04-12-2010 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

NTK/ 12:00

12-04-2010 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-1

NTK/ ST/ KGS/ 12:00

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

जळगाव जिल्ह्यात विविध कारणामुळे केळी बागायतदारांचे झालेले नुकसान

(१) * २६५४ श्री.दिलीपराव सोनवणे, श्री.विक्रम काळे, श्री.वसंतराव खोटरे, प्रा.बी.टी. देशमुख : सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यात वर्षभरात चक्रीवादळ, गारपीट, नैसर्गिक आपत्ती, करपा, बंचीटाप सोडकिडे इ. कारणांमुळे केळी उत्पादक शेतकऱ्यांचे फार नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे होवूनही शेतकऱ्यांना अद्यापपावेतो नुकसान भरपाई मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त ठिकाणच्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई त्वरीत मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणता ठोस निर्णय घेतला आहे,

(४) अद्याप कोणताच निर्णय वा कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

श्री.रणजित कांबळे, डॉ.विजयकुमार गावित यांच्याकरिता : (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) नोव्हेंबर, ०९ मध्ये झालेल्या फळपिकांच्या नुकसानीकरिता मदत देण्यात आली आहे.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये "अंशत: खरे आहे" असे उत्तर दिले आहे. शासनाने नोव्हेंबरमध्ये झालेल्या वादळाच्या संदर्भात केळी उत्पादक शेतक-यांना मदत दिलेली आहे. परंतु दिनांक 11 जानेवारी, 2010 रोजी जी गारपीट झाली, चक्रीवादळ झाले त्याबाबत अद्याप केळी उत्पादक शेतकऱ्यांना मदत मिळालेली नाही. शासनाच्या आताच्या नियमाप्रमाणे दिली जाणारी मदत अत्यंत कमी आहे. एका झाडाला केवळ 2.50 रुपये मदत मिळते. मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करीत आहे. ही मदत वाढवून किमान 20 हजार रुपये प्रती हेक्टर अर्थसहाय्य देण्याचा शासन विचार करील काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सध्याच्या निकषानुसार हेक्टरी 10 हजार रुपये मदत दिली जाते. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, ही मदत वाढवून देण्यात यावी. यासंदर्भात माननीय मदत व पुनर्वसन मंत्री यांच्याकडे बैठक घेऊन त्या बैठकीत यासंबंधी निश्चित विचार करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

12-04-2010 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-2

NTK/ ST/ KGS/

ता.प्र.क्र.2654....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, जळगांव जिल्हयामध्ये वर्षभरात किती वेळा चक्रीवादळ झाले आणि आतापर्यंत किती शेतक-यांना शासनाने मदत दिली आहे ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, जळगांव जिल्हयात 5 वेळा वादळ झाले. नोव्हेंबर महिन्यामध्ये 3,86,016 हेक्टर वरील केळी पिकाचे नुकसान झाले. त्यामुळे 38 लाख 61 हजार रुपयांचे नुकसान झालेले आहे. उर्वरित क्षेत्राबाबतची माहिती महाराष्ट्र रिमोट सेंसिंगकडून मागविली आहे. त्यांच्याकडून माहिती आल्यानंतर संबंधितांना निश्चित मदत केली जाईल.

श्री.दिलीपराव सोनावणे : नोव्हेंबर, 2009 मध्ये झालेल्या नुकसानीकरिता शासनाने मदत दिलेली आहे. परंतु जळगांव जिल्हयात 5 वेळा चक्रीवादळामुळे नुकसान झाले आहे, त्याचे अनेकदा पंचनामे झाले, अनेकदा आश्वासने दिली आहेत. परंतु केळी उत्पादक शेतक-यांना अजूनपर्यंत मदत मिळालेली नाही. हे शेतकरी मदतीपासून वंचित राहिले आहेत. भारतामध्ये केळीचे पीक घेणारा जळगांव जिल्हा क्रमांक एक वर आहे. परंतु अशाप्रकारच्या सातत्याने होणा-या नुकसानीमुळे शेतकरी हे पीक न घेता अन्य पीक घेण्याच्या विचारापर्यंत पोहोचले आहेत. त्यामुळे केळीचे उत्पादन संपुष्टात येण्याची भीती निर्माण झाली आहे. माझा प्रश्न असा आहे की, 5 वेळा नुकसान झालेल्या केळी उत्पादक शेतक-यांना शासन नुकसान भरपाई देणार आहे काय ? चक्रीवादळामुळे केळीचे खोड उन्मळून पडते, ते बाजूला नेऊन टाकण्यासाठी सुध्दा जास्त खर्च येतो. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी म्हटल्याप्रमाणे एकरी 20 हजार रुपये नुकसान भरपाई दिली जाईल काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, महाराष्ट्र रिमोट सेंसिंग ॲप्लीकेशन सेंटरकडून सर्वेक्षणाद्वारे प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे नुकसान भरपाई दिली जाते. त्यांच्याकडून अहवाल मागविला आहे. तो प्राप्त झाल्यानंतर संबंधित शेतक-यांना निश्चित स्वरुपात मदत दिली जाईल.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शेतक-यांना हेक्टरी 10 हजार रुपयाप्रमाणे जी मदत दिली होती त्याप्रमाणे मदत देण्याचा विचार करावा असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. त्याप्रमाणे मदत देण्याचा विचार करण्यात येईल. सनमाननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी आणि सन्माननीय सदस्य श्री. दिलीपराव सोनवणे यांनी विचारल्याप्रमाणे शेत-यांना जास्त मदत करता येईल का यासंदर्भात मदत व पुनर्वसन मंत्र्यांबरोबर बैठक लावून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल.

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील फळ बागायतदारांना द्यावयाची नुकसान भरपाई

(२) * ५०२९ श्री.परशुराम उपरकर, श्री.रामदास कदम, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल परब : सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सन २००८ या सालातील अवेळी पावसामुळे आंबा, काजू पिकांच्या नुकसान भरपाईपोटी शासनाकडून माहे मार्च, २००९ मध्ये २७ कोटीचा निधी सिंधुदुर्ग जिल्ह्याला दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या निर्देशानुसार निधी रोख स्वरुपात न देता बागायतदारांना खते आणि किटकनाशके स्वरुपात देण्याचे कृषि आयुक्तांनी आदेश दिले होते हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, २७ कोटीचा निधी गेले १० महिने पडून राहिला होता हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, १० महिने निधी ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासन कारवाई करणार आहे काय,

(५) असल्यास, त्यातील ५०% निधी रत्नागिरी एमआयडीसीकडे वर्ग केला, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर निधी बागायतदारांना लवकरात लवकर देण्यासाठी शासन उपाययोजना करणार आहे काय ?

श्री.रणजित कांबळे डॉ.विजयकुमार गावित : (१) होय.

(२) केंद्र शासनाच्या निकषाप्रमाणे मदत निविष्ठाच्या स्वरुपात देण्याचे निदेश आहेत.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) ५० टक्के निधी महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाकडे वर्ग केला आहे.

(६) बागायतदारांना निविष्ठा पुरविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री. परशुराम उपरकर : विलंब झालेला नाही असे उत्तरामध्ये नमूद केलेले आहे. मार्चमध्ये निधी उपलब्ध झाला. परंतु त्याचे अद्याप वितरण झालेले नाही. मला आताच मिळालेल्या माहिती नुसार 70 हजार लिटर पैकी फक्त 32 हजार लिटर किटकनाशके आणि फक्त 280 मे. टन खत प्राप्त झालेले आहे. उर्वरित खत केव्हा प्राप्त होईल ? खताचे वाटप शेतक-यांना केव्हा केले जाईल ? बदलते तापमान आणि कोकणामध्ये 35-36 अंशापर्यन्त तापमान गेल्यामुळे आंबा गळून पडायला लागलेला आहे. तेव्हा 2008मध्ये ज्याप्रमाणे मदत करण्यात आली त्याप्रमाणे सन 2009-2010 आणि 2010-2011 या आर्थिक वर्षात आंबा, काजू, जांभूळ आणि रातांबा या फळपिकांच्या बाबतीत शासन नुकसान भरपाई देणार आहे काय ? हेक्टरी 50 हजार रुपये किंवा 500रुपये प्रति झाड याप्रमाणे शासन नुकसान भरपाई देणार आहे काय ? काजूवर पूर्वी 4 टक्के व्हॅट होता तो आता साडेबारा टक्के करण्यात आलेला आहे. हा काजूवरील व्हॅट पूर्वीप्रमाणेच 4 टक्के करण्यात येईल काय ?

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : दिनांक 8.4.2010 पासून खतांचे वाटप सुरु झालेले आहे. मागील आठवड्यात याच विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी 93ची सूचना दिली होती. त्यावेळी उत्तर दिले होते. विलंबाचे कारण हे होते की, कोकण कृषी विद्यापीठाने दोन सूचना केल्या होत्या. ऑरगॅनिक आणि इऑरगॅनिक अशी दोन्ही पकारची खते आणि औषधे देण्याच्या सूचना केलेल्या होत्या. त्यास कास्तकारांनी विरोध केला. फक्त ऑरगॅनिक खते आणि औषधे द्यावीत अशी कास्तकारांनी मागणी केली. तसेच यांचे वाटप तालुकास्तरावर न करता गाव पातळीवरुन सोसायटयाच्या माध्यमातून करावे अशीही त्यांची मागणी होती. 93च्या सूचनेनंतर यासंदर्भात ऑर्डर काढण्यात आली. वितरण चालू झालेले आहे. 15 दिवसात औषधे व खते प्रत्येक कास्तकाराला मिळतील. नुकसान भनपाई वाढवून देणार का असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. यासंदर्भात शासनस्तरावर विचार करण्यात येईल.

श्री. राजन तेली : कोकणातील तापमान वाढल्यामुळे आंबा आणि काजू उत्पादक शेतकरी पूर्णपणे हवालदील झालेला आहे. हा विषय छोटा नाही. त्यामुळे या विषयाबाबत सर्वंकष चर्चा घडवून आणण्यासाठी अल्पकालीन चर्चा द्यावी अशी मी माननीय सभापती महोदय, आपणास विनंती करीत आहे. हा कोकणातील सर्व शेतक-यांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. आंबा आणि काजूच्या दरवर्षी होणा-या उत्पादना पेक्षा 30 टक्के उत्पादन यावर्षी घटलेले आहे. तापमानामुळे आंबा आणि काजूच्या उत्पादनात प्रचंड घट झालेली आहे. तेव्हा याबाबतीत कोकणातील शेतक-यांना शासन कोणती मदत करणार आहे ? या विषयी सदनामध्ये चर्चा घडवून आणावी अशी मी पुनश्च विनंती करतो.

श्री. रणजित कांबळे : कोकणातील सर्व सन्माननीय सदस्यांची माननीय मदत व पुनर्वसन मंत्र्यांबरोबर बैठक घेऊन काही मार्ग काढता येतो का यादृष्टीने प्रयत्न करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : बेदाण्यावर लावलेल्या व्हॅट संबंधात व्यापा-यांनी आपला धंदा पूर्णपणे बंद करुन टाकलेला आहे. माननीय गृहमंत्री यांच्या दबावामुळे की मध्यस्थीमुळे म्हणा, बेदाण्यावरील व्हॅट कमी करण्यात आल्याचे सांगलीमध्ये जाहीर करण्यात आले. काजूवरील व्हॅट वाढविल्यामुळे

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

काजूवर प्रक्रिया करणारे उद्योग बंद करावे लागत आहेत. तेव्हा ज्याप्रमाणे बेदाण्यावरील व्हॅट कमी करण्यात आला त्याप्रमाणे काजूवरील व्हॅट तातडीने कमी करण्याचा निर्णय घेण्यात येईल काय ? काजूवर साडेबावीस टक्के व्हॅट आहे तो 4 टक्क्यावर आणणार काय ?

....नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सदनामध्ये माननीय अर्थमंत्री उपस्थित आहेत व आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक-4 वरील प्रश्न हा वॅट कर प्रणालीच्या अनुषंगाने आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी बेदाण्यावरील वॅटसंबंधीचा प्रश्न उपस्थित केला आहे. बेदाण्यावरील वॅटसंबंधी शासनाने जी सवलत दिली होती ती अर्थसंकल्पीय भाषणामध्ये नमूद केली होती, त्यापेक्षा वेगळा बदल केलेला नाही. त्यामध्ये या क्षणापर्यंत कोणत्याही पध्दतीचा बदल झालेला नाही.

श्री.दिवाकर रावते : आज सांगली जिल्हयाबाबत वृत्तपत्रात जी बातमी प्रसिध्द झाली आहे ती चुकीची आहे का?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी सभागृहात बोलत आहे म्हणजे माझे म्हणणे बरोबर आहे. दुसरा महत्वाचा मुद्दा उपस्थित केला तो काजूवरील वॅटसंबंधीचा होता. काही सन्माननीय लोकप्रतिनिधी मला भेटले व माझ्याशी चर्चा केली त्या अनुषंगाने सरकार निश्चितपणे विचार करेल.

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, काजूवर 12.5 टक्क्याऐवजी 4 टक्के वॅट लावण्यासंबंधीचा प्रश्न गेली दोन-तीन वर्षे सातत्याने या सभागृहात चर्चेला आला आहे. राज्याचे अर्थमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. गोवा राज्यामध्ये काजूवर 12.5 ऐवजी 4 टक्के वॅट आकारला जातो. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये उत्पादित होणाऱ्या काजू बिया प्रक्रियेसाठी गोव्यामध्ये व इतर प्रांतामध्ये पाठविण्यात येतात. काजूवरील 12.5 टक्के वॅट 4 टक्क्यावर आणण्याचा निर्णय शासन तातडीने घेणार आहे काय?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांनी जी भावना व्यक्त केली त्या संदर्भात मी एवढेच सांगू इच्छितो की, काही लोकप्रतिनिधींनी ज्यावेळी माझ्याबरोबर या विषयावर चर्चा केली त्यावेळी ही बाब शासनाच्या निदर्शनास जरुर आणून दिली. याबाबत लवकरात लवकर योग्य तो निर्णय घेतला जाईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सुदैवाने इतक्या वर्षानंतर राज्याला कोकणातील वित्तमंत्री लाभले. ही सुवर्ण संधी आहे. आज सभागृहात हा विषय चर्चेला आलेला आहे. त्यामुळे लवकरात लवकर म्हणण्यापेक्षा आजच निर्णय घ्यायला कोणती अडचण आहे? माननीय

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वित्तमंत्री कोकणातील आहेत. त्यांना वस्तुस्थितीची जाणीव आहे. कोकणातील काजू प्रक्रिया करणारे कारखाने बंद पडले आहेत. हे राज्याला शोभादायक नाही. मी स्वत: आफ्रिकेला जाऊन 200 टन काजू बिया प्रक्रिया करण्यासाठी आमच्या जिल्हयातआणल्या होत्या. काही महिलांना त्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करुन दिला होता. आज अत्यंत वाईट अवस्था निर्माण झालेली आहे. सुदैवाने कोकणातील वित्तमंत्री आम्हाला लाभले आहेत. म्हणून आणखी वाट न पाहता कोकणातील जनतेचा अंत न पाहता आजच निर्णय घ्यावा. काजूवर 4 टक्के वॅट लावण्यापेक्षा तो कायमस्वरुपी रद्द करावा अशी माझी विनंती आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामदास कदम, दिवाकर रावते, ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत शासन निश्चितपणे विचार करीत आहे. पूर्णपणाने कर रद्द करीत असताना इतर राज्यातील व्यापारी त्याचा काही गैरफायदा घेऊ शकतात की काय हाही प्रश्न आहे. आज जो वॅट भरावा लागत असेल त्याची वेगळ्या पध्दतीने नुकसानभरपाई देऊन मदत करता येईल का या संदर्भातील धोरणात्मक निर्णय दोन दिवसात घेतला जाईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, 2008 साली अवेळी पाऊस पडल्यामुळे 2009 मध्ये 27 कोटी रुपयांचा निधी सिंधुदुर्ग जिल्हयाला देण्यात आला. हे 27 कोटी रुपये शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले का? त्यातील किती निधी बँकेमध्ये अद्याप शिल्लक आहे? जो अद्याप शेतकऱ्यांपर्यंत पोहोचू शकला नाही. वस्तू रुपाने मदत करण्यासाठी जो निधी देण्यात आला तो जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या खात्यामध्ये अद्याप पडून आहे ही गोष्ट खरी आहे का?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, वस्तू रुपाने मदतीचे वाटप होते. वाटप करण्यामध्ये विलंब झाला याची कारणे मी सांगितली आहेत. कोकण कृषि विद्यापीठाने ज्या शिफारशी केल्या त्याला कास्तकारांनी विरोध केला होता. गाव पातळीवर मदत उपलब्ध करुन द्यावी असे त्यांनी सांगितले होते. त्यामुळे ट्रान्सपोर्टेशन रेटमध्ये फरक झाल्यामुळे विलंब झाला. 15 मे पर्यंत 100 टक्के कास्तकारांना मदतीचे वाटप होणार आहे.

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, 27 कोटी रुपयांपैकी फक्त 13 कोटी रुपये वापरले गेले असून 14 कोटी रुपये अद्याप अखर्चित आहेत हे खरे आहे काय? 2009-10 आणि 2010-11 या आर्थिक वर्षात आंबा, काजू, जांभूळ, रतांबे या फळ पिकांच्या नुकसानीपोटी आर्थिक मदत दिली जाईल काय?

नंतर डी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 5029.....

श्री. रणजित कांबळे : महोदय, यामध्ये 50 टक्के पेमेंट आपण एमएआयडीसीला केलेले आहे. उर्वरित पेमेंट 15 दिवसात करण्यात येईल. तसेच यासंबंधीची एक बैठक घेऊन त्यातून मार्ग सुध्दा काढण्यात येईल.

सभापती : कोकणातील आंब्याची मोठ्या प्रमाणात गळ झालेली असल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. त्या अनुषंगाने माननीय मंत्री महोदयांनी बैठक आयोजित करावी व यातून मार्ग काढावा. त्याचबरोबर या विषयावर एखादी अल्पकालीन चर्चा घेता येऊ शकते काय याबाबतही विचार केला जाईल.

श्री. रणजित कांबळे : ठीक आहे. आपण निदेश दिल्यानुसार यासंबंधीची बैठक आयोजित करण्यात येईल.

....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीनेने केंद्रीय स्त्रोतामधील वीजेचे नियत वाटप न स्वीकारल्यप्रकरणी करावयाची कारवाई

(3) * 2714 श्री.पांडुरंग फुंडकर, श्री.नितीन गडकरी, श्री.जगदीश गुप्ता : सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने सन 2005-2006 ते सन 2007-2008 या कालावधीत केंद्रीय स्त्रोतामधून मिळणाऱ्या कमी किमतीच्या वीजेचे पूर्ण नियतवाटप उपभोगले नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, यामुळे विद्युत वितरण कंपनीला लघु मुदतीच्या आधारावर महागडया वीजेची खरेदी पीटीसीसकडून करावी लागली व त्यामुळे 374.79 कोटींचा अतिरिक्त खर्च करावा लागला, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, याची कारणे काय आहेत,

(4) असल्यास, अतिरिक्त खर्चास कोण जबाबदार आहे व त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

श्री. विजय वडेट्टीवार, श्री.अजित पवार यांच्याकरिता: (1), (2) व (3)

सन 2005 ते 2008 या कालावधीत केंद्र सरकारच्या कोट्यातून स्वस्त दराने तीन वर्षाकरिता (2005-06, 2006-07, 2007-08) एकूण 39427 दशलक्ष युनिट वीज मिळणार होती, त्यापैकी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने 39277 दशलक्ष युनिट वीज वापरली व त्यातील मागील तीन वर्षातील फरक फक्त 150 दशलक्ष युनिट आहे. त्याची कंपनीच्या एकूण मिळणाऱ्या हिस्साशी तुलना केली असता मागील तीन वर्षाकरिता फारच अल्प म्हणजेच 0.4 टक्क्यापेक्षा कमी आहे. व तो ही केवळ प्रत्यक्षात वीज प्रणालीचे संचलन, संतुलन व शिस्तपालन या कारणास्तव झाला आहे म्हणून महागडी वीज खरेदी करण्यासाठी रु. 374.79 कोटीचा अतिरिक्त खर्च करावा लागला, हे विधान संयुक्तिक नाही.

तसेच वापरात न आणलेल्या वरीलप्रमाणे वीजेचा हिस्सा हा त्यावेळेच्या परिस्थितीमुळे उपभोगता आला नाही. त्याची कारणे पुढील प्रमाणे आहेत.

1) वातावरणात होणाऱ्या अनपेक्षित बदलानुसार वीजेच्या मागणीत बदल होणे.

2) प्रत्यक्ष वेळेच्या प्रणालीची वारंवारता प्रमाणे मागणीत बदल होणे.

3) वीजेची उपलब्धता व गरज यानुसार मागणी केली जाणे.

4) विद्युत विनियमनाच्या अधिन राहून मागणीत फेरबदल.

5) प्रणाली शिस्तपालन व प्रणाली संचलनानुसार मागणीतील चढ, उतार इत्यादी.

6) ग्राहकांना होणारा त्रास वाचवण्यासाठी व मागणी व पुरवठा यामधील तफावत कमी करण्यासाठी व्यापाऱ्यांकडून वीज खरेदी करावी लागते व कराराप्रमाणे ही वीज खरेदी न केल्यास दंड भरावा लागतो. तसेच ही मागणी रद्द करण्याकरिता व्यपाऱ्यांना 2 दिवस अगोदर वीज विनियमानुसार कळवावे लागते. त्यामुळे केंद्रीय स्त्रोतांमार्फत मिळणाऱ्या वीजेचा हिस्सा वीज प्रणालीची स्थिती पाहून 1-1/2 तासांच्या अंतराने कमी किंवा जास्त करता येतो. परंतु व्यापाऱ्यांकडील वीज 1-1/2 तासांच्या अंतराने वरील वीज विनियमाच्या कारणामुळे कमी करता येत नाही तसेच बऱ्याचदा प्रणालीच्या परिस्थितीमुळे अतिरिक्त वीज विकत घ्यावीच लागते व प्रणाली शिस्तपालनाचा हा अविभाज्य भाग आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, "महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने सन 2005-2006 ते सन 2007-2008 या कालावधीत केंद्रीय स्त्रोतामधून मिळणाऱ्या कमी किमतीच्या विजेचे पूर्ण नियतवाटप उपभोगले नाही," हे खरे आहे काय ? असा प्रश्न विचारला असता त्याला मंत्री महोदयांनी " सन 2005 ते 2008 या कालावधीत केंद्र सरकारच्या कोट्यातून स्वस्त दराने तीन वर्षाकरिता (2005-06, 2006-07, 2007-08) एकूण 39427 दशलक्ष युनिट वीज मिळणार होती, त्यापैकी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने 39277 दशलक्ष युनिट वीज वापरली व त्यातील मागील तीन वर्षातील फरक फक्त 150 दशलक्ष युनिट आहे. त्याची कंपनीच्या एकूण मिळणाऱ्या हिस्साशी तुलना केली असता मागील तीन वर्षाकरिता फारच अल्प म्हणजेच 0.4 टक्क्यापेक्षा कमी आहे." असे उत्तर दिलेले आहे. माझ्याकडे भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचाअहवाल असून त्यात त्यांनी सन 2005 ते 2008 या कालावधीत 1661.90 दशलक्ष युनिट वीज कमी घेतली असे म्हटले आहे. शासन मात्र फक्त 150 दशलक्ष युनिट एवढीच वीज कमी घेतल्याचे सांगत आहे. जर कंपनीने केंद्रीय स्त्रोतामार्फत नियत वाटप वीज पूर्णपणे घेतली असती तर या कंपनीला 374.79 कोटी एवढा विजेवरील खर्च वाचविणे शक्य झाले असते. परंतु कंपनीने तसे न करता जास्त खर्च केलेला आहे. यातील कोणती वस्तुस्थिती खरी आहे ?

श्री. विजय वडेट्टीवार : महोदय, केंद्राकडून जी वीज आपल्याला मिळते ती ठरविलेल्या टक्केवारीनुसार मिळते. कारण एखाद्या कंपनीकडून आपल्याला 33 टक्के वीज मिळायला हवी होती तर ती 32.45 टक्के एवढी वीज मिळाली. अशा प्रकारे मूळ मागणी जी असते ती टक्केवारीनुसार असते आणि पुरवठा मात्र निर्मितीनुसार केला जातो, त्यामुळे ही तफावत दिसून येत आहे. अशा प्रकारे या तीन वर्षात 4 टक्के वीज कमी मिळाली त्यामुळे 31.45 कोटीचा खर्च झाला आणि आपण जी वीज खरेदी केली त्यामध्ये 69871 दशलक्ष युनिट एवढी वीज खरेदी केली ही तफावत मोठी आहे. एवढ्याने भागणार नाही परंतु जो नियम आहे तो संयुक्तिक यासाठी नाही की, आपल्या मागणीनुसार विजेचा पुरवठा केला जात नाही तर तो विजेच्या निर्मितीप्रमाणे करण्यात येतो म्हणून ही तफावत दिसून येत आहे.....

श्री. दिवाकर रावते : महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारलेला आहे. माननीय मंत्री महोदय मात्र गोल-गोल उत्तर देत आहेत.....

सभापती : प्रथम मंत्री महोदयांना आपले उत्तर पूर्ण करु द्यावे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, आपल्याला वीज निर्मितीच्या तुलनेत कमी वीज मिळाली तसेच मागणीच्या तुलनेत वीज कमी मिळाली आहे, ही वस्तुस्थिती आहे. केएसटीपीएस मधून आपल्याला 33 टक्के वीज मिळावयास पाहिजे होती परंतु प्रत्यक्षात त्यांच्याकडून 32.45 टक्के वीज मिळालेली आहे. व्हीएसटीपीएस मधून 38 टक्के वीज मिळावयास पाहिजे होती परंतु त्यांच्याकडून 36.62 टक्के वीज मिळालेली आहे. आपल्याला ज्यांच्याकडून वीज मिळत असते ती आपल्याला फक्त पॉईंटमध्ये कमी मिळालेली आहे. आपल्याला फक्त .4 टक्के वीज कमी मिळालेली आहे. आपल्याला जी .4 टक्के वीज कमी मिळालेली आहे ती वीज निर्मिती कमी झाल्यामुळे मिळालेली आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. फुडकर साहेब सांगतात की, वीज कमी मिळालेली आहे. आपल्याला वीज कमी मिळालेली आहे, हे सत्य आहे परंतु आपल्याला केवळ .4 टक्के वीज कमी मिळालेली आहे. आपल्याला एकूण 150 दशलक्ष युनिट वीज कमी मिळालेली असून आपण 69 दक्षलक्ष युनिट वीज खरेदी केलेली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सीएजीचा रिपोर्ट सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेला आहे. त्यामुळे या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदय, सीएजीच्या रिपोर्टच्या विरुध्द माहिती देत आहेत. त्यामुळे सीएजीचा रिपोर्ट चुकीचा आहे, असे माननीय मंत्रीमहोदयांनी येथे जाहीर करुन टाकावे. आमच्या हातात लेखा परीक्षणाचा जो अहवाल आहे त्यामध्ये सरकारने 2005 ते 2008 या काळात 1661.9 दक्षलक्ष युनिट वीज कमी घेण्यात आलेली आहे असे म्हटलेले आहे आणि या ठिकाणी मंत्रीमहोदय सांगतात की, केवळ 150 दक्षलक्ष युनिट कमी घेण्यात आलेली आहे त्यामुळे 374.79 कोटी रुपयांचा खर्च यावर जास्त झालेला आहे त्यामुळे आपण हा खर्च वाचवू शकलो असतो असे रिपोर्टमध्ये म्हटल्ेले आहे. त्यामुळे रिपोर्टच्या विरुध्द माहिती आपण कशी काय देऊ शकता ?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचेही म्हणणे खरे आहे आणि मी जे सांगतो आहे ते सुध्दा खरे आहे. राज्याच्या वाटयाची जेवढी वीज मिळावयास पाहिजे होती त्या तुलनेत वीज मिळाली नाही, हे बरोबर आहे. परंतु प्रत्यक्ष वीज निर्माण झाल्यानंतर आम्हाला जी वीज दिली गेली त्यामध्ये केवळ 150 दशलक्ष युनिटचीच तफावत आहे ही वस्तुस्थिती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सीएजी रिपोर्ट खरा आहे की, माननीय मंत्रीमहोदयांचे म्हणणे खरे आहे ? केंद्राने वीज दिली नाही असे सीएजीचे म्हणणे नाही. केंद्राची वीज एमएसईबीने कमी घेतली असे सीएजीचे म्हणणे आहे. केंद्राच्या कोटयातील वीज तुम्ही कमी वापरली आणि कमी पडलेली वीज बाहेरुन जास्त दराने घेतली व 374 कोटी रुपयांचा फटका वीज बोर्डाला बसला असे आमचे म्हणणे आहे. त्यामुळे सीएजीचा रिपोर्ट खोटा आहे असे माननीय मंत्र्यांनी सांगावे.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय,मागणीच्या तुलनेत आपल्याला 150 दक्षलक्ष युनिट वीज कमी मिळाली आहे परंतु आपण 69,800 युनीट वीज घेतलेली आहे. राज्याची विजेची मागणी मोठया प्रमाणात होती ही वस्तुस्थिती आहे. राज्यानी आपल्या वाटयाच्या विजेची मागणी केली होती. राज्याने राज्याच्या वाटयाच्या विजेची मागणी केल्यानंतर मागील 3 वर्षात केंद्राकडून 0.4 टक्के वीज कमी मिळालेली असून आपल्याला अत्यल्प प्रमाणात कमी वीज मिळालेली आहे. मुंबईमध्ये पाऊस पडला की, सर्व ए.सी.बंद होतात, खानदेशात पाऊस पडला की, त्या ठिकाणच्या विजेची मागणी एकदम कमी होते अशा वेळेस आपल्याला वीज उपलब्ध झाली ती वातावरणाच्या बदलानुसार कमी प्राप्त झालेली आहे ही वस्तुस्थिती आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, वारंवारता प्रमाणे मागणीत बदल होणे याची माहिती मंत्रीमहोदयांनी द्यावी तसेच सीएजीच्या रिपोर्टमध्ये असे म्हटले आहे की, 85 पैसे प्रती युनिट या दराने आपल्याला केंद्राकडून वीज मिळत असतांना आपण 2.92 रुपये प्रती युनिट तसेच 5.18 रुपये प्रती युनिटने महागडी वीज खरेदी केलेली आहे. म्हणजे आपण केंद्राची स्वस्त दरातील 1668 युनिट वीज घेतलेली नाही.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2714 .....

श्री.दिवाकर रावते.....

ग्राहकांना होणारा त्रास वाचवण्यासाठी व मागणी व पुरवठा यामधील तफावत कमी करण्यासाठी व्यापाऱ्यांकडून वीज खरेदी करावी लागते. आपल्याला केंद्र शासनाची वीज मिळाली असताना देखील आपण व्यापाऱ्यांकडून वीज घेतलेली आहे. केंद्र शासनाची 85 पैसै युनिटची वीज आपण बाजूला ठेवली. कराराप्रमाणे ही वीज खरेदी न केल्यास दंड भरावा लागतो. तसेच ही मागणी रद्द करण्याकरिता व्यापाऱ्यांना 2 दिवस अगोदर वीज विनियमानुसार कळवावे लागते. त्यामुळे केंद्रीय स्रोतांमार्फत मिळणाऱ्या विजेचा हिस्सा वीज प्रणालीची स्थिती पाहून दीड तासांच्या अंतराने कमी किंवा जास्त करता येतो. परंतु, व्यापाऱ्यांकडील वीज दीड तासांच्या अंतराने वरील वीज विनियमाच्या कारणामुळे कमी करता येत नाही. त्यामुळे आपल्या लेखी उत्तरात नमूद करण्यात आले आहे की, व्यापाऱ्यांशी केलेल्या कराराप्रमाणे पाच रूपये किंमतीची वीज घेतली. केंद्राची 85 पैशाची वीज घेता आली नाही. असा आपल्या उत्तराचा सरळ सरळ अर्थ आहे. त्यामुळे शासनाला रूपये 374.79 कोटी जास्त द्यावे लागले. सदर अधिकची रक्कम केवळ करारामुळे द्यावी लागली आहे. आपण जर केंद्राची 85 पैशाची वीज घेतली असती आणि व्यापाऱ्यांशी केलेल्या कराराप्रमाणे वीज घेतली नसती तर एकूण किती दंड भरावा लागला असता ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, येथे सन्माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले आहे. केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या विजेची टक्केवारी ठरलेली असते. केंद्र शासनाकडून वीज मिळत असताना त्यांच्याकडे किती विजेचे उत्पादन होते त्याप्रमाणात आपल्याला वीज उपलब्ध होते. सन्माननीय राज्यमंत्र्यांनी सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेब व श्री.फुंडकर साहेब यांच्या प्रश्नाला उत्तर देताना हेच सांगितले की, आमची दरवर्षीप्रमाणे अधिकची मागणी होती. परंतु, केंद्राकडे जेवढी वीज उपलब्ध होती त्याप्रमाणात त्यांनी आपल्याला वीज उपलब्ध करून दिली. सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी जो प्रश्न विचारला त्याचे उत्तर लेखी स्वरूपात दिलेले आहे. ज्यावेळी केंद्र शासनाकडून वीज कमी मिळते, राज्याच्या विजेच्या उत्पादनात कमतरता येते त्यावेळी विजेची तूट भरून काढण्यासाठी खाजगी व्यापाऱ्यांकडून आपण वीज घेत असतो. खाजगी व्यापाऱ्यांबरोबर आपण विजेची जेवढी गरज लागणार आहे, त्यानुसार करार करीत असतो. अशी वीज घेणे गरजेचे होते हे माननीय राज्यमंत्री महोदयांनी नमूद केले आहे.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2714 .....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, लेखी उत्तराच्या अनुक्रमांक 6 मध्ये ग्राहकांना होणारा त्रास वाचवण्यासाठी, व्यापाऱ्यांना 2 दिवस अगोदर कळवावे लागते असे नमूद केले आहे. त्यामुळे हे लेखी उत्तर किती खरे आहे ? सभापती महोदय, मी येथे 3 उपप्रश्न विचारणार आहे. स्वस्त वीज मिळत असताना महाग वीज घेतल्यामुळे रूपये 374.79 कोटीचा फटका आपल्याला बसला आहे. करार करताना आपण पळवाटा ठेवल्या आहेत. त्यामुळे 31.38 कोटी रूपये सदोष करार केल्यामुळे 48.72 कोटी रूपये रोखीने जमाबंदी केली नाही म्हणून 17.49 कोटी रूपये बिन व्याजी डिपॉझिट ठेवल्यामुळे 3.80 कोटी रूपये भारनियमनाचे नियोजन न केल्यामुळे 96 कोटी रूपये बिलिंग चार्जेस वसूल न केल्यामुळे 4.8 कोटी रूपये असे एकूण 576 कोटी रूपये वीज कंपनीचे नुकसान झाले हे खरे आहे काय ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, महागडी वीज खरेदी करण्यात आली असे सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे म्हणणे आहे. पाच रूपये दराने वीज खरेदी केली असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. पण तसे नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, न्युक्लिअर पॉवर कडून दोन रूपये 3 पैशाने देखील वीज खरेदी केलेली आहे. राज्यात वीज निर्मिती कमी झाली. त्याला अनेक कारणे आहेत. अपुरा पाऊस हे देखील महत्त्वाचे कारण आहे. ज्या ज्या वेळी अतिरिक्त विजेची मागणी आली त्या त्यावेळी आपण वीज खरेदी केलेली आहे. ही पद्धत अनेक राज्ये अवलंबितात. महाराष्ट्र राज्य असे करते असे नाही. देशातील अनेक राज्यांना उन्हाळ्यामध्ये त्यांच्या गरजेनुसार अतिरिक्त वीज खरेदी करावी लागते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, 85 पैशाने केंद्र शासनाकडून वीज मिळत असताना शासनाने खाजगी व्यापाऱ्यांकडून 5 रूपये दराने वीज का खरेदी केली आहे ?

...3

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, कोणत्या कंपनीकडून किती दराने वीज खरेदी करण्यात आली, हे मी आपल्याला वाचून दाखवितो. महानिर्मितीकडून 194 पैसे दराने, एनपीटीसी कडून 226 पैशाने न्युक्लिअर पॉवरकडून 203 पैशाने, रत्नागिरी पॉवर कंपनीकडून 308 पैशाने, सरदार सरोवर, पेंच प्रकल्प, दॅटसन असेल यांच्याकडून 205 पैशापासून 500 पैशापर्यंतच्या दराने वीज खरेदी केली आहे. त्यावेळी जेवढी आवश्यकता होती त्याप्रमाणात वीज खरेदी करण्यात आली आहे. राज्यातील जनतेची मागणी लक्षात घेऊन वीज खरेदी केली आहे. वीज कमी उपलब्ध झाल्यामुळे जाणूनबुजून जास्त दराने वीज खरेदी केली असे म्हणणे सयुक्तिक नाही, असे मला येथे नमूद करावयाचे आहे.

.....

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यात वॅट कर प्रणालीबाबत वित्त विभागने जारी केलेली श्वेतपत्रिका

(४) * ५०१८ श्री.रामदास कदम, डॉ.दिपक सावंत, श्री.किरण पावसकर, श्री.परशुराम उपरकर : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वॅटची प्रत्यक्ष अंमलबजावणी माहे एप्रिल, २००५ मध्ये सुरु असतांना पहिल्या वर्षी महसूलात सुमारे ४२१ टक्के वाढ झाली व त्यानंतर विक्रिकराच्या महसूलात चिंताजनक वाढ खुंटली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००५ मध्ये वॅट लागू झाला त्यावेळी नोंदणी झालेल्या व्यापाऱ्यांची संख्या अचानक वाढली व त्यानंतरही ही संख्या वाढणे जरुरीचे असतांना विक्रिकर नोंदणी व्यापाऱ्यांच्या संख्येत प्रचंड घट झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २००५-२००६ ते २००८-२००९ याकाळात अनुक्रमे ४२,३०,२२ व २३ हजार इतकी व्यापाऱ्यांची नोंद झाली परंतु शासनाच्या महसूलात अपेक्षित वाढ झाली नाही असे वित्त विभागाने जारी केलेल्या श्वेतपत्रिकेत नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, टॅक्स रिटर्न प्री-ऑडिट न करता तसेच बँक गॅरटी न घेता मोठया प्रमाणावर कोटयावधी रुपयांचे व्यापाऱ्यांना परतावे दिल्याने शासनाचे सुमारे १२० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचेही लेखा परिक्षण अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, वॅटची महसूली घट कशामुळे झाली याबाबतची चौकशी शासन करणार आहे काय ?

श्री.सुनील तटकरे : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

नंतरच्या वर्षात नवीन नोंदणीधारकांच्या संख्येत वाढ आहे पण पहिल्या वर्षात एवढी वाढ नाही.

(३) अशी कोणतीही श्वेतपत्रिका शासनाने जारी केली नाही.

(४) हे खरे नाही.

(५) लागू नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय,२००२ साली वॅटचा कायदा लागू झाला आणि त्याची अंमलबजावणी २००५ पासून करण्यात आली होती. पहिल्या वर्षी मोठया प्रमाणावर व्यापा-याचे अर्ज आले होते मात्र पहिल्या वर्षी वॅट करामुळे महसूलात वाढ झाली होती आणि त्यानंतरच्या वर्षी ही वाढ कमी कमी होत गेली. या संदर्भात माझ्याकडे जी माहिती आहे त्या नुसार विक्रीकर विभागाने वेगवेगळी परिपत्रके काढली होती. व्यापा-यांनी भरलेल्या विक्रीकरा पैकी ९० टक्के परतावा कोणतीही लेखा तपासणी न करता द्यावी अशा प्रकारचा उल्लेख त्या परिपत्रकात करण्यात आला होता त्याचा फायदा घेऊन संबधित अधिकारी व्यापा-यांना मोठया प्रमाणावर परतावा देत आहेत व त्यामुळे दोन हजार कोटी रुपयांचे महसुलाचे नुकसान झाले होते हे खरे आहे काय ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, ही बाब खरी नाही.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.५०१८..

श्री.अरुण गुजराथी : राज्याचे ५० टक्के उत्पन्न वॅटमधून मिळते. आर्थिक पहाणीमध्ये या वर्षाचे अंदाजित उत्पन्न ९०० ते १००० कोटी रुपयांनी कमी दाखविले गले. वृत्तपत्रात मात्र वॅट वाढला आहे अशा प्रकारच्या बातम्या प्रसिध्द झाल्या आहेत. तेव्हा नेमका किती वॅट वाढला आहे आणि दर वर्षी किती टक्केवारीने वॅट वाढला आहे .? २००५-२००६ आणि २००६-२००७ मध्ये वॅटची जी टक्केवारी होती ती टक्केवारी २००८-२००९ आणि २००९-२०१० सालामध्ये आहे काय ?

श्री.सुनील तटकरे :सभापती महोदय, मूल्यावर्धित कर प्रणाली २००५ -२००६ सालापासून लागू झाली होती. २००५-२००६ मध्ये राज्याची कर वसुली २२ हजार ४६४ कोटी रुपये , २००६-२००७ मध्ये २७ हजार ५९४ कोटी रुपये, २००७-२००८ साली ३१ हजार २१४ कोटी रुपये , २००८-२००९ मध्ये ३४ हजार ३०७ कोटी रुपये आणि ३१ मार्च २०१० पर्यंत ३६ हजार ४५० कोटी रुपयापर्यंत कराची वसुली झालेली आहे अशा प्रकारे दर वर्षी कर वसुलीत चढत्या क्रमाने वाढ झालेली आहे.

श्री.अरुण गुजराथी : टक्केवारी कमी झालेली आहे.

श्री.सुनील तटकरे : जागतिक मंदीचे सावट आल्यामुळे अपेक्षेप्रमाणे वसुली होईल किंवा नाही याबद्दल साशंकता होती. परंतु २००८-२००९ आणि २००९-२०१० या दोन्ही वर्षाची कर वसुली जर आपण पाहिली तर आपल्याला असे दिसून येईल की, कर वसुलीत फार मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, विभागाकडून अनेक परिपत्रके काढण्यात आली होती, व्यापा-यांनी भरलेल्या विक्रीकरापैकी ९० टक्के परतावे कोणतीही लेखा तपासणी न करता द्यावेत असे एका परिपत्रकात म्हटलेले आहे. त्याचा गैर फायदा घेऊन व्यापा-यांकडून पैसे घेऊन संबंधित अधिकारी व्यापा-यांना परतावा देत असतात. या पध्दतीमध्ये बदल तात्काळ करण्यात येणार आहे काय. ? पालघर येथील प्रकरण शासनाला माहीत असून अशा प्रकारे भ्रष्टाचार करणा-या अधिकाऱ्याला पकडले आहे. काही अधिकारी मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार करतात हे यावरुन सिध्द झालेले आहे. तेव्हा या पध्दतीमध्ये तात्काळ बदल करण्यात येणार आहे काय ? यानंतर मला दुसरा प्रश्न विचारावयाचा आहे.राज्याच्या आर्थिक पहाणीमध्ये जी आकडेवारी देण्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आलेली आहे. त्यानुसार २००५ साली वॅटची थकबाकी ८६ हजार ४४६ कोटी रुपयांची होती आणि २००९ साली वॅटची थकबाकी २९ हजार ४५७ कोटी रुपयांची होती हे खरे आहे काय ? कोणत्या कारणामुळे ही थकबाकी वाढली होती ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मूल्यावर्धित कर प्रणाली सुरु झाल्यानंतर आणि संगणकीय प्रक्रिया चालू असतांना व्यापा-यांना सुलभपणे परतावा मिळावा म्हणून कोणत्याही प्रकारची वित्तीय हानी न होता परतावे देण्यासंबधी काही परिपत्रके काढली होते. या संदर्भात दिनांक १२.१.२००७ रोजी पहिले परिपत्रक काढले होते आणि दिनांक १५.१.२००७ रोजी दुसरे अशा प्रकारे वेगवेगळी परिपत्रके काढली असून ती परिपत्रके मी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास तयार आहे.या परिपत्रकानुसार प्राथमिक तपासणी करुन, डेक्स ऑडिट करुन त्याच्या विवरणपत्राची तपासणी केल्यानंतरच परतावे दिले गेले आहेत.....

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.व्र.क्र. 5018....

श्री. सुनील तटकरे...

आणि म्हणून यापुढील कालावधीमध्ये शासनाच्या महसूलाची हानी होऊ नये म्हणून बँक गॅरंटी घेऊन परतावा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. माननीय सदस्यांनी सांगितलेली बाब तपासून घेऊन आवश्यकता वाटल्यास योग्य तो बदल केला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मौजे मस्साजोग (ता.केज,जि.बीड) येथील शेतकऱ्यांच्या

पिकांना पाणी देण्याबाबत

(५) * ३९२७ श्रीमती उषाताई दराडे : सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मस्साजोग (ता.केज,जि.बीड) येथील तलावाच्या गेटचे रॉड कापल्याने तेथील शेतकऱ्यांची पिके पाण्याविना वाळून जात असल्याने शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दिनांक ४ फेब्रुवारी, २०१० रोजी वा त्या सुमारास सामुहिक आत्महत्या करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर गावातील शेतकऱ्यांच्या पिकांना पाणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, सदर शेतकऱ्यांच्या पिकाला पाणी देणेबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विजय वडेट्टीवार, श्री.अजित पवार यांच्याकरिता : (१) होय.

(२) होय.

(३) दिनांक १९.०१.२०१० रोजी तलावाचे सिंचना करिता कालव्यात पाणी सोडण्याची कार्यवाही करण्यात येत असतांना कालवा मुख्य गेटचा रॉड अर्धवट तोडलेला असल्याचे निदर्शनास आले. रॉड दुरुस्तीचे काम करुन घेऊन दिनांक १-२-२०१० रोजी कालव्यात मुदतीत सिंचनासाठी पाणी सोडण्यात आले व मागणी प्रमाणे सिंचन करण्यात आले.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, दि.१.२.२०१० रोजी सिंचनासाठी पाणी सोडण्यात आले व मागणीप्रमाणे सिंचन करण्यात आले याबद्दल मी प्रथमत: शासनाचे आभार मानते. माझा प्रश्न असा आहे की, मुख्य गेटचा रॉड अर्धवट तोडण्यात आला आहे. हा रॉड कुणी, कशासाठी तोडला? रॉड तोडणाऱ्याविरुध्द शासन काय कारवाई करणार आहे?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, रॉड तोडल्याबद्दल शासनाने अजूनही पोलिसांकडे तक्रार केलेली नाही. याचे कारण रॉड तोडणारे शेतकरी आहेत. ज्यावेळी पाण्याच्या प्रश्नावर छोटे छोटे वाद होत असतात, त्यावेळी शासनाकडून कोणत्याही प्रकारची कारवाई करावी असे शासनाचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/

ता.प्र.क्र. ३९२७...

श्री.विजय वडेट्टीवार....

मत नाही. त्यामुळे शासनाने तशाप्रकारची भूमिका घेतली आहे. आणि त्यामुळे दि.१९.०१.२०१० रोजी रॉड तोडल्याचे निदर्शनास आल्यानंतर दि.३०.०१.२०१० रोजी नवीन रॉडची पूर्तता करुन गेट बसविण्यात आला. आंदोलनकर्त्यांनी १ फेब्रुवारीची मुदत दिली होती. त्यामुळे १ फेब्रुवारीला पाणी पुरवठा सुरु केल्यामुळे शेतकऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची शासनाने दक्षता घेतली. मुदतीच्या आत पाणी पुरवठा न झाल्यास आत्मदहन करण्याची आंदोलनकर्त्यांनी धमकी दिली होती. त्यामुळे मुदतीच्या आत शासनाने कारवाई पूर्ण केली आहे. आणि आंदोलनकर्त्यांना आत्मदहनापासून परावृत्त करण्यासाठी अधिकाऱ्यांनी पोलीस स्टेशनमध्ये बैठक घेऊन या वादावर पडदा टाकला आहे.

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यात लागू करावयाचा नवीन वस्तु व सेवा कायदा

(६) * ५२१८ श्री.सुभाष चव्हाण, श्री.सय्यद ज़मा, श्री.राजन तेली : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १ एप्रिल, २०१० पासून नवा वस्तु व सेवा कायदा लागु करण्याची प्रक्रिया विक्रीकर विभागाने सुरु केली आहे, पुर्वीच्या वॅट कायद्यामुळे झालेला घोळ अद्याप निस्तरण्यात आलेला नाही. वॅटमुळे महसुलात वाढ होण्याऐवजी घट झाल्याचा ठपका सरकारी लेखा परिक्षण अहवालातच ठेवण्यात आला आहे, असे माहे जानेवारी, २०१० दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबतीत काही धोरणात्मक निर्णय घेण्याचे ठरविले आहे काय,

(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,

(४) सदर तपशील उपलब्ध नसल्यास त्यामागील विलंबनाची कारणे काय आहेत ?

श्री.सुनील तटकरे : (१) हे खरे नाही.

(२) लागू नाही.

(३) लागू नाही.

(४) लागू नाही.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, लेखा परिक्षण अहवालामध्ये म्हटल्याप्रमाणे विक्री कराचा परतावा दिल्यामुळे राज्याच्या महसूलामध्ये घट झाली आहे काय? खरे असल्यास किती कोटींची घट झाली आहे? दुसरा प्रश्न असा की, वॅटमुळे महसूली उत्पन्नामध्ये अधिक घट झाली आहे की, वाढ झाली आहे?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, लेखा परीक्षण अहवालामध्ये सन २००२-०३, २००३-०४, २००४-०५ या कालावधीतील जमा महसूलाची आकडेवारी मोटार स्पीरीट कराची जमा वसूली सोडून आहे. परंतु सन २००५-६ २००६-०७, २००७-०८ या कालावधीकरिता नमूद केलेली जमा महसूलाची आकडेवारी ही मोटार स्पीरीट कराच्या महसूलासहीत आहे. आणि म्हणूनच त्या आकडेवारीमध्ये २००२-०३ मध्ये वॅट लागू होण्यापूर्वी आपल्या राज्याचा महसूली कर १३७७४ कोटी रुपयांचा होता. त्यामध्ये वाढ झाली आहे, सन २००३-०४ मध्ये वाढ झाली आहे. आणि वॅट लागू झाल्यानंतर एकंदर जमा महसूल टप्प्या-टप्प्याने वाढत गेला. त्याप्रमाणे सन २००५-०६ मध्ये १९४७६

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ५२१८...

श्री. सुनील तटकरे...

कोटी, २००६-०७ मध्ये २३८७५ कोटी, आणि २००७-०८ मध्ये २६५६१ कोटी अशी वाढ होत गेली. या सर्व कोष्टकांचे आपण अवलोकन केले तर या महसूलामध्ये कोणतीही घट झाली नसून टक्केवारीमध्ये वाढ झाली आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सांगली जिल्ह्यातील वसंतदादा शासकीय रुग्णालयाच्या स्थलांतराबाबत नेमण्यात आलेल्या समितीने दिलेले निदेश

(७) * ४८०७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष चव्हाण, श्रीमती मधु जैन, श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील, प्रा.सुरेश नवले : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील वसंतदादा शासकीय रुग्णालयाच्या स्थलांतराबाबत नेमण्यात आलेल्या समितीने दोषींवर कारवाई करण्याचे निदेश देण्यात आल्याचे सह संचालक, वैद्यकीय शिक्षण विभाग यांनी दिनांक ९ जानेवारी, २०१० रोजी वा त्या सुमारास जाहीर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड, डॉ.विजयकुमार गावीत यांच्याकरिता : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, डॉ. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीने आपला अहवाल शासनाला सादर केला. त्या अहवालामध्ये कोणत्या शिफारशी करण्यात आल्या आहेत? आणि त्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली आहे? याची माहिती मंत्रिमहोदय देतील काय?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, डॉ. कुलकर्णी व डॉ. गोडबोले यांच्या नेमण्यात आलेल्या समितीने आपला अहवाल शासनाला दिला आहे. त्यामध्ये ६ रुग्ण दगावले होते, त्याबाबतची माहिती देण्यात आली आहे. त्या ६ रुग्णांपैकी २ बाल रुग्ण होते. त्यापैकी १ प्रिमॅच्युअर डिलिव्हरीचा होता आणि दुसरा बालरुग्ण हा काविळ आणि न्यूमोनिया झालेला होता. त्यामुळे ते मृत झाले होते. त्याशिवाय दोन महिला रुग्ण ९८ टक्के भाजल्यामुळे त्या अत्यवस्थ होत्या त्याबाबतची माहिती देण्यात आली आहे. त्याशिवाय एका रुग्णाला कुत्रा चावल्यामुळे तो रॅबिजने आजारी होता, तो अत्यवस्थ होता. एका रुग्णाला क्षय झाल्यामुळे तोही अत्यवस्थ होता. त्याशिवाय रंगा कांबळे नावाच्या रुग्णाला रक्ताच्या उलटया झाल्यामुळे तो दगावला असल्याचे त्या अहवालामध्ये नमूद करण्यात आले आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4807 . . . .

श्रीमती वर्षा गायकवाड . . . .

त्यांनी दि.02-12-2008 ते दि.31-12-2008 च्या कालावधीमध्ये सांगलीमध्ये मरण पावलेल्या रुग्णाचे वरील अहवालावरील सविस्तर विवेचन पहाता सदर रुग्ण हे गंभीर आजाराने त्रस्त होते व ते अत्यावस्थ होते आणि त्यामुळेच त्यांचा मृत्यू झाला असे त्यांनी अहवालामध्ये म्हटलेले आहे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, सांगली येथील वसंतदादा शासकीय रुग्णालयाच्या स्थलांतराबाबत शासनाने कोणता निर्णय घेतलेला आहे किंवा याबाबत समितीने कोणता अहवाल सादर केलेला आहे ?

श्रीमती वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारलेला आहे, त्याबाबतीत अगोदरच उत्तर दिलेले आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी पद्मभूषण वसंतदादा पाटील रुग्णालयाच्या स्थलांतराबाबत पहिला प्रश्न विचारला आहे. त्याबाबत सांगावयाचे तर आम्ही सार्वजनिक आरोग्य विभागाचे डेप्युटी डायरेक्टर यांना याबाबत अहवाल तयार करण्यास सांगितले आहे. या विभागामार्फत अहवाल तयार झाल्यानंतर वैद्यकीय संचालनालयातर्फे याबाबत चर्चा होऊन याबाबत पूर्णपणे विचार करण्यात येईल.

. . . .आय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील पाली-भुतिवली येथील धरणाच्या कामाबाबत

(8) * 4355 श्री.जयंत पाटील, श्री.कपिल पाटील : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) पाली-भुतिवली येथील सन 1982 सालापासून सुरु असलेल्या धरणाचे काम ठेकेदार कंपनीने सन 1994 पासून रॉयल्टी (स्वामित्व शुल्क) महसूल खात्याकडे जमा न केल्याने महसूल खात्याने ठेकेदार कंपनीच्या एल.ॲण्ड टी कंपनीचे कोमात्सू मॉडेल 130, क्रॉंकिट मिक्सर आदी यंत्रसामुग्रीला सील ठोकले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, महसूल खात्याच्या या कार्यवाहीमुळे धरणाचे काम बंद पडले जाणार आहे काय,

(3) असल्यास, शासन याबाबत कोणती कार्यवाही करणार आहे ?

श्री.विजय वडेट्टीवार, श्री.अजित पवार यांच्याकरिता : (1) होय.

(2) नाही.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, कर्जत तालुक्यातील पाली-भुतिवली येथील धरणाच्या कामाची कॉन्ट्रॅक्टरने रॉयल्टी भरली नाही म्हणून त्याची मशिनरी सील करण्यात आली आहे असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे. माझा प्रश्न असा आहे की, रॉयल्टीची रक्कम किती आहे ? तसेच ठेकेदाराने रॉयल्टी भरली नाही म्हणून त्याला ब्लॅक लिस्ट करणार आहात काय ? या कंत्राटदाराला आतापर्यंत किती बिल अदा करण्यात आले आहे ? तसेच त्याने रॉयल्टीची रक्कम भरल्याबाबतची पावती सादर केली आहे काय ? तर त्याने ही पावती सादर केली नसेल तरी सुध्दा त्याला रॉयल्टीची रक्कम कशी अदा करण्यात आली ? तसेच ही रक्कम ज्यांनी अदा केली, त्या संबंधत अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, या धरणाच्या कामाला 1995 मध्ये प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. या धरणाची आताची किंमत 40 कोटी आहे. रॉयल्टीबाबत सांगावयाचे तर ही अट पूर्वी नव्हती. प्रकल्प पूर्ण होण्यास विलंब लागला आणि 2001 मध्ये शासनाने माती आणि मुरुमावर रॉयल्टी लावण्याचे सुरु केले. त्यापूर्वीच्या कामावर रॉयल्टी लावण्याचा विषय नव्हता. पण रॉयल्टी लावत असताना त्याचा परतावा देताना अशी प्रोव्हीजन होती की, पहिल्यांदा ठेकेदाराने रक्कम भरावयाची आणि त्याचा परतावा शासनाने करावयाचा. याचा अर्थ आम्ही कंत्राटदाराला पैसे देतो आणि जर कंत्राटदार ते पैसे भरत नसेल तर याला तो जबाबदार आहे. पण पण 2001 मध्ये रॉयल्टी लावण्याचे काम सुरु झाल्यानंतर, त्यावेळेस या कंत्राटदारावर तहसीलदार कर्जत यांनी 79

. . . .आय-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लाख 60 हजार रुपयांचा दंड आकारला होता आणि दंडासह ही रक्कम 6 कोटी 78 लाख रुपये झालेली आहे. यासंदर्भात सन्माननीय जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर बैठक झाली आणि जो दंड आकारला आहे, तो माफ करुन 69.60 लाख रुपये भरण्याबाबत संबंधित कंत्राटदाराला सांगण्यात आले आहे, तशा सूचना देण्यात आल्या असून त्यांनी ही रक्कम भरण्याचे मान्य केलेले आहे.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, कोकणातील ठेकेदारांचे किमान 392 कोटी रुपये द्यावयाचे आहेत. शासनाच्या महसूल व इरिगेशन खात्यातर्फे दरवेळी वसुली केली जाते. परंतु ज्यावेळी वसुली होत नाही, तेव्हा तेथे असलेली सर्व मशिनरी जप्त केली जाते अशी बरीच उदाहरणे आहेत. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटीलसाहेबांनी सांगितले, तो वेगळा विषय आहे. परंतु कोकणातील बऱ्याच जिल्ह्यांमध्ये अशा प्रकारे मशिनरी जप्त केली जाते. म्हणून दोन्ही विभाग मिळून याबाबतीत काही कार्यवाही करणार आहात काय ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, ही बाब तपासून योग्य ती कारवाई केली जाईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आपल्या कायद्यानुसार जर कॉन्ट्रॅक्टरने रॉयल्टी भरली नाही तर त्याचे पेमेंट देण्यात येऊ नये असे सर्क्युलर आहे, असा अर्थ खात्याचा नियम आहे. अगोदर रॉयल्टी भरावी आणि त्यानंतर बिल अदा करण्यात येईल. परंतु याठिकाणी संबंधितांनी रॉयल्टी भरल्याचे कोणतेही पुरावे दिलेले नाहीत आणि असे असतानाही पेमेंट अदा करण्यात आले आहे आणि याबाबतीत मी पहिला प्रश्न विचारला होता. परंतु माननीय मंत्री महोदयांच्या ते लक्षात आलेले दिसत नाही. त्याचे मला उत्तर अपेक्षित आहे.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, या प्रकल्पाची सुरुवात 1995 मध्ये झाली. त्यानंतर 2001 मध्ये शासनाने मुरुम आणि मातीवर रॉयल्टी लावण्याबाबतचा निर्णय घेतला. त्या पूर्वीच्या करारनाम्यामध्ये या अटीचा समावेश नव्हता. कारण तसा नियमच नव्हता. पण 2001 मध्ये निर्णय घेतल्यानंतर आता कॉन्ट्रॅक्टरचे म्हणणे असे आहे की, माझ्या करारनाम्यामध्ये ही अट नव्हती, त्यामुळे मी भरत नाही.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

अनुदानीत आयुर्वेद व युनानी संस्था महाविद्यालय व रुग्णालयातील रिक्त जागा व निवृत्ती वेतन व उपदान योजना बाबत

(९) * ५३२० श्री.अरुणकाका जगताप : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय चिकित्सा केंद्रिय परिषदेच्या मानकांप्रमाणे आयुर्वेद व युनानी महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये आवश्यक असलेले अध्यापक व अध्यापकेत्तर कर्मचाऱ्यांची नियुक्ती न केल्यामुळे आयुर्वेद वैद्यकीय शिक्षणावर गंभीर परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्यासंदर्भात शासनाने काही धोरण ठरविले आहे काय,

(३) असल्यास, सदर रिक्त पदे किती कालावधीत भरण्यात येतील,

(४) असल्यास, अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन व उपदान योजना मंजूर करण्यासंदर्भात शासनाने काही धोरण आखले आहे काय,

(५) तसेच सदर निवृत्तीवेतन व उपदान योजना इतर कर्मचाऱ्यांना लागू केली असताना आयुर्वेद कर्मचाऱ्यांबाबत वेगळे धोरण का अंगिकारण्यात आले आहे ?

डॉ.विजयकुमार गावित : (१) खरे आहे.

(२) अनुदानित संस्थांमधील पदांचा आढावा अद्याप झालेला नाही. परंतु भारतीय चिकित्सा परिषदेच्या मानकाप्रमाणे कमी असलेली पदे निर्माण करण्याबाबतची कार्यवाही शासनाकडून सुरु करण्यात येत आहे.

(३) प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर अंदाजे एक वर्षाचा कालावधी लागेल.

(४) यापूर्वी प्राप्त झालेल्या प्रस्तावावर अनुदानित संस्थांमधील कर्मचाऱ्यांना निवृत्ति वेतन व उपदान योजना शासन स्तरावर नाकारण्यात आली आहे.

(५) निवृत्ति वेतन योजना खर्चिक ठरत असल्यामुळे केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनाच्या सेवेत दि.१.११.२००५ नंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना "नवीन परिभाषित अंशदायी निवृत्तिवेतन योजना" लागू करण्याबाबतचा तसेच सध्या ज्या अनुदानित संस्था, मंडळे, महामंडळे इ.मधील कर्मचाऱ्यांना निवृत्तिवेतनाची योजना लागू नाही अशा संस्थांना निवृत्तिवेतन योजना लागू करण्यात येऊ नये असा धोरणात्मक निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.सेनिवे-१००५/१२७/सेवा-४,दि.८.११.२००५ नुसार घेतलेला आहे.

या कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन विषयक योजना लागू न करण्यात आल्यामुळे ते कोणत्याही लाभांपासून पूर्णत: वंचित ठरणार आहेत असे नाही. अशा कर्मचाऱ्यांना अंशदायी भविष्य निर्वाह निधीचे (Contributary Provident Fund) लाभ अनुज्ञेय ठरणार आहेत.

श्री. अरुणकाका जगताप : सभापती महोदय, भारतीय चिकित्सा केंद्रिय परिषदेच्या मानकांप्रमाणे आयुर्वेद व युनानी महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये आवश्यक असलेले अध्यापक व अध्यापकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्त न केल्यामुळे आयुर्वेद वैद्यकीय शिक्षणावर गंभीर परिणाम होत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 5320 .... श्री. अरुणकाका जगताप ....

आहे, हे खरे आहे काय ? अनेक वर्षापासूनचा म्हणजे 1978 चा जो पॅटर्न आहे तो शासन बदलणार की नाही ? 7 पदांचा तोच पॅटर्न चालू आहे. आता जवळजवळ 14 विषय झालेले आहेत. त्या ठिकाणी अनेक प्रश्न आहेत. अजून कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू झालेला नाही. इतर सर्वांना सहावा वेतन आयोग लागू झालेला आहे परंतु आयुर्वेद व युनानी कॉलेजेसमध्ये तो का लागू झालेला नाही ? त्यांना सहावा वेतन आयोग कधी लागू करणार ?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा पहिला प्रश्न केंद्रीय मानकाप्रमाणे कार्यवाही करणार काय असा विचारलेला आहे. ते जरुर करण्याचा प्रयत्न करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत विचारलेला आहे. ती बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, सेंट्रल कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन ॲक्ट नावाचा कायदा आहे आणि त्या कायद्याप्रमाणे हे बंधनकारक आहे. यामध्ये आपल्याला काहीही चॉईस नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी उपप्रश्न क्रमांक 2 ला उत्तर देताना असे म्हटले आहे की, "अनुदानित संस्थांमधील पदांचा आढावा अद्याप झालेला नाही." हा विषय आपल्या पातळीवर पदांचा आढावा घेण्याचा नाही. सेंट्रल कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन यांनी मानके ठरवून नोटिसेस इश्यू केल्या की, आपण ही पदे भरली नाहीत तर मान्यता काढून घेऊ. यामध्ये आपल्याला चॉईस नाही. सेंट्रल कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन च्या मानकाप्रमाणे ही पदे भरण्याची कार्यवाही ताबडतोब सुरु करणार काय ? वेतनश्रेणीच्या बाबतीत या सर्व फॅकल्टीजना लागू केले की नाही याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेले उत्तर लक्षात आले नाही. त्याबाबतचा शासन निर्णय काढला आहे काय ? नसल्यास शासन निर्णय किती दिवसात काढणार ?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर 'होय' असे आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न सहाव्या वेतन आयोगाबाबत विचारला. ती बाब शासनाच्या विचाराधीन आहे आणि लवकर ते करण्याचा प्रयत्न करु.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 5320 ....

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी अत्यंत चांगले उत्तर दिले. एआयसीटीई चे मेन्टेनंस ऑफ स्टॅण्डर्डस् आणि को-ऑर्डिनेशन ऑफ स्टॅण्डर्डस् हा केंद्राचा विषय आहे. आपल्यावर ते बंधनकारक आहे. आपण ते लागू करणार असे सांगितले ते बरोबर आहे. आपण ठराविक मुदत सांगितली पाहिजे. तसे आपण टाईम बॉण्ड सांगितले तर खालच्या लोकांना ज्या सवयी लागलेल्या आहेत त्याला आळा बसेल ? शासन हे किती दिवसात करणार ?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सहा महिन्यात करु.

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, आयुर्वेद आणि युनानी हे इंडियन मेडिसिन म्हणून प्रसिध्द आहे आणि आयुर्वेदाचे अनेक पेटन्ट्स सुध्दा आपल्या देशाला मिळालेले आहेत. इंडियन मेडिसिन परदेशामध्ये जास्त लोकप्रिय होतात. आयुर्वेदिक महाविद्यालयांकडे बघण्याचा शासनाचा जो दृष्टीकोन आहे त्यामध्ये त्या सगळ्या स्टाफला फक्त 90 टक्के पगार देतो. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी मान्य केले होते की, आम्ही त्यांना 100 टक्के पगार देऊ. परंतु त्याप्रमाणे दोन तीन वर्षापूर्वी पगार चालू झाले. शासनाने या आयुर्वेदिक आणि युनानी महाविद्यालयांकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलणे गरजेचे आहे. सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे कौन्सिलच्या नॉर्म्सप्रमाणे सर्व पदे भरावयास पाहिजेत.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5320..... डॉ.वसंतराव पवार...

कौन्सिलच्या निकषाप्रमाणे सर्व पदे भरलेली आहेत. परंतु या कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू केलेला नाही, तो लागू केला पाहिजे. तो दिला नाही तर केंद्रीय कौन्सिल मान्यता रद्द करते. कारण तशाप्रकारच्या नोटिसा काही महाविद्यालयांना आलेल्या आहेत. त्यासंबंधी शासन काय निर्णय घेणार आहे ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, शासनाची भूमिका सकारात्मक आहे, ती बदललेली नाही. त्यामुळेच या कर्मचा-यांना सहावा वेतन लागू करण्याबाबत सकारात्मक दृष्टीकोनातून विचार करीत आहोत. सीसीआयच्या निकषाप्रमाणे रिक्त पदे भरली पाहिजेत, त्याबाबतही अनुकूल विचार करीत आहोत. कारण ही पदे भरणे आवश्यक आहे. त्याच्या व्यतिरिक्त खाजगी अनुदानित महाविद्यालयांची एक बैठक झाली असून त्या बैठकीत त्यांनी 5 एकर जमिनीवर वृक्षाची लागवड केली पाहिजे, जास्तीत जास्त पंचकर्म सेंटर्स सुरु केली पाहिजेत, जास्तीत जास्त मेडिकल टूरिझ्मबाबत विचार केला पाहिजे. अशाप्रकारचे आदेश दिलेले आहेत.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरुणकाका जगताप यांनी प्रश्न विचारला आहे, त्याला उत्तर मिळाले नाही. या महाविद्यालयांना वेळेवर अनुदान दिले जात नाही. कर्मचा-यांची पदे भरण्याबाबत पदांचा आढावा अद्याप झालेला नाही असे उत्तर दिलेले आहे. परंतु माझ्या माहितीप्रमाणे मागील 4 वर्षे हा प्रश्न सातत्याने विचारला जात आहे. या पदांचा किती वर्षांपासून आढावा घेण्यात आलेला नाही ? सन्माननीय मंत्री महोदयांच्या मतदार संघात सायन आयुर्वेदिक महाविद्यालय आहे. तेथील कर्मचारी सातत्याने आमच्याकडे येतात. वेळेवर अनुदान न मिळाल्यामुळे त्यांना कोणताही फायदा मिळत नाही, अशा त्यांच्या तक्रारी आहेत. सायन आयुर्वेदिक महाविद्यालयाबाबत हा प्रश्न वेगळा असला तरी सुध्दा त्या महाविद्यालयाला वेळेवर अनुदान मिळण्यासाठी आपण आमच्या समवेत भेट द्यावी. त्यांचे विलंबित अनुदान देण्यासाठी शासन काय पावले उचलणार आहे ?

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5320....

प्रा.वर्षा गायकवाड : या पदांचा नुकताच आढावा घेण्यात आलेला आहे. 522 पदे मंजूर पदे आहेत. रिक्त पदे 122 आहेत. सीसीआयच्या नॉर्मसप्रमाणे 247 शिक्षकांची पदे आवश्यक आहेत. शिक्षकेत्तर कर्मचा-यांची 1471 पदे मंजूर आहेत, त्यापैकी 291 रिक्त आहेत आणि 2830 पदे पाहिजेत. या कर्मचा-यांना वेतन मिळत नाही, असा प्रश्न विचारला आहे, त्याबाबत निश्चित काळजी घेतली जाईल.

3....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ KGS/

राज्यात अपुऱ्या पाणीसाठ्यामुळे औष्णिक विद्युत केंद्राचे संच बंद ठेवण्याचा घेतलेला निर्णय

(१०) * ३७५७ श्री.अनिल परब, श्री.किरण पावसकर, श्री.परशुराम उपरकर, श्री.रामदास कदम, डॉ.निलम गोऱ्हे : सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात यंदाच्या अत्यल्प पावसामुळे पुरेसा पाणी साठा उपलब्ध नसल्याने महाऔष्णिक विद्युत केंद्राचे चार संच माहे एप्रिल व मे, २०१० या कालावधीसाठी बंद ठेवण्याचा निर्णय महाजनकोने नुकताच घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कालावधीत वीज टंचाईत भर पडणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, मुळातच राज्यात वीजेचा तुटवडा असतांना उक्त प्रकारे वीजेचा अधिक तुटवडा होवू नये म्हणून अन्य काय उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत ?

श्री.विजय वडेट्टीवार, श्री.अजित पवार यांच्याकरिता : (१) होय, हे खरे आहे. पाणी टंचाई मुळे चंद्रपूर विद्युत निर्मिती केंद्राचे संच क्र. १ व संच क्र.६ एप्रिल, २०१० मध्ये तसेच संच क्र. ३ व संच क्र.५ मे, २०१० मध्ये देखभालीसाठी काढण्याचा निर्णय महाजनकोने घेतला आहे.

(२) व (३) होय.

(४) भारनियमनात वाढ होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत व योग्य उपाययोजना करण्याबाबत महावितरण कंपनीस कळविण्यात आले आहे. महावितरण कंपनीने पुढील स्त्रोतांकडून वीज मिळवण्याचे नियोजन केलेले आहे.

१) नवीन परळी प्रकल्प - (७) २०० मे.वॅ.

२) पारस विस्तार प्रकल्प - (४) २०० मे.वॅ.

३) रत्नागिरी गॅस पॉवर कं.लि.,युनिट ३-अे ३४० मे.वॅ.

४) मे.जेएसडब्ल्यू एनर्जी लि.,जयगड, रत्नागिरी ३०० मे.वॅ.

५) मे.वर्धा पॉवर के.लि.कडून लघुमुदतीकरिता ५० ते १७० मे.वॅ.

६) निविदा मागवून वीज खरेदी - ३००-४०० मे.वॅ.महावितरण कंपनीला अशी एकूण सुमारे १४०० ते १५०० मे.वॅ.वीज प्राप्त करण्याचे माहे एप्रिल, २०१० नंतर नियोजन केलेले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, पाणी टंचाईमुळे एप्रिल, 2010 पासून चंद्रपूर औष्णिक ऊर्जा प्रकल्पातील संच बंद पडले आहेत. विदर्भात पाण्याची कमतरता आहे. सिंचनाचा अनुशेष आहे. त्यामुळे ही परिस्थिती निर्माण होत आहे. विदर्भात सिंचनाचा अनुशेष असल्यामुळे चंद्रपूरचा जुना प्रकल्प पाण्याअभावी बंद पडण्याची ही पहिलीच वेळ नाही, ही सहावी वेळ आहे. असे असताना शासनाने 49 नवीन ऊर्जा प्रकल्पांना मान्यता दिली आहे हे खरे आहे काय ? महाराष्ट्रात अमरावती हा क्रमांक एकचा अनुशेषग्रस्त जिल्हा आहे. तेथील पाणी टंचाईमुळे जनतेत

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3757..... श्री.दिवाकर रावते....

प्रक्षोभाचे वातावरण आहे, तेथील जनतेने आंदोलने केल्यामुळे या जिल्हयातील 4 पैकी 3 ऊर्जा प्रकल्प रद्द केले, पण उर्वरित एका प्रकल्पाबाबतही जनतेत प्रक्षोभ आहे. हा प्रकल्पही रद्द करणार आहे काय ? शासनाने लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, "भारनियमनात वाढ होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत व योग्य उपाययोजना करण्याबाबत महावितरण कंपनीस कळविण्यात आले आहे. तसेच नवीन परळी प्रकल्प (7) या प्रकल्पातून 200 मेगावॉट वीज घेणार आहे, पारस विस्तार प्रकल्प (4) या प्रकल्पातून 200 मेगावॉट वीज घेणार आहे, रत्नागिरी गॅस पॉवर कं.लि.युनिट 3-अे या प्रकल्पातून 340 मेगावॉट वीज घेणार आहे, मे.जेएसडब्ल्यू एनर्जी लि.जयगड, रत्नागिरी या प्रकल्पातून 300 मेगावॉट वीज घेणार आहे, मे.वर्धा पॉवर के.लि.कडून लघुमुदतीकरिता 50 ते 170 मेगावॉट इतकी वीज घेणार आहे. या सर्व केंद्रातील विजेचा दर किती असणार आहे ?

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार : प्रश्न चंद्रपूर जिल्हयातील वीज निर्मिती केन्द्राच्या संदर्भात्ील आहे. या प्रश्नाच्या व्याप्तीमध्ये अमरावती जिल्हयाच्या संदर्भातील प्रश्न विचारलेला आहे. या सर्व गोष्टींची माहिती घेऊन ती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : माझा हरकतीचा मुद्दा आहे.

सभापती : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित करण्याऐवजी पूरक प्रश्न विचारावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : नवीन परळी प्रकल्पातून 200 मे.वॅ. वीज उपलब्ध होणार आहे असे छापील उत्तरात नमूद केलेले आहे. तसेच अन्य प्रकल्पातून किती मे.वॅ. वीज उपलब्ध होणार आहे तेही सांगितलेले आहे. माहिती पटलावर ठेवण्याचा हा विषय नाही. माननीय मंत्री महोदयांकडे माहिती उपलब्ध नसेल तर हा प्रश्न राखून ठेवावा.

श्री. विजय वडेट्टीवार : हा विस्तारित नवीन परळी प्रकल्प आहे. जेवढे प्रकल्प उत्तरामध्ये नमूद केलेले आहेत त्यातील वर्धा प्रकल्प सोडून... त्याबाबतीत 2.40 रु. प्रमाणे पीपीअे झालेला आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : दुर्दैवाची गोष्ट ही आहे की, विदर्भामध्ये पाण्याची परिस्थिती काय आहे यांची माननीय मंत्री महोदयांना जवळून माहिती आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी प्रश्न विचारला. तीन प्रकल्प रद्द केल्याचे सांगितले. महत्तम अनुशेष असलेल्या जिल्ह्यातील सोफिया प्रकल्पाच्या संदर्भात पुनर्विचार करण्याची प्रक्रिया अजून सुरु केलेली नाही. कुणाचेही म्हणणे ऐकून घेतलेले नाही. माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार सर्व वर्षामध्ये नंबर एकचा अनुशेष असलेला हा जिल्हा आहे. माननीय राज्यपालांचे निदेश माननीय मंत्री महोदयांना माहीत आहेत. नंबर एकचा अनुशेष असलेल्या जिल्ह्याच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी सोफिया आणि तीन रद्द केलेल्या प्रकल्पाच्या बाबतीत पुनर्विचार करण्यात येईल असे सांगितले होते. ही पुनर्विचाराची प्रक्रिया पार पडली का ?लोकप्रतिधींना बोलावून त्यांचे म्हणणे ऐकूण घेतलेले आहे काय ? नसल्यास ते केव्हा ऐकून घेण्यात येणार आहे ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार : सोफीया हा प्रकल्प निर्णय प्रक्रियेमध्ये आहे. इतर प्रकल्पाच्या संदर्भात सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे लोकप्रतिनिधींची बैठक आयोजित करुन त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : महावितरण कंपनीकडून वीज मिळविण्याचे नियोजन केलेले आहे. पारस विस्तार प्रकल्पातून किती वीज निर्मिती होणार आहे आणि आपल्याला किती वीज मिळणार आहे ?

श्री. विजय वडेट्टीवार : पारस हा जुनाच प्रकल्प आहे. आता त्याचा विस्तार करण्यात येत आहे. या प्रकल्पातून 200 मे.वॅ.वीज उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : 200 मे.वॅ. वीज मिळेल असे उत्तर दिलेले आहे. आता शक्यता वर्तविण्यात येत आहे. या प्रकल्पातून अद्यापपर्यन्त 70 मे.वॅ. वीज देखील निर्माण होऊ शकलेली नाही. मग 200 मे.वॅट वीज कशी काय उपलब्ध होणार ?

श्री. विजय वडेट्टीवार : चंद्रपूर जिल्ह्यामध्ये पाण्याच्या टंचाईमुळे 2300 मे.वॅ. ऐवजी 1700 ते 1800 मे.वॅ. वीज निर्मिती होईल. पिण्याच्या पाण्यासाठी प्रथम प्राधान्य दिलेले आहे. विजेची जी कमतरता निर्माण होईल ती भरुन काढण्यासाठी आवश्यकता असेल तर निविदा मागवून 300 ते 400 मे.वॅ. विजेची तूट भरुन काढण्यात येईल. नवीन परळी प्रकल्पातून 200 मे.वॅ., पारस विस्तार प्रकल्पातून 200 मॅ.वॅ. या प्रमाणे कशी कशी वीज उपलब्ध होणार याची माहिती छापील उत्तरामध्ये दिलेली आहे. पारसच्या 4 टप्प्यातून 1000 मे.वॅ. वीज निर्माण होणार आहे. सध्या 100 मे.वॅ. अतिरिक्त वीज मिळत आहे. पुढील आठवडयात 200 मे.वॅ. वीज उपलब्ध होईल. म्हणजे 200 मे.वॅ. विजेची भर पडणार आहे.

....नंतर श्री. भोगले....

अशुद्धीत पत्र / शुद्धीपत्र नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी याठिकाणी उत्तर दिले की, बैठक बोलावतो, चर्चा करतो. आपण ती चर्चा करणार आहात. दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे 49 प्रकल्प हे फक्त विदर्भातील आहेत. 991 टीएमसी पाणी उद्ध्वस्त होणार आहे. अगोदरच हा भाग अनुशेषाचा आहे. माझे म्हणणे असे आहे की, सोफिया प्रकल्प रद्द करण्याबाबत पुनर्विचार करणार आतात तो प्रश्न आणि विदर्भातील 49 प्रकल्पांबाबतच्या प्रश्नाबाबत हे अधिवेशन संपण्याच्या आत माननीय मुख्यमंत्र्यांच्या पातळीवर सर्व संबंधित लोकप्रतिनिधींशी ही चर्चा घडवून आणली जाईल काय?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, एका बाजूला राज्यामध्ये लोडशेडिंग वाढत आहे. विजेची आवश्यकता आहे. अनेक प्रकल्प हे राज्यात ज्याठिकाणी कोळसा उपलब्ध आहे, पाणी उपलब्ध आहे अशा ठिकाणी येत आहेत. त्या भागात प्रकल्प उभे करायचे नाहीत अशी भूमिका घेतली जात आहे. ज्या ज्या भागात उद्योग उभारण्यासाठी उद्योगपती आपल्याकडे मागणी करतात त्या त्यावेळी.....(अडथळा)....स्पेसिफिक तुमच्या प्रश्नाला.....

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मंत्रीमहोदय म्हणाले की, पाणी उपलब्ध आहे. पाणी कोणत्या जिल्हयामध्ये उपलब्ध आहे?

सभापती : सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांचा शेवटचा जो मुद्दा आहे, या अनुषंगाने सन्माननीय मुख्यमंत्र्यांच्या पातळीवर एखादी बैठक अधिवेशन संपण्यापूर्वी आयोजित करण्यात येईल का या प्रश्नाचा मंत्रीमहोदयांनी जरुर विचार करावा.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, होय.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, विदर्भात 49 प्रकल्पांना पाणी उपलब्ध आहे असे मंत्रीमहोदयांनी सांगितले. आम्हाला ते बिलकूल मान्य नाही. आम्ही शासनाचा निषेध करतो. विदर्भाचे वाळवंट करायला निघाले आहेत. आम्ही बहिर्गमन करीत आहोत.

(विरोधी पक्षाचे सदस्य बहिर्गमन करतात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.विजय वडेट्टीवार (जलसंपदा {कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून} राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने तापी पाटबंधारे विकास महामंडळाचा (जळगाव) सन 2005-2006 ते 2007-2008 चा महालेखापाल, लेप-II नागपूर यांचा अलगलेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.भास्कर जाधव (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद यांचा सन 2005-2006 चा 39 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 च्या सूचना

सभापती : सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "केंद्र शासनाच्या पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत बुलढाणा जिल्हयातील खामगाव ते चिखली या रस्त्याचे चौपदरीकरण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे, रामनाथ मोते यांनी "ठाणे जिल्हयातील तांबडमाळ व खिंडीपाडा (ता.वसई) परिसरातील आदिवासी वस्तीसाठी असलेल्या गावांना तत्कालीन खासदार श्री.राम नाईक यांच्या खासदार निधीतून सन 2000-2001 मध्ये 14 लाख रुपये मंजूर केले असताही गेल्या 10 वर्षापासून नळपाणी पुरवठा योजनेचे काम अपूर्ण असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर, परशुराम उपरकर यांनी "तिलारी धरणाचे पाणी पाईपद्वारे वेंगुर्ल्यापर्यंत आणण्यासाठी शासनाने 125 कोटी रुपये मंजूर करुनही सदर योजनेचे पाणी शेतीकरिता व पिण्याकरिता न वापरता औद्योगिक क्षेत्रातील मे.उत्तम स्टील खनिज कंपनी व मे.टाटा मेटालिक अशा कंपन्यांना देण्याचा शासनाचा विचार असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गो-हे, ॲड.अनिल परब यांनी "वसई-विरार महानगरपालिकेतून राज्य सरकारने 35 गावे वगळण्याची घोषणा केली असताही उर्वरित 18 गावे देखील वगळण्यात यावीत या मागणीसाठी दि.10 एप्रिल, 2010 रोजी मुंबई-अहमदाबाद हायवेवर आमदार श्री.विवेक पंडित यांनी रास्ता रोको आंदोलन केल्याने त्यांना झालेली अटक" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, भगवानराव साळुंखे यांनी "महाराष्ट्र राज्य परिषदेने घेतलेल्या राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेसाठी असलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा निकाल दि.3 एप्रिल, 2010 रोजी जाहीर झाल्यानंतर असंख्य पालकांनी निकालाबाबत तक्रारी व्यक्त केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

नंतर एन.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील, यांनी "मुंबईतील मेसर्स सुलभ इंटरनॅशनल सर्व्हिसेस ऑर्गनायझेशनने बांधलेल्या सुलभ शौचालयातून दररोज लाखो लिटर पाण्याची राजरोसपणे विक्री होत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री गुरुमुख जगवानी, विनोद तावडे, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "रायगड जिल्ह्यातील हरिहरेश्वर आणि दिवे आगार या पर्यटन क्षेत्राच्या विकास कामासाठी मंजूर केलेल्या रु. 21.65 कोटी निधीपैकी सुमारे 8 लाख निधी या भागातील विकास कामांसाठी खर्च करुनही विकास कामे अत्यंत अपुरी व निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर यांनी "राज्यातील पूर्व विदर्भात मोठ्या प्रमाणात धानाचे उत्पादन होत असून स्थानिक राईस मिलर्स असोसिएशन तर्फे या धानाची मिलिंग आणि वाहतूक करण्यासाठी समस्या निर्माण झाल्यामुळे राईस मिलर्स असोसिएशन तर्फे शासनाकडे केलेले निवेदन " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, कपिल पाटील, व्ही.यू.डायगव्हाणे यांनी "राज्यातील उच्च माध्यमिक शिक्षक संघटनेच्या विविध मागण्या अद्यापि शासनाकडे प्रलंबित असल्याने संघटनांनी विधान भवनावर काढलेला मोर्चा" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तिलारी प्रकल्पातील कामे कोकण पाटबंधारे विभागाअंतर्गत तिलारी नगर या ठिकाणी कार्यरत असलेल्या एका उप अभियंत्याने प्रकल्पाची कामे कागदोपत्री दुसऱ्याच्या नावावर दाखवून स्वत:च ठेकेदार बनून लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : वीरमाता जिजाबाई उद्यानात हत्तीणीने प्रेक्षकाला आपटून ठार मारल्याबाबत

मु. शी. : वीरमाता जिजाबाई उद्यानात हत्तीणीने प्रेक्षकाला आपटून ठार मारल्याबाबत सर्वश्री गुरुमुख जगवानी, विनोद तावडे, संजय केळकर व चंद्रकांत पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्य मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री गुरुमुख जगवानी, विनोद तावडे, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "वीरमाता जिजाबाई उद्यानात हत्तीणीने प्रेक्षकाला आपटून ठार मारल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील : महोदय, याप्रकरणात हत्तीच्या पायाखाली मृत झालेली जी व्यक्ती आहे त्याचे कारण म्हणजे तेथे असलेले दोघेही रखवालदार जेवणासाठी गेले होते म्हणून ही दुर्घटना घडली. म्हणून संबंधितांवर कारवाई करण्यात येणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, हत्ती बाहेर फिरण्यासाठी बाहेर काढले जातात त्या मधल्या काळात ज्या व्यक्तिचा मृत्यू झाला ती व्यक्ती एका बाजूच्या भिंतीवरुन उडी टाकून आतमध्ये आली होती तसेच हत्तींना ठेवले जाते तो दरवाजा तोडून आतमध्ये गेली होती म्हणून हत्तीने या व्यक्तिला मारले, त्यामुळे रखवालदारांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. विनोद तावडे : महोदय, कोणावर कारवाई करावी या अर्थाने ही नियम 93 अन्वयेची सूचना दिलेली नाही पण प्रामाणिकपणे विचार केला तर असे निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न मी करणार आहे की, हे उद्यान मुंबईतील सामान्य माणसांना जाण्याचे ठिकाण आहे. जरी त्या व्यक्तिने आगावूपणा केला असला तरी उत्सुकतेने एखादी व्यक्ती अशी वागली असेल, हत्तीच्या जवळ गेली असेल. या उद्यानात अनेक लोक भेट देण्यासाठी येतात. अशा परिस्थितीत उद्यान प्रशासनाचा हलगर्जीपणा सुध्दा याला कारणीभूत आहे. उदा. एखादे लहान मूल गेले असते तरी त्याच्याकडून आपण अशीच अपेक्षा केली असती काय ? म्हणून लोकांनी किती अंतरावर राहिले पाहिजे याची सुध्दा प्रशासनाने दखल घ्यायला नको का ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचे पालन केले जाईल. तसेच या निमित्ताने मी अशीही माहिती देऊ इच्छितो की, सेंट्रल ऑथॉरिटीने असे कळविले आहे की, अशा प्रकारे कुठल्याही प्राणी संग्रहालयामध्ये आता हत्तींना ठेवायचे नाही. त्यानुसार भविष्यात अशा उद्यानांमध्ये हत्ती राहू नयेत म्हणून पीसीसीएफने ते ताब्यात घ्यावेत यासंदर्भातील कार्यवाही सुरु झालेली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यातल्या शासकीय तंत्रनिकेतनातील शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या.

मु. शी. : राज्यातल्या शासकीय तंत्रनिकेतनातील शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या याबाबत सर्वश्री कपिल पाटील व जयंत पाटील वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा. वर्षा गायकवाड (उच्च व तंत्र शिक्षण राज्य मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री कपिल पाटील व जयंत पाटील यांनी राज्यातल्या शासकीय तंत्रनिकेतनातील शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... ...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील :सभापती महोदय, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने सहावा वेतन आयोग मान्य केलेला आहे. त्यामुळे सहाव्या वेतन आयोगाच्या संदर्भातील हा मूळ प्रश्न आहे. सहाव्या वेतन आयोगामुळे शासनाच्या तिजोरीवर किती भार पडणार याचीही माहिती शासनाने दिलेली नाही त्यामुळे सहावा वेतन आयोग लागू करण्याच्या संदर्भात या अधिवेशनात निर्णय 1 मे पूर्वी घेतला जाणार आहे काय ? अखिल भारतील तंत्रशिक्षण परिषदेने जो निर्णय दिलेला आहे तो आपण जसाच्या तसा लागू होणार आहे काय ? सेवा ज्येष्ठता, रिकामी पदे, अधिव्याख्यात्यांची पदोन्नती यासंदर्भात शासन एक महिन्यात कारवाई करणार आहे काय ?

श्रीमती वर्षा गायकवाड : सभापती महोदय, एआयसीटीचे राजपत्र 13 मार्च रोजी वेबसाईटवर आले होते परंतु आम्हाला 22 तारखेला नोटीफिकेशनमुळे प्राप्त झाले. यामध्ये आम्हाला काही त्रुटी आढळून आल्या आहेत. अधिव्याख्यात्यांची वेतनश्रेणी 15600-39100 ही आहे.परंतु ग्रेड पे हा 5400 आणि 5000 असा आहे. त्यामुळे ग्रेड पेच्या संदर्भात आम्हाला कन्फयूजन असल्यामुळे याबाबत अधिक माहिती करुन घ्यावयाची आहे. पी.जी. असेल तर 6000 रु. आणि पी.एचडी. असेल तर 7000 रु. असा ग्रेड पे आहे त्यामध्ये आम्हाला कन्फयूजन नाही. मी सभागृहाला सांगू इच्छिते की, आम्ही यांना सहावा वेतन आयोग 30 तारखेपर्यंत लागू करणार आहोत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, पॉलिटेक्नीक मधील प्राध्यापकांच्या संदर्भातील महत्वाचा प्रश्न आहे. मला शासनाला असे विचारावयाचे आहे की, 2003 पासून एमपीएससी कडून भरती बंद आहे. मधील 8 वर्षाच्या काळात कंत्राटी पध्दतीने मेरीटवर प्राध्यापकांची भरती केलेली आहे. आता आपण एमपीएससीच्या थ्रू भरती करीत आहात परंतु 8 वर्षापूर्वी ज्यांची प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली होती ते आता एमपीएससीच्या निकषात बसत नाहीत. या ठिकाणी जे प्राध्यापक काम करीत आहेत ते आता एजबार झालेले आहेत त्यामुळे या प्राध्यापकांना बाहेर कोठेही काम करता येणार नाही. खरे म्हणजे या प्राध्यापकांमुळेच आपली तंत्रनिकेतने 8 वर्षे चालली होती. आता एमपीएससीच्या भरतीच्या नवीन नियमात बसणार नसल्यामुळे त्यांना तेथील नोकरी सोडावी लागेल व त्यांना बाहेर कोठेही नोकरी मिळणार नाही. त्यामुळे या प्राध्यापकाच्या संदर्भात शासन नेमका कोणता विचार करणार आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती वर्षा गायकवाड : सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न तपासून घेतला जाईल. एमपीएससीच्या मार्फत भरती करण्याबाबतचा जीआर जानेवारी महिन्यातच काढलेला आहे. त्यामध्ये अध्यापक, शिक्षक अशी सर्व पदे 31 मे पर्यंत भरली जातील असे आम्ही त्यांना जी.आर.नुसार कळवलेले आहे.

श्री. विनोद तावडे :सभापती महोदय, जे प्राध्यापक आपण कंत्राटी पध्दतीने भरले त्यांच्यामुळेच खरे म्हणजे आपली तंत्रनिकेतने सुरु आहेत. त्यावेळेस एमपीएससी भरती करीत नव्हती त्यावेळी शासनाने प्राध्यापकांची पदे मुलाखती घेऊन भरली. हे प्राध्यापक आता एमपीएससीच्या निकषात बसणार नाही कारण त्यांचे आता वय उलटून गेल्यामुळे ते अर्जही करु शकणार नाहीत. त्या प्राध्यापकांनी चांगल्या पध्दतीने मुलांना शिकवले होते. त्यामुळे कंत्राटी पध्दतीच्या प्राध्यापकांच्या संदर्भात काय निर्णय घेणार आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात शासनाने गांभीर्याने दखल घेतलेली आहे परंतु सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले आहे की, कंत्राटी पध्दतीच्या प्राध्यापकांना परीक्षेला बसता येत नाही, मी सांगू इच्छितो की अशी वस्तुस्थिती नाही. या प्राध्यापकांना परीक्षेला बसता येऊ शकते. ज्यांचे एज क्रॉस झालेले असेल अशांना परीक्षेला बसता येणार नाही. ज्यावेळी एमपीएससी डीफंक्ट झाली होती त्यावेळी गरजेप्रमाणे कंत्राटी पध्दतीने ही पदे डायरेक्टर लेव्हलला सिलेक्शनची कमिटी स्थापन करुन भरण्यात आली होती. परंतु रिक्रूटमेंट रुल्सच्या नियमानुसार अधिव्याख्यात्यांची पदे एमपीएससीनेच भरली पाहिजेत. डायरेक्टर लेव्हला कमिटी करुन कंत्राटी पध्दतीने जी पदे भरण्यात आली होती ती पदे रिक्रुटमेंट रुल्सप्रमाणे भरण्यात आलेली नव्हती. बॅकडोअर एंट्री रेग्यूलराईज करावयाची नाही अशा प्रकारचा सुप्रिम कोर्टाचा निर्णय झालेला आहे. तसेच आमच्या विधी व न्याय विभागाने सुध्दा यासंदर्भात असे मत व्यक्त केलेले आहे. त्यामुळे आपल्याला बॅकडोअर एंट्री करता येणार नाही. त्यामुळे या कंत्राटी अधिव्याख्यात्यांना आपल्याला रेग्युलराईज करता येणार नाही.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंद

यानंतर श्री.भारवि.....

श्री.राजेश टोपे ...

सभापती महोदय, या सर्वांना नियमित करण्याबाबत राज्य शासनाची पूर्ण इच्छा आहे. हा विषय कॅबिनेट समोर नेण्यासाठी आमच्या विभागाने निर्णय देखील घेतला. परंतु, विधि व न्याय विभागाचा याला थोडासा विरोध आहे. मी येथे असेही सांगू इच्छितो की, या प्रश्नासंबंधी आम्ही ॲडव्होकेट जनरलचा सल्ला देखील घेत आहोत. ॲडव्होकेट जनरल यांना विधि व न्याय विभागाचे मत कळवून त्यांचे मत येत्या आठ दिवसांमध्ये आम्ही निश्चित घेऊ. त्यांचे मत सहमतीदर्शक असेल तर त्या आधारे आम्हाला निर्णय घेणे शक्य होईल. ॲडव्होकेट जनरल यांचे मत घेऊन सकारात्मक निर्णय घेण्याची इच्छा राज्य शासनाची आहे, याबद्दल दुमत नाही.

श्री.रामनाथ मोते : सन्माननीय सभापती महोदय, सेवाज्येष्ठता सूचीनुसार प्राचार्य यांची यादी जाहीर केली आहे. परंतु, विभागप्रमुख, अधिव्याख्याता आणि तत्सम पदांची अंतिम ज्येष्ठतासूची अंतिम टप्प्यात आहे, असे शासनाने लेखी उत्तरात नमूद केले आहे. सदर अंतिम ज्येष्ठतासूची शासन किती दिवसात निश्चित करणार आहे ? विभागप्रमुख आणि प्राचार्य पदांच्या आर.आर.मध्ये शासन बदल करणार आहे. सदर बदल आपण किती दिवसांमध्ये करणार आहात ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या निवेदनाच्या अनुषंगाने तीन चार प्रश्न विचारण्यात आले आहेत. सहावा वेतन आयोग कधी लागू करणार ? असा पहिला प्रश्न होता. तंत्रशिक्षण विभागाच्या दृष्टीकोनातून एप्रिल अखेर पर्यंत सहावा वेतन आयोग लागू करण्यात येईल. दुसरा विषय हा पदोन्तीच्यासंबंधातील होता. आम्ही मे अखेर पर्यंत पदोन्नतीसंबंधातील सर्व माहिती घेऊन मे अखेर पर्यंत पदोन्नतीसंबंधातील काम कुठल्याही परिस्थितीत करण्यात येईल.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी प्रश्न विचारला आहे. ज्यावेळी एमपीएससीकडून निवड होण्याची शक्यता दिसत नव्हती त्यावेळी ॲडहॉक किंवा अन्य पद्धतीने तंत्र शिक्षण विभागात काही उमेदवार विविध पदांसाठी घेतले. हे सर्व उमेदवार सगळ्या अटी पूर्ण करीत आहेत. या उमेदवारांना शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी एमपीएससीकडे ॲप्रोच होऊ शकला तरी चालण्यासारखे आहे. तसे झाले तर हा प्रश्न सुटण्याची शक्यता आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, राज्यातील साधारणपणे 800 लोकांचा हा प्रश्न आहे. ज्यावेळी एमपीएससी डिफंक्ट होती त्यावेळी राज्य शासनाने विहित पद्धतीने म्हणजेच जाहिरात देऊन उमेदवारांची नेमणूक केली. यासाठी राज्य शासनाने एक समिती देखील तयार केली होती. विहित पद्धतीनेच उमेदवारांची निवड झाली. त्यावेळी 80:20 असा क्रायटेरिया होता. तो आता नाही. आता हे सर्व उमेदवार एमपीएससीसाठी पात्र होऊ शकत नाही. आज सकाळी 10 जण माझ्याकडे रडत आले होते. कारण त्यांना आता तेथे वाव मिळत नाही.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मी प्रश्नाचे गांभीर्य सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आता फक्त मुलाखत घेण्यात येते. पूर्वी उमेदवाराची लेखी परीक्षा व मुलाखत व्हायची. आता एमपीएससीतर्फे लेखी परीक्षा घेण्यात येत नाही. फक्त मुलाखत घेण्यात येते. त्यामुळे यापूर्वी लागलेले उमेदवार निकषात बसत नाही ही वस्तुस्थिती आहे. मंत्रिमहोदय यांच्याकडे पूर्वी वैद्यकीय शिक्षण हा विभाग असताना त्यांनी याबाबत निर्णय घेतलेला आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, एमपीएससीने 70 टक्के गुण असले पाहिजेत असा निकष लावला आहे. ज्यावेळी ते उत्तीर्ण झाले त्यावेळी कमाल 62 टक्के गुण मिळवलेला विद्यार्थी होता. ज्यांनी कंत्राटी पद्धतीने शिकविले आहे, त्यांनी अल्प मानधनावर काम केले आहे. त्यांनी करोडो रूपये शासनाचे वाचविले आहेत. अशांना शासन आता वाऱ्यावर सोडत आहेत. सगळ्यांचे जीवन उद्ध्वस्त होण्याची वेळ आलेली आहे. जसा वैद्यकीय शिक्षण विभागासाठी निर्णय केला तसा सहानुभूतीपूर्वक विचार या सर्वांसाठी केला पाहिजे. शेवटी महाराष्ट्र शासन निर्णय घेऊ शकते. मंत्रिमंडळापुढे जाऊन किती दिवसात या सर्वांसंबंधी निर्णय घेणार ? असा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सन्माननीय सदस्य श्री विक्रम काळे यांच्या भावना मी समजू शकतो. या सगळया कामामध्ये मी अतिशय पॉझिटीव्ह दृष्टीकोन ठेवूनच काम करीत आहे याचे ते देखील साक्षीदार आहेत. सन्माननीय सदस्य श्री विनोद तावडे यांच्या प्रश्नाला उत्तर देतांना सांगितले होते की, या संदर्भात शासनाचे मत 100 टक्के पॉझिटीव्ह आहे. परंतु त्यामध्ये कायदेशीर अडचण आलेली आहे. या संदर्भात मी आपणाला सांगू इच्छितो की, लॉ ॲन्ड ज्युडिशिअरी डिपार्टमेन्टने जरी निगेटीव्ह ओपिनीयन दिलेले असले तरी ॲडव्होकेट जनरल यांच्याकडे जाऊन त्यांना या संबंधी सगळया बाबी सांगून त्यातून काही तरी मार्ग निघेल काय या दृष्टीने माझा प्रयत्न राहील. ही कायदेशीर बाब असून मी स्वत: ॲडव्होकेट जनरल यांच्याकडे जाऊन त्यांच्याशी चर्चा करुन अतिशय सहानुभूतिपूर्वक या विषयाच्या संदर्भात निर्णय घेण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करीन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अकोला महानगरपालिकेकडून खाजगी जागेवर टाकण्यात येत असलेला घनकचरा

मु. शी. : अकोला महानगरपालिकेकडून खाजगी जागेवर टाकण्यात येत असलेला घनकचरा याबाबत श्री.गोपीकिसन बाजोरिया, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. भास्कर जाधव (नगर विकास राज्य मंत्री) : सभापती महोदय, श्री.गोपीकिसन बाजोरिया यांनी " अकोला महानगरपालिकेकडून खाजगी जागेवर टाकण्यात येत असलेला घनकचरा." या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

- निवेदना नंतर -

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, अकोला महानगरपालिकेच्या विकास आराखडयात डंपीग ग्राऊंडसाठी जागा आरक्षित करण्यात आलेली नाही हे मान्य करण्यात आलेले आहे. अकोला शहरामध्ये सर्व्हे नंबर 41 वर महानगरपालिकेचा ताबा आहे असे निवेदनात म्हटलेले आहे परंतु सर्व्हे नंबर 41 ची जागा शेतक-यांची आहे. सर्व्हे नंबर 42 ची जागा देखील शेंतक-यांचीच आहे. जवळपास 40 एकर जागेवर डंपीग ग्राऊडसाठी कोणतेही आरक्षण नसताना शेतक-यांच्या जागेवर कचरा टाकण्याचे काम मागील 25 वर्षापासून सुरु आहे.असे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. यानिमित्ताने मला माननीय मंत्री महोदयांना दोन स्पेसिफिक प्रश्न विचारावयाचे आहेत. माझा पहिला प्रश्न असा आहे की, या शेतक-यांच्या जागेवर कचरा टाकणे बंद करण्यात येणार आहे काय आणि माझा दुसरा प्रश्न असा आहे की,शेतकऱ्यांच्या जागेवर मागील 25 वर्षापासून कचरा टाकण्यात येत असल्यामुळे शेतक-यांचे जे नुकसान झालेले आहे त्याची भरपाई देण्यात येणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सर्व्हे नंबर 41 आणि 42 वर टाकण्यात येत असलेल्या कचऱ्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी नियम 93 अन्वये सूचना दिली होती त्या अनुषंगाने त्यांना मी सांगू इच्छितो की, सर्व्हे नंबर 41 हा अकोला महानगरपालिकेच्या ताब्यात आहे.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय,. माननीय मंत्री महोदय चुकीचे उत्तर देत आहेत.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर पूर्ण् झाल्यानंतर पुन्हा प्रश्न विचारावा. अकोला महानगरपालिकेच्या ताब्यात ही जागा असल्यामुळे गेल्या 25 ते 30 वर्षापासून या सर्व्हे नंबरमध्ये कचरा टाकला जात आहे. या सर्व्हे नंबरमधील जागा 7 हेक्टर आणि 25 आर इतकी असून त्या ठिकाणी कचरा टाकला जात आहे. सर्व्हे नंबर 42 हा अकोला महानगरपालिकेचा नाही परंतु 41 आणि 42 हे लगतचे सर्व्हे नंबर असल्यामुळे 41 सर्व्हे ंनबरमध्ये टाकलेला कचरा 42 सर्व्हे नंबरमध्ये जातो ही बाब लक्षात आलेली आहे. येथून पुढच्या काळात 42 नंबरच्या सर्व्हे मध्ये कचरा पडणार नाही यासंबंधी महानगरपालिकेने काळजी घ्यावी अशा प्रकारची सूचना देण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सर्व्हे नंबर 41 ची जागा शेतक-यांची आहे. ती जागा अकोला महानगरपालिकेच्या ताब्यात नाही असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. तेव्हा ही बाब सिध्द करुन माननीय मंत्री महोदयांच्या विरुध्द हक्क भंगाची सूचना देता येईल. माननीय मंत्री महोदय ठामपणाने सांगत आहेत. अकोला शहरातील सर्व्हे नंबर 41 सुध्दा शेतक-यांचाच आहे. तो सर्व्हे नंबर अकोला महानगरपालिकेच्या ताब्यात आहे म्हणजे काय ? तो सर्व्हे नबर डंपीगकरिता बळकावला आहे.सभागृहामध्ये सरकारच्या वतीने माननीय मंत्री महोदय उत्तर देत आहेत. तेव्हा शासनाने तरी जागरुकपणे बोलले पाहिजे.अकोला महानगरपालिकेने त्या सर्व्हे नंबरवर डंपीग करण्यास सुरुवात केली व ती जागा बळकावली गेली म्हणजे ही जागा त्यांच्या ताब्यात आहे काय ?अर्थात हा विषय दुसरा आहे. 42 नंबरचा भूखंड शेतक-यांचा असून ती जागा देखील डंपींग करता वापरली जात आहे.असे माननीय मंत्री महोदयांनी म्हटलेले आहे. त्याचबरोबर असेही सांगण्यात आलेले आहे की, येथून पुढच्या काळात त्या ठिकाणी कचरा टाकणे बंद करण्यात येणार आहे. शासनाच्या मालकीच्या 7 हेक्टर 5 आर इतक्या पर्यायी जागेची निवड करण्यात आलेली आहे.महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे आणि भारतीय विमान पत्तन प्राधिकरण यांच्याकडून ना हरकत प्रमाणपत्र आल्यानंतर त्या जागेवर डंपीग करण्यात येणार आहे.आणि अगोदरच्या भूखंडावर कचरा टाकणे बंद करण्यात येणार आहे या बाबतीत मला माननीय मंत्रीमहोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, यामध्ये काही अपरिहार्यता असल्यामुळे या जागेवरील डपींग ग्राऊन्ड बंद करु शकत नाही आणि दुस-या जागेवर डपींग ग्राऊड सुरु करु शकत नाही. शंहरातून मोठया प्रमाणावर कचरा निर्माण होत असल्यामुळे खाजगी शेतक-यांच्या पिकावू जमिनीवर सुध्दा कचरा टाकला जात आहे. जोपर्यंत नवीन 7.5 हेक्टर जागेवर डपींग ग्राऊन्ड होत नाही तोपर्यंत या शेतक-यांच्या जमिनीचा वापर कचरा टाकण्याचा केला जाणार आहे त्या कालावधीची तसेच गेल्या 25 वर्षापासूनची त्या शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यात येणार आहे काय ?

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत/शीघ्रलिपी नोंद

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, निवेदनामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, सर्व्हे नंबर 41 हा नायगाव गावामध्ये आहे तो महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. सर्व्हे नं. 42 वर कचरा पडत आहे हे आपण मान्य केले आहे, हा भूखंड लगतचा असल्यामुळे त्याठिक्राणी कचरा जातो हेही मान्य केले आहे. त्यामुळे सर्व्हे नं. 42 वर हा कचरा पडणार नाही याची काळजी घेतली जाईल. हा कचरा उघडयावर आहे त्याला कॅपिंग केले जाईल. आजूबाजूच्या लोकांना या कचऱ्याचा त्रास होणार नाही याची काळजी घेतली जाईल. माननीय सदस्यांनी आता सांगितले की, सर्व्हे नं. 41 वरील जागा सुध्दा खाजगी शेतकऱ्याच्या मालकीची आहे. मी उत्तर देतांना ती जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असल्याचे सांगितले आहे. सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी दिलेली माहिती निश्चितपणे तपासून पाहिली जाईल. ती जागा महानगरपालिकेच्या मालकीची नसेल आणि गेल्या 25-30 वर्षापासून महानगरपालिका त्या जागेवर कचरा जाणीवपूर्वक टाकीत असेल,.... माझ या माहितीप्रमाणे हा सर्व्हे न . 41 रेल्वे ट्रॅकच्या बाजूला आहे. आणि म्हणून तेथील खड्डा भरुन काढण्याकरिता कित्येक वर्षापासून त्याठिक्राणी कचरा टाकला जात आहे. त्यामुळे ही जागा महानगरपालिकेच्या मालकीची आहे की नाही, ही बाब तपासून पाहिली जाईल. आणि म्हणून याठिकाणी देण्यात आलेली माहिती जर शेतकऱ्यांच्या विरोधात असेल तर निश्चितपणे माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या विषयासंबंधी शासन सहानुभूतीपूर्वक विचार करील.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, ती शेतकऱ्यांची जमीन आहे. त्या बाजूला राहणाऱ्या रहिवाश्यांच्या प्रकृतीवर त्या कचऱ्याच्या दुर्गंधीचा वाईट परिणाम होत आहे. रेल्वे ट्रॅक आणि तेथील लोकांची घरे यामध्ये केवळ 500 फूटांचे अंतर आहे. दुसऱ्या बाजूला एक उर्दू शाळा असून त्या शाळेत 1500 मुले शिक्षण घेत आहेत. त्या कचऱ्याची दुर्गंधी त्या शाळेमध्ये पोहोचत आहे. असे असतांना मंत्रिमहोदय म्हणत आहेत की, त्या कचऱ्यामुळे कुणालाही आजार झालेला नाही. त्याठिकाणी दुर्गंधी इतकी आहे की, आपण त्या रस्त्याने पायी चालत जाऊ शकत नाही. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, सन 2000 मध्ये महानगरपालिकेने प्रशासनाकडे जो प्रस्ताव दिला आहे तो ताबडतोब निकालात काढून कचरा टाकण्याची जागा ताबडतोब बदलणार काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी निवेदनामध्ये स्पष्ट केले आहे की, त्याठिकाणी 7.5 हेक्टर जागा भोळ गावाजवळ घेण्याचा प्रस्ताव नगर रचना संचालनालयाकडे प्राप्त झाला आहे. त्याकरिता पर्यावरण विभागाची परवानगी मिळविणे आवश्यक आहे, भारतीय विमान पत्तन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ SBT/

श्री. भास्कर जाधव...

प्राधिकरणाची परवानगी मिळणे आवश्यक आहे. ही कार्यवाही लवकरात लवकर केली जाईल. त्याचबरोबर महानगरपालिका या सर्व्हे नं. वर कचरा टाकीत होती त्या अगोदरपासून ही शाळा आहे की, ती त्याठिकाणी नंतर आली आहे? ही बाब सुध्दा तपासून पाहिली जाईल.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: खालापूर (जि.रायगड) येथील डोणवत धरणातील पाणी भूषण स्टील कंपनीस पुरविण्यात येणे

मु.शी.: खालापूर (जि.रायगड) येथील डोणवत धरणातील पाणी भूषण स्टील कंपनीस पुरविण्यात येणे याबाबत सर्वश्री. जयंत पाटील, कपिल पाटील, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री. विजय वडेट्टीवार (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री. जयंत पाटील, कपिल पाटील यांनी "खालापूर (जि.रायगड) येथील डोणवत धरणातील पाणी भूषण स्टील कंपनीस पुरविण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुसरून आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सिंचनासाठी असलेले पाणी कंपन्यांना आणि औद्योगिक वापरासाठी देण्याचे काम रायगड जिल्हयात मोठया प्रमाणावर होत आहे. या डोणवत धरणाचे पाणी भूषण स्टील या कंपनीला दिले त्यावेळी तेथील शेतकऱ्यांना विश्वासात घेतले होते काय? शेतकऱ्यांचे हियरींग घेतले होते काय? त्याठिकाणी अजून किती क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे? सद्या या धरणाच्या सिंचनाखाली किती भात शेती आहे?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, डोणवत धरणापासून 118 हेक्टर जमीन सिंचनाखाली येत होती. या धरणामधून भूषण स्टीलला पाणी दिले जाते असे विचारण्यात आले. खरे म्हणजे भूषण स्टील या कंपनीला पाणी न देता उत्तम स्टील या कंपनीला पाणी दिले जात आहे. पूर्वी या धरणामध्ये 3.13 दशलक्ष घनमीटर पाणी जमा होत होते. परंतु उत्तम स्टील कंपनीने सन 2004 मध्ये 2 कोटी 64 लक्ष रुपये भांडवली हिस्सा देऊन या धरणाची उंची वाढविण्यात आली. धरणाची उंची वाढविल्यानंतर 3.67 दशलक्ष घनमीटर इतकी पाण्यामध्ये वाढ झाली. त्यानंतर 54 दशलक्ष घनमीटर पाणी उत्तम स्टील कंपनीला देण्याचे आपण मान्य केले. त्यापोटी दरवर्षी 45 लक्ष रुपये उत्तम स्टील कंपनीकडून शासनाकडे जमा होत आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, माझ्या मूळ प्रश्नाला उत्तर मिळाले नाही. शेतकऱ्यांचे पाणी तुम्ही इंडस्ट्रीजला देण्यापूर्वी शेतकऱ्यांना विश्वासात घेतले पाहिजे असे आपणही आपल्या आसनावरुन सांगितले आहे. शासन याठिकाणी पाणी विकण्याचा धंदा करीत आहे. हे शासन जनतेची सेवा करण्यासाठी आहे. त्याठिकाणी आपल्याला उत्पन्न मिळत आहे म्हणून शेतकऱ्यांच्या भात शेतीचे पाणी काढून घेणार काय? आपण स्वत:ला जनतेचे कल्याणकारी राज्य असे नेहमी म्हणता. सिंचनासाठी असलेले शेतकऱ्यांचे पाणी आपण इंडस्ट्रीजला देऊन शेतकऱ्यांच्या जमिनीचा सपाटा लावणार काय? शेतकऱ्यांची असेलेली शेती नष्ट करुन उद्योगपतींच्या घशामध्ये घालण्याचे काम शासनाकडून सुरु आहे, त्याला आपण बंधन घालणार काय?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

सिंचनासाठी असलेली शेती नष्ट करुन, पुन्हा ती उद्योगपतींच्या घशात घालण्याचे काम शासना मार्फत सुरु आहे. त्यावर बंधन घालणार आहात काय ? माझ्या एका प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही की, अशा वेळी तेथील शेतकऱ्यांना, लोकप्रतिनिधींना विश्वासात घेतले होते काय ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, जेव्हा आपण धरण बांधतो, तेव्हा त्याच्या प्रॉयॉरिटीज् ठरलेल्या आहेत. त्यानुसार पाणी साठा 367 द.ल.घ.मी.आहे, त्यामध्ये सिंचनासाठी 1.86 द.ल.घ.मी.आणि बिगर सिंचनासाठी 1.39 द.ल.घ.मी.आहे. सिंचनाचे पाणी न वापरता उर्वरित पाणी जर आपण उद्योगासाठी वापरले तर तेथील अनेक बेरोजगारांना काम मिळू शकेल. त्यामुळे उद्योग उभे राहिले पाहिजेत अशी तेथील लोकांची, लोकप्रतिनिधींची मागणी असते. म्हणून सिंचन क्षमता किंवा सिचनासाठी वापरण्यात येणारे पाणी यामध्ये कपात न करता जे आरक्षित पाणी होते, त्यानुसार देण्याचे ठरविलेले आहे.

. . . .एस-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : केंद्र शासनाने जाहीर केल्याप्रमाणे राज्य शासकीय कर्मचारी व शिक्षक यांना वाढीव महागाई भत्ता मंजूर करण्याबाबत होत असलेला विलंब

मु.शी. : केंद्र शासनाने जाहीर केल्याप्रमाणे राज्य शासकीय कर्मचारी व शिक्षक यांना वाढीव महागाई भत्ता मंजूर करण्याबाबत होत असलेला विलंब याबाबत सर्वश्री. व्ही.यू.डायगव्हाणे व जयंत प्र.पाटील वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वयू सूचना

श्री.सुनील तटकरे (वित्त मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री व्ही.यू.डागयव्हाणे यांनी "केंद्र शासनाने जाहीर केल्याप्रमाणे राज्य शासकीय कर्मचारी व शिक्षक यांना वाढीव महागाई भत्ता मंजूर करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

. . . .एस-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, राज्यातील 25 लाख शिक्षक आणि कर्मचारी यांच्या दृष्टीने हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. निवेदनामध्ये शेवटी असे म्हटलेले आहे की, "राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना तसेच इतर पात्र कर्मचारी व निवृत्ती वेतनधारकांना वरीलप्रमाणे अतिरिक्त महागाई भत्ता वाढ मंजूर करण्याबाबत यथावकाश विचार करण्यात येईल." परंतु येथे यथावकाश विचार करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. केंद्र शासनाने दि.1 जानेवारी 2010 पासून आठ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू केला आणि आपली कमिटमेंट आहे. परंतु निवेदनामध्ये मात्र शासनाने निराशाजनक उत्तर दिलेले आहे. शासनाने हे अधिवेशन संपण्यापूर्वी याबाबत निर्णय घेणे अत्यंत आवश्यक आहे. कारण यापूर्वी 1977 मध्ये 54 दिवसांचा संप झाला तेव्हापासून हे सूत्र लागू आहे की, केंद्र शासन जसजसा महागाई भत्त्या वाढवेल, त्याप्रमाणे तो राज्य शासन जशाच्या तसा देईल आणि यापूर्वी तसा दिलेला आहे. 18 महिन्याचा दिलेला नाही, त्याबद्दल मी प्रश्न विचारत नाही. पण केंद्र शासनाने जानेवारी पासून जो 8 टक्के महागाई भत्ता वाढविलेला आहे, त्याबाबत हे अधिवेशन संपण्यापूर्वी निर्णय घेतला पाहिजे आणि तसा निर्णय घेणार आहात काय ? तशा प्रकारचा दिलासा 25 लाख कर्मचाऱ्यांना देणार आहात काय ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, केंद्र शासनाने दि.01-01-2010 पासून महागाई भत्त्यामध्ये 8 टक्के वाढ करण्याचे जरुर आदेश दिलेले आहेत. परंतु त्यांनी ते आदेश दि.26-03-2010 रोजी आणि दि.31-03-2010 रोजी निगर्मित केलेले आहेत. आपल्याकडे एकंदर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या 14 लाख असून, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची संख्या 7 लाख 50 हजार इतकी आहे. या कर्मचाऱ्यांना 8 टक्के दराने महागाई भत्ता मंजूर झाल्यास कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी दरवर्षी 1980 कोटी आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी देय वार्षिक भत्ता हा 375 कोटी रुपये इतका आहे. म्हणजे 2355 कोटी रुपयांचा भार सरकारवर पडणार आहे. म्हणून याबाबतीत योग्य तो साकल्याने निर्णय घेण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, शासनाने कर्मचारी संघटनांना निवडणुकीपूर्वी जे लिहून दिले आणि वाहतूक भत्त्यासंबंधीचा जी.आर.काढण्यात आला. शासनाने स्पष्टपणे ही भूमिका घेतलेली आहे की, याबाबतीत गेल्या 10-12 किंवा 15 महिन्याचे जे द्यावयाचे आहे, ते तसेच राहू द्यावे. परंतु नवीन भत्ता हा केंद्र शासनाप्रमाणे दिला जाईल अशा प्रकारचे लेखी ॲग्रीमेंट

. . . .एस-4

प्रा.बी.टी.देशमुख . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शासकीय कर्मचारी संघटनेला आणि राजपत्रित अधिकाऱ्यांच्या संघटनेला देण्यात आले आहे. परंतु निवेदनामध्ये अतिशय चिथावणी देणारे वाक्य आलेले आहे आणि हे वाक्य जाणीवपूर्वक, विचारपूर्वक देण्यात आले असेल तर राहू द्यावे. पण जाणीवपूर्वक देण्यात आले नसेल तर ते काढून टाकण्यात यावे. यामध्ये असे म्हटलेले आहे की, "मात्र महागाई भत्ता लागू करताना त्या-त्या वेळी उपलब्ध साधनसंपत्तीचा विचार करुन जाणीवपूर्वक निर्णय घेण्यात येतो." त्यानंतर पुढे असे म्हटलेले आहे की,"राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना तसेच इतर पात्र कर्मचारी व निवृत्तीवेतनधारकांना वरीलप्रमाणे अतिरिक्त महागाई भत्ता वाढ मंजूर करण्याबाबत यथावकाश विचार करण्यात येणार आहे." ही धोरणापासून शिफ्ट आहे. म्हणून माझे म्हणणे असे आहे की, शासकीय कर्मचाऱ्यांची संघटना व राजपत्रित अधिकाऱ्यांची संघटना यांच्याशी आपण जी चर्चा केली, त्यानुसार केंद्र शासनाप्रमाणे महागाई भत्ता लागू करण्याचे मान्य केले आहे ही गोष्ट खरी आहे काय ? यामुळे निवेदनातील शेवटचे विसंगत वाक्य काढून टाकण्यामध्ये आपली काही अडचण आहे काय ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, निवेदनामध्ये एवढेच म्हटलेले आहे की,"राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना तसेच इतर पात्र कर्मचारी व निवृत्तीवेतनधारकांना वरीलप्रमाणे अतिरिक्त महागाई भत्ता वाढ मंजूर करण्याबाबत यथावकाश विचार करण्यात येणार आहे." आता "यथावकाश" या शब्दाने आपण कुठे डिप्राय होत आहोत असे जर वाटत असेल तर माझी हरकत नाही. परंतु जेव्हा राज्य शासनावर एवढया मोठया प्रमाणात भार पडत असतो, तेव्हा त्याचा साकल्याने विचार करणे आवश्यक असते. कारण आपण सभागृहामध्ये बसून विकासाच्या कामाच्या संदर्भात, योजनांच्या बाबतीत पोटतिडकीने बोलतो. सन्माननीय प्रा.बी.टी.देशमुख सर, याबाबतीत काही दुमत नाही, फक्त एवढीच बाब आहे की, ही बाब मंत्रिमंडळासमोर ठेऊन आणि आवश्यकता लागली तर सर्व संघटनांच्या बरोबर योग्य पध्दतीने विचार करण्याच्या बाबतीत निर्णय घेतला जाईल.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, शासनाने लेखी कमिटमेंट दिली होती काय ? असेल तर आता शासनाला त्याच्यापासून दूर जाता येईल काय ? लेखी कमिटमेंट दिली असेल तर शासन ती पाळणार आहे की नाही ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांशी सरकारने ज्या चर्चा केलेल्या आहेत आणि त्या अनुषंगाने जे मान्य केलेले आहे ते निश्चितपणे होईल परंतु ते करीत असताना त्याची वेळ आणि उपलब्धता या दोन्ही गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे.

श्री. कपिल पाटील : लेखी कमिटमेंट दिली होती काय आणि ती पाळणार काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, मी यशावकाश शब्दाबाबत मघाशी सांगितले आहे.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : केंद्राप्रमाणे देण्याच्या बाबतीत शासनाने कमिटमेंट दिली होती की नाही ?

प्रा. बी. टी देशमुख : उपलब्ध साधनसंपत्तीचा विचार करुन जाणीवपूर्वक निर्णय घेण्यात येतो असे निवेदनात म्हटले आहे. आपली फर्म कमिटमेंट आहे. यासंदर्भात माननीय मंत्रिमहोदयांना नोटीस दिलेली नसल्यामुळे त्यांच्याकडे यासंदर्भात कागदपत्रे उपलब्ध नाहीत असे दिसते. या ठिकाणी जर तर चे उत्तर दिले आहे त्यामुळे हे वाक्य आपण काढून टाकले पाहिजे. दरवेळी निर्णय घेऊन अशा पध्दतीचे चिथावणी देणारे वाक्य आहे. माझे असे म्हणणे आहे की, शासनाने कर्मचाऱ्यांना फर्म कमिटमेंट दिलेली होती. त्याबाबतचा निर्णय आठ दहा दिवस मागेपुढे घेणे हा भाग वेगळा. अशी फर्म कमिटमेंट दिली होती हे खरे आहे की नाही ?

श्री. कपिल पाटील : लेखी कमिटमेंट दिलेली होती काय आणि ती पाळणार काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, यासंदर्भात राज्य सरकारने संबंधित संघटनेबरोबर चर्चा करुन ज्या गोष्टी मान्य केलेल्या आहेत त्या मान्य करीत असताना आपली जी साधनसंपत्ती आहे त्याचा विचार करुन ते कधीपासून लागू करता येईल याबाबतीत निर्णय घेतला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ. शी. : मराठवाडा कृषी विद्यापीठाला व्यापारी दराने विजेची आकारणी करण्यात येणे

मु. शी. : मराठवाडा कृषी विद्यापीठाला व्यापारी दराने विजेची आकारणी करण्यात येणे याबाबत श्री. दिवाकर रावते,. वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. गुलाबराव देवकर (कृषी राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री.दिवाकर रावते यांनी "मराठवाडा कृषी विद्यापीठाला व्यापारी दराने विजेची आकारणी करण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, राईट टू एज्युकेशन बाबत माननीय पंतप्रधानांनी जाहीर केले. सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे आणि ते योग्य पध्दतीने मिळाले पाहिजे असे त्यांनी जाहीर केले. या सूचनेमध्ये शिक्षण संस्थांना वाणिज्यिक दराने विजेची आकारणी केली त्याबाबतचा विषय आहे. हे सगळे पैसे शेवटी विद्यार्थी आणि पालकांकडून वसूल होतात. हा प्रश्न विद्यापीठांपुरता असला तरी तो सर्वसमावेशक आहे. आपण विद्यापीठांना जी वीज पुरवितो ती वाणिज्यिक पध्दतीने पुरवितो. विद्यापीठे या शैक्षणिक संस्था आहेत. त्यांना घरगुती वापराप्रमाणे दर लावावा असे माझे म्हणणे नाही पण त्यामध्ये मधला भाग काढून त्यांना वीज पुरवठा करणार काय ? या निवेदनामध्ये त्या ठिकाणी बीजोत्पादन केले जाते असा उल्लेख केलेला आहे. त्याबाबत विद्यापीठामध्ये संशोधन चालते. ते वेगवेगळ्या वाणांचे बीजोत्पादन करतात. ते बीजोत्पादन विक्रीकरिता करीत नाहीत. शिल्लक राहिले तर विकतात. परंतु धंदा म्हणून किंवा व्यवसाय म्हणून ते काम करीत नाहीत. ते काम संशोधन म्हणून करतात. त्या संशोधन संस्थेला जो वाणिज्यिक दर लावतात त्याबाबत त्या ठिकाणी बीजोत्पादन करतात असे सांगणे कितपत योग्य आहे ? ते कारण बरोबर नाही. म्हणून संशोधनासाठी असलेल्या या चारही विद्यापीठांच्या बाबतीत या निर्णयात बदल करणार काय ? अनुदानाच्या बाबतीत निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, रिक्त पदांची व्यवस्था केलेली आहे परंतु गेल्या वेळी म्हणजे 2009-2010 मध्ये अनुदान आलेले नाही, 2009 मध्ये पूर्ण अनुदान आलेले नाही. आपण अर्थसंकल्पामध्ये तरतूद केलेली आहे पण ती पूर्ण येत नाही. म्हणून यावेळी जी 6 लाख 69 हजार रुपयांची तरतूद केलेली आहे त्याबाबत भविष्यामध्ये तपासून पाहणार काय ? आदिवासींच्या संदर्भात जो प्रस्ताव आहे त्याबाबत विस्तृत माहिती दिलेली आहे. परंतु किनवट मध्ये जे आदिवासी विद्यापीठ व्हावयाचे आहे ते माननीय मुख्यमंत्र्यांनी सूचित केलेले असून त्यांच्या जिल्ह्यातील असल्यामुळे त्याला तातडीने मान्यता देण्याची आवश्यकता असल्यामुळे त्याला तातडीने मान्यता देणार काय ? उद्घाटन कशामुळे लांबले आहे. माननीय मंत्रिमहोदयांना वेळ मिळत नाही म्हणून उद्घाटन लांबले आहे काय ? उद्घाटन कधी करणार ? हिंगोली येथे असलेली जी 300 एकर जमीन आहे ती पूर्वी निजामाच्या वापरात होती ती जमीन पशू वैद्यकीय विद्यापीठ निर्माण केल्यानंतर

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

त्याच विद्यापीठाची जमीन पशुवैद्यकीय विद्यापीठ, नागपूरला गेली आणि त्याची शाखा येथे आहे. त्यांनी पुढील संशोधनाकरिता 300 एकर जमिनीची मागणी केलेली आहे. तेवढी जमीन उपलब्ध करुन देण्यासाठी शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, या विद्यापीठांकडून यापूर्वी औद्योगिक दराप्रमाणे विजेची आकारणी करण्यात येत होती. त्याचा दर 3.95 पैसे इतका होता. दिनांक 1.6.2008 पासून त्यांच्याकडून वाणिज्यिक दराने म्हणजे 7.15 पैसे या दराप्रमाणे आकारणी करण्यात येत आहे. शासनाने यासंदर्भात विद्यापीठाला मार्गदर्शन केले आहे. विजेचा दर कमी करुन घरगुती दराप्रमाणे विजेची आकारणी करण्याबाबत विद्यापीठाने शासनाकडे प्रस्ताव दिला आहे. या विभागाने ऊर्जा खात्याशी संपर्क साधून तो प्रस्ताव त्यांच्याकडे पाठविला आहे. ऊर्जा खात्याकडून असे सांगण्यात आले आहे की, विद्युत नियामक आयोगाकडे हा प्रस्ताव पाठवावा लागेल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, नियामक आयोगाकडून वाणिज्यिक दर ठरविले जातात. परंतु विद्यापीठ कोणत्या वर्गामध्ये येतात याबाबत शासनाला धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा आहे. नियामक आयोग विजेचा दर ठरविते. त्यामुळे त्यांच्याकडे हा प्रस्ताव पाठवू नका. शासनाने धोरणात्मक भूमिका घेतली पाहिजे.

श्री.गुलाबराव देवकर : हा विषय कृषी खात्याचा आहे. परंतु कृषी खात्याने ऊर्जा खात्याकडे प्रस्ताव द्यावा लागेल, त्यामुळे ऊर्जा खात्याने याबाबतचे धोरण ठरवावयाचे आहे. कृषी विभागाने ऊर्जा खात्याला विनंती केलेली आहे. परंतु ऊर्जा खात्याने असे सांगितले आहे की, नियामक आयोग हे स्वतंत्र आहे. त्यांना विजेचे दर ठरविण्याचा अधिकार आहे. दिनांक 21 तारखेला औरंगाबाद येथे नियामक आयोगाची सुनावणीची बैठक होणार आहे. त्या बैठकीत विजेचा दर कमी करण्यासाठी विद्यापीठांचे प्रतिनिधी प्रस्ताव मांडतील. विजेचा दर कमी करावा अशी मागणी केली जाईल आणि त्या पध्दतीने ऊर्जा विभागाकडून निर्णय घेतला जाईल.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हा संपूर्ण विषय राज्यातील विद्यापीठांचा आहे. नियामक आयोगाकडून वीज खरेदीचे व विक्रीचे दर ठरविले जातात. नियामक आयोगाने काय ठरवावे हे शासन विचारु शकत नाही. परंतु विद्यापीठे व शिक्षण संस्था यांची कॅटेगरी कशामध्ये येते ते शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन ठरवावयाचे आहे. त्याच्याशी नियामक आयोगाचा काय संबंध आहे ?

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ही दुर्दैवी गोष्ट आहे. कृषी क्षेत्रातील संशोधनाचे नफा व तोटयाचे वार्षिक ताळेबंद निघत नाही. पिढयानुपिढयासाठी ती गोष्ट केली जाते. आमच्या वाडवडिलांनी बियाण्यांसाठी कणसे धरण्याचे काम केले. आता या कृषी विद्यापीठामार्फत बियाणे निर्माण करण्याचे काम केले जाते. न्यूक्लीअर व फाऊंडेशन अशी दोन्ही सीडस् या विद्यापीठाकडून तयार केली जातात. त्यामुळे शेतक-यांना फार मोठा रिलिफ मिळतो. ही कमर्शिअल ॲक्टीव्हीटी नाही. त्या विद्यापीठांनी कमर्शिअल ॲक्टीव्हीटी करु नये अशी कायद्यात तरतूद आहे. हे शासनाला माहीत आहे. तरीही त्यांच्या पाठीमागे नियामक आयोगाचे शुक्लकाष्ठ लावून देणे योग्य नाही. नियामक आयोगाला आदेश देण्याचे अधिकार शासनाला आहेत. शेतक-यांसाठी न्यूक्लीअर व फाऊंडेशन सीडस् तयार करण्याची ही ॲक्टीव्हीटी आहे. संशोधनातून उत्तम बियाणे निर्माण ही ॲक्टीव्हीटी आहे. त्या विद्यापीठांना कमर्शिअल ॲक्टीव्हीटी करता येत नाही. शासनाने ठामपणे निर्णय घ्यावा. नियामक आयोगाला आदेश देण्याचे अधिकार आहेत, त्याप्रमाणे त्यांना आदेश द्यावेत. असे शासन करील काय ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, यासंबंधी नियामक आयोगाबरोबर चर्चा करुन हा दर कमी करण्याबाबत त्यांच्याकडे आग्रह धरला जाईल. हा विषय एकटया कृषी विभागाचा नाही. याबाबतचा प्रस्ताव विभागाने यापूर्वीच दिलेला आहे.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम.....

(श्री. गुलाबराव देवकर...

आपली 25 तारखेला सुनावणी होणार आहे. त्यावेळी आमची बाजू मांडली जाईल. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे विद्यापीठाचे व्यापारी धोरण नाही. अध्यापन आणि संशोधनाचे काम विद्यापीठाकडून केले जाते. त्यामुळे घरगुती दराने वीज आकारणी करण्यासंबंधी आमचा आग्रह राहील.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : सिंधुदुर्ग जिल्हयात नोव्हेंबर 2009मधील वादळात बाधित झालेल्या मच्छिमारांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत

मु.शी. : सिंधुदुर्ग जिल्हयात नोव्हेंबर 2009मधील वादळात बाधित झालेल्या मच्छिमारांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत ॲड. गुरुनाथ कुलकणी, राजन तेली, हेमंत टकले, सुभाष चव्हाण, परशुराम उपरकर, किरण पावसकर व ॲड, अनिल परब, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो अणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नोव्हेंबर, 2009 मध्ये वादळामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शेतक-यांचे व मच्छिमारांचे लाखो रुपयांचे नुकसान होणे, शेतक-यांना नुकसानभरपाई शासनाकडून प्राप्त होणे, परंतु मच्छिमारांना अद्यापही मदत न मिळणे, या वादळात मच्छिमारांचे जाळी व होड्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होणे, काही रापण संघांना मदत देण्यात येणे, परंतु 57 रापण संघांना अद्यापही मदत न मिळणे, शासन रापण संघाना जाळी खरेदीच्या पावत्या सादर करण्याची जाचक अट बंधनकारक करणे, जुन्या पावत्या सादर करणे मच्छिमारांना शक्य नसणे, त्यामुळे संबंधित मच्छिमारांमध्ये शासनाविरुध्द निर्माण झालेली संतापाची भावना, लोकप्रतिनिधींनी ही जाचक अट काढून टाकण्याबाबत कृषी राज्यमंत्र्यांकडे लेखी निवेदन देणे, या प्रकरणी शासनाने करावयाची उपाययोजा व शासनाची भूमिका."

श्री.गुलाबराव देवकर (पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : गेल्या दोन-चार वर्षापासून कोकणाला मोठया आरिष्टांना तोंड द्यावे लागत आहे. कोकणाला फयान वादळाचा तडाखा बसला, अवेळी पावसाने झोडपले. आता अत्यंत कडक उन्हाळयामुळे आंब्याचे पीक शेतक-यांना मिळेनासे झालेले आहे. अशा निरनिराळया संकटांनी कोकणातील शेतकरी त्रस्त झालेला आहे. मच्छिमारांनी देखील शासन दरबारी आपल्या व्यथा मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. 9 आणि 10 नोव्हेंबरला कोकणाला फयान वादळाचा जोरदार तडाखा बसला. त्या वादळामध्ये अनेक मच्छिमार नौका बेपत्ता झाल्या, अनेक नौकांची मोडतोड झाली. मच्छिमारांची जाळी उद्ध्वस्त झाली. मच्छिमारांचे कोटयवधी रुपयाचे नुकसान झाले. यासंदर्भात संपूर्ण किनारपट्टीला साडेतेरा कोटीचे अनुदान दिले. त्यापैकी सिंधुदुर्ग जिल्ह्याला 4 कोटी रुपये दिले. शासन निधीची तरतूद करते परंतु तो निधी माणसापर्यन्त पोहोचत नाही हे भयानक वास्तव मी सभागृहापुढे मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. लक्षवेधीच्या निवेदनामध्ये "नुकसान झालेल्या जाळयासाठी प्रती जाळे रु, 10,000/-, मोठ्या जाळयासाठी प्रती जाळे रु. 25,000/-, नष्ट झालेल्या छोट्या नौकेच्या किंमतीच्या 50 टक्के किंवा नुकसानीच्या पंचनाम्यात नमूद केलेली रक्कम किंवा प्रति नौका रु. 60,000 च्या कमाल मर्यादेच्या अधीन राहून या पैकी कमी असलेली रक्कम, फयान चक्रीवादळात बाधित झालेल्या मच्छिमारांसाठी शासनाने शासन निर्णय दि. 25.11.2009 अन्वये रु. 13.94 कोटी निधी मंजूर केला" असे म्हटलेले आहे.

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये असे नमूद केलेले आहे की, "सिंधुदुर्ग जिल्ह्यात नोंदणी झालेले 110 रापणकार सिंधुदुर्ग जिल्हा श्रमजिवी रांपण संघ, मालवण जिल्हा सिंधुदुर्गशी संलग्न आहेत. फयान वादळात झालेल्या रापण संघाच्या जाळयांच्या नुकसानी पोटी जिल्ह्यातील 51 रांपण संघांना रु. 12.97 लक्ष रुपयांचे अर्थसहाय्य वाटप करण्यात आले आहे. शासन निर्णयाच्या अटी व शर्ती नुसार सदर रापण संघांकडून त्यांच्या जाळयांच्या नुकसानीचे सबळ पुरावे प्रत्यक्ष मच्छिमारांकडून प्राप्त झाल्याने व विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या कडून नुकसानीची खात्री पटल्यानुसार 51 रापण संघांच्या 1785 सभासदांना अर्थसहाय्याचा लाभ देण्यात आलेला आहे". माझा प्रश्न असा आहे. रापण संघ जाळी विणत नाहीत. रापण संघ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जाळयासाठी लागणारे सूत आणतात, त्यानंतर जाळी विणली जातात. वेंगुर्ला आणि देवगड मधील रापण संघाना अनुदान दिलेले नाही मात्र मालवण मधील रापण संघांनाच अनुदान दिलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, ज्या मच्छिमारांसाठी अनुदानाची घोषणा केलेली आहे, ज्या मच्छिमारांचे नुकसान झालेले आहे, त्यांना ते अनुदान देण्यात येणार आहे काय ? किती लोकांना हे अनुदान देण्यात येणार आहे ?

श्री. गुलाबराव देवकर : 9, 10 आणि 11 नोव्हेंबर 2009ला फयान वादळ झाले. दिनांक 25.11.2009च्या शासन निर्णयान्वये 13.94 कोटी निधी मंजूर करण्यात आला. त्यापैकी सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी 4.00 कोटी निधी वितरित करण्यात आला. काही रापण संघांना मदत करण्यात आली आणि काही रापण संघांना व मच्छिमारांना मदत करण्यात आली नाही असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले.

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.1.... श्री.गुलाबराव देवकर....

सभापती महोदय, त्याठिकाणी 110 रापण संघ आहेत. त्या 110 पैकी जवळपास 51 रापण संघांना अर्थसहाय्य देण्यात आले आहे. 54 रापण संघांना अद्याप अर्थसहाय्य द्यायचे राहिले आहे. 5 रापण संघांची मागणी नव्हती. 54 रापण संघांना अर्थसहाय्य द्यायचे राहिले आहे त्याचे उत्तर असे आहे की.....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, 45 मिनिटांमध्ये सर्व लक्षवेधी सूचना पूर्ण करावयाच्या आहेत. माननीय मंत्रीमहोदय उत्तर देण्यासाठी 15-15, 20-20 मिनिटांचा वेळ घेतात. मूळ प्रश्नाला उत्तरे दिली जात नाहीत.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, 54 रापण संघांना निधी मिळाला नाही. शासनाच्या नियमाप्रमाणे त्यांनी अटींची पूर्तता करावयास पाहिजे होती.....(अडथळा)....

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, हे निवेदन आम्ही वाचले आहे. ते निवेदन वाचून दाखविण्याची आवश्यकता नाही. या व्यतिरिक्त मंत्रीमहोदयांना काही उत्तर द्यावयाचे आहे का? जे पुरावे सादर केले आहेत ते ग्राह्य धरुन अर्थसहाय्य देणार का?

श्री.गुलाबराव देवकर : शासनाचे निकष स्पष्ट आहेत. जे निकष लावले आहेत त्या निकषाची पूर्तता या रापण संघांनी केली नसेल तर त्यांना निधी देता येत नाही.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी प्रश्न विचारण्यासाठी उभे असतात)

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : तुम्ही 4 कोटी रुपयांचे अनुदान दिले आहे. निधी देता येत नाही असेही सांगत आहात. मग हे 4 कोटी रुपये कसे मान्य केले?

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य आणि आमचे नेते ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांनी प्रश्न उपस्थित केला त्याबाबत मी सांगू इच्छितो की, 13.94 कोटी रुपये शासनाने तरतूद केली होती, त्या निधीचे वाटप करण्यात आले नाही. प्राथमिक सर्वेक्षण करण्यात आले ते ढोबळमानाने केले होते. त्या सर्वेक्षणामध्ये कोकणातील मच्छिमारांना योग्य तो न्याय मिळावा, त्यासाठी निधीची कमतरता भासू नये म्हणून 13.94 कोटी रुपयांचा निधी राखून ठेवण्यात आला होता. हा निधी नुकसानभरपाईसाठी आहे. तो देत असताना शासनाने काही अटी घातल्या होत्या. मागील हिवाळी अधिवेशनामध्ये याबद्दलचा प्रश्न सभागृहात उपस्थित झाला होता. मी उत्तर देताना

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नितीन राऊत.....

असे सांगितले होते की, सदर अटी रिलॅक्स करण्यात येतील. कारण महसूल व पुनर्वसन खात्याचे जे निकष आहेत त्यामध्ये अटी व शर्ती नाहीत. याचा विचार करुन तो प्रस्ताव संबंधित विभागाला आम्ही सादर केला होता. परंतु महसूल व पुनर्वसन विभागाने तो प्रस्ताव अमान्य केला.

श्री.विनोद तावडे : महसूल मंत्री कोकणातील आहेत. ते आग्रहाने प्रेसमध्ये बोलतात. त्यांनी प्रस्ताव नाकारला का?

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर पूर्ण करु द्यावे. सदरच्या अटी शिथिल करण्याची बाब संबंधित विभागाकडे आम्ही सादर केली, कारण निधी महसूल व पुनर्वसन विभागाकडून उपलब्ध करुन दिला जातो. त्या विभागाने प्रस्ताव अमान्य केला. प्रस्ताव नाकारला आहे.

श्री.विनोद तावडे : कसा नाकारला? महसूल मंत्री श्री.नारायण राणे साहेबांनी नाकारला?

डॉ.नितीन राऊत : मी कोणाचे नाव घेत नाही. मी याठिकाणी सांगू इच्छितो की, हा विषय अत्यंत गंभीर आहे. कोकणातील अविकसित भागातील विषय आहे. तेथील मच्छिमांराचा विषय आहे. त्यामुळे संबंधित विभागाच्या मंत्र्यांसमवेत प्रत्यक्षात बैठक घेऊन हा प्रश्न निकाली काढण्याच्या संदर्भातील कारवाई केली जाईल.

नंतर एक्स.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सन्माननीय सदस्यांनी स्पष्टपणे विचारले होते की, जी नुकसान भरपाई मच्छिमारांना मिळते त्यासाठी त्यांच्यांकडून पावत्या मागितल्या जातात तसेच अन्य पुराव्यांची मागणी होते. ही अट शिथील करणार काय ? एवढाच मर्यादित हा प्रश्न आहे.

श्री. नितीन राऊत : महोदय, मी यासंबंधीचे स्पष्टीकरण आणि उत्तर सुध्दा दिलेले आहे.

श्री. जयंत पाटील : महोदय, महसूल विभागाकडून जो निधी वर्ग करण्यात आलेला आहे. जो राहिलेला निधी आहे त्याचे वाटप कशा प्रकारे करावयाचे हे आपल्या विभागाला ठरवावयाचे आहे. अशा प्रकारचे धोरण असताना त्यानुसार हे वाटप करणार काय ?

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनीच असे म्हटले होते की, वेळ पडली तर यासंबंधी घेतलेला निर्णय बदलू. असे असताना मंत्री महोदय मात्र अशा प्रकारचे उत्तर सभागृहात देत आहेत....

श्री. नितीन राऊत : महोदय, या नुकसान भरपाईच्या प्रोसिजरमध्ये जी जाचक अट घातलेली आहे ती शिथील करण्यासंबंधीचा प्रस्ताव आम्ही संबंधित विभागाकडे पाठविला होता. तो त्यांनी नाकारलेला असला तरी संबंधित विभागाच्या मंत्र्यांबरोबर बैठक घेऊन यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल तसेच हे अधिवेशन संपण्यापूर्वी हा प्रश्न निकालात काढण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : महोदय, मागील अधिवेशनात नियम 93 अन्वयेच्या निवेदनातच सांगण्यात आले होते की, कोकणातील मच्छिमारांना नुकसान भरपाई देताना त्यामध्ये जी पावत्यांची अट आहे ती शिथील करण्यात येईल. त्यानुसार हा प्रस्ताव महसूल विभागाकडे पाठविला. माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे हे कोकणातीलच असल्याने ते या प्रस्तावाला अमान्य करणे शक्यच नाही. तसेच माननीय मंत्री महोदयांनी वर्तमानपत्रातून सुध्दा यासंबंधीची घोषणा केली होती तरी देखील त्यांनी हा प्रस्ताव अमान्य केला आहे काय असे मंत्री महोदयांना विचारले असता ते त्याला देखील "होय" असेच म्हणाले. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील व श्री. राजन तेली यांनी देखील मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिले की, ही नुकसान भरपाई देणे केवळ आपल्याच विभागाच्या अखत्यारितील बाब आहे त्यामुळे महसूल विभागाला का दोष देत आहात. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी पावत्या मिळत नाहीत कारण रॉ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

मटेरियल आणून जाळी बनविण्याचे काम मच्छिमार करतात असेही सांगितले तरी देखील मंत्री महोदय असेच उत्तर देत आहेत. कदाचित मंत्री महोदय हे कोकणातील नसल्याने त्यांना या गोष्टीची जाणीव नसावी. फयानग्रस्तांना अशा प्रकारे मदत देण्याबाबत टाळाटाळ केली जात असेल तर ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी अशी मी विनंती करतो.

श्री. नितीन राऊत : महोदय, मी जरी कोकणातला नसलो तरी कोकणातील सर्व सन्माननीय सदस्यांचे दु:ख मात्र मी चांगल्या प्रकारे समजू शकतो. मच्छिमारांवर जो अन्याय झालेला आहे तो दूर करण्याच्या दृष्टीने मी अगोदरच सांगितले आहे. तरी देखील हे अधिवेशन संपण्यापूर्वी सभागृहात यासंबंधीचे निवेदन करण्यात येईल.

(अनेक सन्माननीय सदस्य लक्षवेधी सूचना राखून ठेवण्याचा आग्रह धरतात)

उपसभापती : माननीय मंत्री महोदयांनी ही गोष्ट मान्य केली आहे की हे अधिवेशन संपण्यापूर्वी यासंदर्भातील निर्णय घेण्यात येईल, त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचना राखून ठेवण्याचा आग्रह कृपया धरु नये. कारण माझा त्यांच्यावर पूर्ण विश्वास आहे.

श्री. विनोद तावडे : महोदय, माझा विश्वास नाही. कारण नियम 93 अन्वयेच्या निवेदनात माननीय मंत्री महोदयांनी सुध्दा हेच सांगितले होते की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी यासंबंधीचा निर्णय घेतला जाईल....

यानंतर श्री. जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, माझ्या विभागाने अट शिथील करण्याचा निर्णय घेतला होता, खात्याच्या प्रोसिजर नुसार हा विषय मदत व पुनर्वसन विभागाकडे पाठविण्यात आला होता परंतु संबंधित विभागाने ही बाब नाकारली होती. मदत व पुनर्वसन विभागाने ही बाब नाकारली असली तरी त्यामध्ये दुरुस्ती करुन फयानग्रस्त मच्छीमारांना योग्य ती मदत केली जाईल.

श्री. विनोद तावडे :सभापती महोदय, फयानग्रस्तांमधील मच्छीमारांना मदत करण्यासाठी शासन अटी वगळण्याबाबातचा निर्णय अधिवेशन संपण्याच्या अगोदर घेईल असे मागच्या अधिवेशनात सांगितले होते आणि आता सुध्दा मंत्रीमहोदय तेच सांगत आहेत. त्यामुळे मच्छीमारांना मदत करण्याच्या संदर्भात आम्ही शासनावर कसा विश्वास ठेवावा ? माननीय राणे साहेबांसारखे सिनिअर मंत्री ही बाब नाकारीत आहेत तर ते ही बाब कशी काय स्वीकारतील ? त्यामुळे ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी.

डॉ.नितीन राऊत : सन्माननीय सभागृहाला माझी विनंती आहे की, हा विषय अत्यंत गंभीर आहे. या विषयाची सत्यता न बोललेली बरी कारण सत्य काय आहे याची आपल्याला सुध्दा माहिती आहे. तरी सुध्दा ....

उपसभापती : लक्षेवधी सूचना क्रमांक एक राखून ठेवण्यात येत आहे.

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हरकतीच्या मुद्याबाबत

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी 8 एप्रिल, 2010 रोजी नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. या सूचनेतील विषय आपल्या भागातील आहे. ठाणे येथील सर्व्हे नंबर 189 वरील 600 झोपडयांवर संकट आलेले आहे. या 600 झोपडया तोडण्याची नोटीस तहसीलदाराने पाठविलेली आहे. आज पासून या झोपडया तोडण्याची कारवाई होणार होती परंतु माननीय उपसभापती महोदयांनी या विषयात लक्ष घातल्यामुळे आज या झोपडया तोडण्यात आलेल्या नाहीत. 1995 पूर्वीच्या झोपडयांना शासनाने संरक्षण दिलेले असून या झोपडया सुध्दा 1995 पूर्वीच्या आहेत. 1995 पूर्वीच्या या झोपडया असल्यामुळे या झोपडयांचे पुनर्वसन झाल्याशिवाय आपल्याला कारवाई करता येणार नाही. त्यामुळे मी 93 ची सूचना दिलेली आहे त्या सूचनेचे उत्तर शासनाकडून येईपर्यंत या ठिकाणच्या झोपडया तोडण्याची कारवाई त्वरीत थांबवावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

उपसभापती : निवेदनाचे उत्तर येईपर्यंत या झोपडयांच्या संदर्भातील कारवाई थांबविण्यात यावी व यासंदर्भात सूचना कलेक्टरांना पाठविण्यात यावी.

श्री. प्रकाश सोळंके :ठीक आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : पुणे शहरातील जलतरण तलावात शिक्षण देणारे जीवरक्षक पूर्णपणे प्रशिक्षित नसणे.

मु. शी. :पुणे शहरातील जलतरण तलावात शिक्षण देणारे जीवरक्षक पूर्णपणे प्रशिक्षित नसणे यासंबंधी सर्वश्री मोहन जोशी,जयप्रकाश छाजेड, वि.प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुखमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे शहरात महानगरपालिकेच्या वतीने खाजगी जलतरण तलाव मोठ्या प्रमाणात निर्माण होत असणे या तलावामध्ये शिक्षण देणाऱ्या जीवरक्षकांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढलेली असणे, परंतु सदर जीवरक्षकांचे प्रशिक्षण राबविणाऱ्या पुणे शहरात दोन संस्था असणे, उक्त संस्था बोगस प्रमाणपत्र घेऊन जीवरक्षकाची नोकरी मिळवित असल्याचा प्रकार फेब्रुवारी, २०१० मध्ये निदर्शनास आल्याने ज्या जीवरक्षकांच्या सहाय्याने तलावात प्रशिक्षण दिले जाते त्यांच्याबाबत शंका निर्माण होणे, पुण्यासारख्या मेट्रो शहरात दरवर्षी उन्हाळयामध्ये जलतरण तलावात एक ते दोन बळी जात असणे, जीवरक्षकांच्या अभ्यासक्रमांवर महापालिकेच्या प्रशासनाचे पूर्ण नियंत्रण असणे गरजेचे असताना याकडे दुर्लक्ष होत असणे, त्यामुळे पोहण्यासाठी सराव करणाऱ्या मुलांच्या पालकांमध्ये पसरलेली साशंकता व भितीचे वातावरण, याबाबत शासनाने कार्यवाही करुन जीवरक्षक अभ्यासक्रमांवर नियंत्रण आणण्यासाठी करावयाची उपाययोजना व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. "

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्य मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी :सभापती महोदय, राज्यामध्ये नागरीकरण फार मोठया प्रमाणात वाढत आहे. पुणे महानगरपालिका व राज्यातील जेवढया महानगरपालिका, महापालिकेमध्ये जे पोहण्याचे तलाव असतात त्या ठिकाणी जीवरक्षकांची नेमणूक केली जात असते. परंतु जीवरक्षकांची नेमणूक ही शासनाच्या नियमाप्रमाणे करावयास पाहिजे. कारण पोहणा-यांचा जीव वाचावा यासाठी जीव रक्षकांची नेमणूक केली जात असते. परंतु ज्यांना पोहता येत नाही अशांना देखील जीवरक्षकांचे प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे ही फार गंभीर बाब आहे. जीव रक्षकांने केवळ पोहणा-यांना वाचवायचे नसते तर पोहणा-याला बाहेर काढल्यानंतर त्या व्यक्तीस कृत्रिम श्वासोश्वास देणे, पोटातून पाणी बाहेर काढणे गरजेचे असते. माणसाचा जीव वाचविण्यासाठी सर्व ज्ञान जीव रक्षकास असणे आवश्यक आहे. या ठिकाणी जे निवेदन करण्यात आलेले आहे त्यामध्ये म्हटले आहे की, "राष्ट्रीय लाईफ सेव्हींग सोसायटी आणि अस्तित्व" या दोन संस्थाकडून जीवरक्षकांची गुणवत्ता, क्षमता आणि पोहण्याच्या सरावाचा अनुभव न घेता जीवरक्षक प्रशिक्षणाचे दाखले दिले जातात असे वृत्त प्रसिध्द झालेले आहे.या दोन्ही संस्थांना जीवरक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम व प्रमाणपत्र देण्यास पुणे शहर महानगरपालिकेने प्राधिकृत केलेले नाही.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी ....

असे पहिल्या पानावर नमूद केले आहे. दुसऱ्या पानावर असे नमूद केले आहे की, "पुणे शहरातील जलतरण तलाव येथे यापूर्वी झालेल्या अपघाताची घटना विचारात घेऊन पोहण्याच्या तलावासाठी वेगळी/स्वतंत्र नियमावली अस्तित्वात नसल्याने सर्व जलतरण तलावाच्या देखभालीसाठी मानद सल्लागार म्हणून राष्ट्रीय लाईफ सेव्हिंग सोसायटी (इंडिया) यांची दिनांक 17.4.2001 पासून पुणे महानगरपालिकेने नेमणूक केली आहे." या संस्थेची नेमणूक करून दहा वर्षे झाली. ज्यासंस्थेची नेमणूक पुणे महानगरपालिकेने केली त्या संस्थेने बोगस प्रमाणपत्र देण्याचे काम देखील केलेले आहे. महापालिका म्हणते की, यात आमचा काहीही संबंध नाही. ज्यांचा काहीही संबंध नाही अशांना महानगरपालिका दहा वर्षे मानद सल्लागार म्हणून नेमते. ही एक मोठी विसंगती येथे आहे. लेखी उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, पुणे महानगरपालिका क्षेत्रात एकूण 153 जलतरण तलाव आहेत. शासनाच्या धोरणानुसार 20 जणांच्या मागे एक जीवरक्षक असणे बंधनकारक आहे. असे जर प्रमाण असेल तर पुणे महानगरपालिकेमध्ये एकूण किती जीवरक्षक आहेत ? हे शासनाने सांगावे. तसेच सदर तलावामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना फायर ब्रिग्रेडच्या धर्तीवर जीवरक्षकांचा अभ्यासक्रम शासनानेच घ्यायला हवा म्हणून शासन या अभ्यासक्रमाची निवड, पात्रता, निकष स्पष्ट करणार काय ? प्रमाणपत्र देण्याचे काम करणार काय ? त्यावर नियंत्रण ठेवणार काय ? शासनाच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत तीन महिन्याचा कोर्स सुरू करून सदर जीवरक्षकांना प्रशिक्षण देणार काय ? असे माझे स्पेसिफिक प्रश्न आहेत.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी पुणे महानगरपालिकेतील जलतरण तलावात पोहणाऱ्यांच्या जीवनाची काळजी घेण्यासाठी जीवरक्षक अस्तित्त्वात असायला पाहिजे असा अत्यंत मूलभूत प्रश्न उपस्थित केला आहे. हा प्रश्न पूर्णपणे दुर्लक्षित होता. या प्रश्नाच्या अनुषंगाने आम्ही माहिती घ्यायला गेलो त्यावेळी एक गोष्ट लक्षात आली की, जलतरण तलाव मोठे मोठी खाजगी हॉटेल्स, महानगरपालिका, नगरपालिका तयार करतात. परंतु, त्यामध्ये जीवरक्षक कोणत्या प्रकारचे घ्यावेत, त्यांना कोणी प्रशिक्षित केले असावे,त्यांचे शिक्षण किती असावे, यासंदर्भातील निश्चित असे धोरण कुठेही अस्तित्त्वात नाही. म्हणून मी सन्माननीय सदस्यांना मनापासून धन्यवाद देतो. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रामध्ये जलतरण तलाव निर्माण केले जातील त्यावेळी प्रशिक्षित जीवरक्षक घेतले जावेत असा निश्चित नियम पुढच्या काळात बिल्डींग परमीशनमध्ये समाविष्ट केला जाईल.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव ...

सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचना दिली असल्यामुळे हा विषय ऐरणीवर आलेला आहे.या निमित्ताने सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले आहे की अग्निशमन दलाच्या वतीने जल तरण तलावातील जीव रक्षकांना प्रशिक्षण देण्यात यावे आणि अशा प्रकारे प्रशिक्षित जीव रक्षकांची तेथे नेमणूक करण्यात यावी. मी आपल्याला सांगू इच्छितो की, महाराष्ट्र ॲमेच्युअर स्वीमिंग असोसिएशन ही राज्य स्तरीय अधिकृत संस्था असून या संस्थेकडून तांत्रिक मार्गदर्शन घेऊन आणि त्यांच्या मार्फत लाईफ गार्डसचे क्वालिफिकेशन पूर्ण करुन पुढच्या काळात लाईफ गार्डस तयार करण्यात यावेत अशा प्रकारचा निर्णय घेण्यात येईल. त्याचबरोबर सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, 153 जल तरण तलावापैकी 137 जल तरण तलाव खाजगी आहेत. त्या जल तरणं् तलावाकडून माहिती घेतली असता अशी माहिती मिळाली की त्या ठिकाणी 134 लाईफ गार्डस आहेत. 20 पोहोणा-या व्यक्ती मागे एक लाईफ गार्ड असला पाहिजे असा निकष आहे परंतु त्या निकषाची अंमलबजावणी् केली गेली नाही.ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे पुणे महानगरपालिकेमध्ये अशा प्रकारचे जे जलतरण तलाव आहेत त्यामध्ये या निकषाप्रमाणे तात्काळ लाईफ गार्डस घ्यावेत यासाठी महानगरपालिकेच्या आयुक्तांनी पहाणी करुन तात्काळ लाईफ गार्डसची नियुक्ती करावी अशा प्रकारची सूचना आजच देण्यात येईल. आय.टी.आय.मधून तीन महिन्यांचा कोर्स लाईफ गार्डससाठी देण्यात यावा अशी सूचना सन्माननीय सदस्यांनी केली आहे. तेव्हा अशा प्रकारचा कोर्स सुरु करता येईल काय ही बाब तपासून पहावी लागेल. आणि जर अशा प्रकारचा कोर्स सुरु करता येत असेल तर त्याबाबत विचार करण्यास शासन अनुकूल आहे.

श्री.मोहन जोशी : पुणे महानगरपालिकेच्या क्षेत्रात 137 जल तरण तलाव आहेत त्या ठिकाण एकूण किती लाईफ गार्डस आहेत यासंबंधीची माहिती मंत्री महोदयांनी सांगितली नाही.

श्री.भास्कर जाधव : त्यासबंधी मी उत्तर दिलेले आहे.मी पुन्हा सागू इच्छितो की, खाजगी 137 जलतरण तलाव आहेत त्यामध्ये 134 लाईफ गार्डस आहेत.

श्री.मोहन जोशी : 20 पोहोणा-या व्यक्तीमागे एक लाईफ गार्ड असावा असा नियम आहे. तेव्हा या नियमाप्रमाणे किती लाईफ गार्डस नेमण्यात आलेले आहेत.?

श्री.भास्कर जाधव : त्या ठिकाणच्या जलतरण तलावामध्ये पोहोणा-या व्यक्तीची क्षमता किती

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव ...

आहे यासबंध्ीची माहिती आता उपलब्ध नाही. या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने हा विषय समोर आलेला आहे पुणें् महानगरपालिकेच्या आयुक्तामार्फत यासबंधीचा सर्व्हे करण्यात येईल आणि 20 पोहोणा-या व्यक्ती मागे एक लाईफ गार्ड ठेवावा यासंबंधीच्या नियमाची अंमलबजावणी करण्यात यावी अशा प्रकारच्या सूचना देण्यात येतील.

.श्रीमती अलका देसाई: सभापती महोदय, लाईफ सेव्हीग सोसायटी ऑफ इंडिया यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण न घेतलेले लाईफ गार्डस जलततरण तलावामध्ये नेमण्यात आलेले आहेत त्यामुळे त्यांचा काहीही फायदा होत नाही. बोगस सर्टिफिकेट देणा-या संस्थावर शासन कारवाई करणार आहे काय ? जर कारवाई केली नसेल तर ती कारवाई केव्हा करण्यात येणार आहे ? यानंतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, राष्ट्रीय लाईफ सेव्हीग सोसायटीच्या वतीने 17.4.2001 रोजी सल्लागाराची नियुक्ती करण्यात आलेली आहे परंतु या निवेदनात असे म्हटलेले आहे की," पुणें् महानगरपालिकेला या जीव रक्षकांची नेमणूक करण्यास सांगितलेले आहे." 2001 साली सल्लागाराची नियुक्तीकरुन सुध्दा 2010 सालापर्यंत पुणें् महानगरपालिकेने अशा प्रकारची जीवरक्षकाची नेमणूक करण्यासंबंधीची योजना का केली
नाही ?आणि त्याबाबतीत संबंधिताविरुध्द कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री.भास्कर जाधव : राष्ट्रीय लाइफ सेव्हींग सोसायटी ऑफ इंडिया ही मूळ कंपनी असून श्री. शर्मा नावाच्या सैन्यातील निवृत्त ॲडमिरलने ती स्थापन केली आहे . ही शासकीय संस्था नाही. ज्या व्यक्तीने ही संस्था स्थापन केली आहे त्या व्यक्तीने लायसन्स घेतले असून ती संस्था रजिस्टर केलेली आहे.पोंहोणा-या व्यक्तीला किंवा लाइफ गार्डला खाजगी पध्दतीने या संस्थेतून प्रशिक्षण दिले जाते. त्यांची कोणत्याही प्रकारची कायदेशीर नेमणूक केलेली नाही.परंतु लाईफ गार्ड नेमत असतांना कोणाकडून त्याची माहिती घ्यावयाची किंवा लाईफ गार्ड म्हणून एखादी व्यक्ती इलिजीबल आहे किंवा नाही हे कोणाकडून ठरवून घ्यावयाचे यासंबंधी मानद म्हणून दिनांक 17.4.2001 रोजी त्यांना मान्यता देण्यात आलेली आहे . हा प्रश्न आता ऐरणीवर आलेला आहे.त्यामुळे महाराष्ट्र ॲमेच्युअर स्वीमिंग असोसिएशन या राज्यस्तरीय .....

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

मान्यताप्राप्त संस्थेकडून योग्यायोग्यतेचा दाखला घेण्याचा निर्णय घेतला आहे. ज्या अस्तित्व संस्थेचा उल्लेख आपण केला आहे, त्या संस्थेचे लोक सुध्दा श्री. शर्मा यांच्याबरोबर काम करीत होते. त्यामध्ये श्री. कोंडविलकर नावाचे गृहस्थ असून ते त्या संस्थेमधून बाहेर पडून त्यांनी खाजगी संस्था निर्माण केली आहे. त्या संस्थेचा याच्याशी संबंध नाही.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या तलावामध्ये लहान मुले पोहायला जातात त्यावेळी त्यांच्यापेक्षा कित्येक पटीने उंच असलेल्या तलावामध्ये ते बुडून मरण पावतात. त्यानंतर त्याबाबत चर्चा होत असते. माझा प्रश्न असा आहे की, तलावामध्ये लहान मुले बुडून मृत्युमुखी पडण्याचे प्रमाण जास्त आहे, म्हणून या तलावांची निर्मिती वास्तूशात्रानुसार आणि खासकरुन आर्किटेक्टच्या मार्गदर्शनाखाली करुन त्यामध्ये लहान मुलांसाठी वेगळे सेक्शन करणे आवश्यक आहे. अनेक ठिकाणी दोन तलाव बांधलेले असतात, त्यामध्ये एक भाग मोठ्या पुरुषांसाठी असतो, आणि दुसरा भाग लहान मुलांसाठी असतो. वॉटर किंग्डममध्ये अनेक वेळा मोठी माणसे सुध्दा पाण्यामध्ये चालत असल्याचे पहावयास मिळते. तेव्हा असे वेगवेगळे भाग आपण तलावामध्ये ठेवले पाहिजेत. माझा प्रश्न असा आहे की, तलावातील रचना कशाप्रकारची असावी या संबंधी आपल्या विभागामार्फत महानगरपालिकेला सुधारीत स्वरुपामध्ये आराखडा देणार काय?

श्री. भास्कर जाधव : सजेशन फॉर ॲक्शन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अंधेरी (पश्चिम) मुंबई येथे मे.ऑबेरॉय कन्स्ट्रक्शनकडून 30 टक्के जादा चटईक्षेत्राचे बांधकाम करणे

मु.शी.: अंधेरी (पश्चिम) मुंबई येथे मे.ऑबेरॉय कन्स्ट्रक्शनकडून 30 टक्के जादा चटईक्षेत्राचे बांधकाम करणे यासंबंधी श्री. पांडुरंग फुंडकर,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अंधेरी (पश्चिम),मुंबई येथील न.भू.क्र.१/३८/२ व्हिजेल ओशिवरा, प्लॉट नं.१२०, लोखंडवाला कॉम्प्लेक्य येथील स्वामी समर्थ प्रसन्न ले-आऊटमध्ये मे.ऑबेरॉय कन्स्ट्रक्शन यांनी बांधकाम केलेल्या ओबेरॉय स्काय हाईट व ऑबेरॉय स्प्रिंग या इमारतीत जादा चटईक्षेत्र वापरले असल्याचे मार्च, २०१० मध्ये निदर्शनास येणे, सीआरझेड-२ च्या कायद्यानुसार समुद्राच्या २०० मीटरपासून आत बांधकाम करता येत नसतांनाही मे.ऑबेरॉय कन्स्ट्रक्शन यांनी महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांच्या संगनमताने ३० टक्के जादा चटईक्षेत्राचे बांधकाम करणे, या अनधिकृत बांधकामाबाबत मुंबई महानगरपालिकेच्या "के" वार्डच्या कार्यकारी अभियंत्याकडे तक्रारी दाखल झाल्या असता त्यांनी याबाबतचा अहवाल शासन स्तरावर सादर करुनही अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई न होणे, मे.ऑबेरॉय कन्स्ट्रक्शन यांनी बांधलले अनधिकृत बांधकाम त्वरीत तोडण्याबाबत तसेच या बांधकामास परवानगी देणाऱ्या मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची भूमिका."

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांनाआधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ KGS/

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अंधेरी पश्चिम मुंबई येथील न.भू.क्र.1/38/2 व्हिलेज ओशिवरा,प्लॉट नं. 120, लोखंडवाला कॉम्प्लेक्स येथील स्वामी समर्थ प्रसन्न ले-आऊटमध्ये मे. ओबेराय कंस्ट्रक्शन यांनी बांधकाम केलेल्या ओबेराय स्काय हाईट व ओबेराय स्प्रिंग या इमारतीत जादा चटईक्षेत्र वापरले असल्याची मार्च, 2010 मध्ये उघडकीस आलेली घटना, सीआरझेड-2 च्या कायद्यानुसार समुद्राच्या 200 मीटर पासून आत बांधकाम करता येत नसतानाही मे. ओबेरॉय कन्स्ट्रक्शन यांनी स्थानिक महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरुन 30 टक्के जादा चटई क्षेत्राचे बांधकाम केले आहे. ओबेरॉय स्काय या इमारतीच्या बांधकामाबाबत महानगरपालिकेच्या "के" पश्चिम वॉर्डाचे वॉर्ड ऑफिसर श्री. खोजे, "के" विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. लालजी, तसेच तत्कालीन महानगरपालिका आयुक्त श्री. फाटक यांच्याकडे आदर्श फाऊंडेशन यांनी दि. 26 ऑक्टोबर 2009 रोजी तक्रार केली हे खरे आहे काय? दुसरा प्रश्न असा की, सदर तक्रारीबाबत कोणत्या बाबीबाबत आक्षेप घेण्यात आले? तिसरा प्रश्न असा की, सदर तक्रारीच्या अनुषंगाने "के" वॉर्डच्या कार्यकारी अभियंत्याने तपासणी करुन आपला अहवाल तयार केला. त्या अहवालाची प्रत आदर्श फाऊंडशनने मागितली असतां त्यांना दिली गेली नाही. या संबंधी मी सुध्दा त्यांना पत्र दिले होते त्याचे उत्तर मला मिळाले नाही. कार्यकारी अभियंत्यांनी या तपासणी अहवालात काय नमूद केले आहे? बिल्डिंगचे बांधकाम करीत असतांना लॉबी स्पेसमध्ये 5 ते 10 टक्के क्षेत्र धरले जाते. परंतु ओबेरॉय कंस्ट्रक्शन्सने स्काय हाईटसच्या बांधकामामध्ये ते क्षेत्र 40 टक्क्याहून अधिक धरले आहे. यामधील खरी परिस्थिती काय आहे? या माझ्या तीनही प्रश्नांची उत्तरे आपण देणार काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जे प्रश्न विचारले आहेत त्यामधील काहींचा उल्लेख लक्षवेधी सूचनेमध्ये नाही. लक्षवेधी सूचनेमध्ये केवळ 2 गोष्टींवर प्रकाश टाकण्यात आला आहे. त्यामध्ये सी.आर. झेड. 2 च्या कायद्याचे उल्लंघन करुन 200 मीटरच्या आत बिल्डिंगचे बांधकाम करण्यात आले, यासंबंधीचा प्रश्न विचारण्यात आला आहे. दुसरा प्रश्न असा की, स्थानिक महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरुन 30 टक्के जादा चटईक्षेत्राचे बांधकाम करण्यात आले त्यासंबंधी विचारण्यात आला आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी त्याशिवाय आणखी दोन प्रश्न उपस्थित केले. की, तेथील वॉर्ड ऑफिसरविरुध्द

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

तत्कालीन आयुक्त श्री. फाटक यांच्याकडे तक्रार करण्यात आली. त्या तक्रारीच्या अनुषंगाने सी.ई. यांनी नक्की कोणता अहवाल दिला? या संदर्भातील माहिती आता माझ्याजवळ नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, त्याच बांधकामाच्या संदर्भातील प्रश्न आहे आणि त्या बांधकामापासून फार लांब अंतरावरील प्रश्न विचारलेला नाही, तर तीच इमारत, तोच कॅम्पस् असून त्याबाबतचा प्रश्न विचारल्यानंतर सुध्दा माननीय मंत्री महोदय माहिती घेण्यात येईल असे सांगत आहेत. मग पुढे असे सांगितले जाईल की, आम्ही फक्त 1 ते 5 मजल्यापर्यंतच माहिती आणली असून वरील मजल्यांच्या संदर्भातील माहिती आणलेली नाही. सभापती महोदय, विषय तोच आहे, प्रकरण तेच आहे मग याठिकाणी माहिती का दिली जात नाही ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी असे सांगितले की, या लक्षवेधी सूचनेमध्ये या बाबींच्या संदर्भात थोडासा, ओझरता जरी उल्लेख असता की, यापूर्वी अशा प्रकारची तक्रार करण्यात आलेली आहे काय ? . . . .

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हे सर्व हास्यास्पद सुरु आहे, म्हणजे आम्ही प्रत्येक मजल्याच्या संदर्भात वेगवेगळी लक्षवेधी सूचना द्यावयाची काय ?

श्री.पांडुरग फुंडकर : सभापती महोदय, मी एकाच इमारतीच्या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे.. . .

उपसभापती : माननीय मंत्री महोदय, याठिकाणी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेबांनी प्रश्न विचारलेला आहे. ते माननीय विरोधी पक्षनेते आहेत आणि त्यांनी विचारलेल्या सगळयाच प्रश्नांची उत्तरे व्यवस्थित द्यावीत असे माझे मत आहे. आता माननीय विरोधी पक्षनेत्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे समर्पक उत्तर आले पाहिजे.

श्री.पांडुरंग फुंडकर (खाली बसून) : सभापती महोदय, आपण ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आता या क्षणापर्यंत तरी शासनाकडे अशा प्रकारचा कोणताही अहवाल नाही आणि मला देखील याबाबतीत काहीच लपविण्याचे कारण नाही. सभापती महोदय, आपण जे सांगाल आणि आदरणीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब जे सांगतील ते मला मान्य असेल. मला यामध्ये लपविण्यासारखे काहीही नाही किंवा यामध्ये आढेवेढे घेण्यासारखे काहीच नाही.

उपसभापती : आपण काही लपवित आहात असे माझे बिलकूल म्हणणे नाही. परंतु आपल्याकडे जे छापील स्वरुपामध्ये उत्तर आलेले आहे, त्यावरुन अधिकारी वर्ग या बिल्डरांना . . .

. . . .2 सी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती . . . .

संरक्षण देत आहेत की काय ? अशी शंका आली म्हणून मी आपल्याला सांगितले. आपल्या भावनेबद्दल आमच्या मनामध्ये काहीही हेतू नाही. परंतु उत्तरे देताना कोणी प्रश्न विचारलेला आहे हे पहावे, निदान माननीय विरोधी पक्षनेत्यांनी प्रश्न विचारलेला असताना त्याबाबतीत असे त्रोटक उत्तर देणे बरोबर नाही. कारण शेवटी आपल्याकडे माहिती पूर्णपणे आली असती तर आपण व्यवस्थित उत्तर दिले असते. परंतु आपल्यापर्यंत याबाबत पूर्ण माहितीच आलेली नाही. त्यामुळे कृपया आपण अधिकारी वर्गाला देखील हे समजावून सांगितले पाहिजे की, बिल्डरनां जरी संरक्षण द्यावयाचे झाले तरी त्याचे स्वरुप मर्यादित असावे, ते बेसूमार असू नये. हे बरोबर नाही.

श्री.विनोद तावडे (खाली बसून) : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी.

उपसभापती : मी सदरहू लक्षवेधी सूचना राखून ठेवणार नाही. माननीय मंत्री महोदय लक्षवेधी सुचनेबाबत उत्तर देतील. त्यांनी पाहिजे तर सभागृहाच्या पटलावर उत्तर ठेवावे, माझे काही म्हणणे नाही. पण आपण त्यांना दोष देण्यात अर्थ नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सरकारशी संबंधित असलेल्या विषयाबाबत लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने प्रश्न विचारलेला आहे. जर माननीय मंत्री महोदयांकडे त्याबाबत उत्तर नसेल तर मग ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, ओबेरॉय स्काय हाईट आणि ओबेरॉय स्प्रिंग या इमारतींच्या कन्स्ट्रक्शनच्या बाबतीत सर्वच नियम आणि अटी शिथिल करण्यात आलेल्या आहेत. माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न विचारलेला आहे. पण शहरामध्ये ओबेरॉय कन्स्ट्रक्शनसाठी शासनाने सर्व नियम आणि शर्ती बाजूला ठेऊन रेड कार्पेट घातलेले आहे. त्यातील गोरेगाव (ईस्ट) येथील एक प्रकार सांगू इच्छितो. गोरगाव (ईस्ट) मध्ये ज्या इमारतीमध्ये त्यांचे स्वत:चे ऑफीस आहे त्याबाबत सांगावयाचे तर शहरातील ही पहिलीच इमारत अशी असेल की ज्याला शासनाने परवानगी दिलेली आहे. त्याठिकाणी 1 ते 17 मजल्यापर्यंत ऑफीसेस सुरु असतात आणि 18 ते 34 मजल्यापर्यंत फाईव्ह स्टार हॉटेलसाठी परवानगी दिलेली आहे. शहरामध्ये कुठेही अशा प्रकारची परवानगी दिलेली नाही. त्याठिकाणी स्टील्ट पोडिअमपुढे

. . . . 2 सी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पार्कींगची सोय नाही, हे पार्कींग बाहेर केले जाते. उद्या जर असाच तेथे ताज, ओबेरॉय सारखा हल्ला झाला किंवा तेथे रहाणारे जे रहिवासी आहेत त्यांना जर काही प्रॉब्लेम निर्माण झाला तर तेथे अग्निशमन दलाच्या गाड्या देखील येऊ शकणार नाहीत. तर माझी अशी विचारणा आहे की, शासन ओबेरॉय यांना रेड कार्पेट का घालत आहे ? माननीय मंत्री महोदय, आपण निवेदनामध्ये ओबेरॉय स्काय हाईटसाठी असे सांगितले आहे की "सदर भूखंड सीआरझेड-2 ने बाधित असल्यामुळे " मग सीआरझेड-2 मध्ये असे किती प्रकल्प बाधित आहेत.. . .

श्री.भास्कर जाधव (खाली बसून) : यासाठी बीएमसी परवानगी देते की शासन परवानगी देते?

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, जोपर्यंत नगरविकास विभागाकडून परवानगी दिली जात नाही, तोपर्यंत बीएमसी देखील परवानगी देत नाही. नगरविकास विभागाकडून प्रथम परवानगी दिली जाते. नगरविकास विभागाकडून जोपर्यंत पहिल्यांदा परवानगी मिळत नाही, तोपर्यंत मुंबई महानगरपालिका परवानगी देऊ शकत नाही. आपण या ओबेरॉयसाठी एवढे रेड कार्पेट का घालत आहात ?

श्री.भास्कर जाधव (खाली बसून) : यासाठी सी.सी.परवानगी कोण देते ? मुंबई महानगरपालिका परवानगी देते की शासन परवानगी देते ?

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, नगरविकास विभागाने परवानगी दिल्याशिवाय पुढे काही होऊ शकत नाही. पहिली परवानगी नगरविकास विभागाकडून दिली जाते. सरकारकडून दिली जाते.

डॉ.नीलम गोऱ्हे (खाली बसून) : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय खाली बसून बोलत आहेत.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, आमचा प्रश्न एवढाच आहे की, बांधकामासाठी एवढया अटी आणि शर्ती असताना ओबेरॉय बिल्डरसाठी आपण एवढे का वाकत आहात ? राज्यावर कर्जाचा बोजा भरपूर आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आदरणीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी विचारलेली लक्षवेधी सूचना असल्यामुळे मला यासंबंधात जी-जी माहिती घ्यावयाची होती, ती मी ...

. . . .2 सी-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

घेतलेली आहे. यामध्ये स्टील्ट पार्कींग, पोडिअमसाठी आणि प्रत्यक्षात या इमारतीमध्ये किती मजल्यांच्या बांधकामासाठी मंजुरी मिळालेली आहे ? प्रत्यक्षात किती मजल्यांचे बांधकाम झाले आहे ? याची मी पूर्ण माहिती घेतलेली आहे. याला सीसी कधी देण्यात आले ? याचीही मी पूर्णपणे माहिती घेतलेली आहे. याठिकाणी एक ओबेरॉय स्काय व्हाईट आणि दुसरी ओबेरॉय स्प्रिंग अशा दोन वेगवेगळया इमारती आहेत.

यानंतर श्री.बरवड . . . .

.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

यासंदर्भात जेवढी काही माहिती घ्यावयाची होती ती घेतली. याउपर सन्माननीय सदस्यांचे जर असे म्हणणे असेल की, आपल्याला अधिकची काही माहिती पाहिजे तर सभापती महोदय, आपण म्हणाल्याप्रमाणे कोणी अधिकाऱ्यांनी जर ही माहिती लपविण्याचा प्रयत्न केला असेल तर निश्चितपणे ती माहिती पटलावर ठेवण्यात येईल. ज्या अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक ही माहिती लपविली असेल त्यासंदर्भात जी काही कायदेशीर कारवाई करावयाची आहे ती कारवाई करता येईल. त्यामध्ये काही अडचण असण्याचे कारण नाही. एसआरए योजनेमध्ये किती एफएसआय दिला जातो आणि ओपन प्लॉटला किती एफएसआय दिला जातो हे आपणा सर्वांना माहीत आहे. या सगळ्या बाबतीत जेवढी माहिती घेता येईल तेवढी मी घेतलेली आहे. सन्माननीय सदस्य जेव्हा दुसऱ्या बाजूने बोलत आहेत तेव्हा महापालिका काय करते हाही प्रश्न विचारावयास पाहिजे. एवढी सगळी बांधकामे होत असताना आपण झोपलेला असता काय ? आपण महानगरपालिकेमध्ये काय करता ? वाटेल तेवढे बांधकामाकडे दुर्लक्ष करावयाचे आणि शासनावर सगळे विषय ढकलावयाचे हे बरोबर नाही. आपल्या कारकिर्दीत महानगरपालिकेमध्ये काय चालले आहे ?

श्री. किरण पावसकर : पहिली परवानगी नगरविकास विभागाने दिलेली आहे.

श्री. भास्कर जाधव : सगळी डोळेझाक करावयाची आणि सर्व शासनाकडे ढकलावयाचे असा प्रकार आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य बसून बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांचा प्रश्न असा आहे की, यामध्ये सी.सी. देत असताना महापालिका काय करीत होती ? माननीय मंत्रिमहोदय हे आता या सरकारमध्ये नगरविकास राज्यमंत्री झालेले आहेत. या स्पेसिफिक केसमध्ये मागच्या मुख्यमंत्र्यांच्या खात्याने काय केले हे मी रेकॉर्डवर आणू काय ? आपण सांगितले तर मी ते रेकॉर्डवर आणतो.

श्री. भास्कर जाधव : आपल्याला माझी परवानगी घेण्याचे काही कारण नाही. ते आपण ठरवावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, नगरविकास खात्याकडून नियम 37(1) आणि 37(3) अंतर्गत वरुन सर्व आदेश थोपले जातात. खाली जर नाकारले तर पुन्हा 30 दिवसांमध्ये ते करावे लागते. या सगळ्या गोष्टी असतात. माननीय मंत्रिमहोदयांनी जो अभ्यास केलेला आहे त्यासंदर्भात प्रश्न विचारतो. त्या ठिकाणी जे 20 टक्के फिजिकल पझेशन लागते ते या स्कीमध्ये ऑबेरॉयने कार पार्किंगमध्ये विकले आहे हे खरे आहे काय ? खरे असेल तर शासनाने काय कारवाई केली ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, यासंदर्भातील माहिती आता माझ्याकडे नाही. ती माहिती पटलावर ठेवण्यात येईल्.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, ही माहिती माननीय मंत्रिमहोदयांकडे का नाही ?

श्री. किरण पावसकर : माननीय मत्रिमहोदय जाणूनबुजून उत्तर देत नाहीत.

श्री. विनोद तावडे : यामध्ये ओबेरॉयला वाचविण्याचे कारस्थान आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : कारण नसताना महानगरपालिकेवर ढकलत आहेत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी. आपण आम्हाला संरक्षण द्यावे. असे बिल्डर मुंबईची वाट लावत आहेत.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

उपसभापती : एक गोष्ट नक्की आहे की, इमारतीच्या परवानग्या कॉर्पोरेशनकडून दिल्या जातात....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी यासंदर्भातील डिटेल्समध्ये जाऊ इच्छितो. माननीय मंत्रिमहोदय बोलले म्हणून मी गप्प होतो. आपण तसे बोलू नका. शासनाकडून जेवढा अन्याय झालेला आहे तेवढेच आम्ही बोलत आहोत. आपण ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, एकाही प्रश्नाला या ठिकाणी उत्तर येत नाही.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, या ठिकाणी निवेदनामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे शासनाने 1997 ला परवानगी दिल्यानंतर महानगरपालिकेने 2000 साली परवानगी दिलेली आहे. पहिली परवानगी सरकारकडून येते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : ऑप्शनल विषय सोडून माननीय मंत्रिमहोदयांनी जो अभ्यास केलेला आहे त्याबाबत मी प्रश्न विचारलेला आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, आपण जो निर्णय द्याल त्याबाबत माझी काही हरकत नाही. आपण जर लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यास सांगितली तर त्याला माझी तयारी आहे. मला यामध्ये कोणताही प्रतिष्ठेचा प्रश्न करावयाचा नाही. फक्त मला सन्माननीय सदस्य डॉ. नीलमताई गोऱ्हे यांना सांगावयाचे आहे. मी या ठिकाणी लाईटली बोलत असताना त्यांनी मला शोभत नाही वगैरे शब्द प्रयोग केले. मी जर उद्या शब्दप्रयोग करावयास लागलो तर आपल्याला माझ या तोंडाला लागणे अवघड जाईल हे मी आपल्याला आधीच सांगून टाकतो. मी इतक्या चांगल्या पध्दतीने सांगत असताना आपण कशाला बोलता ? माझा काही विरोधच नाही. आपण लक्षवेधी सूचना राखून ठेवावी. अशा प्रकारचे शब्दप्रयोग आपल्याला करता येणार नाही.

डॉ. नीलम गोऱ्हे : आपण असे बोलल्यानंतर आम्ही अगदी शांत बसणार काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय श्री. पांडुरंग फुंडकर हे विरोधी पक्ष नेते आहेत. त्यांना माझे उत्तर योग्य आहे असे वाटत नसेल तर ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी. मी स्वत: सांगतो. माझी काही अडचण नाही. याचा अर्थ बसून भलतेच टॉन्टींग करुन चालणार नाही. मी तसे करीन तेव्हा अवघड जाईल हे लक्षात ठेवावे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री. भास्कर जाधव : ही लक्षवेधी सूचना राखून ठेवा असे मी सांगत आहे. माझा काही संबंध नाही. माननीय सभापती महोदय जो निदेश देतील तो मला मान्य आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांपर्यंत काही गेले नाही, ते आम्हाला मान्य आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी हा प्रश्न वैयक्तिक स्तरावर घेऊ नये. मंत्री म्हणून आम्ही सर्व सन्माननीय सदस्य आपल्याला प्रश्न विचारत आहोत.

उपसभापती : मंत्री महोदय, उर्वरित माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मंत्री महोदय स्वत: म्हणत आहेत की, ही लक्षवेधी सूचना राखून ठेवली तरी त्याला माझी हरकत नाही. त्यामुळे आपण ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी.

उपसभापती : ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्याचे कारण काय आहे ते सांगावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांबाबत मंत्री महोदयांनी अभ्यास केलेला नाही. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या संदर्भात माझ्याजवळ माहिती उपलब्ध नाही असे ते स्वत: म्हणाले आहेत. त्यांनी असेही म्हटले होते की, स्टील्ट पार्किंगबाबतची मी माहिती घेतली आहे. त्यामुळे आम्ही त्याबाबत प्रश्न विचारला होता. पण त्याबाबत ते उत्तर देऊ शकले नाहीत. मंत्री महोदयांनी या प्रश्नाबाबत अधिक माहिती घेतली तर हा प्रश्न तडीस लागेल. ज्यादिवशी ही लक्षवेधी सूचना येईल त्यादिवशी वितरित केलेले निवेदन जर परिपूर्ण असेल तर थोडक्यात प्रश्न विचारले जातील. त्यामुळे ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी ही लक्षवेधी सूचना वाचून दाखवितो. त्यात असे नमूद केले आहे की, "अंधेरी (पश्चिम), मुंबई येथील न.भू.क्र.1/38:2, व्हिलेज ओशिवरा, प्लॉट नं.120, लोखंडवाला कॉम्प्लेक्स येथील स्वामी समर्थ प्रसन्न ले-आऊटमध्ये मे.ऑबेरॉय कन्स्ट्रक्शन यांनी बांधकाम केलेल्या ऑबेरॉय स्काय हाईट व ऑबेरॉय स्प्रिंग या इमारतीत जादा चटईक्षेत्र वापरले असल्याचे मार्च, 2010 मध्ये निदर्शनास येणे" म्हणजे चटईक्षेत्राबाबत प्रश्न विचारला आहे. "सीआरझेड-2 च्या कायद्यानुसार समुद्राच्या 200 मीटरपासून आत बांधकाम करता येत नसतानाही

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव....

मे.ऑबेरॉय कन्स्ट्रक्शन यांनी महानगरपालिकेतील अधिका-यांच्या संगनमताने 30 टक्के जादा चटईक्षेत्राचे बांधकाम करणे" हे दोनच मुद्दे आहेत. त्याच्या उपर सन्माननीय सदस्यांना माहिती पाहिजे असेल तर ती माहिती मी देण्यास तयार आहे. मी अधिकची माहिती घेऊन येण्यास तयार आहे. पटलावर माहिती ठेवण्यास तयार आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आम्ही या लक्षवेधी सूचनेत नमूद केलेल्या प्रश्नासंबंधी माहिती विचारली आहे. बाहेरची माहिती विचारलेली नाही. मंत्री महोदयांकडे या प्रश्नांची अपूर्ण माहिती आहे. ती माहिती मिळत नसल्यामुळे ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी.

उपसभापती : मंत्री महोदय, गुरुवारपर्यंत या लक्षवेधी सूचनेचे सुधारित निवेदन सादर केले जाईल काय ?

श्री.भास्कर जाधव : होय.

उपसभापती : मी ही लक्षवेधी सूचना राखून ठेवत आहे.

अशुद्धीरित प्रत / अशुद्धीरित नाही

NTK/ ST/ KGS/

पृ. शी. : चक्रीवादळ व अवेळी पावसामुळे कोकण तसेच जळगांव जिल्हयातील शेतीचे झालेले नुकसान

मु. शी. : चक्रीवादळ व अवेळी पावसामुळे कोकण तसेच जळगांव जिल्हयातील शेतीचे झालेले नुकसान यासंबंधी सर्वश्री दिलीपराव सोनवणे, कपिल पाटील, डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री राजन तेली, जयप्रकाश छाजेड, उल्हास पवार, मोहन जोशी, एस.क्यू.ज़मा, श्रीमती मधु जैन, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे, परशुराम उपरकर, किरण पावसकर, अनिल परब, संजय केळकर, रामनाथ मोते, डॉ. दिपक सावंत, सर्वश्री सुभाष चव्हाण, गुरुनाथ कुलकर्णी, हेमंत टकले, ॲड. उषा दराडे, श्रीमती मंदा म्हात्रे, श्रीमती अलका देसाई, श्रीमती वंदना चव्हाण ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.दिलीपराव सोनावणे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पुनर्वसन व मदत कार्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यामध्ये विशेषत: कोकण विभागात नोव्हेंबर, 2009 या कालावधीत आलेल्या चक्रीवादळामुळे अवेळी पाऊस व अतिवृष्टी होणे तसेच दिनांक 17 डिसेंबर, 2009, 11 जानेवारी 2010 आणि 11 व 12 मार्च, 2010 मध्ये राज्यातील काही जिल्हयात विशेषत: जळगाव जिल्हयात अवेळी पाऊस, गारपीट, वादळ यामुळे प्रचंड प्रमाणात शेती क्षेत्राचे नुकसान होणे, सदर नुकसानीच्या अनुषंगाने पंचनाम्यानुसार कृषी विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या माहितीनुसार बाधित शेतकऱ्यांना मदत देण्याची आवश्यकता असताना सन 2010-2011 च्या अर्थसंकल्पातही तरतूद न होणे, त्यामुळे राज्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके (पुनर्वसन व मदतकार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

5...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ KGS/

श्री.दिलीपराव सोनावणे : सभापती महोदय, राज्यामध्ये विशेषत: कोकण व जळगांव जिल्हयामध्ये चक्रीवादळ, फयान वादळ, गारपीट, अवेळी पडलेला पाऊस यामुळे कोरडवाहू शेतकरी, फळ बागायतदार, बागायतदार यांचे गेल्या वर्षभरामध्ये 5 वेळा आलेल्या संकटामुळे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झालेले आहे. परंतु नैसर्गिक संकटात सापडलेल्या शेतक-यांना कोणतीही मदत मिळालेली नाही. नोव्हेंबर, 2009 मध्ये झालेल्या वादळामुळे 263.53 हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले. त्याचप्रमाणे दिनांक 17.12.2009, दि.11 जानेवारी, 2010 व दिनांक 11 व 12 मार्च, 2010 रोजी आलेल्या अवेळी पडलेला पाऊस, गारपीट, वादळ यामुळे 15011.72 हेक्टर क्षेत्राचे 50 टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झालेले आहे. जानेवारी, 2010 मधील 50 टक्क्यांवरील बाधित क्षेत्र 8985.42 हेक्टर आहे आणि मार्च, 2010 मध्ये 528.45 हेक्टर क्षेत्र 50 टक्क्यांपेक्षा जास्त बाधित झालेले आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात हे नुकसान झालेले आहे. ज्वारी, बाजरी, गहू, हरभरा, भूईमूग, केळी, कापूस, केळी अशा सर्व पिकांचे नुकसान झालेले आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिलीपराव सोनावणे..

निवेदनामध्ये "छाननी सुरु आहे" असे नमूद करण्यात आलेले आहे. वित्त आयोगाच्या अहवालानुसार प्रत्येक राज्यासाठी आपत्ती निवारण निधी निश्चित केला जातो. त्यामुळे नैसर्गिक आपत्तीसाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्याची आवश्यकता नाही, असे शासनाचे म्हणणे आहे. जळगाव जिल्ह्यातील 700 पेक्षा अधिक गावातील शेतक-यांचे नुकसान झालेले असून हे नुकसान 24 कोटीच्या घरात आहे. कोकणातील बाधित झालेल्या शेतक-यांना ज्या प्रमाणे मदत दिली गेली त्याच प्रमाणे जळगाव जिल्ह्यातील शेतक-यांना विशेषत: केळी पिकविणा-या शेतक-यांना शासन विशेष दराने नुकसान भरपाई देणार आहे काय ? ही नुकसान भरपाई किती दिवसात मिळेल ? वित्त आयोगाने या वर्षी राज्यासाठी किती निधी उपलब्ध करुन दिलेला आहे ?

श्री. प्रकाश सोळंके : मी सन्माननीय सदस्यांच्या शेवटच्या प्रश्नाचे पहिल्यांदा उत्तर देतो. वित्त आयोगाच्या अहवालानुसार प्रत्येक राज्यासाठी आपत्ती निवारण निधी निश्चित केला जातो. नैसर्गिक आपत्तीमध्ये राज्यामध्ये जे नुकसान होते त्याचा निश्चित अंदाज आधी करता येत नाही. त्यामुळे अर्थसंकल्पामध्ये त्यासंबंधी तरतूद करता येत नाही. अशा वेळी आकस्मिक निधीतून मदत केली जाते. आकस्मिक निधीमध्ये पैसे उपलब्ध नसले तर माननीय अर्थमंत्र्यांचे आथोरायझेशन घेऊन तातडीने मदत करण्यात येते. फयान वादळामध्ये झालेल्या नुकसानीच्या संदर्भात ही लक्षवेधी विचारण्यात आलेली आहे. नोव्हेंबर 2009मध्ये फयान वादळ झाले. तेव्हा पासून डिसेंबर, जानेवारी आणि मार्च या कालावधीत झालेल्या नुकसानाबाबत सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. जळगाव जिल्हयामध्ये 263.53 हेक्टर एवढे क्षेत्र बाधित झाले असून रु. 124.67 लाख इतकी रक्कम अनुदान स्वरुपात दिलेली आहे. डिसेंबर आणि जानेवारीमध्ये 15,011.72 हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले असून त्यासंबंधीचा अहवाल कृषी विभागाकडून प्राप्त झालेला आहे. मार्च महिन्यात झालेल्या नुकसानीचा अहवाल आलेला असून त्याची छाननी सुरु चालू आहे.

श्री. अरुण गुजराथी : नोव्हेंबरमध्ये झालेल्या नुकसानीची नुकसान भरपाई दिली. डिसेंबर, जानेवारी आणि मार्च या तीन महिन्यामध्ये झालेल्या नुकसानीबाबतचे आर्थिक सहाय्य हे अधिवेशन संपण्याच्या आत शासन देणार काय ? सकाळी ता.प्र.क्र.2654या संदर्भात उत्तर देताना मदत व पुनवर्सन मंत्र्यांबरोबर चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल असे मंत्री महोदयांना सांगितले. तेव्हा वाढीव रक्कम हे अधिवेशन संपण्याच्या आत शासन देणार आहे काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके : जळगाव जिल्हयाला लवकरात लवकर मदत देण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल. सदरील बाबीसाठी मंत्रिमंडळापुढे जावे लागेल. केळयाच्या संदर्भात सातत्याने या सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित करण्यात येतो. तेव्हा कोकणाप्रमाणे जळगावत जिल्ह्यातील केळयांच्या संदर्भात देखील शासन सकारात्मक विचार करील.

लक्षवेधी सूचना क्रमांक 5 संबंधी

उपसभापती : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सांवत यांनी विनंती केल्यानुसार लक्षवेधी सूचना क्रमांक 5 पुढे ढकलण्यात येत आहे.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : प्रवासी वाहतूक करणाऱ्या बोटींवर दळणवळण यंत्रणा बसविणे

मु. शी. : प्रवासी वाहतूक करणाऱ्या बोटींवर दळणवळण यंत्रणा बसविणे यासंबंधी डॉ.नीलम गोऱ्हे, ॲड.अनिल परब, सर्वश्री परशुराम उपरकर,किरण पावसकर, गोपीकिसन बाजोरिया,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय बंदरे विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"रायगड जिल्ह्यातील मोरा बंदराकडे जाणारी मधुमती लॉंच दिनांक २१ फेब्रुवारी, २०१० रोजी वा त्यासुमारास बुचर आयलँडजवळ बुडालेल्या बोटीची धडक लागल्याने बोट फुटण्याची घडलेली घटना, या बुचर आयलँड परिसरात यापूर्वी अनेक लहान मोठ्या बोटी बुडालेल्या असणे, त्या काढण्याबाबत वारंवार निवेदने देऊनही कोणतीही कार्यवाही न होणे, त्यामुळे सदरहू घटना घडणे, तसेच मुंबई ते घारपुरी, रेवस, मोराबंदर आदी ठिकाणी दररोज प्रवासी वाहतूक होत असून या मार्गावरील लॉंचवर दळणवळणाची कोणतीही अत्याधुनिक यंत्रणा नसल्याने भरसमुद्रात अपघात झाल्यास कोणतीही उपाययोजना नसणे, परिणामी या मार्गावरुन प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे जीवन धोक्यात येणे, त्यामुळे संबधित प्रवाशांमध्ये निर्माण झालेले भितीचे व चिंतेचे वातावरण, सबब शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (बंदरे विकास मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, अत्यंत महत्वाच्या परंतु फार दुर्लक्षित असलेल्या एका विषयाकडे लक्षवेधी सूचनेद्वारे मी सरकारचे लक्ष वेधले आहे. माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी त्यांचे अनुभव सांगितले ते वगळता वारंवार बोटी बुडणे, बोटींना अपघात होणे, या संदर्भात ज्या त्रुटी आहेत त्यामध्ये सुधारणा व्हावी आणि या संदर्भात उपाययोजना होण्यासाठी गेल्या आठ वर्षात सभागृहात या विषयावर तपशीलवार चर्चा झालेली मला आठवत नाही. धुक्यामुळे मार्ग चुकला, त्यानंतर बोट धोक्यात सापडली असे निवेदनात म्हटले आहे. मधुमती लाँच आणि त्या संपूर्ण विभागामध्ये संदेश यंत्रणा कोणत्या स्वरुपाची आहे? एका प्रवाशाने मोबाईलवरुन जिल्हाधिकाऱ्यांना फोन केल्यानंतर यंत्रणा हलली. आपत्कालीन व्यवस्था उपलब्ध नव्हती. बूचर आयलंड भागात वारंवार बोटी बुडतात. अनेकदा लाँच बंद पडतात, चिखलात रुतून बंद पडण्याचे प्रकार घडले आहेत. मधुमती लाँचबाबत घटना घडली त्याचवेळेला गुहागर येथील वेळणेश्वरला एका बोटीचे इंजिन बंद पडले. सुदैवाने बोटीतील प्रवासी बचावले. फक्त मधुमती लाँचबाबत नव्हे तर या संपूर्ण क्षेत्रात कोणत्या पध्दतीचे सर्वेक्षण केले जाते, कोणत्या पध्दतीचे आपत्ती व्यवस्थापन उपलब्ध आहे? या संदर्भात बीपीटीच्या अधिकाऱ्यांना बोलावून वेगवेगळ्या बोटी बुडाल्या, त्या भागात जो भंगार माल पडून आहे त्या संदर्भात कृती कार्यक्रम तयार केला जाईल का?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, बीपीटी विभागामार्फत मोरा याठिकाणी लाँचच्या माध्यमातून प्रवासी वाहतूक होते. वास्तविक या लाँचेस अनेक वर्षापासून स्थानिक लोकांमार्फत चालविल्या जात आहेत. त्यांना अशा प्रकारची प्रवासी वाहतूक करण्याची परवानगी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाकडून दिली जाते. बीपीटीच्या माध्यमातून लाँचेस सोडण्याची कार्यवाही केली जाते. केवळ धुके असल्यामुळे लाँच प्रवाह मार्गातून भरकटली आणि बूचर आयलंड याठिकाणी अपघात झाला. अशा प्रकारच्या लाँचेसवर आवश्यक त्या सुविधा असण्याची गरज आहे. आतापर्यंत रजिस्ट्रेशन देताना, परवानगी देताना निश्चित निकष आहेत. परंतु हा कायदा 1917 चा जूना कायदा आहे. त्यामध्ये आवश्यक ते बदल करावयास पाहिजेत ते केले गेले नाहीत. ज्या बोटी बुडाल्या किंवा समुद्रात भंगाराचे साठे निर्माण झालेले आहेत ती बाब बीपीटीच्या कार्यक्षेत्रात येते. राज्य सरकारने बीपीटीला कळविले आहे की, हे साठे ताबडतोब कसे काढता येतील आणि त्या भागातील समुद्राची खोली वाढविता येईल या संदर्भात कारवाई करावी. बीपीटीने राज्य सरकारला कळविले आहे की,हे क्लीन करण्यासाठी खर्च प्रचंड येणार आहे.तरी याबाबत आवश्यक

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील.....

ती कारवाई करीत आहोत. प्रवासी बोटींवर दिशा दर्शविणारी साधने आहेत. दुर्दैवाने त्यावेळी होकायंत्र उपलब्ध नव्हते. म्हणून लाँचेसबाबत पुनर्तपासणी करताना तात्पुरत्या स्वरुपाच्या आणि दीर्घकालीन उपाययोजना कोणत्या कराव्या लागतील याबाबत आवश्यक ती पावले आम्ही उचलत आहोत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी सांगितले की, नवीन लाँचेसना परवानगी मेरिटाईम बोर्डाकडून दिली जाते. आता नवीन लाँच आल्या आहेत त्यामध्ये सुध्दा पूर्ण यंत्रणा बसविलेली नाही. होकायंत्र, वायरलेस यंत्रणा आवश्यक असते. जून्या लाँचेसबाबत टप्प्याटप्प्याने बदल करण्यात यावेत. परंतु नवीन लाँचेसना परवानगी देताना किमान आवश्यक ती बंधने लागू केली जातील काय?

नंतर 2एच.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.....

आणि ज्या जुन्या लाँचेस आहेत त्या सतत बंद पडत असतात म्हणून त्यांचे इंजिन बदलण्याची गरज आहे. या लाँचेस चोर बाजारातून खरेदी करुन आणलेल्या असल्याने त्या बंद पडतात. म्हणून अशा लाँचेसमध्ये नवीन इंजिन्स बसविण्याबाबत शासनाकडून संबंधित विभागाला आदेश दिले जाणार काय ? तसेच धक्क्यावर लाँचेस लावतांना जी प्रोसिजर आहे त्याचे पालन केले जात नाही. कारण एका वेळेस एकच लाँच लावावयाची असते परंतु तीन-तीन लाँचेस एकाच वेळेस लागतात त्यामुळे महिलांची अडचण होते. यासंबंधीचे कम्पल्शन केले जाणार काय ? या सभागृहात मी अनेक वेळा हा प्रश्न उपस्थित केलेला असूनही प्रत्यक्ष कृती मात्र अद्यापही झालेली नाही, ती मंत्री महोदयांच्या काळात तरी होणार आहे काय ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, लाँचेसच्या संदर्भात अशा प्रकारची यंत्रणा असली पाहिजे ती नव्हती हे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे अगदी बरोबर आहे. तसेच या ठिकाणी चालविल्या जाणाऱ्या लाँचेस स्थानिक लोकांनाच प्रमोट करुन परवानगी दिलेली आहे. त्यातील इंजिन्स जुने आहे. यासंदर्भातील कार्यवाही 15 दिवसात करण्यात येईल. तसेच या लाँचेस अपग्रड करण्यासंबंधीच्या सूचनादेखील देण्यात येतील. प्रवासी वाहतुकीच्या संदर्भात प्रवाशांची क्षमता, सुरक्षितता यांच्यासंबंधीचे जे बंधन आहे ते सुध्दा पाळण्यात येईल. तसेच प्रत्येक पोर्टवर एक पोर्ट इन्स्पेक्टरची नियुक्ती करण्यात येईल. याबरोबरच तेथे प्रवाशांची क्षमता मर्यादित रहावी म्हणून कार्ड पंचिंग सिस्टीम सुध्दा आपण इंट्रॉड्युस करीत आहोत. अन्य सुविधांमध्ये प्रवाशांचे लाईफ सेव्हिंग चार्जेस, प्रवाशांची सुरक्षितता व अन्य बाबींच्या बाबतीतही निदेश दिलेले आहेत. तसेच याबाबत एक उच्चाधिकार समिती स्थापन करुन त्यामध्ये डायरेक्टर ऑफ फिशींग आणि अन्य अधिकारी समाविष्ट करण्यात येतील. त्यांच्या माध्यमातून गाईडलाईन्स ठरविल्या जातील. त्यात मग बोटीचे वय, प्रवासी क्षमता किती असावी, इंजिन कशा प्रकारे आहे अशा सर्व बाबी या समितीमार्फत तपासून पाहण्यात येतील. कुठल्याही स्वरुपात जल वाहतूक अधिक गतिमान व सुरक्षित करता आली पाहिजे, कार्यक्षमतेने चालली पाहिजे असा विचार सुध्दा समितीच्या माध्यमातून करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : महोदय, उत्तरामध्ये बूचर आयलंडजवळ बुडालेल्या होडीला अडकून ही घटना घडली. मुळात लक्षवेधी सूचनेचा गाभा असा आहे की, अशा प्रकारच्या अडकलेल्या बोटी का काढल्या जात नाहीत ? अशा प्रकारे अडकून पडलेल्या बोटी काढण्याची व्यवस्था नसेल तर ती करण्यात येणार आहे काय ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : महोदय, मागील 7-8 वर्षांची माहिती बीपीटीकडून घेतली असता त्यात सुदैवाने अशा प्रकारचा अपघात घडला नसल्याचे त्यांनी कळविले आहे. परंतु अशा प्रकारे बुडालेल्या बोटी तसेच गाळ किंवा वेस्टेज मटेरियल गाडले गेले आहे ते काढण्यासाठी बराच मोठा खर्च असल्याचे बीपीटीने सांगितले. तरी देखील आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे हे करण्याबाबत त्यांनी सांगितले आहे. आम्ही त्या विभागाचे मंत्री तसेच सीईओ यांना तशा सूचनाही दिलेल्या आहेत. अपेक्षा आहे की, हे काम ते लवकरात लवकर करतील. परंतु प्रवासाचा जो मार्ग अशा लाँचेसना होकायंत्राने दाखवून दिलेला आहे त्यातून जाण्याच्या सूचना आपण करीत आहोत. तरी देखील सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली त्याअनुषंगाने आवश्यक तो पाठपुरावा संबंधित विभागाकडे करण्यात येईल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ. शी. : वृक्षतोड बंदीमुळे स्थानिक लोकांमध्ये पसरलेला असंतोष

मु. शी. वृक्षतोड बंदीमुळे स्थानिक लोकांमध्ये पसरलेला असंतोष: .. याबाबत श्री.राजन तेली, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री. राजन तेली यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"राज्यात विशेषत: कोकणातील चारही जिल्हयात वृषतोडीबाबत शासनाने दिलेले निर्देश, वृक्षतोड बंदीमुळे सर्वसामान्य शेतक-यांवर येणारी उपासमारीची वेळ, जळणासाठी वापरण्यात येणारी लाकडे, घरबांधणीसाठी लागणारे लाकडे, शेतीच्या मशागतीसाठी वापरण्यात येणारे लाकूड इत्यादी गरजेकरिता वापरण्यात येणा-या लाकूडतोडीवर बंदी आल्यामुळे स्थानिक लोकांमध्ये पसरत असलेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, याकरिता लाकूड तोडीच्या बंदीवर शिथिलता करणे आवश्यक आहे याकरिता मी सभागृहात विशेष उल्लेखची सूचना उपस्थित करीत आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हरकतीच्या मुद्याबाबत

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. भरकटलेल्या नौका मार्गावर कशा आणाव्यात याबाबत या ठिकाणी चर्चा झाली यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या कक्षेत आणि अवाक्यात उत्तर दिलेले आहे. परंतु महाराष्ट्र शासनाची मराठीवरील भरकटलेली नौका मार्गावर कशी आणावयाची हा महत्वाचा मुद्दा आहे. या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदय, बॉम्बे पोर्टट्रस्टच्या संदर्भात बोलले आहेत. माननीय मंत्री श्री. राधाकृष्ण विखे-पाटील हे कायदा मंत्री आहेत. "बॉम्बे पोर्ट ट्रस्ट"चे "मुंबई ट्रस्ट" कधी होणार आहे? या विषयाच्या संदर्भात माननीय सभापतींच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती परंतु या बैठकीचे दिवाळे वाजलेले आहे. या बैठकीत माननीय मंत्री महोदय आपण सुध्दा उपस्थित नव्हता तसेच राज्याचे मुख्य सचिव हे सुध्दा बैठकीसाठी उपस्थित राहिले नव्हते. या बैठक्ीत काहीही निर्णय न झाल्यामुळे मला खूप दु:ख झाले आहे. आपण महाराष्ट्र राज्याचे कसले सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करता ? त्यामुळे "बॉम्बे"चे "मुंबई" तसेच इतर जे कायदे आहेत ते महाराष्ट्राच्या नावाने 1 मेच्या पूर्वी किंवा अधिवेशन संपण्याच्या अगोदर केले जाणार आहेत काय ? लवकर होणारे कायदे केव्हा होणार आहेत? तांत्रिक बाब असेल तर त्यासंदर्भात मी काही बोलत नाही. त्यामुळे लवकर होणारे कायदे आपण कधी करणार आहात ते सांगितले तर बरे होईल.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय,या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्या भावना सर्व सभागृहाच्या देखील आहेत. त्यामुळे मी सांगू इच्छितो की, काही कायदे हे केंद्रसरकारच्या अखत्यारीत येतात. महाराष्ट्र राज्याचे हे वर्ष सुवर्णमहोत्सव वर्ष आहे. आपल्याला कायद्यामध्ये नावामध्ये जे काही बदल करावयाचे आहेत, म्हणजे "बॉम्बे पोर्टट्रस्ट"चे "मुंबई पोर्टट्रस्ट" तसेच व्हेईकल ॲक्ट, बॉम्बे मुंबई न्यायालयीन फी यासंदर्भात राज्यासरकारच्या अंतर्गत ज्या काही बाबी आहेत ते कायदे याच अधिवेशनात करण्याचा आमचा मानस आहे तसेच आवश्यक ते अध्यादेश सुध्दा या सुवर्ण महोत्सवी वर्षात काढण्याच्या संदर्भात शासन कार्यवाही करील एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : मा□□य सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांची विशेष उल्लेखाची सूचना आहे परंतु त्या सभागृहात उपस्थित नाहीत. यापुढची विशेष उल्लेखाची सूचना सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांची आहे त्यांनी ती मांडावी.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :बीड जिल्हयातील नेकनूर येथील स्त्री रुग्णालय पूर्ण क्षमतेने न चालणे

मु. शी. : बीड जिल्हयातील नेकनूर येथील स्त्री रुग्णालय पूर्ण क्षमतेने न चालणे याबाबत श्रीमती उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री. उषा दराडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडनलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

"सन 2006 मध्ये बीड जिल्हयातील नेकनूरमध्ये महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील पहिले स्त्री रुग्णालय सुरु करण्यात येणे, तसेच या 60 खाटांच्या स्त्री रुग्णालयात अद्ययावत शस्त्रक्रिया गृह, रक्त साठवण केंद्र, क्ष-किरण , सोनोग्राफी, इसीजी, कुटुंब कल्याण, बाळंतपण स्त्रियांच्या गर्भाशयाच्या शस्त्रक्रिया, अपेंडिक्स शस्त्रक्रिया, कायदेशीर गर्भपात, नवजात बालकांची काळजी व उपचार, उड्स सल्ला व उपचार केंद्र, छोटया ट्यूमरच्या शस्त्रक्रिया यासारख्या अनेक सुविधा मिळणार असल्याने सर्वसामान्य जनतेच्या अपेक्षा असणे, 15 ऑगस्ट, 2009 मध्ये या स्त्री रुग्णालयासाठी सुमारे एक कोटी खर्च करुन बांधलेल्या रग्णालयास इमारतीचा लोकार्पण सोहळा पार पडणे, रुग्णालयाचे काही बांधकाम अपूर्ण असतांना सार्वजनिक बांधकाम विभागाने आरोग्य विभागाकडे हस्तांतरित करण्यात येणे, इमारतीतील काही बांधकाम अपूर्ण असल्यामुळे स्त्री रुग्णालय नवीन इमारतीत पूर्णपणे कार्यान्वित करण्यास अडचणी येणे, तसेच वीज पुरवठा व भूलतज्ज्ञाचे पद, अधिपारिचारिकाची सहा पदे, तसेच रुग्णालयातील तीन वैद्यकीय अधिकारी पाच महिन्यापासून अनाधिकृतरित्या गैरहजर राहणे, तसेच इमारतीचे अपूर्ण असलेले बांधकाम त्यामुळे रुग्णाल पूर्ण क्षमतेने न चालणे, याबाबत सखोल चौकशी करुन रुग्णालय पूर्ण क्षमतेने चालणेबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया".

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: वाहनाच्या हॉर्नमुळे ध्वनीप्रदूषणात वाढ होणे

मु.शी.: वाहनाच्या हॉर्नमुळे ध्वनीप्रदूषणात वाढ होणे याबाबत प्रा. सुरेश नवले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

राज्यातील प्रामुख्याने शहरी भागात वाहनांची संख्या मोठया प्रमाणात वाढली असून वाहनांच्या हॉर्नमुळे ध्वनी प्रदूषण अत्यंत वाढले असणे, रुग्णालये, शाळा, महाविद्यालयाच्या परिसरामध्ये शांतता क्षेत्र असूनही वाजणाऱ्या हॉर्नवर निर्बंध काटेकोरपणे पाळले जात नसणे, काही वाहन चालक वाहनाच्या हॉर्नचे आवाज कर्कश ठेवत असणे, त्यामुळेही ध्वनीप्रदूषणात वाढ होत असणे, या प्रदूषणाने लोकांमध्ये कानाचे आजार, ह्रदयविकार, लकवा, मेंदूचे विकाराचे प्रमाण वाढलेले असणे, वाहनाच्या हॉर्नमुळे होणाऱ्या प्रदूषणाला आळा बसावा, यासाठी कठोर उपाययोजना राबविणे आवश्यक आहे, हा विषय विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे, कृपया स्वीकृत करावा, ही विनंती.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: ठाणे, भिवंडी व मुंबई शहरामध्ये जलवाहिनी फुटून पाणी फुकट जाणे.

मु.शी.: ठाणे, भिवंडी व मुंबई शहरामध्ये जलवाहिनी फुटून पाणी फुकट जाणे याबाबत श्रीमती अलका देसाई, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

गेल्या दोन महिन्यापासून मुंबई शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या ठाणे, भिवंडी व मुंबई शहरामध्ये पाण्यांचे पाईप फुटुन पाणी फुकट जात आहे. पर्यायाने मुंबई शहरांमधील नागरिकांना पाणी कपातीच्या भीषण संकटाला तोंड द्यावे लागत असणे.

मुंबई महानगरपालिके जवळ यावर योग्य धोरण नसणे, त्यामुळे लाखो रुपये खर्च होऊन दिवसेंदिवस पाण्याची समस्या जटिल होणे याबाबत शासनाचे धोरण कोणते आहे ? त्याचप्रमाणे मुंबई महानगरपालिकेचे जलअभियंता यांनी छातीठोकपणे सांगणे की, मुंबई महानगरपालिकेचीच पाणी देण्याची जबाबदारी आहे. पाणी वाया जात असल्यामुळे त्यावर करावयाची उपाययोजना याबद्दल मी विशेष उल्लेखाद्वारे या सभागृहाचे लक्ष वेधू इच्छिते.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: पात्र उमेदवारांना अनुकंपा तत्वावर नेमणुक देणे.

मु.शी.: पात्र उमेदवारांना अनुकंपा तत्वावर नेमणुक देणे याबाबत श्री. चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

महाराष्ट्र शासनाने शासनाच्या नोकरीमध्ये कार्यरत असताना जर कोणी दिवंगत झाला तर त्यांच्या कुटुंबियाला अनुकंपा तत्वावर नोकरीस घेतले जाते. पण अलिकडच्या 23 एप्रिल, 2008 च्या शासन निर्णयानुसार वयाची 40 वर्षे पूर्ण झालेल्या त्यांच्या वारसास नोकरीच्या यादीतून नाव कमी केले जाते, अनुकंपा उमेदवाराला त्याच्या वयाची 18 वर्षे पूर्ण झाल्यानंतर नोकरीसाठी अर्ज घेतले जातात पण रिक्त जागा नाहीत, हे कारण पुढे करुन त्याला वयाची 40 वर्षे पूर्ण झाल्यानंतर वयाच्या अटीचे नियम दाखवून त्याला नेमणुकीसाठी अपात्र ठरविणे हे त्यांच्यावर अन्यायकारक असणे, जे अनुकंपा उमेदवार 40 वर्षे वयाच्या अटीत अपात्र ठरलेले आहेत व त्यांना मुले असूनही मुलांचे वय 18 वर्षांपेक्षा कमी आहे. अशा उमेदवारांना त्यांच्या वयाची 18 वर्षे पूर्ण होताच प्रतिक्षायादीत नाव नोंदवून त्यांना नेमणूक द्यावी तरच त्यांना न्याय मिळेल.

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महाराष्ट्र शासनाच्या नोकरीमध्ये कार्यरत असताना जर कोणी दिवंगत झाला तर त्यांच्या कुटुंबियाला अनुकंपा तत्वावर नोकरीस घेतले जाते. पण अलिकडच्या 23 एप्रिल, 2008 च्या शासन निर्णयानुसार वयोमर्यादा 40 वर्षे केली आहे. ती 45 करावी असा आग्रह मी या विशेष उल्लेख सूचनेद्वारे धरत आहे. सदर वयोमर्यादा ओलांडल्यानंतर प्रतीक्षा यादीवरील क्रमांक न आल्यामुळे नोकरी लागत नाही. त्याच वेळी त्या घरातील मुलगा किंवा मुलगी 18 वर्षाची झाली असेल तर 40 वर्षे पूर्ण होईपर्यंत नोकरी न मिळाल्यामुळे सज्ञान झालेल्या अपत्याला त्या यादीमध्ये समाविष्ट करावे.

सदर विषय महत्वाचा असल्याने मी आज सभागृहात विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करीत आहे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: एडसचे थैमान रोखण्यासाठी शासनाने परिणामकारक योजना राबविणे.

मु.शी.: एडसचे थैमान रोखण्यासाठी शासनाने परिणामकारक योजना राबविणे याबाबत श्री.हेमंत टकले,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सन 2007 पासून राज्यात एड्सग्रस्तांची संख्या 98578 एवढी असून मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या 10371 एवढी झाली आहे. संबंध देशातील एकूण संख्येच्या 23 टक्के झालेली वाढ भयावह आहे. एड्सचे थैमान रोखण्यासाठी शासनाने अधिक परिणामकारक पद्धतीने योजना आखण्याची तातडीची गरज असून ही महाभयानक साथ नियंत्रित करणे जरुरीचे आहे. एड्सची लागण झालेल्यांमध्ये हॉटेल व पर्यटन व्यवसायातील काम करणारे ट्रक ड्रायव्हर व बेरोजगार युवक यांची संख्या सर्वाधिक आहे. नॅशनल एड्स कंट्रोल ऑर्गनायझेशन ह्या राष्ट्रीय संस्थेने एड्स बाधित देशातील 49 जिल्ह्यातील यादी जाहीर केलेली असून दुर्दैवाने महाराष्ट्रातील 14 जिल्ह्यांचा त्यात समावेश आहे. ह्या चिंताजनक परिस्थितीची गंभीर दखल शासनाने घ्यावी याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: निसर्गाचे संरक्षण व पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून चंद्रपूर जिल्हयातील सर्व वीज प्रकल्पांची मंजूरी रद्द करणे.

मु.शी.: निसर्गाचे संरक्षण व पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून चंद्रपूर जिल्हयातील सर्व वीज प्रकल्पांची मंजूरी रद्द करणे याबाबत श्री जैनुद्दीन जव्हेरी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री जैनुद्दीन जव्हेरी यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

चंद्रपूर जिल्हयातील खाण मालकांनी औष्णिक वीज प्रकल्पांना मंजूरी मिळविण्यासाठी केंद्रीय पर्यावरण मंत्री यांना खोटी माहिती सादर करुन मंजूरी मिळविण्यात आली आहे. या खाण प्रकल्पाच्या मालकांकडून हे प्रकल्प इकोसेन्सीटीव्ह क्षेत्रात नसल्याची खोटी माहिती सादर करुन वीज प्रकल्पांना मंजूरी मिळविण्यात आलेली आहे. यामुळे पर्यावरणाचा धोका दिवसेंदिवस मोठया प्रमाणात वाढत आहे. निसर्गाचे संरक्षण व पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून विचार करुन ज्या प्रकल्पांना मंजूरी देण्यात आली आहे त्या सर्व प्रकल्पांची मंजूरी रद्द करावी. जिल्हयाचे निसर्ग सौंदर्य व पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास थांबविण्याकरिता या अतिशय महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे, कृपया स्वीकृत करण्यावी यावी.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>सभागृहाच्या कामकाजासंबंधी</u>

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) :सभापती महोदय, आता चहापानासाठी सभागृह स्थगित होईल असे मला वाटते. त्यामुळे नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव सुरू करण्यापूर्वी माझी सभागृहाला विनंती आहे की, खालच्या सभागृहाने संमत केलेले वि.स.वि.क्रमांक 29 पूर्वी ह्या सभागृहाने देखील संमत केले आहे.

यानंतर श्री.गायकवाड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव ...

विधान सभा सभागृहाचा कालावधी संपला असल्यामुळे हे विधेयक पुढे गेले होते तेव्हा हे विधेयक दहा मिनिटामध्ये घेण्यात यावे आणि त्यानंतर 260 अन्वये प्रस्ताव घेण्यात यावा. याबाबतीत मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या बरोबर बोललो आहे तसेच हे विधेयक पूर्वी सभागृहाने मंजूर केले होते.

उपसभापती : ठीक आहे .

डॉ.नीलम गोऱ्हे : काही सन्माननीय सदस्य सभागृहाबाहेर गेलेले आहेत.

उपसभापती : सदस्य जरी बाहेर गेलेले असले तरी आपण कामकाज थांबविलेले नव्हते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2..

पृ. शी. : वैद्यकीय सेवा - व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा - संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) विधेयक.

L.A. BILL NO. XXIX OF 2010

(A BILL TO PROVIDE FOR THE PREVENTION OF VIOLENCE AGAINST MEDICARE SERVICE PERSONS AND PREVENTION OF DAMAGE OR LOSS OF PROPERTY OF MEDICARE SERVICE INSTITUTIONS IN THE STATE OF MAHARASHTRA AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री.भास्कर जाधव(नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि. स. वि. क्रमांक 29 (महाराष्ट्र राज्यातील वैद्यकीय सेवा - व्यक्ती बाबत घडणा-या हिंसक कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी आणि वैद्यकीय सेवा - संस्थांच्या मालमत्तेची हानी किंवा नुकसान होण्यास प्रतिबंध करण्यासाठी तसेच तत्संबंधित व तदानुषंगिक बाबीसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक) मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.भास्कर जाधव : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि. स. वि. क्रमांक 29 (महाराष्ट्र राज्यातील वैद्यकीय सेवा - व्यक्ती बाबत घडणा-या हिंसक कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी आणि वैद्यकीय सेवा - संस्थांच्या मालमत्तेची हानी किंवा नुकसान होण्यास प्रतिबंध करण्यासाठी तसेच तत्संबंधित व तदानुषंगिक बाबीसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

डॉ.दीपक सावंत (बसून) : या विधेयकावर मला बोलावयाचे आहे.

उपसभापती : ठीक आहे. आपण त्या विधेयकावर नंतर बोलावे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या विधेयकासंबंधी मी थोडक्यात विचार मांडतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (बसून): सभापती महोदय,विधेयक क्रमांक 5 घेण्यात यावे असे मी सांगितले होते.

श्री.भास्कर जाधव :महाराष्ट्र वैद्यकीय सेवा - व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) विधेयक हे सभागृहाने मागे मंजूर केले होते त्याचबरोबर विधानसभेनेसुध्दा हे विधेयक मंजूर केले होते.

डॉ.दीपक सावंत : हे विधेयक सभागृहाने मंजूर केलेले नव्हते. गोंधळामध्ये ते पास केले गेले होते.

श्री.भास्कर जाधव : विधान सभेने हे विधेयक काल मंजूर केले होते.

श्री.दिवाकर रावते : पाच नंबरचे विधेयक घ्यावे असे मी म्हटले होते.

डॉ.दीपक सावंत : या विधेयकावर मला बोलावयाचे आहे.

श्री.भास्कर जाधव : मी हे विधेयक माडले आहे. सन्माननीय सदस्यांनी त्यावर बोलावे. किंवा सन्माननीय सदस्यांनी ऑन लेग रहावे. माझे म्हणणे जर पटले नाही तर ऑन लेग रहावे.

श्री.दिवाकर रावते(बसून) : पटणारच नाही.

श्री.भास्कर जाधव : तो तुमचा अधिकार आहे.

सभापती महोदय, खाजगी हॉस्पिटल्स आणि खाजगी डॉक्टर्सवर अनेकवेळा शारीरिक हल्ले होत असत. त्यांना कायद्याने संरक्षण मिळणे आवश्यक आहे अशा प्रकारची मागणी या सभागृहातील जवळजवळ सर्वच सन्माननीय सदस्यांनी तसेच महाराष्ट्र मेडिकल कौन्सील, इंडियन मेडिकल कौन्सील या सारख्या वेगवेगळया संस्थांनी मागणी केली होती. डॉक्टर्सच्या आणि हॉस्पिटल्सच्या संरक्षणासाठी कायदा करण्यात यावा अशा प्रकारची विनंती त्यांनी केली होती. या सर्व बाबीवर सांगोपांग विचार करुन या संदर्भात 2008 पासून खालच्या सभागृहात दोन वेळा विधेयक मांडण्यात आले होते तसेच तेथे देखील हे विधेयक मंजूर करण्यात आले होते.या सभागृहामध्ये देखील हे विधेयक मांडण्यात आले होते व ते मंजूर करण्यात आले होते.सभागृहाचा कार्यकाळ संपला व दोन्ही सभागृहाची एकत्रितपणे या विधेयकाला मंजुरी मिळू शकली नाही .यासाठी हे विधे्यक आता सभागृहापुढे आणले गेले आहे. खालच्या सभागृहाने या विधेयकाला संमती दिली आहे. ज्या प्रमाणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉक्टर्सच्या हक्कांचे संरक्षण करण्यात आलेले आहे त्याप्रमाणे एक प्राधिकरण देखील स्थापन करण्यात आलेले आहे.सन्माननीय सदस्यांना कदाचित असे वाटेल की, या कायद्याने डॉक्टरांनाच फक्त संरक्षण देण्यात आलेले आहे. परंतु केवळ डॉक्टरांना संरक्षण दिलेले आहे असे नाही तर जे डॉक्टर चुकीच्या पध्दतीने वागतील, जे डॉक्टर्स घेतलेल्या शपथेप्रमाणे, व्रता प्रमाणे किंवा व्यवसायाप्रमाणे वागणार नाहीत त्यांच्यावरसुध्दा कायद्याने बंधन घालण्यात आलेले आहे. हे बंधन कोण कोणत्या कायद्याअंतर्गत आहे हे समजावून सांगणारे एक प्राधिकरण आजतागायत अस्तित्वात नव्हते .....

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रमेश शेंडगे)

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

ते अस्तित्वात आणण्याचे काम शासनाने केले आहे. जिल्हयाचे सिव्हिल सर्जन यांच्या अध्यक्षतेखाली प्राधिकरण नेमण्यात आले आहे. त्यामध्ये ग्राहक मंचाचे अधिकारी, संबंधित एखादा अधिकारी यांचा समावेश आहे. यामध्ये एखाद्या डॉक्टर्सने आपल्या कर्तव्यात कसूर केली. एखाद्या व्यक्तिच्या मृत्यूला तो कारणीभूत झाला तर त्याच्याविरुध्द कलम 304 चा गुन्हा कसा होऊ शकतो, कलम 307 चा गुन्हा कसा होऊ शकतो, त्यामध्ये किती वर्षाचा कारावास होऊ शकतो? त्याचप्रमाणे कलम 324 चा गुन्हा कधी होऊ शकतो, कलम 326 चा गुन्हा कधी होऊ शकतो? त्याकरिता इंडियन पीनल कोडमध्ये कोणकोणत्या शास्ती ठेवलेल्या आहेत याची माहिती देण्याचे काम या कायद्यामध्ये करण्यात आले आहे. आणि म्हणून मध्यंतरी सातत्याने ज्या काही घटना घडल्या. त्यामध्ये खूप मोठया प्रमाणावर लोकांचा भावनिक उद्रेक झाला. एखाद्या डॉक्टरच्या दरवाजावर जात असतांना प्रत्येक माणसाला आपला पेशंट बरा होऊनच बाहेर आला पाहिजे असे वाटत असते. अशी अपेक्षा धरणे चुकीचे आहे अशातला भाग नाही. ज्यावेळी एखादा रुग्ण आजारी असतो, त्यावेळी त्याला एखाद्या डॉक्टरच्या दरवाजावर नेले जाते, त्याला हॉस्पिटलमध्ये नेले जाते त्यावेळी तो रुग्ण मृत्यूशय्येवर असतो. त्याच्याबद्दल नातेवाईकांच्या मनात शंका असते की हा रुग्ण बरा होईल की नाही? आणि म्हणून ज्याप्रमाणे आपण देवाचा धावा करतो, त्याप्रमाणे डॉक्टरच्या दरवाजात गेल्यानंतर त्याला आपण देव मानतो. त्यामुळे पेशंटला तो डॉक्टर देव वाटतो, आणि पेशंट बरा झाल्यानंतर त्याच्या नातेवाईकांना एक चांगला माणूस आपल्याला सापडला, योग्य वेळी हा माणूस आपल्याला मिळाल्यामुळे माझा पेशंट जगला. पहिल्यांदा देव वाटणारा डॉक्टर नंतर मानव वाटतो. ज्यावेळी पेशंट हॉस्पिटलमधून डिसचार्ज घेतो, आणि ज्यावेळी बिल भरण्याची वेळ येते, त्याला घरी पाठविण्याची वेळ येते त्यावेळी डॉक्टर त्यांना दानव वाटतो. अशी ही मानसिक स्थित्यंतरे बदलत जातात. त्यामुळे नंतर कळत न कळत या संदर्भातील राग, उद्रेक निर्माण होतो. कधी डॉक्टरच्या दरवाजात पेशंट गेला व जर तो दुर्दैवाने दगावला तरी सुध्दा लोकांना राग येतो. आणि त्यामधून डॉक्टरवर शारिरीक हल्ले करण्यामध्ये त्याचे रुपांतर होते. याला कुठेतरी कायद्याने बंधन घालणे आवश्यक असल्यामुळे या विधेयकामध्ये तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये 3 वर्षांचा कारावास व 50 हजार रुपयांच्या दंडाची तरतूद केली आहे. यामध्ये डॉक्टरच्या मालमत्तेचे जेवढे नुकसान होईल त्याच्या दुप्पट भरपाई करुन देण्याची तरतूद ठेवण्यात आली आहे. या अनुषंगाने आणलेल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ SBT/

श्री. भास्कर जाधव....

विधेयकावर विस्ताराने माननीय सदस्य आपले विचार मांडतील त्यावेळी त्यासंबंधी अधिक विस्ताराने आपल्याला उत्तरे देता येतील. त्यामुळे हे विधेयक केवळ डॉक्टर्सना संरक्षण देण्याकरिता नाहीतर त्याबरोबर एक प्राधिकरण स्थापन करुन ग्राहकांना, रुग्णांना , नातेवाईकांना निश्चितपणे कोणत्या ठिकाणी न्याय मागावा याकरिता यामध्ये तरतूद केली आहे. म्हणून या सभागृहाने हे विधेयक एकमताने संमत करावे अशी विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, हे विधेयक मांडण्याच्या मागे आता जरी खूप मोठी पार्श्वभूमी दिसत असली तरी गेल्या 15 ते 20 वर्षापासून आपण निरीक्षण केले तर या वैद्यकीय व्यवसायामध्ये अनेक प्रकारची तंत्रज्ञाने, संशोधने होत असल्याचे आपल्यासमोर आलेले आहे. ती पाहिल्यानंतर डॉक्टरी व्यवसायामध्ये अनेक डॉक्टर अतिशय चांगले आणि सेवाभावी काम करीत असले तरीसुध्दा अनेक ठिकाणी वैद्यकीय व्यवसायाचे मोठया प्रमाणात व्यापारीकरण झालेले आहे असे दिसून येईल. पूर्वीच्या काळामध्ये रोगाची लक्षणे पाहून निदान केले जात होते. पण आता मात्र "डॉक्टर तुम्ही सुध्दा" असे म्हणण्याची वेळ जशी त्या गाजलेल्या नाटकामध्ये आलेली आहे, त्याच पध्दतीने डॉक्टर्स्नी आवश्यकता नसताना शस्त्रक्रिया करणे, त्या खर्चाचा रुग्णांवर टाकणे, त्याचप्रमाणे गरज नसताना सलाईन सारख्या गोष्टींचा गैरवापर करणे, आवश्यकता नसताना पॅथॉलॉजीकडून तपासणी करण्याची सूचना करणे आणि या प्रश्नांवर सातत्याने मोठया प्रमाणावर . . . ..

काही सन्माननीय सदस्य (खाली बसून) : सभापती महोदय, आता मध्यंतरासाठी सभागृहाची बैठक स्थगित करावी.

तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे) : ठीक आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांचे भाषण अपूर्ण आहे. आता मी मध्यंतरासाठी सभागृहाची बैठक स्थगित करीत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 40 मिनिटांनी पुन्हा सुरु होईल.

(यानंतर सभागृहाची बैठक 03 वाजून 11 मिनिटांनी,3 वाजून 40 मिनिटांपर्यंत स्थगित झाली)

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रमेश शेंडगे)

तालिका सभापती : सभागृहाची बैठक मी 4 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.40 ते 4.00 पर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रमेश शेंडगे)

पृ.शी.: राज्यात जीवनावश्यक वस्तूंची झालेली बेसुमार भाववाढ

मु.शी.: राज्यात जीवनावश्यक वस्तूंची झालेली बेसुमार भाववाढ या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, विनोद तावडे, डॉ.दीपक सावंत, श्री. संजय केळकर, ॲड. अनिल परब, सर्वश्री. केशवराव मानकर, परशुराम उपरकर, पाशा पटेल, किरण पावसकर, चंद्रकात पाटील, भगवान साळुंखे व रामनाथ मोते, वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्यात गेल्या काही महिन्यांपासून जीवनाश्यक वस्तू विशेषत: तूरडाळ, साखर, तांदूळ, गहू, कडधान्ये, भाजीपाला इत्यादींच्या किमतीत झालेली बेसुमार भाववाढ, सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत यापैकी काही वस्तू शासनाने रेशन दुकानातून वितरणासाठी निश्चित केल्या असल्या तरी त्यांचा वेळेवर पुरवठा न होणे, तसेच त्या वस्तू अतिशय निकृष्ट दर्जाच्या असणे, वाढत्या महागाईमुळे कमी पगार घेणारे मध्यमवर्गीय, झोपडपट्टीतील रहिवासी यांची परिस्थिती अत्यंत हलाखीची होणे, अत्यावश्यक वस्तूंच्या भाववाढीबरोबरच पेट्रोल, डिझेलच्या किमतीत सतत वाढ होणे, वीज दरवाढ, गृहकर्जाच्या व्याजदरात झालेली वाढ, मुद्रांक शुल्कातील वाढ, मूल्यवर्धित करामध्ये एक टक्का वाढ, एस.टी.बस भाड्यातील वाढ, बेस्ट बस भाड्यातील वाढ, शाळा व महाविद्यालयातील फी वाढ इत्यादी सर्व प्रकारच्या भववाढीमुळे सामान्य माणसाला जगणेच कठीण होणे, अत्यल्प उत्पन्नात आणि वाढत्या महागाईत घर कसे चालवावयाचे हा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होणे, महागाईस कारणीभूत असणारे साठेबाज, अकार्यक्षम सार्वजनिक वितरण व्यवस्था, बोगस शिधापत्रिका यावर नियंत्रण ठेवण्यात तसेच सर्व प्रकारची भाववाढ कमी करण्यात शासनास आलेले अपयश, याबाबत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा सुरु असताना या विषयावर विरोधी पक्षाच्यावतीने शासनाचे लक्ष केन्द्रीत करण्यात आले होते. त्यानंतर अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु झाले. अर्थसंकल्प मांडत असताना आमची अपेक्षा अशी होती की, शासन काही तरी धोरणात्मक निर्णय घेऊन ही महागाई कमी करण्याचा निश्चित प्रयत्न करील. परंतु तसे न झाल्यामुळे हा ठराव या ठिकाणी आणण्याची वेळ आमच्यावर आलेली आहे. आज महागाईचा प्रश्न एवढा गंभीर झालेला आहे की, या देशाच्या पंतप्रधानांना त्यामध्ये हस्तक्षेप करावा लागला, लक्ष घालावे लागले आणि देशातील प्रमुख 10 राज्याच्या मुख्यमंत्र्याची परिषद दिल्लीला घ्यावी लागली. त्यावेळी चार-चार पाच-पाच राज्यांचा एक ग्रुप तयार करुन मॉंटेकसिंग अहलुवालिया यांना त्या ग्रुपचे अध्यक्ष केले. महागाईच्या या ज्वलंत प्रश्नाबाबत देशाचे पंतप्रधान गंभीर झालेले असताना आपल्या राज्यातील शासनकर्त्यानी कोणतीही काळजी न करता, या महागाईवर नियंत्रण आणण्यासाठी कोणत्याही प्रकारची उपाययोजना केली नाही. या महागाईची चर्चा आज देशभरात चालू आहे. आपल्या राज्यात गेल्या वर्षा पासूनच महागाईची चढती कमान वाढतच चालली आहे. एप्रिल ते डिसेंबर 2009 या कालावधीत जीवनावश्यक वस्तूंच्या भावात 25 ते 50 टक्क्यांनी वाढ झाली. तेल, साखर, गुळ, कांदा, बटाटा यांच्या किंमतीत 50 टक्क्यापेक्षा जास्त वाढ झाली. ही भाववाढ सरकारने आपल्या आर्थिक पाहणी अहवालामध्ये नमूद केलेली आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या दरामध्ये 50 टक्क्यापेक्षा जास्त वाढ झालेली आहे. विशेष म्हणजे ही भाववाढ होत असताना अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी 10 दिवस आधी .....

...नंतर श्री.भोगले...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

सभापती महोदय, खरे म्हणजे याची काही आवश्यकता नव्हती. दहा दिवसांनी अर्थसंकल्प मांडला जाणार होता. ज्याप्रमाणे केंद्र सरकारने केंद्रीय अर्थसंकल्प सादर करण्याच्या दहा दिवस अगोदर शेतकऱ्यांच्या खताची भाववाढ केली, केंद्र सरकारने महागाईत भर घालणारा अर्थसंकल्प सादर केल्यानंतर दीड-दोन महिने उलटल्यानंतर आधीच गरीब जनतेला महागाईच्या खाईत लोटणारा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला. किमान 5 टक्के वॅटचा दर वाढविण्यात आला. अर्थसंकल्पीय अधिवेशनात ही करवाढ करता आली असती. दहा दिवस अगोदरच कर वाढविण्यासंबंधीचा अध्यादेश काढण्यात आला. विधानसभेचे अधिवेशन सुरु होण्यास काही दिवस उरले असताना प्रत्यक्ष कर रचनेत बदल करणारा महत्वाचा निर्णय घेऊन कोणतीही चर्चा न करता एक टक्का कर वाढविण्यात आला. केंद्र सरकारने सुध्दा खताच्या किंमती याच पध्दतीने वाढविल्या. इंधनाच्या दरामध्ये याच पध्दतीने वाढ केली. ही भाववाढ होत असताना सर्वसाधारण माणसाचे कंबरडे मोडले गेले आहे. या करामुळे किती वस्तूंचे दर वाढले? अन्नधान्यामध्ये तांदूळ, गहू, आटा, रवा, हळद, मिरची यावरील दर शून्य टक्क्यावरुन 4 टक्के करण्यात आला. साबूदाणा, खाद्यतेल यावरील कर 4 टक्क्यावरुन 5 टक्के करण्यात आला. कृषि विभागांतर्गत पशुखाद्य, बियाणे, शेती अवजारे, खते, ट्रॅक्टर, ट्रेलर आणि त्यांचे सुटे भाग, बांबू, विडी पाने, पंपसेट, पंप फिटिंग यावरील कर वाढविण्यात आला. खाद्य पदार्थामध्ये दुग्धजन्य पदार्थ, बेकरी प्रॉडक्ट, फरसाण, मिठाई यासह शिधापत्रिकेवरील दिल्या जाणाऱ्या केरोसिनवर देखील कर वाढविण्यात आला. कपडे, तयार कपडे, पादत्राणे, बांधकाम साहित्यामधील वाळू, विटा, प्लॅस्टिक पाईप, इलेक्ट्रॉनिक्स वापराच्या वस्तू, संगणक यावरील कर वाढविण्यात आला. अन्य वस्तूंमध्ये सायकल, सेफ्टी माचिस, सोलापूर चादरी, अशा सर्व प्रकारच्या वस्तूंवर कर वाढविल्यामुळे त्याच्या किंमती वाढल्या. औषधांमध्ये युनानी, आयुर्वेदिक, होमिओपॅथीक, मानसिक स्वास्थ्यासाठी वापरल्या जाणाऱ्या औषधांवर कर वाढविण्यात आला. कागदाच्या किंमती वाढल्या. न्यूज प्रिंट, पेपर बोर्ड, संगणक पेपर, अमोनिया पेपर, स्टेशनरी यावरील कर वाढला. विद्यार्थ्यांना लागणारे मटेरियल, ज्यामध्ये पेन, पेन्सिल,शार्पनर यावरील कर वाढला. खेळाच्या साहित्यावर कर वाढविण्यात आला. प्रिंटिंग व लिखाणाची शाई महागली. कोळसा व जळाऊ लाकूड महागले. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वी एक टक्का कर वाढविल्यामुळे इतक्या वस्तूंची भाववाढ झाली. अर्थसंकल्प

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

मांडताना स्वच्छपणाने सांगितले की, कोणत्याही वस्तूंवर कर वाढविलेला नाही. कर कपात केली म्हणून जाहीर केले. हेअर पिनसारख्या वस्तूवरील कर कमी केला. गोरगरिबांना खायला लागणाऱ्या ज्या जीवनावश्यक वस्तू आहेत त्या वस्तूसंबंधी कोणतेही धोरण सभागृहासमोर ठेवले नाही. हा एक टक्का वॅट वाढविल्यामुळे खऱ्या अर्थाने लाखो गरीब लोकांना या महागाईचा फटका बसला आहे. महागाई देशभर वाढली आहे. महागाईचा विषय ज्वलंत बनलेला असताना महाराष्ट्रातील आघाडी सरकारने त्यात आणखी भर घातली आहे. केंद्रात युपीए सरकार आणि महाराष्ट्रात आघाडीचे सरकार या महागाईची जबाबदारी एकमेकावर ढकलण्याचा प्रयत्न करीत आहेत. खरे म्हणजे ही सरकारची सामुहिक जबाबदारी आहे. काँग्रेस पक्षाने केंद्रीय कृषि मंत्री श्री.शरद पवार हे महागाईला जबाबदार आहेत असे सांगितले. दुसरीकडे श्री.शरद पवार हे माननीय पंतप्रधान महागाईला जबाबदार आहेत असे सांगत आहेत. म्हणजे एकमेकावर जबाबदारी ढकलून हा विषय संपविण्याचा प्रयत्न चालला आहे. हे खरे आहे की, ज्या ज्यावेळी देशात काँग्रेस पक्षाचे सरकार सत्तेवर येते त्या त्यावेळी महागाई वाढत असते. देशात काँग्रेस पक्षाचे सरकार, राज्यात काँग्रेस पक्षाचे सरकार आहे. गेल्या 25-30 वर्षाच्या कालावधीचा आढावा घेतला तर ज्या ज्यावेळी देशात काँग्रेस पक्षाचे राज्य आले त्या त्यावेळी या देशातील महागाई वाढली आहे.

नंतर 2क्यू.2....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

म्हणून राज्याच्या दृष्टीने जी पावले उचलायला पाहिजे ती उचलली की नाही याचे स्पष्टीकरण मंत्री महोदयांकडून अपेक्षित आहे. मला माहीत आहे की, माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री यासंबंधीचे उत्तर काय देणार आहेत. कदाचित ते सांगतील की आम्ही गोर-गरिबांना स्वस्त धान्य दुकानांमार्फत जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करण्याचा निर्णय घेतला असून अमुक वस्तू वाटप होत आहेत तसेच त्याबाबत तरतूद देखील केली आहे. पण तेवढ्याने हा प्रश्न सुटणारा नाही. आज राज्यातील स्वस्त धान्य दुकानांची काय अवस्था आहे याचा विचार केला तर माननीय मंत्री महोदयांनीच निवेदन केले होते की, राज्यात जवळपास 20 लाख बोगस शिधा पत्रिका आहेत असे चौकशीत आढळून आले. स्वस्त धान्य दुकानांची अशी अवस्था असल्याने राज्यात आज माल सुध्दा वेळेवर पोहचत नाही. इकडे मात्र मंत्री महोदय घोषणा करतात आणि 25 तारखेपर्यंत सुध्दा हा माल या दुकानांमध्ये पोहचत नाही. राज्यात स्वस्त धान्य दुकानांमधून शासनाने गहू, तांदूळ, डाळ वगैरे वस्तू देण्याचा निर्णय घेतला आहे परंतु या वस्तू अत्यंत निकृष्ट दर्जाच्या असून तो देखील 25 तारखेला जातो. दोन दिवस दुकान उघडे ठेवतो आणि तिसऱ्या दिवशी मात्र दुकानदार आपले दुकान बंद करतो. मालाचे वाटप झाले नाही तर कुठल्या तरी व्यापाऱ्याला तो माल काळ्या बाजारात विकून टाकतो. अशा प्रकारे राज्यात गोर-गरिबांच्या तोंडचा घास काढला जातो. 30 तारीख आल्यानंतर मात्र या गरिबांना सांगितले जाते की, आता धान्य मिळणार नाही पण त्याला जे धान्य मिळालेले असते त्याची विल्हेवाट बोगस शिधा पत्रिकांच्या नावे नोंद करुन करण्यात येते. तसेच काही दुकानदार तर अशा प्रकारे मालाची नोंद सुध्दा करीत नाहीत आणि सर्वच्या सर्व माल काळ्या बाजारात विकतात अशी परिस्थिती आहे. शासनाने तूर डाळ 55 रुपये किलोप्रमाणे देण्याचा निर्णय घेतला आहे पण ही तूर डाळ जी कोरियातून आयात केलेली आहे. तिला उग्र वास, ही डाळ शिजतही नाही, त्यामुळे ती ग्राहकांच्या पसंतीस उतरु शकली नाही म्हणून ती परत करण्याची नामुष्की शासनावर आली आहे. यासंदर्भात दोन तीन ठिकाणाहून तक्रारी आल्यानंतर या तूर डाळीऐवजी नवीन तूर डाळीचा पुरवठा केला जाईल अशी कबुली देखील लोकसत्ताशी बोलताना मंत्री महोदयांनी केली. आपण लोकसत्ताला मुलाखत दिली आणि हे मान्य केले की, ही तूर डाळ उग्र वासाची आहे, ती शिजत नाही. याचा अर्थ शासन उग्र वास असलेली तूर डाळ

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

गोर-गरिबांना खायला देणार. एका बाजूला गहू सडका, तांदूळ चांगल्या प्रकारचा नसणे आणि तूर डाळ सुध्दा उग्र वासाची अशा प्रकारे गरिबांची थट्टा चालली आहे. वरुन सांगणार की आम्ही गोर-गरिबांना स्वस्त भावाने अन्नधान्याचा पुरवठा करतो अशा प्रकारचे चित्र या राज्यात निर्माण झाले. मध्यंतरी दिल्लीमध्ये माननीय पंतप्रधानांनी एक बैठक घेतली होती, त्या बैठकीमध्ये देशाच्या माननीय वित्तमंत्र्यांनी असे सांगितले होते की, राज्यांना जो पुरवठा पीडीएस मार्फत राज्यांना पुरविण्यात येतो तो माल राज्य उचलतच नाही, आम्ही सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत मालाचा पुरवठा करण्यास तयार आहोत परंतु राज्य तो माल उचलत नाही त्यामुळे राज्यांना धान्याचा पुरवठा कमी आहे. खरे म्हणजे या व्यवस्थेसंबंधी राज्याचे नियोजन काय आहे याचे उत्तर मंत्री महोदयांकडून अपेक्षित आहे. राज्याला तूर डाळ, तांदूळ, गहे यासारख्या वस्तुंचा कोटा किती आहे यासंबंधीचे नियोजन काय आहे याचेही स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. राज्यात स्वस्त धान्य दुकानांच्या माध्यमातून जो माल गरिबांपर्यंत पोहचविला जातो त्याचे नियोजन देखील योग्य नाही. कारण ज्या पध्दतीने दुकानदार मनमानी पध्दतीने काम करीत आहेत ते यापुढेही सुरुच राहिले तर राज्यातील महागाई कधीच कमी होऊ शकत नाही, दिवसेदिवस ती वाढतच जाणार आहे. एका बाजूला प्रचंड महागाई वाढत आहे.....

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, शेतक-याच्या शेतीसाठी लागणा-या ज्या वस्तू आहेत त्याच्या किमतीत भरमसाठ वाढ झालेली आहे. केंद्रसरकारने खताच्या किमतीमध्ये 10 टक्के वाढ केलेली आहे, बियाण्यांच्या किमती तर फार मोठया प्रमाणात वाढलेल्या आहेत, पिकांवर फवारणीसाठी जी औषधे लागतात त्यामध्ये तर फार फार वाढ झालेली आहे आणि दुस-या बाजूने शेतक-याच्या शेतमालाच्या किमती कमी कमी होत आहेत. आपण म्हणता की, आम्ही महागाई कमी केली आहे परंतु आपण कोणती महागाई कमी केली आहे ? शेतक-यांच्या मालाची महागाई कमी झालेली आहे, शेतक-याच्या कपाशीचे दर कमी झाले आहेत, सोयाबीनचे दर कमी झाले आहेत, शेतक-याच्या तुरीचे दर कमी झाले आहेत. मार्केटमधील महागाई कमी करण्याचा सर्वातमोठा फटका हा शेतक-याला झालेला आहे. शेतक-याच्या मालाला कमी दर मिळत असल्यामुळे शेतकरी उध्वस्त झालेला आहे. एका बाजूला प्रचंड महागाई, जीवनासाठी आवश्यक असणा-या वस्तू महाग झालेल्या आहेत, शेतीसाठी आवश्यक असणा-या वस्तू महाग झालेल्या आहेत. सर्व बाजूने शेतकरी घेरला गेलेला आहे. महागाईचा फटक झोपडपट्टीवासींयांना, मागासवर्गीयांना, मध्यम वर्गीयांना जसा बसला आहे त्याच्यापेक्षा जास्त फटक हा शेतक-याला बसला आहे. शेतक-याला फटका बसत असल्यामुळेच शेतकरी आत्महत्या करीत आहे. शेतक-याचे उत्पन्न आणि खर्च याचा मेळ बसत नसल्यामुळे त्याला आपल्या मुलीचे लग्न करता येत नाही, आजारपणावर खर्च करता येत नाही, शेतमाल स्वस्त झाल्यामुळे त्याला घर चालविणे आज शक्य होत नाही. पिकासाठी बँकेने कर्ज दिले नाही तर त्याला खाजगी सावकाराच्या दारात जावे लागते व अव्वाच्या सव्वा दराने कर्ज घ्यावे लागते, शेती गहाण ठेवून, घर गहाण ठेवून त्याला कर्ज घ्यावे लागत आहे. शेतक-याने एकदाका कर्ज घेतले तर त्यामधून त्याची सुटका कधीच होत नाही. उत्पन्न आणि खर्च याचा मेळ न बसणे, शेतीचा खर्च प्रचंड प्रमाणात वाढणे, संसाराला आणि शेतीला लागणा-या वस्तू महाग होणे, शेतीच्या मालाचे दर कमी होणे, निसर्गाच्या कोपामुळे शेती न पिकणे यामुळे आमचा शेतकरी आत्महत्या करीत आहे. महागाईचा सर्वातजास्त फटका शेतक-यालाच बसलेला आहे. मध्येवर्गीयाचा जसा विचार होतो तसा विचार मात्र शेतक-यांच्या बाबत होतांना दिसत नाही. शेतीच्या फवारणीसाठी अगोदर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

एंड्रीन दोनशे रुपये लिटर होते परंतु आता याच एंड्रीनची किंमत प्रती लिटर दोन ते अडीच हजार रुपये झाली आहे. एंड्रीनची किंमत वाढल्यामुळे शेतकरी एंड्रींनची फवारणी सुध्दा करु शकत नाही. असे असतांना "काँग्रेसका हाथ आम आदमी के साथ"अशा घोषणा मात्र शासनाकडून केल्या जात असतात, "काँग्रेसका हाथ आम आदमी के साथचे बॅनर्स अनेक ठिकाणी लावल्याचे आपल्याला दिसून येईल. आज सर्वसामान्य जनतेला साखर 50 रुपये किलो दराने विकत घ्यावी लागत आहे, तेल 70 रुपये प्रती किलो दराने विकत घ्यावे लागत आहे, डाळ 60 रुपये दराने विकत घ्यावी लागत आहे अशी परिस्थिती असतांना "काँग्रेसका हाथ आम आदमी के साथ" अशा घोषणा देणे बरोबर आहे काय ? काँग्रेसने सर्वसामान्य जनतेला हिप्नोटाईज केलेले आहे. काँग्रेसने केवळ "काँग्रेसका हाथ आम आदमी के साथ" असे सांगून सांगून सर्वसामान्य जनतेवर हॅमरिंग केलेले आहे. आज सर्वसामान्य जनतेची अवस्था काँग्रेसने बिकट करुन टाकलेली आहे. काँग्रेसने सर्वसामान्यांचे जीवन उध्वस्त केलेले आहे. अशी एक वस्तू दाखवून द्या की, जी स्वस्त राहिलेली आहे. सर्वसामान्य माणसाला जीवन जगणे अवघड झाले. स्वस्त धान्याच्या दुकानावरील वस्तूंचे दर कमी केलेले आहेत असे सांगितले जाते परंतु असे करुन महागाई कमी होणार नाही तर महागाईचा अभ्यास करुन महागाई कमी केली पाहिजे.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

राज्यातील गोरगरीब माणसाची असलेली गरज आपण लक्षात घेतली पाहिजे, गहू, तांदूळ,, डाळी, भाजीपाला यांच्या किंमती वाढल्या आहेत. कालच वर्तमानपत्रात दुधाचे दर दोन रूपयांनी वाढल्याची बातमी आली. अशा पद्धतीने महागाई वाढत गेली, त्यावर नियंत्रण ठेवले नाही तर पुढे काय होईल हे सांगता येत नाही. मागणी आणि पुरवठा यांचा विचार झाला नाही, मागणी आणि पुरवठा यांचे संतुलन राखले गेले नाही तर या राज्यातील सर्वसामान्य माणसाला आत्महत्येशिवाय दुसरा पर्याय राहणार नाही. मी जास्त काही बोलणार नाही. माझा वेळ मी माझ्या सहकार्यांना देणार आहे. आज सकाळीच बैठक झाली. त्यात वेळेचे नियोजन केले पाहिजे असे ठरले. मी दोन-चार अपेक्षा माननीय मंत्रिमहोदयांकडून करतो. पूर्ण वर्षभरासाठी मंत्रिमहोदयांनी कोणते नियोजन केले आहे ? केंद्र शासनाकडून आपल्याला किती धान्य मिळणार आहे ? किती गहू,तांदूळ,साखर मिळणार आहे ? लेव्ही साखर किती मिळणार आहे ? हे सर्व धान्य सर्वसामान्यांच्या घरापर्यंत पोहोचविण्यासाठी आपण कोणते नियोजन करणार आहात ? आजची जी प्रचलित पद्धत आहे ती योग्य नाही. शासनाचे दक्षता पथक, फूड इन्स्पेक्टर, डीएसओ काम करीत नाही. सर्वजण खिशे गरम करत आहेत. स्वस्त धान्य दुकानदाराला आज अधिकारी अभय देत आहेत. त्यांच्या दुकानातील माल ट्रकद्वारा बाहेर जातो. तहसील कोटमधून 25-26 तारखेला माल दिला जातो. तो माल पोहचेपर्यंत 29 तारीख उजाडते. 29 तारखेला माल आल्यानंतर दीड दिवस दुकानदार दुकान उघडे ठेवतो आणि नंतर दुकान बंद करून या महिन्याचा कोटा संपला असे सांगतो. ही जी पद्धती आहे, ती सदोष आहे. ती दुरूस्त करण्यासाठी आपण काय उपाययोजना करणार आहात हे या प्रस्तावावर उत्तर देताना कृपा करून सांगावे एवढेच या ठिकाणी सांगतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, रोज मरे त्याला कोण रडे. तसे आता महागाईबद्दल कुणालाही काही वाटेनासे झाले आहे. महागाई आपल्या नशिबीच आहे असे जनता गृहीत धरून आहे. कर्माचे भोग म्हणून भोगूया असे म्हणून जनता हे भोग भगत आहे. कारण त्यांनी आपल्याला निवडून दिलेले आहे. आपणच चूक केलेली आहे, त्यामुळे आता पाच वर्षे ती भोगायलाच पाहिजे असे जनतेला वाटते आहे.

श्री.गुरूनाथ कुळकणी : सभापती महोदय, आज सुद्धा तसेच झाले आहे. नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये पुन्हा लोकशाही आघाडी आलेली आहे.

श्री.दिवाकर रावते : आम्ही संभाजीनगर महानगरपालिका फटकामारून जिंकली आहे. लाखो-लाखो रूपये लावून फिरफिर फिरून श्री.छगन भुजबळ थकून आले. आबा बिचारे एकदा गेले. पण ते हात हलवत आले. संभाजीनगर, बदलापूर महानगरपालिका आम्ही जिंकली. लोकांना लुटण्याचा अड्डा हा आपल्याकडेच राहिला. जेथून महागाई निर्माण होते आणि मुंबईतील सर्वसामान्य माणसांचा सत्यानाश होतो, ती बाजारसमिती नवी मुंबईमध्ये आहे, ती नवी मुंबई महानगरपालिका आपल्याकडेच राहिलेली आहे. कारण हे कर्म आपल्याकडेच पाहिजे ना. पापी नगरी ही आपल्याकडेच पाहिजे. शेवटी आपले धोरण तेच आहे. या पक्षाचे धोरण काय आहे ? लाचार जनता काहीच करू शकत नाही. सत्तेपुढे शहाणपण नसते. श्री.गुरूनाथजी कुळकर्णी आपण ज्येष्ठ आहात. सभागृहात नाही. राजकारणात. जे बिघडलेले आहेत, त्यांना मार्गदर्शन करून सुधरविण्याचे काम केले पाहिजे. पण आपणच बिघडायला लागल्यानंतर मला वाईट वाटले. राष्ट्रवादी काँग्रेसने आपले धोरण जाहीर केले. साखर खाल्ली नाही तर कोणी मरत नाही. हे आपलेच धोरण. हे आपल्याच अंकात छापून आले. याचा खुलासा आदरणीय श्री.शरद पवार साहेबांना दिल्लीपर्यंत करावा लागला. त्यांनी असा खुलासा केला की, हे संपादकाचे धोरण आहे. मासिक आपल्या पक्षाचे. धोरण मात्र संपादकाचे. यावर आपल्याला काही बोलायचे आहे काय ?

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

भारतामध्ये मधुमेहाचे पेशंटस वाढले आहेत . त्यामुळे साखरेचा वापर कमी होत चालला आहे. शासनाचे नशिब थोर आहे असे त्यांनी समजावे.

सभापती महोदय, महागाईच्या संदर्भात चर्चा घेण्यात यावी अशा प्रकारची मागणी आम्ही गेल्या आठवडयात केली होती त्यानुसार आज ही चर्चा घेण्यात आलेली आहे. काल वर्तमानपत्रातील बातम्या वाचल्यानंतर महागाईवर आम्ही चर्चा कशाला करावयाची असा प्रश्न आमच्या समोर निर्माण झाला आहे. "वीज आणखी भडकणार" अशी महाराष्ट्र टाईम्समध्ये बातमी प्रसिध्द झाली होती.कोण कोणत्या वस्तुंची भाववाढ झालेली आहे या बाबतीत सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले आहेच. त्या संदर्भात मी देखील नंतर सांगणार आहे. "लोडशेडीग मुक्त स्वप्न प्रत्यक्षात येणे दूरच सध्या मिळणा-या विजेची किंमत वाढविण्याचा प्रस्ताव महावितरणने राज्य वीज नियामक आयोगाकडे सादर केला आहे." अशी बातमी महाराष्ट्र टाईम्समध्ये प्रसिध्द झाली आहे. या संदर्भात मघाशी सभागृहात चर्चा झाल्याप्रमाणे शिक्षणालासुध्दा वाणिज्याचा दर्जा देऊन शिक्षण खात्यामध्ये लूट करुन पालकांच्या डोक्यावर वीज दरवाढीचा बोजा वाढविण्यात येत आहे. त्यामुळे महागाई वाढत जाते.शिक्षण संस्थांना व्यापारी दर्जाचा विजेचा दर लावण्यात आल्यामुळे शिक्षण संस्था स्वत:च्या खिशातून विजेचे पैसे न भरता हे पैसे विद्यार्थ्याकडून म्हणजेच पालकांकडून वसूल करण्यात येणार आहे. एका बाजूला घरगुती विजेचे दर वाढविण्यात येत आहे व दुस-या बाजूला विद्यार्थ्याच्या शाळेची फी भरत असतांना वाढलेल्या विजेच्या दराचे पैसे देखील त्यांच्याकडून वसूल केले जात आहे आणि एक प्रकारे शॉक ट्रीटमेन्ट त्यांना दिली जात आहे असे दुर्दैवाने म्हणावेसे वाटते.

सभापती महोदय, योगायोगाने आजच्या सामना वर्तमानपत्रात अग्रलेख लिहिला आहे. "महागाईचे फटके सुरुच "अशा प्रकारे आदरणीय शिवसेना प्रमुखांनी मत प्रदर्शन करीत असतांना दुधाच्या वाढलेल्या भावाची चिंता व्यक्त केलेली आहे.त्याचबरोबर त्यांनी असे मत मांडलेले आहे की, दुधाच्या वाढलेल्या भावामध्ये माझ्या घरात येणाऱ्या दुधाचा भाव आणि तुम्ही देत असलेला शेतक-यांना दुधाचा भाव यामध्ये जो फरक आहे त्यासबंधी त्यांनी चिंता व्यक्त केली आहे.वाढलेल्या दुधाचा भाव जर आमच्या खिशातून घेण्यात येत असेल तर शेतक-याच्या खिशात का टाकत नाही अशा प्रकारचा प्रश्न आजच्या अग्रलेखातून त्यांनी विचारला आहे.दुधाच्या किंमती दोन रुपयांनी

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

वाढविल्यानंतर 7 लाख लिटर्स दूध् कोल्हापूरच्या संघाकडून येत असल्यामुळे त्यांना 14 लाख रुपयांचा नफा मिळणार आहे.

सभापती महोदय. वीज दर वाढीची टांगती तलवार आणि दुधाचे वाढते भाव यावर आदरणीव शिवसेना प्रमुखांनी भाव वाढीचा भस्मासूर वाढलेला आहे त्याचा लेखाजोखा अग्रलेखात घेतला आहे. त्यामुळे त्याचा मी या ठिकाणी आवर्जून उल्लेख करणार आहे. या अग्रलेखात असे म्हटलेले आहे की,"जानेवारीत विजेचे बिल आलेले पाहून आमचे डोळे पांढरे होण्याची वेळ आलेली आहे. भार नियमन मुक्त कंपनीने त्यावेळी प्रतीयुनिट 70 पैशांची वाढ केली होती.आता दोन महिन्यामध्ये शहरामध्ये 40 पैशांनी वाढ केलेली आहे.शिवाय सरसकट 14 टक्के वीज दराची टांगती तलवार आता आहेच " वीज दर वाढविण्यासाठी आम्ही वीज नियामक आयोगाकडे गेलो आहे हे सांगताना सरकारला काही वाटत नाही काय ? त्या अग्रलेखात पुढे असे म्हटलेले आहे की, " वीज दर वाढीमुळे लोकांचे कंबरडे मोडावे अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे उत्तर प्रदेशामध्ये 52 लाख टन जादा साखर तयार झाली आहे आणि महाराष्ट्रातही 20 टक्के जादा उत्पादन होणार आहे पण साखर उत्पादकांच्या लॉबीने साखरेचे भाव कमी न केल्यामुळे सर्वसामान्याची होरपळ सुरुच आहे . दूध साखर महाग झाल्यामुळे चहा आणखी महागणार आहे . भाज्या, गहू, तांदूळ आणि डाळीचे भाव तर चढलेले आहेतच गहू, साखर रेशन दुकानात स्वस्त जरुर आहे पण खुल्या बाजारात चढया भावाने या दुकानांचा बराचसा कोटा पुरवठा खात्याच्या मेहरबानीमुळे बाजाराकडे वळवला जातो त्यामुळे दैनंदिन जीवनाला लागणारी प्रत्येक वस्तू महाग
झालेली आहे ".असे मत सामाना या वर्तमानपत्रात प्रकाशित झालेले आहे.

सभापती महोदय, भाववाढीच्या मूळ गाभ्यापर्यंत जाण्याची माझी इच्छा आहे.तांदूळ आणि गहू यांचे भाव किती वाढले या सबंधीची आकडेवारी मी नंतर मांडणार आहे.परंतु ही भाववाढ नक्की कशामुळे निर्माण झाली आहे ? इनफ्लेशन म्हण्जे भाववाढ . सरावाची भाषा असल्यामुळे इंग्रजीतून उल्लेख केला की सर्वाना लगेच समजू शकेल. सर्वसाधारण वस्तूंच्या किंमती वाढल्यामुळे त्यातूनच भाववाढ निर्माण झाली आहे. सर्वसाधारण वस्तूंच्या किंमती वाढल्यामुळे त्यातून भाववाढ आली आणि उत्पादन खर्च वाढला ..

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री. दिवाकर रावते...

आणि उत्पादन खर्च वाढला, त्यामध्ये कॉस्ट पुशबरोबर डीमांड पुल झाली नाही. मालाची मागणी वाढली. सर्वसाधारण बाजारामध्ये मालाचे असणारे जे भाव आहेत, त्यामध्ये कॉस्ट पुश आणि डीमांड पुल निर्माण होते त्यावेळी भाववाढीला चालना मिळते. कृषी विकास दराचा भाव काढला तर या देशाच्या माननीय कृषी मंत्र्यांनी सांगितले की, जीवनावश्यक वस्तूंचे भाव वाढले तरी चिंता करावयाची नाही. तुमच्या खिशातून पैसे निघाले पाहिजेत. भाव वाढ झाली पाहिजे, आणि भाव वाढ झाल्याबरोबर शेतकऱ्याला जास्त पैसे मिळाले पाहिजेत. ते मिळतात काय? हा संशोधनाचा विषय आहे? कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांने आत्महत्त्या करण्यापेक्षा त्याच्या उत्पादनाला किंमत मिळाली पाहिजे असे या देशाच्या कृषी मंत्र्यांचे मत आहे, त्यांच्याकडे आणखी दोन खाती आहेत. त्या खात्यामध्ये भानगड आहे, त्याकडे मी नंतर येणार आहे. मला तो विषय टाळावयाचा होता, परंतु माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी मला चाळविल्यामुळे तो विषय मी आता टाळणार नाही. इतर राज्यातील विकास दराची आकडेवारी मी आपणास सांगतो. यामध्ये विकास दराच्या बाबतीत बिहार नं.1 वर आहे, त्या राज्यामध्ये विकास दर 11 टक्के आहे. यापूर्वी महाराष्ट्र हा नंबर एक वर होता. बिहारच्या खालोखाल आता गुजरात आहे, त्यानंतर आंध्र प्रदेश आहे, उत्तरांचल, गोवा, पंजाब व त्यानंतर महाराष्ट्राचा नंबर लागतो. आपण विकास दराचे काय कौतुक करता? इंडेक्सचा, भाववाढीचा प्रश्न विकास दराशी निगडीत असल्यामुळे आपला खालचा नंबर आहे. आणि म्हणून शेतीच्या, कृषी विकास दरामध्ये नंबर एकवर गुजरात राज्य आहे, आणि महाराष्ट्र राज्य सहा नंबरवर आहे.

कमॉडिटी मार्केट, सट्टाबाजारामधून भाववाढीचे दुष्ट चक्र सुरु आहे त्यावर नियंत्रण आणण्याचे सामर्थ्य या सरकारमध्ये नाही. या राज्यातील 80 टक्के भाववाढ ही तिथून होते. हा सट्टाबाजार चालतो कसा? त्या व्यापाऱ्याचा माल गोडाऊनमध्ये असतो, तो जागचा हालत नाही. त्याने 100 रुपयांना घेतलेला माल जागेवर बसून दुसऱ्याला 120 रुपयांना विकला, त्या माणसाने तिसऱ्या माणसाला तो 140 रुपयांना विकला. अशाप्रकारे पाच ते सहा व्यापाऱ्यांमध्ये हा व्यवहार चालत चालत त्या मालाची किंमत 200 रुपयांपर्यंत जाते. अशाप्रकारे सट्टाबाजार चालतो. या व्यवहारामध्ये मधले 100 रुपये खाणारे सट्टाबाजारवाले आहेत त्यांच्यामुळे ही भाववाढ होत असते. आपल्याला जर याचे दर्शन घ्यावयाचे असेल तर आपण कांदा-बटाटयाच्या मार्केटमध्ये जा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/

श्री. दिवाकर रावते...

त्याच्या बाजूला धान्याचे मोठे गोडाऊन आहे, त्याठिक्राणी जा. आपण आमच्या दादरच्या मार्केटमध्ये सकाळी 7 वाजता उभे रहा. त्याठिकाणी नाशिकहून आलेला भाजीचा ट्रक परत

नाशिकला जातो. भाजीने भरलेला ट्रक नाशिकहून आल्यानंतर त्याठिकाणी रुमालाखाली हात घालून भाजीचा सौदा केला जातो. नाशिकचा व्यापारी तिकडच्या लोकांसाठी तो माल विकत घेतो. नाशिकहून 100 रुपयांनी आलेला माल 200 रुपयांना विकत घेऊन तो पुन्हा 250 रुपयांच्या भावाने विकला जातो. शेतकऱ्याकडून 100 रुपयांना घेतलेल्या मालाचे सट्टाबाजाराच्या माध्यमातून भाववाढीचे इन्फलेशन निर्माण होते. आणि म्हणून त्यावर सरकारचे नियंत्रण नाही ही गंभीर बाब आहे. सेबीचे नियंत्रण स्टॉक एक्सचेंज मार्केटमध्ये आहे. त्याठिकाणी शेअर बाजारामध्ये भ्रष्टाचार झाला तर त्यावर सेबीचे नियंत्रण आहे. त्याप्रमाणे या सट्टाबाजारावर तुमचाही ताबा आहे असे जर तुम्ही सांगितले तर बरे होईल. सटोडियन आज ज्या पध्दतीने शेतकऱ्याचा माल गोडाऊनमध्ये ठेवीत आहेत, तो बाहेर काढीत नाहीत. बाहेर गिऱ्हाईक मरत आहे तो मरु दे, त्याचे त्यांना देणे घेणे नाही. माझ्या सट्टाबाजारामध्ये मी पैसे कसे कमवीन आणि शेतकऱ्याकडून आलेला माल 1 रुपयाला विकत घेऊन चढया भावाने 10 रुपयांना कसा बाजारात विकायला घेऊन जाईन. यामध्ये दहा सटोडियांचे कसे भले होईल ही जी भूमिका आहे त्यावर तुमचे कोणतेही नियंत्रण नाही. या सट्टाबाजाराला सरकारची मान्यता आहे, तो जुगार नाही, बेकायदेशीर व्यवसाय नाही, तो अधिकृत आहे. एकेका गाळयावर बसलेल्या व्यापाऱ्यामार्फत करोडो रुपयांचा व्यवहार त्याठिकाणी सुरु असतो. त्याच्याजवळ 4 फोन असतात, संगणक असतो. त्याठिकाणी मालाच्या भावाची चढउतार होत असते. फायनान्शिअल इंस्टिटयूट, बँका या सर्व फलोरिश्ड झाल्या आहेत,त्यांच्याकडे पैसे सरप्लस झाले आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ते कर्जदारांची वाट पहात असताता, कोण कर्ज घ्यावयास येत आहे याची वाट पहात असतात. पैशाची आवक वाढलेली आहे. ही आवक कशामुळे वाढली ? सभापती महोदय, आपल्या हिंदुस्थानामध्ये प्रचंड प्रमाणात परदेशी पैसा आला. सध्या एन.आर.आय.आपल्याकडे व्याजाने पैसे लावतो. कारण जर अमेरिकेमध्ये व्याजाने पैसे लावले तर फक्त दोन टक्केच मिळतात. तेथे महागाई होत नाही. तेथे सगळया फायनान्शिअल इन्स्टीट्युटचा नियमच आहे. आता तुम्हाला पाहिजे तेवढे डॉलर मिळतात, आंतरराष्ट्रीय वगैरे सगळे काही गेले. त्यामुळे एन.आर.आय.चे पैसे अधिकृतरित्या येथे येतात आणि याठिकाणी त्याने कितीही कमाविले तरी मग त्यावेळी जो काही डॉलरचा रेट असेल त्याप्रमाणे तो येथून डॉलरमध्ये घेऊन जातो. आता याबाबतीत काही बंधन राहिलेले नाही. त्यामुळे याचा परिणाम असा झाला आहे की, याठिकाणी प्रचंड प्रमाणात परदेशी पैशाची गुंतवणूक सट्टाबाजारापासून सगळया ठिकाणी होत आहे. त्यामुळे येथे प्रचंड पैसा आला. शेअर कधीही कोसळतात. परदेशी माणसाने केलेली गुंतवणूक पटकन एखाद्या दिवशी घेऊन जातो, त्यानंतर शेअर बाजार एकदम कोसळलेला दिसतो. या देशातील पैसा, गोरगरीबांच्या खिशातील पैसा हा परदेशी लोकांच्या गुंतवणूकीच्या माध्यमातून भराभर बाहेर चाललेला आहे आणि आपण मात्र येथे महागाईला तोंड देत आहोत ही यातील बेसिक बाब आहे.

सभापती महोदय, खरेदीची किंमत वाढत आहे. जेव्हा मागणी वाढते तेव्हा किंमत वाढते आणि मग त्यावेळी पुरवठा गोठवून ठेवला जातो. जेव्हा पुरवठा कमी होतो, तेव्हा पुन्हा मागणी वाढते ही एक सायकल व्यापाऱ्यांनी निर्माण केलेली आहे. ज्यावेळेला भाववाढ होते तेव्हा चलन फुगवटा वाढतो. अशा वेळी नोकऱ्या निर्माण झाल्या पहिजेत. काल एम्प्लॉयमेंट एक्ससेंजमध्ये 62 लाख बेकारांनी नोकरीसाठी नोंदणी केलेली आहे. भाववाढीबरोबर रोजगार वाढला पाहिजे, पण तो दुर्दैवाने वाढत नाही ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. कोणकोणत्या भागामध्ये भाववाढ झाली नाही ? याला जबाबदार कोण ? बँकेच्या व्याज दरामध्ये वाढ झाली आहे. 1 जानेवारी 2004 मध्ये 10 लाखापर्यंत 9 टक्के व्याज होते, 10 लाखाच्यावर देखील 9 टक्केच होते. जुलै 2006 मध्ये 10 लाखापर्यंत व्याज 10 टक्के झाले आणि 10 लाखाच्या वर 9.5 टक्क्यांनी वाढले. जानेवारी 2007 मध्ये 10 लाखापर्यंत 10.5 म्हणजे .5 टक्क्यांनी व्याजदर वाढले आणि 10 लाखाच्यावर पुन्हा 5 टक्के वाढले म्हणजे 10 टक्के वाढले. 1 मे 2007 मध्ये 10 लाखावर 11 टक्के व्याज होते, ते ...

. . . .2 व्ही-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

10 लाखाच्यावर 12 टक्के झाले म्हणजे दोन्हीकडे एक टक्क्यांनी दर वाढला. जुलै 2008 मध्ये 2 लाखापर्यंत 10 टक्के व्याज झाले, याठिकाणी स्लॅब खाली आणला परंतु व्याज कसे वाढलेले आहे, कशी लुटालूट सुरु आहे ते पहा. पुढे 5 लाखापर्यंत 11 टक्के, 5 ते 10 लाखापर्यंत 11 टक्के आणि 25 लाखापर्यंत 12 टक्के व्याज केले. सर्वसामान्य माणसाला कर्ज घेताना सुध्दा व्याज दरामध्ये वाढ झाली. सर्वसामान्य माणसांच्या जीवनामध्ये हे सर्व प्रश्न असतातच.

सभापती महोदय, ट्रान्सपोर्टच्या बाबतीत सांगावयाचे तर सी.एन.जी.झाल्यानंतर वाहतुकीचे दर कमी व्हावयास हवे होते. कारण पेट्रोल, डिझेल च्या किंमतीपेक्षा सीएनजी म्हणजे गॅस हा अर्ध्या किंमतीमध्ये उपलब्ध असतो. परंतु सीएनजी आल्यानंतर दरवाढ झाली. खरे म्हणजे यासाठी सबसिडी दिली होती. ज्या टॅक्सीवाल्यांनी सीएनजी बसविले, त्यांना सरकारने सबसिडी दिली होती आणि मग त्यांनी सीएनजी केले होते. त्यांना सबसिडी का दिली ? कारण त्यांना सीएनजी बसविण्यासाठी एकाच वेळी 35 ते 40 हजार रुपये खर्च करावे लागणार होते. हा प्रदूषणाचा विषय होता. परंतु यामुळे जो प्रवास स्वस्त होता, तोच महाग झाला. टॅक्सीचे दर 1 कि.मी.साठी 13 रुपये, पुढच्या कि.मी.साठी पूर्वी 7 रुपये होते ते 8 रुपये झाले. 2009 मध्ये हा दर 14 रुपये झाले आणि पुढच्या कि.मी.साठी 8 रुपयावरुन 9 रुपये म्हणजे 1 रुपया वाढला, अशा प्रकारे ट्रान्सपोर्टमध्ये देखील दरवाढीचे चक्र निर्माण झाले.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलेखी नोंद

श्री.दिवाकर रावते....

रिक्षाचे भाडे सुध्दा दरवर्षी 1-1 रुपयांनी वाढवित गेले आहे. माणसांना लागणारी वीज महाग झाली, बँकेच्या व्याजदरामध्ये वाढ झाली, प्रवास महाग झाला. बीइएसटीच्या भाडयात वाढ झालेली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर केंद्रीय कृषी मंत्री माननीय श्री.शरद पवार हे असे म्हणाले की, भाववाढ झाली तरी बेहत्तर, त्यामुळे दोन पैसे शेतक-यांना अधिक मिळत आहेत. सभापती महोदय, शेतक-यांच्या शेतीसाठी कोणकोणत्या गोष्टी लागतात त्याची भाववाढीसह माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता ती माहिती अशी आहे. महिन्द्रा ॲण्ड महिन्द्रा कंपनीच्या ट्रॅक्टरची किंमत 4.25 लाख इतकी होती त्यासाठी आता 6.25 लाख रुपये मोजावे लागतात. नुकतेच बँकेच्या व्याजाचे दर वाढलेले आहेत, त्यामुळे वाढीव व्याज दराने या ट्रॅक्टरचे मूळ कर्ज व व्याज द्यावे लागत आहे. ट्रॅक्टरच्या मागे ट्रॉली लावतात, ही ट्रॉली पूर्वी 90 हजार रुपयांमध्ये मिळते. ती घ्यावयाची असेल तर कर्ज आणि वाढीव व्याजदर द्यावे लागते. नांगर पूर्वी 30 हजार रुपयांमध्ये मिळत होता, आता 60 हजार रुपये लागतात. म्हणजे दुप्पट किंमत झालेली आहे. मोगडा 11 हजार रुपयांमध्ये मिळत होता, तो 27 हजार रुपयात मिळतो, डोडावेट असते त्याची किंमत 40 हजार रुपये होती ती 70 हजार रुपये झाली आहे. पेरणी यंत्र 28 हजार रुपयात मिळत होते ते आता 40 हजार रुपयात मिळते. पूर्वी बैलजोडी 25-30 हजार रुपयांमध्ये मिळत होती ती आता 1 लाख, 1.50 लाख लाखापर्यंत गेली आहे. नामी बैलजोडी असेल तर 2 लाखापेक्षा अधिक पैसे द्यावे लागतात. बँकेचे व्याजदर वाढलेले आहेत, महागाई वाढली आहे. शेतक-यांनी काय करावयाचे ? परवा माझ्या घरात माझ्या पत्नीने मला असे सांगितले की, आज भेंडीची भाजी केली आहे, ती सुध्दा कमीच केली आहे. या भेंडीचा भाव प्रति किलो 40 रुपये इतका झालेला आहे. कांदा आणि बटाटयाचे भाव तर दररोज बदलत असतात. गृहिणीला आता पश्चातापाची वेळ आली आहे. आता बाजारात खरेदीला जाऊ नये असे खरोखरच वाटत आहे. एवढी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. पालक, मेथी यासारख्या पालेभाज्यांचे भाव वाढले आहेत. मध्यंतरी मेथीच्या जुडीची किंमत 100 रुपये झाली होती. लहान जुडीत 3 काडया, 4 काडया, 5 काडया दिल्या जात होत्या. लोकांची काय अवस्था या शासनाने करुन ठेवली आहे ? हा पैसा शेतक-यांच्या

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

घरामध्ये जात आहे काय ? अळू, लसूण, अद्रक, टोमॅटो यांचे सुध्दा भाव वाढलेले आहेत. सामान्य लोकांना टोमॅटो सुध्दा घेणे परवडत नाही. गृहिणी पूर्वी 1 किलो टोमॅटो घेत होत्या, आता 4 किंवा 5 टोमॅटो घेतात. टोमॅटोचे सूप करावयाचे म्हटले तर 4 वेळा लागतील एवढे टॉमेटो त्यासाठी लागतात असे सांगून सूप करण्यास नकार देतात. सभापती महोदय, ही प्रत्येक घरातील माणसांची ही व्यथा आहे. मग मोठा असो की छोटा असो.

सध्या घरामध्ये केळी हे एकच फळ खाणे परवडते, ते सुध्दा स्वस्त नाही. परंतु सफरचंद, चिकू, द्राक्षे, संत्रा, मोसंबी या फळांना हात लावण्याची लोकांची हिंमत होत नाही. 100 रुपयांमध्ये 4 किंवा 5 मोसंबी मिळते. म्हणजे फळे सुध्दा सामान्य माणसांच्या नशिबी नाहीत. भाजी नाही. कडधान्य आणि डाळींचे भाव पूर्वी किती होते आणि आता किती झाले आहेत ते सांगतो. 1995-96 मध्ये तूर डाळीचा क्विंटलचा भाव 2651 रुपये होता, सन 2009-10 मध्ये तो भाव 6200 रुपयांपर्यंत पोहोचला आहे. म्हणजे पाच वर्षात दुपटीपेक्षा जास्त झाला. मागील 5 वर्षात तुमचे शासन होते, त्याच्याही 5 वर्षे अगोदर तुमचेच शासन होते. मूग डाळीचा भाव 3401 रुपये होता तो 7200 रुपये झाला, म्हणजे दुपटीपेक्षा अधिक झाला आहे.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

(श्री. दिवाकर रावते....

चणाडाळीचा भाव क्विंटलला 2451 रु. होता तो आता 2700 रुपये झालेला आहे. उडीद डाळीचा भाव क्विंटलला 2300 रुपये होता तो आता 5500 रुपये झालेला आहे म्हणजे भाव दुपटीपेक्षा अधिक, तिपटीने वाढलेले आहेत. मसूरडाळीचा भाव क्विंटलला रुपये 2201 रु. तो 4000 रुपये झालेला आहे. शिल्टी डाळीचा भाव क्विंटलला 2751 रुपये होता तो आता 6200 रुपये झालेला आहे. काबुली चण्याचा भाव भाव क्विंटलला 3600 रुपये.होता तो 6200 रुपये झालेला आहे. साखरेचे भाव आपण पहातच आहोत. डाळीचे भाव देखील दुपटीपेक्षा जासत वाढले. सोन्या-चांदीवर रिझर्व्ह बँकेचे गणित मांडले जाते. मागील 5 वर्षापासून केन्द्रामध्ये तुमचेच सरकार आहे आणि राज्यात देखील तुमचेच सरकार आहे. माझ्याजवळ 2005 पासून 2010 पर्यन्तची भाववाढीची सर्व प्रकारची आकडेवारी आहे. 2 जून 2004ला सोन्याचा भाव 10 ग्रॅमला 6150 रु. होता तो आता 17050 रुपये म्हणजे तिपटीने वाढला. घरांचे भाव देखील वाढले. मग कपडे तरी स्वस्त झाले का हो ? अन्न, वस्त्र आणि निवारा या माणसाच्या तीन मूलभूत गरजा आहेत. घरांच्या किंमती म्हणजे निवा-याच्या किंमती इतक्या प्रचंड वाढलेल्या आहेत की सर्वसामान्य माणूस त्याचा विचारच करीत नाही. मी मघाशी सांगितल्या प्रमाणे अन्नधान्याचे भाव वाढले. कपडयांच्या भावात देखील खूप वाढ झालेली आहे. 2006 मध्ये साध्या शर्टची किंमत 125 रुपये होती ती आता 600 रुपये झालेली आहे. सर्वात हलक्या साडीची किंमत 170 रु. होती ती आता 650 रुपये झालेली आहे. बनियनची किंमत 25 रुपये होती ती 60 रुपये झालेली आहे. मुलाच्या हाफ पॅण्टची किंमत 45 रु.होती ती आता 150 रु. झालेली आहे. या महागाईतून कपडे देखील सुटले नाहीत. एवढया गोष्टी सुटल्या नाहीत तर मग दाढी-केस या गोष्टी तरी कशा सुटतील ? केस कापण्याचे दर 25 रु. होते ते 40 रुपये झालेले आहेत. दाढी करण्याचे दर 12 रुपये होते ते 20 रुपये झालेले आहेत. केस-दाढी एकत्र केले तर 60 ते 70 रुपये पडतात. लहान मुलांचे केस कापण्याचे दर 40 रुपये झालेले आहेत. मग आता लोकांनी दाढी आणि केस वाढवायचे काय ?

सभापती महोदय, या राज्यात माणसाला मरण देखील स्वस्त राहिलेले नाही. 2000मध्ये तिरडीच्या सामानाची किंमत 260 रुपये होती. काल-परवाच्या सामानाची मला एकाने रिसिट दिली. त्यावरुन तिरडीच्या सामानाची किंमत 660 रुपये झालेली आहे. मरण देखील तीन पटीने

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

वाढले आहे. मुंबई महानगरपालिकेने मात्र सरणावरची सर्व क्रिया मोफत केली आहे. या शासनाच्या राज्यात मरणसुध्दा स्वस्त झालेले नाही.

....नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय, माझ्याकडे होलसेल किंमतीची प्रत्येक दिवसाची आणि प्रत्येक महिन्याची आकडेवारी उपलब्ध आहे. मी तुमची गाथा वाचायला उभा आहे का? दु:ख होते. हे मी का सांगतो. तुम्ही सांगू शकता. सगळे सांगू शकतात. याचे काहीच वाटत नाही का? माननीय पंतप्रधानांनी भाववाढ कमी करण्यासाठी परवा दिल्लीमध्ये बैठक घेतली. तीन महिने केंद्र सरकार हैराण आहे. भाववाढ कशी कमी करायची? या देशाचे पंतप्रधान कोण आहेत? ते अर्थतज्ज्ञ आहेत. रिझर्व्ह बँकेचे ते गव्हर्नर होते. अर्थ क्षेत्रातील सर्वोच्च ज्ञान असलेले व्यक्तिमत्व आज पंतप्रधानपदी बसलेले आहेत. महागाई आणि भाववाढ कशी थांबवावी याचे गणित त्यांना सुटत नाही. का गणित सुटत नाही? त्यांचे गणित कच्चे आहे का? धोरणात कमतरता आहे का? नक्की काय झालेले आहे? सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांना मी धन्यवाद देतो. त्यांच्या माहितीसाठी मला सांगायचे आहे. ते म्हणाले की, केंद्रीय मंत्री श्री.प्रफुल्ल पटेल यांनी सांगितले की, श्री.शरद पवार यांच्यामुळे भाववाढ झालेली नाही. असेल. पंतप्रधान कार्यालयात केंद्रीय राज्यमंत्री असलेले श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितले की, ठीक आहे. श्री.शरद पवार यांच्यामुळे भाववाढ झालेली नाही. परंतु भाववाढ ही राज्याची बाब आहे असे ते म्हणतात. मला माननीय मंत्रीमहोदयांकडून याचे उत्तर नको. काँग्रेस पक्षातून निवडून आलेले एक केंद्रीय मंत्री म्हणतात, हे खाते केंद्रात आणि राज्यात राष्ट्रवादी पक्षाकडे आहे. तुम्ही जबाबदार आहात भाववाढीला. अशा प्रकारची त्यांनी भूमिका मांडली आहे. आपण म्हणतो ना, शुभ बोल नाऱ्या. चांगले होईल. पण का कोण जाणे. या देशात चारही बाजूंनी टीका झाली. सर्व पक्षांना गिऱ्हाईक लागते दोष द्यायला. ते म्हणतात, भाववाढीला श्री.शरद पवार जबाबदार आहेत. श्री.शरद पवार साहेब एवढे हुशार, त्यांनी पहिल्यांदाच जाहीर केले. पहिला आरोप झाला त्याचवेळी जाहीर केले. आता दुधाची भाववाढ होण्याची शक्यता आहे. शुभ बोल नाऱ्या. बोलले. ही तिसरी भाववाढ आहे. जानेवारी पासून मार्चपर्यंत तिसऱ्यांदा दुधाचे दर वाढले. शेतकऱ्यांना भाव वाढवून दिला का? साखरेच्या किंमतीबद्दल तेच आहे. या प्रश्नाचे उत्तर मंत्रीमहोदयांच्या आवाक्याबाहेरचे आहे. त्यांनी यामध्ये पडू नये. पडलात तर गडबड होईल. आता आहात, परंतु अवघड जागी आहात. आदरणीय श्री.शरद पवार यांनी 11 कलमी कार्यक्रमाला प्रतिसाद देताना केलेले वक्तव्य आहे. कोणत्या परिस्थितीत, कशा प्रकारे वक्तव्य केले त्याचा अर्थ मला कळत नाही. कदाचित मी छोटा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

असेन, विचाराने मतिमंद असेन. त्यांनी परिषदेचे उद्घाटन करताना म्हटले आहे. महागाईच्या संदर्भातील त्यांचे निरीक्षण, परिक्षण, परिरक्षण आणि त्यांनी निर्माण केलेला अर्थ किती गंभीर आहे. सभापती महोदय, त्यांनी असे म्हटले की, वाढत्या तापमानामुळे पुढील 15 वर्षात जागतिक शेती उत्पादनात सुमारे 20 ते 40 टक्के घट होणार आहे. महागाई 15 वर्षे चालणार हे त्यांनी सांगितले.

जागतिक तापमान वाढत आहे. त्यावर मात करण्यासाठी उच्च तापमानात टिकाव धरणारी सुधारित बी-बियाणे तयार करावी लागतील. त्यादृष्टीने या परिषदेत विचार करावा असे सुचविताना कृषि खात्याचा मुलभूत आधार बी-बियाणे असल्यामुळे अशा प्रकारच्या बियाण्यांचे संशोधन करावे असा सल्ला त्यांनी दिला. 15 वर्षे काही खरे नाही. संशोधन करायचे म्हणजे ते दोन तासात, दोन दिवसात होत नाही.

नंतर 2झेड.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

तर ती बियाणे मिळाली की या तापमानात ते टिकेल, त्यानंतर ते शेतात पिकेल आणि शेतातून घरी, घरातून बाजारात येईल व बाजारातून गोर-गरिबांच्या घरात येईल, हा जो प्रकार आहे तो म्हणजे "आत्याबाईच्या मिशा" असाच आहे.....अडथळा.....आदरणीय कृषी मंत्रीच दिल्लीत बोलत आहेत, मी बोलत नाही.

श्री. हेमंत टकले : महोदय, माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरदरावजी पवार बोलले त्यात ऑब्जेक्शनेबल काय आहे ? सध्याची जी परिस्थिती आहे ती त्यांनी लोकांसमोर मांडली. तसेच शेतीच्या बाबतीत संशोधन व्हायला पाहिजे असे त्यांनी सांगितले असता त्यात काय चूक आहे ?

श्री. दिवाकर रावते : मी कधीच म्हटले नाही की, यामध्ये चूक आहे. मी मतिमंद आहे हे आपल्याला फार लवकर समजले. पण माझ्या पोटात घास कसा जाईल ही आज गरिबाची चिंता आहे. पण माननीय शरदराव पवार म्हणतात की, आजच्या तापमानात टीकाव धरेल अशी बियाणे शोधली पाहिजे, त्यावर संशोधन होईल, मग शेतकरी ती बियाणे लावतील, त्यातून शेती येईल, शेतातून बाजारात आणि बाजारातून माझ्या दरवाजात येईल हा विषय मी मांडला आणि त्याला "आत्याबाईच्या मिशा" असे म्हटले तर माझे काय चुकले आहे ?

श्री. हेमंत टकले : महोदय, सन्माननीय सदस्य जे विधान करीत आहेत ते तर्कसंगत नाही.

श्री. दिवाकर रावते : महोदय, मी शेतीबद्दलच बोलत आहे, सोन्या-चांदीबद्दल बोलत नाही किंवा मोटर गाडीबद्दलही बोलत नाही. शेती पिकत नाही तोपर्यंत माझ्या पोटाला अन्न मिळणार नाही, एवढेच मी म्हटले आहे, बाकी काहीच बोलत नाही. हे सरकार व्यापाऱ्यांचे बटिक आहे म्हणून ही महागाई वाढली आहे. माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी 11 कलमी कार्यक्रमावर आधारुन जे वक्तव्य केले ते सर्व जनतेकरिता आहे, यात चुकले असे मी म्हणणार नाही. केंद्राने सांगितले की, हजारो टन माल केंद्राने दिला पण त्याला घ्यायला राज्य आलीच नाहीत, हे सुध्दा मी बोलत नाही. हा दोष कुणाचा तर काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीची सरकारे असणाऱ्या राज्यांनी हे धान्य उचलले नाही, हे देखील मा. कृषी मंत्री शरद पवार साहेबच बोलले, मी बोलत नाही. तुम्ही धान्य उचलले की नाही हे सभागृहाला सांगायचे आहे. काँग्रेस-राष्ट्रवादी सरकारे असणाऱ्या राज्यांनी धान्य उचलले नाही तर हा दोष केंद्रीय नेतृत्व क्षमतेचा आहे. केंद्राने

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

याबाबत जाब विचारायला पाहिजे होता की, राज्यात महागाई वाढत आहे आणि आपण धान्य का घेऊन जात नाही ? तसे नसेल तर मार्केटमध्ये मोठ्या प्रमाणावर धान्य आणून किमती खाली न आणण्याचा प्रकार जाणीवपूर्वक केला जात आहे अशी परिस्थिती निर्माण झाली असेल तर व्यापाऱ्यांच्या भल्याकरिता कदाचित त्या त्या सरकारांनी धान्य उचलले नसेल. आताच सांगितल्यानुसार गोडावून मध्ये धान्य असूनही राज्य सरकारे उचलत नाहीत आणि इकडे मात्र जनता महागाईने होरपळत आहे याचे उत्तर मंत्री महोदयांनी स्पष्टीकरणासहित दिले पाहिजे. अन्नधान्याची आवक कमी झाली त्यामुळे होलसेल मार्केटचे भाव कडाडणार होते पण ते सहन करावे लागले. पण रिटेलवाल्यांवर मात्र कोणाचेच नियंत्रण नाही. वाशी येथील मार्केटमध्ये 60 रुपये किलोने मिळणारी तूर डाळ रिटेल मार्केटमध्ये मात्र 100 रुपये किलोने मिळते. आपण मघाशी म्हणालात जेथे आपली सत्ता आली त्या नवी मुंबईतच हे मार्केट आहे. तरी देखील सरकारचे नियंत्रण का नाही ? कोण अडविणार त्या महागाईला ? त्यांच्यावर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा अस्तित्वात नाही हे सत्य आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

सभापती महोदय, नाशिकच्या शेतक-यांनी टोमॅटोला भाव मिळाला नाही म्हणून त्यांनी त्यांचा टोमॅटो रस्त्याच्या कडेला फेकून दिला, कांद्याला भाव मिळाला नाही म्हणून त्यांनी कांदे रस्त्याच्या कडेला फेकून दिले. नाशिकमध्ये शेतक-यांच्या शेतमालाला भाव कमी मिळत असतांना मुंबई-पुण्यातील लोकांना कमी दराने टोमॅटो किंवा कांदे मिळालेले नाही तर चढया भावानेच हा माल खरेदी करावा लागला होता. तिकडे माल स्वस्त झालेला असतांना सुध्दा मुंबई-पुण्यातील लोकांना मात्र अफाट किमततीने कांदे-टमाटे विकत घ्यावे लागले होते. त्या काळात दलालानी मालाचा साठा करुन ठेवल्यामुळे शहरातील जनतेला चढया भावाने टोमॅटो आणि कांदे विकत घ्यावे लागले. यामध्ये मात्र शेतकरी भिकारी झाला आणि व्यापारी गब्बर झाले. हे सरकार शेतक-यांचे नसून व्यापा-याचे आहे असे म्हटले तर ते चूक होणार नाही. एका बाजूला शेतकरी माल फेकून देत असतांना मात्र आम्हाला चढया दराने त्या वस्तू विकत घ्याव्या लागल्या ही वस्तुस्थिती आहे.

डॉ. वसंत पवार :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी सांगितले की, नाशिकमधील शेतक-यांनी टोमॅटो, कांदे रस्त्याच्या कडेला फेकून दिले परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो की, शेतक-यांनी कांदे, टमाटेच नाही तर मेथी आणि इतर भाजीपाला सुध्दा रस्त्याच्या कडेला फेकून दिला होता. शेतमाल मार्केटमध्ये ट्रक्टरने आणला जातो परंतु शेतक-यांच्या मालाला भाव नसल्यामुळे शेतापासून मार्केटपर्यंत आणण्यासाठी ट्रॅक्टरला जे भाडे द्यावे लागत होते ते भाडे सुध्दा माल विकून येत नसल्यामुळे शेतक-यांना आपला माल रस्त्याच्या कडेला फेकून द्यावा लागला होता. भाव नसल्यामुळे शेतक-यांना आपला माल रस्त्याच्या कडेला फेकून द्यावा लागला होता एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. परंतु शेतक-याला मालाला भाव मिळावा यासाठी माननीय पवार साहेब सोडून इतर कोणीही प्रयत्न केले नव्हते हे आपण विसरु नका.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझ्या म्हणण्याला सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार यांनी दुजोरा दिल्यामुळे मी त्यांना धन्यवाद देतो. मी असे म्हणालो नाही की, पवार साहेबांनी महागाई वाढवली. मी हे म्हणालो होतो की, हे सरकार शेतक-यांच्या हिताचे नसून व्यापा-यांच्या हिताचे आहे. हे सरकार व्यापा-यांचे आहे, शेतक-यांचे नाही. परंतु माझ्या हातात ज्या वर्तमानपत्राचे कात्रण आहे त्यामध्ये "महागाईला शरद पवार साहेबच दोषी आहेत" असे म्हटलेले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

आहे. माननीय शरद पवार साहेब महागाईला दोषी आहेत असे मी म्हणालो नाही. खरे म्हणजे उंदराला मांजर साक्षी असा हा प्रकार आहे. आता मात्र मी माननीय श्री. शरद पवारांचे नाव घेऊन बोलतो. केंद्राचे कृषी मंत्री यांनी साखर वाढण्याची शक्यता आहे असे म्हटल्या बरोबर साखरेचे दर वाढले, तूर डाळ महाग होण्याची शक्यता आहे असे म्हटल्या बरोबर तुरीच्या डाळीच्या किंमतीत वाढ झाली, दुधाचे दर वाढण्याची शक्यता आहे असे म्हटल्याबरोबर दुधाचे दर वाढले. बोलाफुलाची गाठ पडली असे म्हटले तर ते वावगे होणार नाही.

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, माननीय केंद्रीय मंत्री श्री. शरद पवार साहेबांनी ऊसाचे उत्पादन कमी असल्यामुळे साखरेचे भाव वाढतील, दूधाचे उत्पन्न कमी आहे म्हणून दुधाचे भाव वाढतील, तूर डाळीचे उत्पन्न कमी आहे त्यामुळे भाव वाढतील असे म्हटले होते परंतु खरे म्हणजे मार्केटमध्ये जी वस्तू कमी प्रमाणात उपलब्ध होते तेव्हा त्या वस्तूचे भाव वाढत असतात त्यामुळे या वस्तूचे उत्पादन शेतक-यांनी जास्त प्रमाणात करावे व भाव स्थिर रहावेत यासाठीच त्यांनी विचार मांडले होते. शेतक-यांच्या मालाला भाव वाढवून शेतक-याला दोन पैसे कसे मिळतील यासाठी माननीय पवार साहेबांनी प्रयत्न केले आणि त्याप्रमाणे शेतक-यांना दोन पैसे वाढवून मिळालेले आहेत. माननीय शरद पवार साहेबांनी विचार मांडले म्हणून महागाई वाढली असे म्हणणे चूकीचे आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, "कावळा बसायला आणि फांदी मोडायला एक वेळ झाली". मी माननीय शरद पवार साहेबांविषयी काही एक म्हणत नाही त्यामुळे सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार यांनी जास्त मनावर घेऊ नये.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

मी लहानपणी पंजाबीपिसी गहू खात होतो. पण तो आता मला मुंबईत दिसत नाही. तो आता फक्त अंबानी, टाटा यांच्या घरी असू शकतो. सामान्यांच्या घरी कुठला गहू असू शकतो. इथला गहू एक्सपोर्ट कसा केला. ऑस्ट्रेलियातील सडका गहू येथे आणून तो गोरगरीबांच्या घशात कसा घातला हे डॉ.दीपक सावंत यांनी काल येथे प्रत्यक्षात दाखविले. याला जबाबदार कोण. होय, याला जबाबदार देशाचे कृषी मंत्री श्री.शरद पवार हे आहेत. एक्सपोर्ट पॉलिसीमुळे फसलेला, मातीतील सडका गहू त्यांनी खायला लावलेला आहे. हे उघड सत्य आहे. साखरेचे भाव का वाढले? कुठे गेली साखर? श्री.राजू शेट्टी यांनी याचा पूर्ण पर्दाफाश केला आहे. 1300 रूपयाने साखर एक्सपोर्ट केली आणि तीच साखर तीन महिन्यांनी 1900 कोटी रूपयाने आणली. रुमालाखाली जे व्यवहार होतात ते आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत झालेले आहेत. आपण नाकारू शकता. पक्षाला फंड मिळत असेल. आपण नाकारा. मी वस्तुस्थिती सांगत आहे.

ॲड्. उषा दराडे : सभापती महोदय, पक्षाला फंड मिळतो हे वाक्य आपण रेकॉर्डवरून काढून टाकावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे वाक्य काढून टाकावे. फंड कोणाला मिळतो हे मला माहित नसल्यामुळे मी चांगले नाव घेतले होते. शेवटी पक्ष वाढवायचा असतो. राज्याने महागाईला आळा घालावा अशा प्रकारचे आवाहन माननीय पंतप्रधान साहेबांनी केले आहे. शेवटी मी काय सांगणार. गाडी पासून ते चपलेपर्यंत, कपड्यापासून ते अंडरवेअरपर्यंत यातील कुठलीही गोष्ट अशी नाही की जी महागाईपासून सुटली नाही. खरे सांगतो घराच्या बाहेर पडलो तर खिशातील किती पैसे संध्याकाळपर्यंत शिल्लक राहतील हे कोणालाही सांगता येणार नाही. एवढी महागाई भडकली आहे. म्हणून जाताना एवढेच सांगतो की, आपण स्वतंत्र झाल्यानंतर वस्तूंच्या किंमती सतत वाढत आहे. किंमती वाढल्यामुळे कोणत्याही मंत्र्याला कधी राजीनामा द्यावा लागला नाही. 2010 मध्ये वाढत्या किंमतीची चिंता पवार साहेबांनी कशासाठी करायची. आमचे एवढे मित्र चिंतेत आहे असे त्यांना वाटत नाही. आपल्या खात्यात कोणीही बदल करू शकत नाही, हे अभिमानाने सांगू शकतात. त्यांना पदाची काळजी नाही. काळजी कुणी करायची असेल तर ती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सामान्य जनतेने करावी. कारण त्यांनाच जगण्यासाठी संघर्ष करावा लागतो. वर्षभरात साखरेच्या किमती जेव्हा दुपटीने वाढतील तेव्हा सामान्य माणसाचाच चहा कडू होणार आहे. ही कडू साखरेची कहाणी भाववाढीमुळे होत आहे. मी जाता जाता माननीय मंत्रीमहोदयांना एवढेच विचारणार आहे की, शेतकऱ्यांकडून घेतलेले धान्य ग्राहकांपर्यंत पोहोचेपर्यंत 3 ते 4 टप्प्यामध्ये त्याची किंमत वाढते. हे टप्पे वगळून ग्राहकापर्यंत माल पोचविण्याची व्यवस्था निर्माण करता येईल काय ? म्हणजे किमान 100 रूपयाचा माल 120 रूपयापर्यंत जाईल. तो 200 रूपयापर्यंत जाणार नाही. पिकतय पण खपत नाही अशी शेतकऱ्यांची स्थिती झाली आहे. शेतकरी पिकवत आहे, गोदामे भरलेली आहेत. त्या गोदामावर छापे घालून गोदामावर असलेले निर्बंध ते पाळतात की नाही हे बघून शेतकऱ्यांचा माल आणि ग्राहकांची मागणी याचा मेळ आपण बसवू शकणार काय ? धान्याचे व्यवस्थापन, वाटपाचे व्यवस्थापन आपण नीट पद्धतीने करणार काय, वेळच्या वेळी करणार काय ? की आपण साठेबाजांना सांभाळणार हा विषय मी आपल्यापुढे मांडतो. कडू साखरेची ही कहाणी आपल्या दृष्टीने गोड आहे. श्री.शरद पवार साहेबांचे खाते बदलल्याशिवाय महागाई कमी होणार नाही, असे अनेक केंद्रीय मंत्र्यांनी जाहीररित्या वक्तव्य केल्यामुळे हा भाववाढीचा राक्षस केंद्रातून राज्यामध्ये आलेला आहे. आपण काय करतात, केंद्र काय करते याचे कुणालाही काही देणे घेणे नाही. लोकांना महागाईच्या ससेहोलपाटीपासून थांबविणार आहात की नाही ? हे मात्र सांगता येत नाही. काल डिझेल पेट्रोलची भाव वाढ झाली. अख्या देशामध्ये त्याची चर्चा झाली. मंत्रिमंडळापासून सर्वांनी बोंब मारली. परंतु, माननीय पंतप्रधानांनी ठाम सांगितले की, कोणत्याही परिस्थितीमध्ये ही भाववाढ कमी करता येणार नाही. तीन तीन वेळा भाव वाढ झाली आहे. अशी परिस्थिती आज राज्यात निर्माण झाली आहे. भावावाढीचे समर्थन सत्तारूढ पक्षातील सदस्य देखील करू शकणार नाही याची मला खात्री असल्याने या भाववाढीला आळा घातला नाही तर तो प्रक्षोभ निर्माण होईल. आपण तीन वेळा निवडून आला असला तरी त्या प्रक्षोभाच्या जाळ्यामध्ये संपुष्टात आल्या शिवाय राहणार नाही अशी नांदी देऊन मी येथेच थांबतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

.....

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये महागाईच्या संदर्भात जो प्रस्ताव मांडलेला आहे त्या प्रस्तावावरील चर्चेत सहभागी होण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महागाई वाढलेली आहे ही वस्तुस्थिती आहे. परंतु महागाईची कारणमिंमासा या ठिकाणी करण्यात आली आणि कारण नसतांना केन्द्रीय कृषी मंत्री माननीय श्री.शरद पवारसाहेबांना लक्ष्य करण्यात येत आहे ही बाब अयोग्य आहे. उत्पादन खर्चावर आधारित शेती मालाला भाव मिळावा अशी सर्व शेतक-यांची मागणी आहे आणि सर्वच लोकप्रतिनिधीनी ही मागणी उचलून धरली आहे. त्यासाठी आंदोलन देखील केले होते. आपल्याला माहीत आहे की नाशिक जिल्हयातून मोठया प्रमाणावर कांद्याचे उत्पादन होत असते.आशिया खंडातील सर्वात मोठी बाजारपेठ निफाड तालुक्यातील लासलगाव येथे आहे. कांद्यांच्या उत्पादनाबाबत सांगावयाचे म्हणजे तीन चार वर्षानी एक सायकल निर्माण होत असते. दुष्काळ पडल्यानंतर कांद्याचे उत्पादन कमी होते व त्यामुळे मार्केटमध्ये कांदा कमी येतो. त्यामुळे कांद्याला जास्त भाव मिळतो.कांद्यांला जास्त भाव मिळाल्यामुळे दिल्लीच्या सरकारच्या डोळयात पाणी आले होते आणि त्यांना देखील पायउतार व्हावे लागले होते हे आपल्याला माहीत आहेच. ज्यावेळी मोठया प्रमाणावर कांद्याचे उत्पादन होत असते त्यावेळी कांदा उत्पादन करण्यासाठी जो काही खर्च येतो तेवढा खर्च देखील शेतक-याला मिळत नाही. त्यामुळे कांदा शेतक-याला रस्त्यावर फेकून द्यावा लागतो त्यावेळी शेतक-याला मदत करण्यासाठी कोणी पुढे येत नाही.

सभापती महोदय, या निमित्ताने मला सांगावेसे वाटते की, माननीय श्री. शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र सरकारने दोन वेळा कांद्याला सपोर्ट प्राईस म्हणून मार्केट हस्तक्षेप योजना राबविली होती आणि त्यांनी शेतक-यांना न्याय दिला. कांद्याच्या उत्पादनावर कांद्याचे भाव अवलंबून असतात. ज्यावेळी कांद्याचे उत्पादन मोठया प्रमाणावर होत असते त्यावेळी कांद्याच्या किंमती कमी असतात. सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी भाषण करीत असतांना साखरेचा उल्लेख केला होता. मी त्यांना सांगू इच्छितो की, साखरेच्या बाबतीत जागतिक पातळीवर कमतरता निर्माण झाली आहे. भारतामध्ये 220 लाख मे.टन साखरेचे उत्पादन करावयाचे होते.परंतु तेवढया साखरेचे उत्पादन होऊ शकले नाही व 170 लाख मे.टनापर्यंत साखरेचे उत्पादन खाली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार..

आले होते.त्यामुळे साखरेची मागणी वाढली होती. ब्राझिलमध्ये देखील हीच परिस्थिती आहे.डॉलरचा दर जर आपण पाहिला तर आपल्याला असे दिसून येईल की, आंतरराष्ट्रीय बाजारात 550 डॉलर्स पर्यंत साखरेचा भाव गेला होता.भारतामध्ये कोणी तरी काही तरी केले म्हणून साखरेची कडू कहाणी सुरु झाली असे म्हणणे योग्य नाही. श्री.शरद पवार यांच्यामुळे साखरेचा उद्योग चांगल्या प्रकारे चालला आहे. अनेक कारखान्यांना पॅकेज दिले गेले आहे त्याचबरोबर नाबार्डच्या मार्फत मदत दिली गेली आहे त्यामुळे ऊस उत्पादन करणारा शेतकरी सुखावला आहे हे लक्षात घेणे गरजेचे आहे असे मला सांगावेसे वाटते. आज मार्केटमध्ये साखरेचे दर वाढलेले असल्यामुळे शेतक-यांना दोन हजार रुपये प्रती टन या दराने ऊसाला भाव मिळू लागला आहे.ही बाब आपण विसरतो आणि साखरेची किंमत वाढली एवढेच सांगितले जाते. साखर एक्सपोर्ट करण्यात आली असे देखील सांगण्यात आले आहे. ज्यावेळी साखरेचे जास्त उत्पादन झाले होते त्यावेळी आपण जरुर साखर एक्सपोर्ट केली होती. ज्यावेळी गव्हाचे उत्पादन कमी झाले होते त्यावेळी गहू इम्पोर्टसुध्दा करण्यात आला होता. उत्पादन कमी होते की जास्त होते आणि आपली मागणी किती आहे यावर ही बाब अवलंबून आहे.

नंतर श्रीसरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार...

आणि मला याठिकाणी सांगावे लागेल की, आज या देशात दोन वर्षे पुरेल एवढे अन्नधान्य गोडाऊनमध्ये साठवून ठेवले आहे. अशा परिस्थितीत शेतीचे उत्पादन कमी झाले तरी आपल्याला भाववाढीवर नियंत्रण करता येईल. निसर्गाच्या लहरीपणामुळे दुष्काळ पडला, अतिवृष्टी झाली तरी या दोन्हींच्या बाबतीत आपल्याला भाववाढीवर नियंत्रण करता येईल. त्यामुळे याठिकाणी केंद्रीय कृषीमंत्री माननीय श्री. पवार साहेबांनी गव्हाची आधारभूत किंमत 1170 रुपयांपर्यंत नेण्याचा प्रयत्न केला, जी यापूर्वी 490 रुपये होती. त्यामधून शेतकऱ्याला गव्हाचे पैसे मिळणार आहेत. ते पैसे मिळाल्यानंतर त्यामधून तो शेतीवरील उत्पादन खर्च भागवितो. त्यामधून जास्तीत जास्त गहू उत्पादित करण्यासाठी त्याला प्रेरणा मिळते. पंजाब व हरयाणा याठिकाणी माननीय श्री. पवार साहेबांच्या धोरणाचे स्वागत झाले. कारण त्या राज्यातील शेतकरी या निर्णयामुळे सुखावला. त्याच्या घरामध्ये जास्तीचे दोन पैसे आल्यानंतर तो बाजारामध्ये खर्च करु लागला. अशाप्रकारे त्याठिकाणी सर्क्युलेशन ऑफ मनी होऊ लागले.

सभापती महोदय, नोकरदार वर्गाला प्रथम तिसरा आयोग लागू झाला, त्यानंतर चौथा आयोग लागू झाला, त्यानंतर पाचवा आणि आता सहावा आयोग लागू झाला. त्यामुळे त्यांच्यामध्ये क्रयशक्ती वाढली. या सर्व गोष्टी मंदीची लाट थोपविण्यासाठी कामी आल्या. माननीय श्री. पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेण्यात आला . त्यामध्ये कापसाला किंवा कांद्याला भाव देण्याचा सरकारचा निर्णय असला तरी त्यामध्ये शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय माननीय श्री. पवार साहेबांनी घेतल्यामुळे त्या शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. सभापती महोदय, दूधाचे उत्पादन कमी झाले. त्यामुळे मार्केटमध्ये दूधाचे दर वाढले. परंतु ज्यावेळी दूधाचे उत्पादन जास्त होईल त्यावेळी वाढलेली किंमत कमी होईल. आणि म्हणून ज्यावेळी गाई व म्हशीच्या दूधाचे दर मार्केटमध्ये वाढले त्यावेळी दूधाचा व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना सुध्दा जास्तीचे दोन पैसे मिळाल्याशिवाय तो धंदा करणार नाही. म्हणून याठिकाणी मुबलक उत्पादन निर्माण करणारे तत्व महत्वाचे आहे. प्रत्येक गोष्टीमध्ये जास्तीत जास्त उत्पादन करण्याची ताकद आपल्यामध्ये आली पाहिजे. ती आली तर महागाईवर निश्चितपणे आपल्याला नियंत्रण आणता येईल. आंतरराष्ट्रीय मार्केटमध्ये पेट्रोलचे दर खाली-वर होत असतात हे लक्षात घेणे आवश्यक आहे. जगातील महागाईचा ट्रेंड आहे, त्याचा परिणाम भारतात होतो.आणि म्हणून कारण नसतांना वाढत्या महागाईबाबत माननीय श्री. पवार साहेबांना दोषी धरु नये. त्यांनी शेतकरी व गोरगरीबांच्या हिताचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ SBT/

डॉ. वसंत पवार...

निर्णय घेतला. आणि म्हणून महागाईवर नियंत्रण करण्यासाठी एकच महत्वाची सूचना करतो की, काळाबाजार, साठेबाजी करणाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे सरकारला शक्य आहे. त्यासाठी सरकारने कडक पावले उचलावीत. आपली स्वस्त धान्य दुकाने आहेंत, त्या दुकानात यलो कार्ड होल्डरला महागाईचा चटका बसलेला नाही हे आपण लक्षात घेतले पाहिजे. स्वस्त धान्य दुकानातील वस्तूंमध्ये एक रुपयांची सुध्दा वाढ झालेली नाही. सरकारने त्या वस्तूंची किंमत वाढविली नाही. आणि म्हणून अबाऊ यलो कार्ड होल्डरची चर्चा करण्याची गरज नाही. गोरगरीब जनतेच्या पाठीशी उभे राहणे या सरकारचे कर्तव्य आहे. आणि म्हणून हे सरकार ती जबाबदारी चांगल्या प्रकारे पार पाडीत आहे. या महागाईच्या मुद्याबाबत खासकरुन माननीय श्री. पवार साहेबांना धन्यवाद देतो.

या ठरावामध्ये अनेक वस्तूंची झालेली दरवाढ, वीजेची दरवाढ, कर्जाच्या व्याजामध्ये झालेली वाढ असे अनेक विषय नमूद केले आहेत. आज पेट्रोलचे भाव वाढल्यामुळे एस.टी. च्या भाडयामध्ये वाढ झाली आहे.हे आपल्याला माहीत आहे. त्यावर आपण राजकीय उद्देशाने टिका केली, राजकीय किंतु ठेवून बोलले तर त्यामध्ये आपल्याला यश येणार नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार . . ..

मी असे सांगू इच्छितो की, आपण सार्वजनिक वितरण व्यवस्था चांगली ठेवावी. बोगस शिधापत्रिकांवर नियंत्रण ठेवले तर निश्चितपणे भाववाढ कमी करण्यामध्ये शासनाला यश मिळेल आणि तशा प्रकारचे शासनाला यश मिळत आहे याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

. . . .3 ई-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि अन्य सहकाऱ्यांनी नियम 260 अन्वये महागाईच्या संदर्भात जो प्रस्ताव मांडलेला आहे, त्या प्रस्तावावर मी माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, याठिकाणी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे, तो गंभीर आहे. या प्रश्नाची व्यापकता मोठी आहे. राज्यामध्ये महागाई आहे ही वस्तुस्थिती नाकारता येण्यासारखी नाही आणि महागाईची झळ, त्याचे चटके सर्वांनाच सोसावे लागत आहेत ही देखील वस्तुस्थिती आहे हे मी अमान्य करीत नाही. आपण येथे महागाईच्या बाबतीत चर्चा करीत आहोत, त्याचे विश्लेषण करीत आहोत. आपण गेल्या एक-दीड वर्षाचा विचार केला तर संपूर्ण देशामध्ये अतिवृष्टी झाली आहे तर काही ठिकाणी अवर्षणाची परिस्थिती, काही ठिकाणी दुष्काळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे. तसेच देशाच्या कित्येक भागामध्ये मोठया प्रमाणात पाऊस तर काही भागामध्ये दुष्काळाची स्थिती झालेली आहे. पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश किंवा बिहार आणि अगदी महाराष्ट्र राज्यामध्ये सुध्दा गेल्या दोन वर्षातील पावसाचा सिझन पाहिला तर काही भागात अतिवृष्टी झालेली आहे तर काही भागामध्ये दुष्काळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे. तेव्हा जर देशातील काही भागामध्ये दुष्काळाची परिस्थिती असेल आणि त्यामुळे अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ झाली नसेल, परंतु दुसरीकडे मागणी वाढत असेल तर स्वाभाविकपणे भाववाढ होणार आहे हे सांगण्यासाठी कोण्या ज्योतिषाकडे जाण्याची गरज नाही. माझे मित्र सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सांवत यांनी दुधाच्या बाबतीत उल्लेख केला. 1972-73 मध्ये स्व.वसंतराव नाईक माननीय मुख्यमंत्री होते. त्यावेळी मुंबईमधील लोकांना स्वस्त दरामध्ये दूध मिळाले पाहिजे म्हणून दररोज आंदोलने होत होती. मात्र एकीकडे येथे आंदोलने करावयाची, शेतकऱ्यांना जास्त भाव दिला तर शहरातील लोकांवर अन्याय होतो असे म्हणावयाचे आणि दुसरीकडे गावामध्ये जाऊन सांगावयाचे की, दूध उत्पादक शेतकऱ्यांना जास्त पैसे मिळाले पाहिजेत. परंतु मी या विषयाच्या खोलामध्ये जाऊ इच्छित नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी माननीय कृषी मंत्री श्री.शरद पवारसाहेब यांच्यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला आहे. ते या देशाचे कृषी मंत्री आहेत आणि कृषी विभाग किंमती ठरवत नाही.ते माननीय कृषी मंत्र्यांचे काम नाही.प्राईज स्ट्रक्चर कसे असले पाहिजे,इंडेक्स कसा कमी-जास्त होतो हे पहाण्याचे काम त्यांचे नाही,तर कृषी मंत्र्यांचे काम असे

. . . .3 ई-3

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे की, या देशातील कृषी उत्पादन वाढले पाहिजे, त्यादृष्टीने तयारी केली पाहिजे आणि ते काम माननीय कृषी मंत्री श्री.शरद पवारसाहेब यांनी प्रामाणिकपणे केलेले आहे काय ? तर त्याचे उत्तर असे आहे की, एन.डी.ए.चे सरकार असताना . . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपण आपल्या नेत्याची नेहमी भलावण करतो हे मान्य आहे. माननीय श्री.शरद पवार हे या देशाचे केवळ कृषी मंत्री आहेत असे नाही तर त्यांच्याकडे अन्न व नागरी पुरवठा विभाग देखील आहे. म्हणून केंद्रामध्ये सुध्दा त्यांना दरवाढीबाबत जबाबदार धरण्याच्या बाबतीत बोंबाबोंब करण्यात आली आणि त्यांच्याकडील खाते काढून घेण्याच्या बाबतीत मागणी करण्यात आली होती. या देशामध्ये साडेतीन कोटी बोगस रेशन कार्ड आहेत आणि ही घोषणा माननीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी केली आहे. या देशात साडेतीन कोटी बोगस रेशन कार्ड आहेत अशी घोषणा माननीय श्री.शरद पवार यांनी केली. परंतु त्यांनी अशी घोषणा का केली ? कृषी मंत्री म्हणून त्यांचा काही संबंध आहे काय ?

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

त्यांच्याकडे ते खाते आहे. महागाईशी त्यांचा संबंध आहे. कृषी मंत्री म्हणून संबंध नसला तरी अन्न व नागरी पुरवठा विभागाचे मंत्री म्हणून त्यांचा संबध आहे.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या ठिकाणी जी भूमिका मांडली ती त्यांच्या दृष्टीने बरोबर असेल परंतु त्याबाबत उत्तर देणे आवश्यक आहे. अन्न व नागरी पुरवठा मंत्री म्हणून यासंदर्भात त्यांची काही भूमिका असू शकेल परंतु मुळात कृषी मंत्री म्हणून श्री. शरद पवार यांच्यावर आक्षेप घेतले जातात. त्यांनी केंद्रीय कृषी मंत्री म्हणून आपली जबाबदारी अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडलेली आहे. सन 2004-05 ला केंद्रामध्ये आघाडी सरकार आले. त्याच्या अगोदर साडेचार वर्षे केंद्रामध्ये भारतीय जनता पक्ष प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार होते. त्यावेळी कृषी विभागासाठी जो पतपुरवठा केला जात होता तो पाहिला तर 2004 पर्यंत फक्त 78 हजार ते 80 हजार कोटी रुपये पतपुरवठा केला जात होता. त्यानंतर आतापर्यंत शेतकऱ्यांच्या पतपुरवठ्यामध्ये कशी वाढ करावयाची यासंदर्भात कृषी मंत्री म्हणून श्री. शरद पवार यांनी तसेच केंद्र शासनाने काम केले. कृषी क्षेत्राला मोठ्या प्रमाणावर चालना देण्याचे काम माननीय श्री. शरद पवार यांनी केले. त्याची नोंद इतिहासामध्ये झाल्याशिवाय राहणार नाही. सन 2004 मध्ये 78 हजार किंवा 80 हजार कोटी रुपयांची तरतूद होत होती पण 2009-2010 च्या अर्थसंकल्पामध्ये 325 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आणि आता सन 2010-2011 च्या अर्थसंकल्पामध्ये 375 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. म्हणजे व्यापक प्रमाणात पतपुरवठा करण्याचे काम माननीय श्री. शरद पवार यांनी केले आहे. आज आम्हाला काही प्रमाणात महागाईची झळ बसत असेल. ज्या धान्याला 450 रुपये प्रती टन किंमत दिली जात होती तो दर 1150 रुपये झाला. सन 2009-2010 मध्ये आणि 2010-2011 मध्ये शेतकऱ्यांना ज्या किमती मिळाल्या त्यामुळे पंजाब, हरियाणा आणि इतर अनेक राज्यांमध्ये शेतकऱ्यांना कोट्यवधी रुपये मिळालेले आहेत. त्यातून त्या भागामध्ये सधनता, संपन्नता आलेली आहे, हे विसरुन चालणार नाही. महागाई नाही असे मी म्हणत नाही परंतु महागाई कमी करण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात आहेत. शेवटी महागाई नियंत्रणामध्ये ठेवण्याची राज्य शासनाची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी .....

जबाबदारी जरुर आहे. विशेषत: आपली जी सार्वजनिक वितरण व्यवस्था आहे त्यामार्फत गरीब लोकांना, दारिद्र्यरेषेखालील लोकांना रेशनवर व्यवस्थितपणे धान्य पुरवठा होतो की नाही, कमी दरामध्ये त्यांना धान्य दिले जाते की नाही हे पाहिले पाहिजे आणि हे काम या वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून राज्य शासनाने केले पाहिजे. ते जर केले नसेल तर त्याची जबाबदारी संबंधित खात्यावर येते. म्हणून आपली सार्वजनिक वितरण व्यवस्था दुरुस्त केली पाहिजे. त्यामध्ये ज्या पळवाटा असतील त्या दूर केल्या पाहिजेत. आपण मागे सांगितले की, 22 लाख बोगस रेशन कार्डे आढळून आली. याचा अर्थ वितरण व्यवस्था कशा पध्दतीने काम करीत होती हे दिसून येते. महागाईचे चटके गरीब माणसाला सोसावे लागतात त्यामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्था सुदृढ करण्याचे काम केले तर राज्य शासनाच्या माध्यमातून महागाई आटोक्यात आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न करता येईल.

सभापती महोदय, मला या प्रस्तावावर यापेक्षा जास्त बोलावयाचे नाही. या प्रस्तावावर माझे मत मांडत असताना कोणत्या तरी मंत्र्यांचे किंवा जबाबदार व्यक्तीचे नाव सभागृहामध्ये घ्यावयाचे हे योग्य नाही. माननीय शरद पवार हे केवळ व्यक्ती किंवा एक मंत्री नसून ते महाराष्ट्राचे शक्तीस्थान आहेत. त्यांच्यावर आरोप केला जातो म्हणजे केवळ केंद्रीय मंत्री म्हणून आरोप करीत नाहीत तर महाराष्ट्राच्या शक्तीस्थळावर आरोप केला जातो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी...

म्हणून विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्याच्याशी मी सहमत न होता मी माझ्या भावना मांडल्या आहेत. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या प्रस्तावावर आणखी किती सन्माननीय सदस्य बोलणार आहेत ?

तालिका सभापती : माझ्याकडे या प्रस्तावावर बोलण्यासाठी 21 सन्माननीय सदस्यांची नावे आलेली आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा बोलण्याचा अधिकार आहे. परंतु बोलू इच्छिणा-या सन्माननीय सदस्यांनी सभागृहात बसले पाहिजे. विरोधी पक्षाची आणि सत्ताधारी पक्षाची विचारांची देवाणघेवाण असते. परंतु सभागृहात बसायचे नाही हे बरोबर नाही. सभापती महोदय, आपण नावे वाचून दाखवावीत. त्यापैकी जे सन्माननीय सदस्य उपस्थित नसतील त्यांची नावे वगळण्यात यावीत, यामध्ये विरोधी पक्षातील सदस्यांची नावे असतील तरी चालेल. सभागृहातील एकूण उपस्थिती पाहिली तर काँग्रेस पक्षाचा या चर्चेवर बहिष्कार आहे असे दिसते. त्यामुळे केवळ राष्ट्रवादी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांची भाषणे आम्हाला ऐकावी लागत आहेत. ब-याचदा आपण पाहतो की, सत्ताधारी आघाडीतील दोन्ही पक्षाचे सन्माननीय सदस्य ठाण मांडून बसलेले असतात. परंतु आज तशी परिस्थिती दिसत नाही. राष्ट्रवादी पक्षाचे सन्माननीय सदस्य बोगस रेशनकार्डासंबंधी बोलले, परंतु ते महागाईबाबत काही बोलत नाहीत. माझे एवढेच म्हणणे आहे की, बोलू इच्छिणा-या सन्माननीय सदस्यांनी सभागृहात उपस्थित राहिले पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी आणलेल्या नियम 260 च्या प्रस्तावाचे समर्थन करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, राज्यातील वाढत्या महागाईची जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता आहे. केंद्रात व राज्यात आघाडी सरकार आहे. या आघाडी सरकारचे मुख्यमंत्री आणि त्यांचे मंत्रिमंडळ, केंद्रातील आघाडी सरकारचे पंतप्रधान आणि त्यांचे मंत्रिमंडळ हे सर्वजण महागाईला जबाबदार आहेत असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील सावळा गोंधळ थांबविण्याची आवश्यकता आहे. हे कर्तव्यचुकार सरकार त्याबाबत काहीच करण्यास तयार नाही. पहाट झाल्यावर सूर्य उगवला की, सगळयांना चहाची आठवण होते. परंतु गरीब माणसांना चहा पिणे सुध्दा महाग झाले आहे. साखर महाग झाली आहे म्हणून गुळाचा चहा प्यावा म्हटले तर गूळ सुध्दा महाग झाला आहे. चहा पावडर महाग झाली असून प्रति किलो 200 ते 300 रुपये भाव झाला आहे. साखरेचा भाव 40 रुपयांच्यावर पोहोचला आहे. दूध 22 ते 24 रुपये लिटर या भावात मिळते. पाणी मोफत आहे, परंतु त्याला लागणारे इंधन महाग झाले आहे, गॅस महाग झाला आहे, रॉकेल महाग झाले आहे. चहाच्या अर्ध्या कपाची किंमत 5 रुपये झाली आहे. एवढी भयंकर महागाई पहाटेच नजरेला येते. बांधो दाम, वरना करेंगे नींद हराम, जनतेला महागाईच्या विरोधामध्ये रस्त्यावर यावे लागते. दिनांक 21 तारखेला दिल्ली येथे संसदेला घेराव घालण्याचा कार्यक्रम आयोजित केला आहे. भारतीय जनता पक्षाच्यावतीने महागाईच्या विरोधामध्ये मोठे आंदोलन होणार आहे. सामान्य जनतेची मागणी संसदेसमोर ठेवण्यासाठी हे आंदोलन होणार आहे. देशभरामध्ये हल्लाबोल, जेल भरो आंदोलन होणार आहे. शासनाच्या अकार्यक्षमतेमुळे महागाईला आळा बसत नाही हे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, मी गोंदिया जिल्हयाचे उदाहरण देईन. सध्या तेथे सामान्य माणूस भाजीपाला खाण्याचे टाळत आहे. कारण मेथीची जुडी 28 रुपये, वांगी 20 रुपये किलो झाली आहे. कांदा, सांभार महाग आहे. कोणतीही भाजी स्वस्त नाही. सामान्य माणूस हिरवी पालेभाजी खाऊ शकत नाही म्हणून कडधान्याकडे वळतो. परंतु कडधान्याचे भाव सुध्दा कडाडले आहेत.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. केशवराव मानकर...

मी आपणास सांगू इच्छितो की, व-हाडामध्ये तुरीचा भाव 30 रुपये किलो होता. शेतक-याची तूर 30 रुपये किलोने घेण्यात आल्यानंतर तिचा भाव 100 रुपयापर्यन्त गेला. आता शेतक-या जवळचा माल संपल्यानंतर आणि हा माल व्यापा-यांकडे गेल्यावर हा भाव 60 रुपयापासून पुढे वाढू लागला आहे. मूगडाळ किलोला 17 रु. होती ती 40 रु. झाली. उडीद डाळ 55 ते 60 किलो आहे, मसूर डाळ 55 ते 60 रु. किलो आहे, चणाडाळ 28 ते 30 रु. किलो आहे, वाटणा 20 ते 22 रु. किलो आहे, काबुली चणा 45 ते 50 रुपये किलो आहे. गहू 16 ते 20 रुपये किलो आहे. किराणा मालाच्या किंमती देखील कमी नाहीत. खसखस 450 रु. किलो आहे. मोहरी 40 रु. किलो, हळद 160 रु. किलो, तोंडाला आग लावणारी मिरची 100 रु. किलो आहे. इतकी प्रचंड भाव वाढ झालेली आहे. सर्वसामान्य माणसाला 50 ते 80 रुपये मजुरी मिळते. या सामान्य माणसाला जीवन जगणे कठीण झालेले आहे. सामान्य माणसाला निवा-याची गरज आहे. या निवा-याचा प्रश्न कसा सोडवायचा हा प्रश्न त्याच्या पुढे आहे. बँकेचे व्याजदर वाढल्याने कर्ज घेणे दुरापास्त झालेले आहे. मी एका संस्थेचा पदाधिकारी आहे. एका इमारतीच्या बांधकामासाठी मी सिमेंटच्या गोणी खरेदी केल्या 170 रुपयाची सिमेंटची गोण 250 रुपये झालेली आहे. केवळ तीन महिन्यामध्ये एका सिमेंटच्या गोणीमध्ये 70 रुपये भाववाढ झाली. लोखंडाचे भाव देखील दुप्पट झालेले आहेत. या महागाईमध्ये कसे जगायचे हे सामान्य माणसाला कळेनासे झालेले आहे. सहाव्या वेतन आयोगामुळे कर्मचा-यांनी कर्ज घेऊन घर घेण्याची स्वप्ने बाळगली. परंतु बँकाच्या वाढत्या व्याजदरामुळे ते स्वप्नही त्यांचे पुरे होऊ शकणार नाही. सर्वसामान्य माणसाला जीवन जगण्यामध्येच स्वारस्य राहिलेले नाही. डिझेल आणि पेट्रोलच्या दरामध्ये वाढ झाली, व्हॅट 25 टक्के लावला. सभापती महोदय, रॉकेल 11 रुपये लिटर आहे. परंतु 11 रुपये दराने फक्त 800 ते 850 मि.लि. रॉकेल मिळते. रॉकेल विक्रेता 11 रुपयाने रॉकेल देताना कंची मारतो. हेच रॉकेल काळयाबाजाराने 25 रुपये लिटरने विकले जाते. ट्रकवाले, रिक्षावाले, टॅक्सीवाले रॉकेल काळयाबाजाराने घेतात. रॉकेलच्या या काळ्याबाजारामुळे राज्याचे राजस्व बुडते आणि सबसिडी देखील वाया जाते. हा दोष सार्वजनिक वितरण प्रणालीचा आहे. हा दोष दूर केला तर महागाई कमी होण्यास निश्चितच मदत होईल. आमच्या जिल्ह्यामध्ये एसपीने घेतलेल्या कडक भूमिकेमुळे सर्वांना 11 रु. लिटरने रॉकेल

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर...

मिळते. अशा प्रकारची चोख वितरण प्रणाली सर्व राज्यामध्ये का राबविली जात नाही ? सभापती महोदय, आज राज्यामध्ये अन्नधान्याचा साठा करण्यासाठी गोदामे उपलब्ध होत नाहीत. परंतु दारुच्या बाटल्या ठेवण्यासाठी मात्र गोदामे उपलब्ध होतात, ही या राज्याची शोकांतिका आहे. अवेळी पावसामुळे करोडो रुपयाचे अन्नधान्याचे नुकसान झाले. पेट्रोल डिझेलचे दर वाढले मात्र वाहतुकीचे दर वाढवून देण्यास शासन तयार नाही. परिणामी अन्नधान्याचा साठा पडून आहे.

....नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म्हणून सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील दोषाच्या संदर्भात मला बोलायचे आहे.

सभापती महोदय, खरे म्हणजे महागाईला वायदे बाजार कारणीभूत आहे. तो वायदे बाजार केंद्र व राज्य सरकार बंद करणार का? हा खरा प्रश्न आहे. एखाद्या मालाचा व्यवहार होतो, तो माल जागेवरच पडून असतो. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी उदाहरण दिले आहे. नाशिक येथील माल नाशिकमध्येच असतो. पण त्या मालाची विक्री किती वेळा होते? मी एका मालाचा सौदा 1 हजाराला केला. तो माल दुसऱ्या व्यापाऱ्याला 1200, 1300, 1400, 1600, 1800, 2000, 2500 किंवा 3000 रुपयांपर्यंत विकला जातो. एका ठिकाणी फक्त वायदा होतो आणि मुनाफा घेण्याचे काम मुनाफेखोर करीत असतात. म्हणून वायदा बाजार थांबविला पाहिजे असे मला वाटते. यामुळे महागाईला आळा घालण्यात यश येऊ शकते. आज महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची फी वाढ किती करावी या संदर्भात शासनाचे कोणतेच धोरण नाही. सामान्य माणसाला जगण्यासाठी ज्या ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या सर्वच गोष्टी महागल्या आहेत. मी एसटी प्रवासाचे उदाहरण देतो. आम्हाला एसटी प्रवास करावा लागतो. तो किती महागला आहे हे मी सभागृहाला सांगू इच्छितो. या प्रवास दरामध्ये 7.5 टक्के वाढ झाली आहे. भंडाऱ्याहून नागपूरला एक्स्प्रेस गाडीने जाण्यासाठी पूर्वी 43 रुपये लागत होते, आता 46 रुपये मोजावे लागतात. निमआराम गाडीने जायचे झाल्यास पूर्वी 55 रुपये लागत होते, आता 63 रुपये मोजावे लागतात. हे दर 10 टक्के वाढले आहेत. जनता फेरीसाठी 3.30 रुपये ऐवजी 3.70 रुपये द्यावे लागतात. एका टप्प्यासाठी 3.90 ऐवजी 4.20 रुपये द्यावे लागतात. म्हणजे एसटी प्रवास महाग झाला आहे. रेल्वे प्रवास सुध्दा महागला आहे. सर्व महागच महाग आहे. स्वस्त काय आहे? कोणत्या वस्तू स्वस्त आहेत? सौंदर्य प्रसाधने, औषधे महागली आहेत. महागाईच्या काळात जनता होरपळून निघाली असून सामान्य माणसाला शेतकऱ्यांप्रमाणे आत्महत्या करण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. म्हणून या महागाईला आळा घालण्यासाठी शासनाने जी पावले उचलणे आवश्यक आहेत ती उचलावीत अशी विनंती करुन वेळेअभावी माझे भाषण थांबवितो. जय हिंद, जय भारत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) :सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि शिवसेना व भारतीय जनता पक्षाच्या सदस्यांनी नियम 260 अन्वये महागाईच्या विषयावर जो प्रस्ताव मांडला आहे त्या प्रस्तावावर माझ्या काही सूचना मांडण्यासाठी मी याठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, महागाईबद्दल जी परिस्थिती आहे त्याबाबतचे विश्लेषण अतिशय चांगल्या पध्दतीने अगोदरच्या वक्त्यांनी केलेले आहे. मला एका महत्वाच्या मुद्याकडे शासनाचे लक्ष वेधायचे आहे. नियोजन आयोगाने वारंवार सरकारला कळविले की, दारिद्र्य रेषेची व्याख्या बदलली पाहिजे. जून्या दारिद्र्य रेषेच्या व्याख्येनुसार रेशन कार्डवर अन्नधान्य दिले जाते अशा फार मोठ्या लोकसंख्येला आपण त्यांच्या मूलभूत अन्नाच्या अधिकारापासून वंचित ठेवतो याची जाणीव ठेवली पाहिजे. नियोजन आयोगाने दारिद्रय रेषेची व्याख्या बदलण्यात यावी असे सुचविले आहे. अल्पउत्पन्न गटातील माणसे, जी श्रीमंत नाहीत, उच्च मध्यमवर्गीय नाहीत, थोडी दारिद्रय रेषेच्या वर आलेली आहेत, अल्प मध्यम उत्पन्न गटात आहेत यांना जीवनावश्यक वस्तू देण्यासाठी म्हणून शासनाने पुन्हा एकदा ठोस पावले उचलण्याची गरज आहे याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छिते.

सभापती महोदय, मराठवाडयामध्ये दारिद्रय रेषेखालील 50 हजार बचत गट गेल्या 10 वर्षापासून काम करीत आहेत. या बचत गटांमध्ये त्यांनी केलेल्या कामांने सुधारणा झाली आहे हे स्वत: मराठवाड्याच्या विभागीय आयुक्तांनी सांगितले. त्यांच्याच कामामुळे 50 हजार बचत गट दारिद्रय रेषेवर यावयास लागले आहेत. ज्याक्षणी हे बचत गट वर जातात त्याक्षणी दारिद्रय रेषेच्या व्याख्येत बसत नाहीत. त्यानंतर सगळ्या योजनांपासून ते वंचित राहतात. म्हणून अप्पर पॉवर्टी लाईन गटांसाठी, अबोव्ह पॉवर्टी लाईन व्यक्तींसाठी नवीन योजना करणे अत्यंत आवश्यक आहे. एका बाजूला प्रचंड महागाई आणि दुसरीकडे जे लोक वयोवृध्द नाहीत, ज्यांना रोजगार हमी योजनेवर काम मिळते की नाही आपल्याला माहिती नाही.....

नंतर 3जे.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे.....

याची जाणीव सरकारने ठेवली नाही तर आपोआपच ही कुटुंबे शहराकडे स्थलांतरित होतील आणि शहरातील बेकारीत भर पडेल तसेच इतर सुविधांवर सुध्दा ताण पडणार, पर्यायाने शेतात काम करणारे मनुष्यबळ सुध्दा कमी पडणार म्हणून अत्यल्प उत्पन्न गटाकडे सरकारने लक्ष दिले पाहिजे. सेन्सेसमध्ये कदाचित ही व्याख्या बदलेल पण नियोजन आयोगाने तत्पूर्वी ती व्याख्या बदलली पाहिजे. कारण सेन्सेसच्या प्रक्रियेला 10 वर्षे लागतात तोपर्यंत थांबण्याचे कारण नाही म्हणून यासंबंधीचा धोरणात्मक निर्णय म्हणून सरकारने हे स्वीकारले पाहिजे.

महोदय, एकट्या आणि निराधार स्त्रियांचा विचार दारिद्र्यरेषेखालील निकषांमध्ये बदल करतांना विचार करणे आवश्यक आहे. आपण सुविद्य लोक आहोत. गेल्या 10 वर्षांत दारिद्र्याचे जागतिकीकरण या विषयावर प्रचंड उहापोह चालला आहे आणि अमर्त्य सेन सारख्या विचारवंतांने सांगितले की, गरिबी रेषेखाली जास्तीत जास्त विधवा, परित्यक्त्या किंवा ज्यांचे पती स्थलांतरित झालेले आहेत असे लोक आहेत. माननीय मंत्री महोदय श्री. अनिल देशमुख यांच्या ऑफिसमध्ये मध्यंतरी काही देवदासी महिलांनी आक्रमकपणे आंदोलन केले होते आणि त्यांच्या खुर्चीला निवेदन चिकटविण्याचा प्रयत्न केला. मी समजू शकते की, मंत्रीमहोदयांचा त्यांनी सन्मान ठेवला नाही. पण मार खाण्यासाठी, पोलिसांच्या लाठ्या खाण्यासाठी ते सुध्दा निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर देखील लोक एवढे जिवावर उदार का होतात याचा देखील अंतर्मुख होऊन विचार करण्याची वेळ आली आहे. निवडणुकीपूर्वी जर असे आंदोलन केले असते तर मी समजू शकते की विरोधी पक्षाने चिथावणी दिली असावी म्हणून या महिलांनी असे आंदोलन केले असावे पण निवडणुकीनंतरर देखील अशा प्रकारचे आंदोलन करुन आपल्या कार्यालयात घुसण्याचे धाडस करतात याचा विचार करणे आवश्यक आहे. ज्या देवदासी माहिला आहेत, ज्या निराधार आहेत, ज्यांचे वय 60 वर्षाच्या वर आहे त्यांना रेशन कार्डावरील धान्याचा कोटा वाढवून पाहिजे एवढीच त्यांची मागणी होती. दुसरे एक उदाहरण सांगणार की, मधल्या काळात लता देशमुख, अकोला यांनी तीन वर्षापूर्वी अकोला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर स्वत:ला जाळून घेतले होते, त्यावेळेस ती महिला 80 टक्के भाजली होती आणि काही दिवसातच तिचा मृत्यू झाला. या संपूर्ण निराधार महिला संघटनेची मागणी आहे की ज्या विधवा आहेत, ज्या परित्यक्त्या आहेत त्यांची कुठलीही व्यवस्था नाही, ज्यांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

वर्षानुवर्षे उद्योग मिळत नाही अशा स्त्रियांना रेशन कार्डावर धान्य वाढवून मिळावे. त्यांना दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या नवीन व्याख्येत बसविणार नसाल तर त्या आत्महत्त्या करतील अथवा अन्य कुठल्या तरी चुकीच्या गोष्टी करतील याची संवेदनशीलता सरकारने ठेवली पाहिजे. मानव विकास निर्देशांकानुसार राज्यात 88 लाख स्त्रीया एकट्या आणि निराधार आहेत. अशाच स्त्रिया जास्तीत जास्त रेशनच्या लाईनमध्ये पिशवी घेऊन एक-एक तास तिष्ठत उभ्या असतात त्यांना संरक्षण देणे आवश्यक आहे. मी असेही म्हणेन की अशा स्त्रियांची अपेक्षा फार मोठी नाही, जिल्हाधिकाऱ्यांकडे त्यांची यादी सुध्दा असते. त्यांची मागणी फक्त दोन किलो तांदूळ, पाच किलो गहू, अर्धा किलो साखर, अर्धा किलो तेल, डाळ अर्धा किलो एवढीच आहे, त्याचाही विचार होणे आवश्यक आहे.

यानंतर माझा मुद्दा फुड स्टॅम्पबाबतचा आहे. केंद्रशासनाने या अर्थसंकल्पात जाहीर केलेले आहे की, सध्याच्या परिस्थितीत रेशन दुकानदारांची जी मक्तेदारी चालली आहे की आमच्या दुकानातूनच इतर वस्तू सुध्दा घेतल्या पाहिजेत तरच तुम्हाला आम्ही देय असलेले रेशनचे धान्य देऊ. त्यातही तेल फक्त अर्धा किलो, रॉकेलचा निम्मा कोटा असतो. अशा परिस्थितीत ज्यांना रेशनचे सामान पाहिजे त्यांच्यावर इतर वस्तुंची सक्ती देखील करण्यात येते. अशा परिस्थितीत जर फूड स्टॅम्पची सोय केली आणि तो स्टॅम्प दाखवून कुठल्याही दुकानातून त्याला धान्य घेता आले पाहिजे. ही संकल्पना मुळात श्री. मिलींद मुरुडकर यांची असून माननीय श्री. उध्दवजी ठाकरे यांनी देखील ती मांडली आहे. त्याचा समावेश वचननाम्यातही आहे. वचननामा आमचा की त्यांचा हा प्रश्न नाही परंतु त्या माध्यमातून भ्रष्टाचार होणार नाही आणि स्पर्धेच्या युगात चांगल्या दुकानातून असे धान्य मिळाले तर गोरगरिबांना त्याचा लाभ मिळू शकेल.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे...

म्हणून यासारखा सुध्दा मोठा निर्णय करणे गरजेचे आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या संदर्भात मला सांगावेसे वाटते की, रेशनची अनेक दुकाने कायमस्वरुपी बंद असतात. मुंबईसारख्या शहरात सुध्दा काही ठिकाणी कुपोषण आहे व यासंदर्भात प्रचंड प्रमाणात हाकाटी झाली होती. विशेष करुन हिंदी माध्यमांनी यासंदर्भात विशेष माहिती दिली होती. या विषयाच्या संदर्भात आम्ही जेव्हा लक्षवेधी सूचना लावली तेव्हा असे लक्षात आले की, त्या परिसरातील अनेक रेशनची दुकाने बंदच होती. रेशनची दुकाने बंद असतील तर शेवटी लोक काय करतील ? रेशनची दुकाने बंद असल्यामुळे शेवटी त्या ठिकाणी कुपोषणच होईल. रेशनचे धान्य बाजारात जात असल्यामुळे त्या ठिकाणच्या गरीब लोकांना बाजारातून चढया भावाने धान्य खरेदी करणे शक्य होत नसल्यामुळे त्यांच्याकडे भीक मागण्याशिवाय दुसरा पर्यायच नसतो. त्यामुळे रेशन दुकानावरील वस्तू जनतेला मिळण्यासाठी रेशन दुकानांबाबत शासनाने चांगल्या प्रकारचे नियोजन करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आर्थिक पाहणी अहवालात महाराष्ट्रातील वयोवृध्दांची संख्या मोठया प्रमाणात वाढलेली आहे. लोकांची आयुमर्यादा वाढते ही चांगली गोष्ट आहे. घरातील 65 वयावरची माणसे घरातील लोकांना जड होतात. आपण आळंदी, पंढरपूर येथे गेलात तर आपल्याला दिसून येईल की, त्या ठिकाणी शेकडो वयोवृध्द लोक वारीच्या निमित्ताने तेथे आलेली असतात. ही माणसे दर्शनासाठी आलेली असतात परंतु ही माणसे आळंदी किंवा पंढरपूर येथेच राहतात, त्या ठिकाणी कोणत्या ना कोणत्या आश्रमात दिवस काढत असतात. वयोवृध्दांनी भीक मागून जीवन जगू नये यासाठी शासनाने त्यांच्यासाठी विचार करण्याची गरज आहे असे मला या निमित्ताने सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, शहरामध्ये गॅस सिलेंडरचा मध्येच अचानक तुटवडा निर्माण होतो. हा तुटवडा ठरवून केलेला असतो की, काय असे आम्हाला वाटू लागले आहे. कारण गॅसचा कधी सांगलीत तुटवडा होतो, कधी संभाजी नगरला होतो तर कधी विदर्भात होतो. त्यामुळे गॅस सिलेंडरचा पुरवठा व्यवस्थित होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, निराधारा महिलांबरोबर सामान्य गृहिणींसाठी दक्षता समित्या आहेत. मला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे...

असे वाटते की, यासाठी 103 नंबरची हेल्पलाईन आहे तशीच पुण्यामध्ये 1093 अशी हेल्पलाईन आहे. तशाच प्रकारची हेल्पलाई रेशन दुकानाच्या संदर्भात असली पाहिजे. त्यामुळे ज्या ठिकाणी अशा प्रकारची तक्रार असेल त्या ठिकाणचे लोक हेल्पलाईनवरुन तक्रार नोंदवू शकतील. पोलीस सांगतात की, आमच्याकडे ब-याच तक्रारी खोटया येत असतात. परंतु 100 मधील 40 टक्के तक्रारी खोटया असल्या तरी 60 टक्के तक्रारी या ख-या असतात हे आपण विसरु नका. त्यामुळे रेशन दुकानासाठी हेल्पलाईन ठेवली तर त्यातून चांगल्या प्रकारचे काम होऊ शकेल असे मला वाटते. तुमची नियत साफ आहे असे समजून मी या ठिकाणी सूचना करीत आहे. यामध्ये अधिका-यांचे साटेलोटे असेल तर ते दूर करण्यासाठी विधासभा आणि विधानपरिषदेच्या आमदारांच्या कमिटया करण्याची घोषणा पूर्वी केली होती. विधानमंडळाच्या काही कमिटयांवर आम्ही सुध्दा आहोत. पण या कमिटयांच्या बैठका वर्षातून एकदा सुध्दा होत नाही. त्यामुळे या बैठका तीन महिन्यातून एकदा तरी झाली पाहिजे. ज्यावेळेस आमदारांना बैठकीसाठी उपस्थित राहणे शक्य होत नाही त्यावेळेस आम्ही आमचे दोन प्रतिनिधी पाठवले तर अन्न नागरी पुरवठा अधिका-यांनी भेटले पाहिजे. ब-याच वेळेस दक्षता समित्यांच्या बैठकाच होत नाही. नावापुरत्याच दक्षता समित्या असतात. प्रत्येक वेळेस घेराव करुन आंदोलन करुन, मोर्चे काढून महागाईवर उतारा मिळेल असे नाही तर आता लोक सुध्दा दमून गेलेले आहेत. उष्माघात, पाणी टंचाई अशा मुद्याच्या संदर्भात लोक त्रस्त असतांना रोज त्यांनी मोर्चे काढले तरच आम्ही त्यांचे प्रश्न सोडवणार अशी जर सरकारची भूमिका असेल तर ती भूमिका योग्य नाही असे मला वाटते.

सभापती महोदय, साखर खाण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. ज्यांना डायबेटीसचा आजार आहे त्यांनी साखर कमी खावी हे मी समजू शकते. उष्माघात झालेल्या माणसाला किंवा डायबेटीसच्या माणसाची शुगर डाऊन झाली की, त्याला साखर खावी लागते. गोडाधोडाचे आपण कधी तरी खावे असा विचार गरीब माणसे सुध्दा करीत असतात. त्यामुळे साखरेच्या संदर्भात शासनाने उदार भूमिका घ्यावी असे वाटते.

आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

----- यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद ज़मा (विधानसभा सदस्यों द्वारा निर्वाचित) :सभापति महोदय, बढ़ती हुई मंहगाई के संबंध में नियम 260 के अन्तर्गत यहां पर प्रस्ताव रखा गया है, उस पर अपने विचार व्यक्त करने के लिए खड़ा हूं. सभापति महोदय, सभागृह में उपस्थिति बहुत कम है, इसका कारण यही लगता है कि सदस्यों को महंगाई के विषय में रुचि कम है. कुछ वरिष्ठ सदस्य यहां बैठे हैं. मुझे इस सदन का सदस्य बने ज्यादा समय नहीं हुआ है. इसलिए मुझे तजुर्बा नहीं है. लेकिन मैं यह कह सकता हूं कि नियम 260 के अन्तर्गत जो प्रस्ताव इस सदन में रखे जाते हैं, उसका रुप रेक्विझिट होता है. नियम 260 के अन्तर्गत कभी महंगाई पर चर्चा होती है, कभी कानून और व्यवस्था पर चर्चा होती है. इन विषयों पर सदस्य अपनी भावना व्यक्त करते हैं. आज इस विषय पर सदस्य अपनी भावना व्यक्त कर रहे हैं. लेकिन इस पर डिबेट नहीं हो रही है. मेरी यह भावना है कि महंगाई बढ़ी है और बढ़ती हुई महंगाई का विषय गंभीर है. इसमें कोई दो राय नहीं हो सकती है. लेकिन हम यहां पर इस विषय पर कितना भी विचार कर ले, हम इसके लिए राज्य सरकार को दोष दे दें, केन्द्रीय सरकार को दोष दे दें लेकिन महंगाई का असर अब अन्तर्राष्ट्रीय हो गया है. पूरा राष्ट्र इससे प्रभावित है. महंगाई राष्ट्रीय समस्या हो गई है. जिस प्रकार से महाराष्ट्र में महंगाई है उसी प्रकार से अन्य राज्यों में भी महंगाई है. महंगाई किसी एक राज्य तक ही सीमित नहीं है. हमाम में सभी राज्य है. इसलिए एक राज्य तक हम महंगाई को सीमित कर देंगे तो वह उचित नहीं होगा. किसी भी पार्टी की सरकार हो, कोई भी राज्य हो, चाहे वह पश्चिम बंगाल की वामपंथी दल की सरकार हो, पंजाब हो, हरियाणा हो, झारखंड हो, कर्नाटक हो, सभी राज्यों में महंगाई बढ़ रही है. सभी राज्यों में महंगाई गंभीर रुप धारण करती जा रही है. अंतर्राष्ट्रीय स्तर पर महंगाई असर कर रही है. मैं इस समस्या को अंतर्राष्ट्रीय समस्या इसलिए बता रहा हूं कि पूरी दुनिया में ग्लोबलाईजेशन का जो दौर चला और उसके बाद जो परिस्थिति निर्माण हुई है, उस पर नियंत्रण करना हमारे हाथ में नहीं है. अब हमारी इकॉनॉमी को मार्केट रेगूलेट करती है. जहां के मार्केट पर और जिसके हाथ में नियंत्रण होता है उसी के इशारों पर इकॉनॉमी रहती है. यह महंगाई उसी का परिणाम है. दूसरा कारण यह है कि, हमारे देश में कई राज्यों में गठबंधन सरकार की स्थापना की प्रथा आई है. गठबंधन सरकार के कारण हमारी अर्थव्यवस्था पर विपरीत प्रभाव पड़ रहा है. इस वजह से महंगाई पर नियंत्रण करना कठिन होता है. पिछली बार सरकार ने कहा था कि सार्वजनिक वितरण व्यवस्था अच्छी करने वाले हैं.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद ज़मा..

महंगाई कम करने के लिए कार्यवाही करने की बात कही गई थी. लेकिन पिछले कुछ वर्षो से हम देख रहे हैं कि मौसम में परिवर्तन हो रहा है. हमारे देश में सिंचाई भूमि 18-20 प्रतिशत से कम है. हमारे देश की कृषि व्यवस्था प्रकृति पर निर्भर है. पिछले कुछ वर्षो से हम देख रहे हैं कि कभी ओले पड़ते है, कभी सूखे की परिस्थति पैदा हो जाती है, कभी अतिवृष्टि हो जाती है, कभी बाढ़ आ जाती है जिससे फसल नष्ट हो जाती है, परिणाम स्वरुप उत्पादन में कमी आती है और महंगाई बढ़ती है. ग्लोबल वार्मिंग, क्लाईमेट का चेंज होना, कभी जाड़े के मौसम में गर्मी होना, गर्मी के मौसम में जाड़ा होना, गर्मी के मौसम में बरसात होना ये चीज़े भी उत्पादन को प्रभावित करती है जिसके परिणामस्वरुप महंगाई बढ़ती है. लेकिन मैं इस बात को नहीं मानता हूं कि सरकार महंगाई को कम करने के लिए प्रयास नहीं कर रही है. राज्य सरकार, केन्द्रीय सरकार उपाय कर रही है. सरकार की निष्ठा पर शंका नहीं की जा सकती है. यह सामूहिक जिम्मेदारी का विषय है. मैं नहीं समझता कि महंगाई के लिए कोई एक या दो व्यक्ति दोषी है. प्रधान मंत्री, कृषि मंत्री या वित्त मंत्री को दोष नहीं दिया जा सकता है. यह सामूहिक जिम्मेदारी है. मंत्रिमंडल की जिम्मेदारी है.

इसके बाद श्री शर्मा.

अशुधारित प्रत / प्रशिक्षणार्थी नहीं

. . . .श्री. सय्यद जमा जारी (पूर्वी तालेवार)

हमारा यह कर्तव्य है कि हम मंहगाई पर अंकुश लगाएं. अगर हम मंहगाई पर अंकुश नहीं लगा पा रहे हैं, चाहे वह केन्द्रीय सरकार हो, चाहे वह हमारी राज्य सरकार हो या किसी अन्य राज्य की सरकार हो, हम सत्ता में हैं, इसलिए मंहगाई अगर कम नहीं हो रही है या उसके ऊपर कम नियंत्रण हो रहा है तो उसकी जबाबदारी भी हमारी है. हम अपनी जबाबदारी से पीछे नहीं हट सकते हैं. इसलिए मंहगाई के विषय पर गंभीरतापूर्वक चर्चा होनी चाहिए. हमारे एक वरिष्ठ साथी ने यहां पर कहा कि माननीय प्रधानमंत्री ने राज्यों के मुख्यमंत्रियों की एक बैठक बुलाई थी और उसके बाद उन्होंने कुछ राज्यों के मुख्यमंत्रियों की एक सब कमेटी बनाई है. इस सब कमेटी की दिल्ली में एक मीटिंग हुई है. यह विषय इतना महत्वपूर्ण है कि अलग अलग राज्यों के मुख्यमंत्री माननीय प्रधानमंत्री के साथ मंहगाई कम करने के बारे में कुछ कदम उठाने की बात सोच सकते हैं तो महाराष्ट्र में भी हमें विरोधी पक्ष के तजुर्बेकार लोगों के साथ मिलकर, उनसे चर्चा करके कदम चाहिए. यह बात सच है कि मंहगाई रोकने के लिए हमें कुछ कदम ऐसे उठाने होंगे जो अन-पॉपूलर होंगे. इससे सरकार अन-पॉपूलर होगी, लेकिन हमें इस बात की चिन्ता नहीं करनी चाहिए, क्योंकि लोकसभा या विधान सभा के चुनाव में अभी चार-साढ़ चार साल का समय है. महाराष्ट्र की सरकार इस बारे में गंभीर है, इसलिए उसे कालाबाजारियों के खिलाफ कड़े कदम उठाने की तैयारी करनी चाहिए. इस बारे में मंत्रिमंडल में चर्चा की जाए और विरोधी पक्ष के नेताओं से संपर्क करके, उनसे मिलकर महाराष्ट्र सरकार को कड़े कदम उठाने चाहिए. इससे मंहगाई कुछ प्रतिशत अवश्य कम होगी. अगर किसी विभाग में छापा मारकर 200-400 टन अनाज या शक्कर जप्त कर लेते हैं तो हमारी सामाजिक और राजनैतिक व्यवस्था इस प्रकार की हो गई है कि उसको छोड़ने के लिए अगले दिन किसी नेता का फोन आ जाता है. इसलिए सभी लोगों के साथ विचार-विमर्श करके सरकार को कालाबाजारियों के खिलाफ कड़े कदम उठाने चाहिए. मेरा सुझाव है कि सरकार की केपेसिटी में जो कुछ संभव है, कड़े से कड़े कदम उठाए जाएं, इससे सरकार अन-पॉपूलर भी हो सकती है, लोगों की थोड़ी नाराजी भी हो सकती है, लेकिन गरीब जनता को राहत देने के लिए ऐसा करना जरुरी है. इसके साथ साथ सार्वजनिक वितरण व्यवस्था को सुदृढ़ बनाया जाए.

. . . 3M 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री सय्यद जमा

सभापति महोदय, हम लोगों को मालूम है कि सरकार का फूड सिक्योरिटी बिल लाने का विचार है. यह बिल अभी प्लानिंग कमीशन के पास है. हमारे देश में गरीबी की रेखा के नीचे कितने लोग है, यह हम निश्चित नहीं कर पा रहे हैं. इसके लिए एन.सी. सक्सेना की कमेटी बनाई गई. गरीबी की रेखा को नापने का जो पैमाना है, वह बहुत पुराना हो गया है. 2500 रुपए से कम आय वाले व्यक्ति को गरीबी की रेखा से नीचे माना जाता है, इसको बदलने की आवश्यकता है. मुझे ऐसा लगता है कि फूड सिक्योरिटी बिल एक क्रान्तिकारी कदम होगा. अभी हमारे पास गरीबी की रेखा से नीचे के लोगों की वास्तविक संख्या नहीं है. हमारे राज्य में 20 लाख से अधिक बोगस राशन कार्ड है और अगर इसकी तह में जाएंगे तो यह संख्या और अधिक हो सकती है. हम लोगों को मालूम है कि गरीबी की रेखा से नीचे के लोगों की संख्या दिल्ली में प्लानिंग कमीशन तय करेगा. लेकिन यह ठीक नहीं है. मेरा सुझाव है कि महाराष्ट्र में हम पंचायत राज प्रणाली के अन्तर्गत ग्राम पंचायत को यह निश्चित करने का अधिकार दें कि उनके यहां कितने लोग गरीबी की रेखा से नीचे हैं और कितने लोग पिछड़े हैं. इस तरह से शायद हमारे पास वास्तविक संख्या आ सकती है. इसी सुझाव के साथ मंहगाई रोकने के लिए सरकार को जो भी संभव है, वह कदम उठाने चाहिए. धन्यवाद.

****

भाषण पूर्ण.

यानंतर श्री. टकले यांचे भाषण (3M 3)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे) : आता माननीय मंत्री महोदयांचे उत्तर सुरु करावयाचे आहे परंतु अजूनही अनेक सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. तेव्हा या प्रस्तावावरील चर्चा पुढे चालू ठेवावयाची काय ?

एक सन्माननीय सदस्य : या चर्चेसाठी वेळ वाढवून देण्यात यावा.

तालिका सभापती : माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासह 6.30 वाजता चर्चा संपवावयाची आहे. तरी सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात विचार मांडावेत.

ॲड उषा दराडे : ज्या सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे त्यांना बोलण्याची संधी देण्यात यावी आणि 8.00 वाजता चर्चा संपविण्यात यावी.

श्री.अनिल देशमुख : 6.30 वाजेपर्यंत सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी द्यावी आणि 6.30 वाजता उत्तर देण्यास मी सुरुवात करीन.

तालिका सभापती : ठीक आहे. यानंतर सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी आपले भाषण सुरु करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधान सभेने निवडलेले): सभापती महोदय, विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी आणि इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये आणलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महागाई हा विषय अतिशय महत्वाचा आणि संवेदनशील आहे. त्याचबरोबर आज लोकांच्या समोर महागाईसंबंधी जी वस्तुस्थिती आहे ती नाकारुन आपण पुढे जाऊ शकत नाही. सामान्य माणसांना लागणाऱ्या सर्वच वस्तू आता त्याच्या आवाक्याच्या पलीकडे जावयास लागल्या आहेत की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. ही परिस्थिती का निर्माण झाली आहे यासंबंधी या अगोदरच्या सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत.लोकांना ज्या जीवनावश्यक वस्तू रोज लागतात त्याचा योग्य साठा, योग्य वितरण आणि शेवटच्या माणसापर्यंत ते पोहोचेल अशी सुरक्षित व्यवस्था निर्माण करण्याची जबाबदारी राज्य शासनाची असते ही कोणीही नाकारणार नाही. आतापर्यंतच्या अनुभवावरुन असे म्हणता येईल की, यामध्ये मध्यस्थ म्हणून काम करणारे जे अनेक लोक आहेत ते गैरफायदा घेऊन जीवनावश्यक वस्तूंचा बेकायदा साठा करुन ....

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले.....

त्याची कृत्रिम टंचाई निर्माण करतात. एखाद्या वस्तूबद्दल बाजारातील उपलब्धता कमी होण्याकडे अधिक काळजीपूर्वक लक्ष दिले जाते. अमुक वस्तू बाजारातून गायब होण्याची शक्यता आहे हे ज्यावेळी लक्षात येते, त्यावेळी अनेक ग्राहकांच्या मनामध्ये चिंता निर्माण होते. आपण त्या वस्तूचा साठा करुन ठेवला नाहीतर कदाचित पुढे ती वस्तू मिळणार नाही, ही मानसिकता तयार होते. त्याला प्रामुख्याने आजची वितरण व्यवस्था अधिक जबाबदार आहे असे मला वाटते. . नाशिक जिल्हयातील काही आदिवासी भागमाध्ये तेथील पुरवठा अधिकाऱ्यांमार्फत एक प्रयोग करण्यात आला. त्याचा पुरस्कार सर्व देशभर झाला अशाप्रकारचा तो प्रयोग होता. आदिवासींना जे धान्य द्यावयाचे असते, त्यांचा जो धान्याचा कोटा असतो त्याची व्यवस्थित नोंदणी करुन तो सरकारी गोदामातून थेट आदिवासींच्या घरापर्यंत दर महिन्याला न देता तीन महिन्यांचा साठा एकदम दिला तर त्यामधील वहातुकीच्या खर्चावर नियंत्रण येईल व योग्य प्रकारे माल पोहोचविला जाईल. त्यामुळे त्याला दारोदारी फिरावयास लागणार नाही. हा लहानसा प्रयोग करुन पाहिला गेला. अशाप्रकारचा नाविन्यपूर्ण उपक्रम सर्व देशामध्ये राबविणे आवश्यक झाले आहे. एकंदरीत देशाची अर्थव्यवस्था आहे, त्याबाबत आणि या देशाच्या माननीय कृषीमंत्र्यांचा उल्लेख याठिकाणी अनेक वेळा केला गेला. त्यांच्याकडे अन्न व नागरी पुरवठा खातेही आहे. देशातील प्रत्येक माणसाला खायला पुरेसे अन्न मिळेल अशाप्रकारची अन्न सुरक्षितता राखण्याचे महत्वाचे काम त्यांच्या खात्याकडे आहे. आणि म्हणून शेतकऱ्याला चांगला भाव मिळाला पाहिजे त्याचप्रमाणे ग्राहकाला तो माल परवडेल, त्याच्या खिशाला परवडेल अशा किंमतीमध्ये त्याच्यापर्यंत पोहोचविण्याची दुहेरी जबाबदारी त्यांच्याकडे आहे. त्यांच्या बाबतीत असेही विचार व्यक्त केले गेले की, माननीय केंद्रीय कृषी मंत्री बोलले की भाववाढ होते. याला कार्यकारणभाव म्हणा, किंवा अगदी सोप्या भाषेत "कावळा बसायला आणि फांदी तुटायला एकच गत होते" असा उल्लेख करण्यात आला. परंतु वस्तुस्थिती जनतेसमोर आणण्यासाठी एकप्रकारे आगाऊ सूचना जनतेला देण्याची पध्दत आहे. या देशाच्या कृषीमंत्र्यांकडे संपूर्ण देशात रोजच्या रोज किती पाऊस झाला, किती झाला नाही, पाणी साठा किती आहे, गोदामामध्ये अन्न साठा किती आहे, वितरण व्यवस्थेकडे किती साठा आहे? याची रोज रात्री आकडेवारी त्यांच्या हातामध्ये येते. त्यावरुन ती यंत्रणा पुढील काम करते. इतक्या बारकाईने आपण या प्रश्नाकडे बघत असतांना देशाच्या हवामानामध्ये होणारे बदल, जागतिक तापमानामध्ये होणारे बदल इत्यादी गोष्टींमुळे शेतीच्या व्यवहारामध्ये एकप्रकारची क्रांती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/

श्री. हेमंत टकले.....

घडवून आणणारी दूरदृष्टी ठेवून हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न आपण केल्यास भविष्यात निर्माण होणाऱ्या प्रश्नांना सामोरे जाण्यासाठी योग्य प्रकारचे संशोधन करुन सतत बदलणाऱ्या परिस्थितीशी सामना करणारे बियाणे निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. अशाप्रकारे या क्षेत्रामध्ये संशोधन करणाऱ्या संस्थांना मदत केली पाहिजे. आणि त्यांच्यामार्फत बदलत्या हवामानाला सुसंगत असलेले वाण तयार करुन ते बियाणे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे, व ज्यामधून या देशाची अन्नधान्य सुरक्षितता संभाळली जाईल यासाठी निश्चितपणे प्रयत्न केले पाहिजेत. व त्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण देणे इत्यादी गोष्टी आपल्याला कराव्या लागतील. हे करीत असतांना देशाची वाढती लोकसंख्या देखील एकप्रकारे या देशाच्या अर्थव्यवथेवर किंवा बदलत्या जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम करते.

जागतिकीकरणामुळे आज बाजारु संस्कृती निर्माण व्हावयास लागली आहे. त्याबाबतीत मी आपणास सांगू इच्छितो की, मुंबईसारख्या एखाद्या मॉलमध्ये 26 जानेवारीच्या सुमारास सेल लावला जातो. त्यामध्ये तीन दिवसात वस्तूंची खरेदी केल्यास निम्म्या किंमतीमध्ये तुम्हाला विकत मिळेल अशी जाहीरात केली जाते. त्यामधून ग्राहकांमध्ये आकर्षण निर्माण केले जाते. अशाप्रकारे त्या वस्तू पदरात पाडून घेण्यासाठी ग्राहकांच्या सुध्दा झुंडीच्या झुंडी त्या मॉलच्या ठिकाणी पडतात. त्यामधून कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होतात. त्याठिकाणी आपल्याला पोलीस बंदोबस्त वाढवावा लागतो. अशाप्रकारचे एक विरोधाभास असलेले चित्र या देशामध्ये आपल्याला पहावयास मिळत आहे. आणि म्हणून एकीकडे असे प्रकार होत असतांना या समाजातील तळागाळातील शेवटच्या माणसाचे सबलीकरण करण्यासाठी...

(अपूर्ण ---यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले . . . .

केंद्र शासन काही महत्वाच्या योजना गेल्या काही वर्षापासून राबवित आहे. मग ती नरेगा सारखी योजना असेल, ज्याच्यामध्ये मजुरांना 100 दिवस निश्चितपणे रोजगार मिळणार आहे, मजुरी निश्चितपणे मिळणार आहे. त्यामुळे आज त्याही माणसाच्या हातामध्ये दोन पैसे येऊ लागलेले आहेत. नोकरदार वर्गाच्या हातामध्ये पैसे येऊ लागले आहेत. बाजारामध्ये पैसा उपलब्ध असताना, जर बाजारामध्ये त्याप्रमाणात वस्तू उपलब्ध नसतील तर तफावत निर्माण होते आणि आपण भाववाढीच्या दिशेने जातो. पण या सगळया यंत्रणेतील जे चुकीचे लोक असतील, त्यांना निवडून बाजूला काढणे ही जबाबदारी मात्र वितरण व्यवस्था सांभाळणाऱ्या मंत्रालयाची आहे, राज्याची आहे. अशा वेळी केंद्राकडून राज्याकडे आणि राज्याकडून केंद्राकडे चेंडूची टोलवाटोलव न करता, या प्रश्नाच्या बाबतीत एकत्रितपणे विचार करण्याची गरज आहे. म्हणूनच मागच्या आठवड्यामध्ये माननीय पंतप्रधान यांनी राज्याच्या सर्व मुख्यमंत्र्यांची एक बैठक घेतली आणि त्यामध्ये तीन-चार विषय प्रामुख्याने मांडले आहेत. त्या बैठकीमध्ये केवळ या राज्याच्या आघाडीचे माननीय मुख्यमंत्री होते असे नाही तर अनेक राज्यातील माननीय मुख्यमंत्री उपस्थित होते. विरोधी पक्षाचे जेथे सरकार आहे,त्यांचेही माननीय मुख्यमंत्री उपस्थित होते. ही सिस्टीम सुधारण्यासाठी ज्यांच्याकडे जे-जे चांगले आहे, ते-ते सर्व एकत्र करुन सगळया देशभर एक नवीन व्यवस्था निर्माण करण्याची गरज आहे. त्यामुळे शासनाने या गंभीर विषयाकडे अधिक चांगले लक्ष द्यावे आणि या व्यवस्थेतील जे चुकीचे पायंडे असतील, ते नष्ट करुन अधिकाधिक सुरक्षितता निर्माण करावी आणि हे आव्हान राज्य शासन निश्चितपणे पेलू शकेल असा मला विश्वास वाटतो. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद.

---

3 ओ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, याठिकाणी माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे, त्यावर चर्चा करीत असताना आतापर्यंत सन्माननीय सदस्य ज्या मुद्यांबाबत बोलले आहेत, ते मुद्दे सोडून मी बाकीच्या मुद्यांना धावता स्पर्श करणार आहे.

सभापती महोदय, या भाववाढीच्या पाठिमागे नित्याची तीन कारणे आहेत म्हणजेच यापूर्वी संपन्न झालेल्या दोन निवडणुका आणि याच दरम्यान घोषित झालेला सहावा वेतन आयोग आणि एक पारंपारिक कारण आहे आणि ते म्हणजे दुष्काळी परिस्थिती आणि चौथे कारण म्हणजे कृत्रिम टंचाई आणि ही कारणे सातत्याने चर्चेमध्ये येत असतात. पण यापेक्षा आणखी कारणावर प्रकाश टाकणे मला योग्य वाटते. ते म्हणजे वाढता चंगळवाद. एका बाजूला एखाद्या व्यक्तीला तिच्या गरजेपेक्षा जास्त वस्तुंचा उपभोग घेणे आणि आपल्याकडे पैसा आहे म्हणून त्याचा विनियोग करणे असे चित्र दिसते. पण दुसऱ्या बाजूला खाण्यासाठी भाकरी नाही म्हणून तडफडून मरणारी माणसे पहात आहोत. पण दुसऱ्या बाजूला हॉटेल संस्कृतीमध्ये 500 रुपयाचे एक ताट, 1000 रुपयांचे एक ताट मागविले जाते आणि तेथे होणारी अन्नाची नासधूस हे चित्र देखील आम्ही पहात आहोत. अशा प्रकारचे चित्र या हिंदुस्थानला, देशाला, महाराष्ट्राला अभिप्रेत आहे काय ? असा आमच्यापुढे मोठा प्रश्न आहे. सध्या जी भाववाढ होत आहे, त्यासाठी वाढता चंगळवाद हे देखील अनेक कारणांपैकी एक महत्वाचे कारण आहे, याकडे आपल्या सर्वांचे लक्ष वेधणे आवश्यक आहे म्हणून मी आपल्या ही बाब निदर्शनास आणत आहे.

सभापती महोदय,आता भ्रष्टाचार हा शिष्टाचाराच्या स्वरुपामध्ये पुढे येत आहे आणि त्यामुळे दुष्परिणाम होत आहेत. म्हणजे एखादा सद्प्रवृत्त माणूस असेल, ज्याला सामान्य पध्दतीने जीवन जगावयाचे आहे. परंतु सध्याची जी सिस्टीम आहे, ती त्याला भ्रष्टाचारी बनविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीत आहे आणि आम्ही अशी सिस्टीम विकसित करीत आहोत. असे असले तरी आम्ही मात्र त्याकडे हताशपणे पहात आहोत. त्यावर कंट्रोल करण्यासाठी जी यंत्रणा राबविली पाहिजे, ती आम्ही दुर्दैवाने राबवत नाही. भ्रष्टाचाराची पाळेमुळे खोलवर जात असून त्याचाही भाववाढीवर परिणाम होत आहे. वेगळया अर्थाने सांगावयाचे तर समाजामध्ये एका बाजूला "नाही रे"चा मोठा वर्ग आहे आणि दुसऱ्या बाजूला "आहे रे"चा मोठा वर्ग आहे. अशा वेळी जर आपण "आहे रे" लोकांचे उत्पन्न तपासले, त्यांचे उत्पन्नांचे मूळ स्त्रोत तपासले तर आपल्या असे लक्षात येईल की,

. . .. 3 ओ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे . . ..

त्यांच्याकडे प्रचंड प्रमाणात माया गोळा होत आहे आणि त्यांच्यावर कोणाचेही नियंत्रण नाही. तसेच याबाबतीत केंद्र शासनाची आणि राज्य शासनाचीही इच्छाशक्ती नाही. कोणतीही यंत्रणा नाही आणि समाज पूर्णपणे गलितगात्र झालेला आहे आणि एकापरीने समाजही भ्रष्टाचारामध्ये, भाववाढी मध्ये प्रचंड भर घालत आहे.सगळयात वाईट गोष्ट म्हणजे शासनाची अर्थनीती,जी या भाववाढीला कारणीभूत आहे.उदाहरण द्यावयाचे तर आम्हाला विकास करावयाचा आहे ही गोष्ट मान्य आहे. पण आम्ही विकास करण्यासाठी जी प्लॅनिंग कमिशन नेमत आहोत ती पहाता केवळ कर्जबाजारी- पणा हा विकासाचा पाया असतो असा चुकीचा सिध्दांत बरोबर घेऊन आमची राज्यप्रणाली चालवलेली आहे. खरे म्हणजे कर्ज घ्यावयाची असतात, पण त्याबाबतीत सुध्दा टक्केवारी ठरली पाहिजे. त्या टक्केवारीच्या पुढे कर्ज घेणे बरोबर नाही. तसेच कर्जबाजारीपणावर आधारित विकास नीती हा भाववाढीच्या पाठिमागे असणारा एक महत्वाचा मुद्दा आहे. अशा अनेक मुद्यांचा परामर्श घेता येईल पण वेळेची मर्यादा पाळून मी बोलू इच्छितो.

सभापती महोदय, मला आणखी एका मुद्याकडे लक्ष वेधावयाचे आहे आणि त्याबाबतीत शासनाने काही उपाययोजना केल्या पाहिजेत. त्यापैकी मला एका उपाययोजनेबाबत सांगावयाचे आहे.

यानंतर श्री.बरवड . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे .....

आम्ही ग्राहक संरक्षण कायदा केला. ज्या मालाचे उत्पादन करतो त्या मालाची उत्पादन किंमत किती ? उत्पादनाची पारदर्शक पध्दतीने किंमत निश्चित करणे, त्यावर माफक नफा घेणे आणि ती वस्तू बाजारामध्ये विक्रीसाठी उपलब्ध करुन देणे यासंबंधामध्ये शासनाच्या माध्यमातून कोणती यंत्रणा राबविली हा मोठा विषय आहे. आमच्याकडे राज्य ग्राहक संरक्षण सल्लागार समिती गठीत केली परंतु त्या समितीवर गेली तीन वर्षे अध्यक्षाची नेमणूक करु शकलो नाही. परिणाम जो व्हावयाचा तो झाला. ग्राहक संरक्षण कायद्याच्या अंतर्गत होणारे उत्पादन आणि त्याची निर्धारित किंमत याकडे लक्ष वेधले तरी सुध्दा भाववाढ नियंत्रित होऊ शकते. शेतीमालाच्या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्य बोलले. त्या विषयावर बोलत असताना मनावर ताण येतो म्हणून बोललो नाही. आदरणीय श्री. शरद पवार साहेबांबद्दल बोलले जाते. त्यांच्या शेतकऱ्यांबद्दलच्या प्रेमाबद्दल मला संशय घेण्याचे कारण नाही. कारण ते उपजत शेतकरी आहेत. परंतु या महागाईचे विश्लेषण करताना ती शेतकऱ्यांना लाभदायक आहे असे जे विश्लेषण करीत आहेत ते कितपत योग्य आहे हा चिंतेचा विषय आहे. जोपर्यंत शेती मालाची उत्पादन किंमत निर्धारित करण्यामध्ये उत्पादकाला भूमिका मिळत नाही आणि तो उत्पादित होणारा माल थेट ग्राहकांपर्यंत जाण्यासाठी पारदर्शक पध्दत निर्माण होत नाही तोपर्यंत शेती मालाला मिळालेला भाव, भाजीपाला, वांगी, डाळींचे जे भाव वाढले त्याचा लाभ शेतकऱ्यांना मिळतो असे म्हणणे वस्तुनिष्ठ होणार नाही. शेतकरी आहे तिथेच आहे. मालाचे भाव निर्धारित करण्यामध्ये शेतकऱ्याला भूमिका मिळाली तरच त्याला लाभ होईल.

सभापती महोदय, या सगळ्या गोष्टींबाबत आपणा सगळ्यांना थोडेसे राजकारणापलीकडे जाऊन महाराष्ट्रातील जी 10 कोटी पेक्षा जास्त सामान्य जनता या महागाईमध्ये होरपळत आहे त्या जनतेला दिलासा देण्यासाठी उत्तम प्रकारची इच्छाशक्ती दाखवावी लागेल आणि सर्वांना एकत्र घेऊन काही दिवसात तातडीच्या उपाययोजना करुन ही महागाई एक महिन्याच्या आत नियंत्रणात आणली तर या सदनामध्ये नियम 260 अन्वये प्रस्ताव आणून त्यावर एवढ्या वेळ चर्चा करण्याला काही अर्थ निर्माण होईल. या विचारमंथनातून चांगला उपाय निघाला तरच या चर्चेला अर्थ राहील. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये महागाईच्या संदर्भात जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याला अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे. प्रस्ताव इतका सुस्पष्ट आहे की, त्यावर जास्त बोलण्याची गरज नाही. ज्या ज्या गोष्टींमुळे महागाई वाढली ते सगळे मुद्दे या प्रस्तावामध्ये समाविष्ट केलेले आहेत. अनेक सन्माननीय सदस्यांनी महागाई कशी वाढली, महागाई वाढण्याची कारणे काय याबाबतीत समर्थन केले. केंद्राचे काय धोरण होते याबद्दल सुध्दा सन्माननीय सदस्य बोलले. मी त्याच्या खालच्या भागामध्ये येणार आहे. एस.टी. बसच्या भाड्यामध्ये झालेली वाढ, बेस्ट बसच्या भाड्यामध्ये झालेली वाढ तसेच शाळा-महाविद्यालयांमध्ये झालेली फी वाढ या मुद्यांवर माझे विचार केंद्रित करणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी आणि अन्य सहकाऱ्यांनी असे सांगितले की, दुधाचे उत्पादन कमी झाल्यामुळे दुधाचे भाव वाढले. परंतु अडचणीच्या वेळी शेतकऱ्यांना ज्या दुधाळ गाई-म्हशी दिल्या गेल्या होत्या त्या नेमक्या कोठे गेल्या ? सभापती महोदय, आपल्याला हा विषय चांगला माहीत आहे. ज्या दुधाळ गाई-म्हशी शेतकऱ्यांना दिल्या गेल्या, पूरग्रस्तांना दिल्या गेल्या त्या सर्व भाकड होत्या. त्यामुळे यामध्ये देखील सरकारच जबाबदार आहे. ज्या लोकांना दुग्धव्यवसायावर आपले घर चालवावयाचे होते, गुजराण करावयाची होती त्या लोकांची निव्वळ फसवणूक झालेली आहे. दुसरी महत्वाची गोष्ट अशी की, या सभागृहामध्ये किमान दोन वेळा तरी मी सडक्या गव्हाचे पुरावे दिले. या ठिकाणी गहू आणून दाखवला.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

अगदी हिवाळी अधिवेशनामध्ये आणि त्यापूर्वीच्या अधिवेशनामध्ये गहू दाखविला होता. परंतु दोन्ही वेळा पुरवठादार आणि दुकानदार मालक यांच्यावर कारवाई झाली नाही. शिवसेनेच्या उपविभाग प्रमुखांनी जीव धोक्यात घालून ट्रक पकडला होता. गहू दाखवून दिला, त्याबद्दल पोलीस केस इ ाली, एफआयआर दाखल झाली आहे. परंतु त्यानंतर ते प्रकरण बंद झाले. आज देखील हा प्रश्न मी उपस्थित केला होता. त्यावेळी देखील मी हेच सांगितले होते. लक्ष्मी स्टोअर्सचे बिल दाखविले होते. गव्हाऐवजी गव्हातील कचरा दाखविला होता. जोपर्यंत या दुकानदारांवर, पुरवठादारांवर कडक कारवाई करीत नाही तोपर्यंत हे असेच चालू राहणार आहे. सभापती महोदय, रेशनिंग इन्सपेक्टर काय करतात ते सांगतो. मी दक्षता समितीवर आहे. दक्षता समित्यांच्या बैठकांचे इतरांना निमंत्रण मिळत नसले तरी मला बैठकीचे निमंत्रण वेळेवर मिळते, हे मी नमूद करु इच्छितो. हे रेशनिंग इन्सपेक्टर रेशनिंगच्या दुकानामध्ये चहाचा पाहुणचार घेतात, तेथे सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील कोणता माल आहे की नाही ते पहात नाहीत, पण पाकिट घेऊन निघून जातात. त्यामुळे कृत्रिम टंचाई निर्माण करणारे जे रेशनिंग दुकानदार आहेत त्यांच्यावर कडक कारवाई करणे आवश्यक आहे. यासंदर्भात शासन काय करणार आहे त्याचे सुतोवाच मंत्री महोदयांनी उत्तरातून करावे. त्यासाठी दक्षता समिती नेमावी. परंतु त्यातूनही अशा भ्रष्टाचा-यांना भ्रष्टाचार करण्यास वाव मिळता कामा नये. कारण त्यातूनही हप्ते सुरु होतात. अधिकाऱ्यांचे फावते, सभागृहाचे कारण लोकांना सांगितले जाते. लोकांची दिशाभूल केली जाते, विषयाला वेगळे वळण लावले जाते. त्याबाबत अधिक काळजी घेणे आवश्यक आहे

सभापती महोदय, राज्य शासनाच्या डोक्यावर फार मोठा कर्जाचा बोजा आहे. प्रत्येक माणसावर कर्ज आहे तसाच तो लहान विद्यार्थ्यांवर सुध्दा आहे. सध्या महाविद्यालयीन फीमध्ये वाढ होत आहे. सध्या अन्नधान्याचे, भाजीपाल्याचे, अंडयांचे भाव वाढलेले आहेत. इंधनाचे भाव वाढलेले आहेत. डिझेल व पेट्रोलचे भाव वाढले म्हणून इनडायरेक्टली महागाई वाढली आहे. परंतु महागाई वाढली म्हणून फी वाढण्याचे कारण काय ? त्यातल्या त्यात वैद्यकीय महाविद्यालयांची फी वाढलेली आहे. सध्या शिक्षण शूल्क समिती अस्तित्वात आहे. परंतु त्या समितीला चुकीचे

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

पुरावे दाखविले जातात. बॅलन्स शीटचे आकडे वाढवून सादर केले जातात. त्यामुळे पॉलिटेक्निक, इंजिनिअरिंग, मेडिकल कॉलेजच्या फीमध्ये वाढ झालेली आहे. यामध्ये पारदर्शकता येणे आवश्यक आहे. या कॉलेजकडून जे बॅलन्स शीट दिले जाते त्याच्यावर विचार होतो काय ? विचार होणार नसेल तर सामान्य माणूस काही करु शकत नाही. मी डी.वाय.पाटील कॉलेजचे उदाहरण दिले आहे. त्यांच्या साईटवर जाऊन पहावे. त्यांची पूर्वी वैद्यकीय शिक्षणाची फी 4 लाख होती ती 6 लाख रुपये झाल्याचे दिसेल. परीक्षा फी वेगळी घेतली जाते. ॲनाटॉमी या विषयाची परीक्षा फी 10 हजार रुपये, फिजिऑलॉजीसाठी 10 हजार रुपये, ज्यूरिसप्रोडेन्ससाठी 10 हजार रुपये परीक्षा फी द्यावी लागते. म्हणजे प्रत्येक विषयाच्या परीक्षेला 10-10 हजार रुपये द्यावे लागतात. अभिमत विद्यापीठांनी वैद्यकीय व इंजिनिअरिंगची फी वाढविली आहे. मुंबई विद्यापीठाचे फी वाढीवर नियंत्रण नाही. या विद्यापीठाच्या विरोधात आंदोलन झाले होते. टयूशनच्या फीमध्ये वाढ झालेली आहे. शाळेत शिक्षक शिकवित नाही. तुला पास व्हायचे असेल तर खाजगी टयूशनसाठी माझ्याकडे ये असे शिक्षक विद्यार्थ्यांना सांगतात.

सभापती महोदय, शासनाने व्हॅटमध्ये 1 टक्क्यांनी वाढ केली. यासंबंधी मी देखील प्रश्न विचारला होता. या व्हॅटच्या विरोधात मोठया प्रमाणावर व्यापारी आपली नावे नोंदवून घेत आहेत. तसेच सेवा करात, वस्तू करामध्ये अनेक वस्तू समाविष्ट होत आहेत. हा कायदा 1 एप्रिलपासून लागू झाला आहे. त्यामुळे सामान्य जनतेला आणखी कर द्यावा लागणार आहे.

सभापती महोदय, सामान्य माणूस आपले कोठे तरी घर असावे म्हणून बँकेतून लोन घेतो.

यानंतर श्री.शिगम.....

अशुद्धीरत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केन्द्राच्या या पॉलिसीमुळे गृहकर्ज देखील महागलेले आहे हेही मी आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो. या गृहकर्जावरील व्याज सर्वसामान्य माणसाला न परवडणारे आहे. एका बाजूला भाजीपाला घेणे परवडत नाही, दुस-या बाजूला कर्ज घेणे परवडत नाही. सर्वसामान्य माणसाने काय करायचे ? सभापती महोदय, या राज्यामध्ये शेतक-यांच्या आणि विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांबरोबरच सर्वसामान्य माणसे आत्महत्या करायला लागल्यानंतरच या सरकारला जाग येणार आहे काय ? म्हणून या चर्चेच्या निमित्ताने शासनाला माझी एवढीच विनंती आहे की, किमान 5 गरजेच्या वस्तूंचे भाव शासनाने स्थिर ठेवावेत. तसेच शाळा महाविद्यालयाबरोबरच वैद्यकीय आणि अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या फीच्या संदर्भात शिक्षण शुल्क समिती गठीत केलेली आहे. त्या समितीवर शासनाने स्वत:चे नियंत्रण ठेवावे आणि जास्तीत जास्त फी किती असावी याचा विचार करावा. सर्वसामान्य माणसाचा मुलगासुध्दा डॉक्टर किंवा इंजिनिअर व्हावयास पाहिजे, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !!

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये महागाईच्या संदर्भात आणलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, जगामध्ये आर्थिक मंदी आल्यानंतर जगामध्ये जी भाववाढ झाली त्या तुलनेमध्ये भारतामध्ये झालेली भाववाढ सर्वात कमी आहे ही गोष्ट मला या निमित्ताने नमूद करावीशी वाटते. या देशाचे कृषी मंत्री आदरणीय श्री. शरद पवार यांनी कृषी विषयक धोरण अवलंबिले आणि शेतमालाला आधारभूत किंमत वाढवून दिली. वितरण व्यवस्थेच्या बाबतीत खबरदारी घेतली. या सर्वाचा परिणाम जगाच्या तुलनेत देशाला महागाईचा फटका खूप कमी प्रमाणात बसला. कृषी मंत्र्यांच्या धोरणामुळे मोठा फटका बसला नाही हे मला नमूद करावयाचे आहे. देशातील 12 राज्यातील 312 जिल्हयामध्ये अवेळी पाऊस झाला, देशात दुष्काळ पडला. तरी देखील रब्बी आणि खरिपाचा आढावा घेता चांगले उत्पादन आल्याचे दिसून येते. गहू, तांदळाच्या उत्पादनामध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे.

भारताची अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून आहे. शेतक-यांना योग्य भाव मिळावा म्हणून बिगर काँग्रेसी सरकारानी तांदळाची आधारभूत किंमत वाढवून मागितली. आता उद्दिष्टापेक्षा दुपटीने धान्योत्पादन झालेले आहे. दोन वर्षे पुरेल एवढा साठा आहे. डाळीची टंचाई आहे. परंतु एम.एम.टी.सी. आणि एस.टी.सी मार्फत डाळीची आयात करण्यात येऊन किलोला 50 रुपये या प्रमाणे केन्द्राने 4 अब्ज रु.चा तोटा सहन केलेला आहे. सर्वसामान्य माणसाठी हा तोटा केन्द्राने सहन केलेला आहे. या महागाईवर केन्द्र आणि राज्य सरकार नियंत्रण आणण्याचा प्रयत्न करीत आहे. राज्य सरकार देखील डाळ आणि अन्नधान्याच्या किंमतीवर नियंत्रण आणण्यासाठी सबसिडीचा भार सहन करीत आहे. केन्द्र सरकारने वितरण प्रणाली मार्फत वितरित करण्यात येणा-या धान्याच्या किंमती 2002 पासून वाढविलेल्या नाहीत. वितरण व्यवस्थेमध्ये बदल करण्याची गरज आहे. गहू आणि तांदळाच्या आधारभूत किंमती वाढविल्यामुळे काही राज्यांनी उत्पादन वाढविले. याबाबतीत पंजाब, हरियाणा या राज्यांचा उल्लेख करावा लागेल. आपण एकेकाळी धान्याची आयात करीत होतो. पण आता निर्यातही करु लागलो आहोत. दारिद्र्य रेषेखालील नागरिकांना जीवनावश्यक वस्तू माफक दरात मिळण्यासाठी शासन सबसिडीवर खर्च करते. या महागाईची झळ गरीब माणसांना पोहोचू नये याची काळजी सरकारने घेतलेली आहे. राष्ट्रीय

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे.....

लोकशाही आघाडी सरकारने साठेबाजाविरुध्द धडक कारवाई केलेली आहे. पोलीस व नागरी पुरवठा विभागाने धाडी टाकून 2008मध्ये 150 कोटीचा माल जप्त केलेला आहे. 2009मध्ये 299 कोटी रु.चा माल जप्त केलेला आहे. धान्याचा काळाबाजार थांबविण्यासाठी जिल्हा व राज्य यंत्रणा अहोरात्र कार्यरत आहे. जीवनावश्यक वस्तू कायद्यांतर्गत राज्यात 45 प्रकरणे दाखल करण्यात आली. 75 लोकांना अटक करण्यात आली. ही वितरण व्यवस्था व्यवस्थित करण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्न करीत आहे. राज्याच्या मुख्यमंत्र्यांची बैठक केन्द्र सरकारने घेतली. त्या बैठकीत महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी काही मागण्या केलेल्या होत्या.

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे.....

पामतेल आणि तूरडाळीसंबंधी केंद्राकडून मिळणाऱ्या अनुदानाचा कालावधी संपत आला होता. त्याची मुदतवाढ मिळावी अशी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी बैठकीमध्ये आवर्जून केली. केंद्राच्या किमान आधारभूत किंमत योजनेच्या अंमलबजावणीचा कालावधी वाढवून द्यावा अशा प्रकारची मागणी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी त्या बैठकीमध्ये केली. केंद्र सरकारने राज्यातील 9.95 लाख हेक्टर क्षेत्राचा एकात्मिक पाणलोट क्षेत्रामध्ये समावेश केलेला आहे. परंतु आपल्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी मागणी केली की, 2010-11 मध्ये 10 लाख हेक्टर क्षेत्राचा समावेश एकात्मिक पाणलोट क्षेत्रामध्ये करावा. निश्चितच केंद्र सरकार ही सोय उपलब्ध करुन दिल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, दरववर्षी एक लाख शेततळी बांधण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत. जी केंद्र सरकारने गाभा समिती नेमली आहे. ज्यामध्ये आंध्रप्रदेश, आसाम, बिहार, पश्चिम बंगाल, पंजाब, गुजराथ, हरियाणा, तामिळनाडू, मध्यप्रदेश, छत्तीसगड राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसह केंद्रीय अर्थमंत्री श्री.प्रणव मुखर्जी, केंद्रीय कृषिमंत्री श्री.शरद पवार आणि नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष श्री.मॉंटेकसिंग अहुलूवालिया यांचा समावेश आहे. ही समिती अत्यंत समाधानकारक काम करीत असताना या वर्षीचा मान्सून ठीक नव्हता. तरी या सर्व राज्यांना अडचणीतून बाहेर काढण्याचा प्रयत्न केंद्र सरकार करीत आहे. विरोधकांकडे कोणताही मुद्दा शिल्लक नाही म्हणून केवळ जगाच्या तुलनेत महागाई कमी असताना, त्या महागाईतून देशाला बाहेर काढण्याचा प्रयत्न करीत असताना केंद्रीय मंत्री श्री.शरद पवार यांच्यावर टीका करणे एवढेच लक्ष्य उरलेले आहे. अशा प्रकारच्या टिकेला मी जाणीवपूर्वक विरोध करते. एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, 30 लाख टन गहू आणि तांदूळ खुल्या बाजारात आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एवढा समाधानकारक साठा आहे की, 1 एप्रिल, 2010 ला 1 कोटी 40 लाख टन धान्यसाठा उपलब्ध आहे. खरे म्हणजे 40 लाख टनाचे उद्दीष्ट असताना 1 कोटी 40 लाख टन उत्पादन येईल अशा प्रकारचा आशावाद आधारभूत किंमत वाढवून दिल्यामुळे शेतकऱ्यांनी व्यक्त केलेला आहे. तांदळाचा साठा 1.17 कोटी टन इतका आहे. उद्दीष्ट 72 लाख टनाचे होते. तरी उत्पादन वाढविण्याचे काम केले आहे. हे सर्व करण्याचा प्रयत्न होत असताना देशातील शेतकरी, बळीराजा आहे, जो देशाला वाचविण्याचे काम करतो, जे 70 टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत त्यांचा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे.....

विचार होत आहे. महागाईचा बाऊ करण्याचे कारण नाही. जगाच्या तुलनेत महागाई कमी आहे. शेती जगली पाहिजे, शेतकऱ्याला जगविले पाहिजे. विकासाचा दर वाढविला पाहिजे हे मान्य केले आहे. 30 टक्के लोकांच्या खिशात भरपूर पैसा आहे. 70 टक्के लोकांना जागविण्याचा प्रयत्न यशस्वीपणे केला जात आहे. सहाव्या वेतन आयोगाचा विषय असेल, मंदीची लाट असेल, या सर्व गोष्टींचा विचार करुन महागाई रोखण्यासाठी कर्जमुक्तीचा निर्णय घेतला, पतमर्यादा वाढवून दिल्यामुळे शेतकरी जगला. नाही असे नाही. या सर्व प्रयत्नांचा परिणाम म्हणून महागाईचा बागुलबूवा न करता काम करण्याचा निश्चित प्रयत्न करावा. ते काम करीत असताना बळीराजावर अन्याय होणार नाही याची दक्षता घेतली जावी अशी भावना व्यक्त करुन पुन्हा एकदा माननीय श्री.शरद पवार यांना टार्गेट करण्याच्या चुकीच्या प्रयत्नाबद्दल निषेध व्यक्त करुन माझे भाषण संपविते.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये महागाईच्या प्रश्नावर माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, विरोधाभास दाखविण्यासाठी मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार आणि सन्माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांनी सांगितले की, दोन वर्षे पुरेल एवढा धान्यसाठा उपलब्ध आहे. मागणी ज्यावेळी वाढते आणि आपल्याकडचा साठा कमी असतो त्यावेळी महागाई वाढते. एका बाजूला म्हटले जाते की, साठा दोन वर्षे पुरेल इतका आहे आणि दुसऱ्या बाजूला महागाई कमी साठ्यामुळे वाढत आहे. हा एका अर्थाने विरोधाभास आहे. असाच विरोधाभास म्हणजे शेतीमालाला भाव वाढवून दिल्यामुळे शेतकऱ्यांचा फायदा होणार आहे असे म्हटले जाते. साखरेची किंमत 38 रुपये किलो आहे. ती साखर गेल्या वर्षीच्या ऊसापासून निर्माण झालेली आहे. गेल्या वर्षी ऊसाला 1800 रुपये भाव शेतकऱ्यांना दिला गेला. मात्र साखर 38 रुपये किलो दराने विकली जात आहे. जवळजवळ 2000 रुपये प्रती क्विंटल भावामध्ये जो फरक आहे तो मधला फरक कोणाला मिळाला? हा विरोधाभास या चर्चेमधून लक्षात घेतला पाहिजे. एका बाजूला अर्थशास्त्र म्हणते की, मंदी असते त्यावेळेला स्वस्ताई असते. संपूर्ण देशात मंदी आहे. महागाई मात्र पराकोटीला पोहोचली आहे. आपण एखादे वक्तव्य करीत असताना ते वक्तव्य किंवा आपले म्हणणे लक्षात घेतले पाहिजे. शेतकऱ्यांना आपण फार सुखी करीत आहोत असा भास निर्माण करुन शेतकऱ्यांच्या हातात काही मिळालेले नाही. एका बाजूला दारिद्र्य रेषेखालील लोकांना आपण कार्ड देऊ शकत नाही.....

नंतर 3टी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील.

दुसऱ्या बाजूने 3500 ते 4000 रुपये दरमहा ज्यांचे उत्पन्न आहे ते दारिद्र्यरेषेच्या व्याख्येत बसत नाही म्हणून त्यांना पिवळी रेशन कार्ड्स मिळणार नाहीत. या अनुषंगाने मी अशी सूचना करणार आहे की, सन 2002 पासून दारिद्र्यरेषेखालील कार्डांची संख्या वाढलेली नाही. एका बाजूने या कुटुंबांचा सर्व्हे पूर्ण झालेला आहे, त्यांची यादी तयार आहे तरी देखील अद्यापही त्यामध्ये वाढ केली जात नाही, म्हणून शासनाने हा निर्णय लवकरात लवकर घ्यावा आणि ज्यांचे उत्पन्न 50 हजार रुपये वर्षाला असेल त्यांनाही दारिद्र्यरेषेची कार्ड मिळतील अशी या कुटुंबांची व्याख्या बदलली पाहिजे. तसेच नाशिक जिल्ह्यातील काही प्रमाणात वस्तुस्थिती सांगण्यात आली त्याच धर्तीवर कोल्हापूर जिल्ह्यात सुध्दा ज्या गावात पीडीएसचा कोटा दिला जातो त्यासंबंधीचे जिल्हाधिकाऱ्यांचे एसएमएस गावातील चार-पाच प्रतिष्ठित व्यक्तिंना जातात. त्यातून गावात पीडीएसचा कोटा आल्याचे गावात समजते, त्यामुळे यामध्ये भ्रष्टाचार होण्याचे प्रमाण कमी आहे. अशा प्रकारचे नवनवीन प्रयोग सर्व जिल्ह्यात सुरु केले तर या व्यवस्थेतील भ्रष्टाचार संपण्यास मदत होईल, अशी सूचना करुन माझे भाषण संपवितो.

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : महोदय, सदनात महागाईसंबंधी जो प्रस्ताव चर्चेला आणलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, सर्वसामान्य व गोरगरीब माणसाला ज्या रेशन दुकानांच्या मार्फत धान्य मिळते त्या दुकानांमध्ये मुळात धान्यच नसते, ते संपलेले असते असेच सातत्याने बघायला मिळते. शासनाच्या वतीने अनेक वेळा घोषणा केली जाते की, आम्ही सणासाठी तेल देणार, तूर डाळ देणार पण ते तेल आणि डाळ प्रत्यक्षात मिळतच नाही अशीच नेहमी लोकांची बोंबाबोंब असते. म्हणजे खऱ्या अर्थाने शासनच लोकांना फसविण्याचे काम करीत आहे असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही. ज्या ठिकाणी धान्य मिळायला हवे तेथे मात्र सडके धान्य असते ते सुध्दा घोषणा केल्याप्रमाणे मिळत नाही. आज या दुकानांमधून गरीब लोकांना 2 रुपये किलोने गहू देण्याची शासनाची योजना आहे पण दारिद्र्यरेषेखालील लोकांना अद्यापही पिवळी रेशन कार्डे मिळालेलीच नाहीत त्यामुळे शासनाच्या वितरण व्यवस्थेतील धान्य त्यांना मिळत नाही, पर्यायाने या योजनेच्या फायद्यापासून ते वंचित राहतात म्हणून अशी रेशन कार्डे मिळण्याबाबत शासनाने उपाययोजना करावी. जनगणनेचा विचार केला तर ती सध्या सुरु झालेली आहे. रेशन कार्डासाठी सुरुवातीला जे फॉर्म्स भरलेले होते ते गहाळ केल्यामुळे गरिबांना पुन्हा फॉर्म भरण्यास सांगितले जात आहे. त्यासाठी त्यांना 100 ते 500 रुपये एवढा खर्च करावा लागतो. अशा प्रकारे सिंधुदुर्ग जिल्ह्यात जवळपास 71 हजार कुटुंबांना रेशन कार्ड मिळालेले नाही, त्यासंबंधीची उपाययोजना करावी. त्याचबरोबर या जिल्ह्यात धान्य घोटाळा मोठ्या प्रमाणात गाजलेला आहे. यामध्ये 54 दुकानदार आणि जिल्हा पुरवठा अधिकारी व उप विभागीय अधिकारी यांनाही अटक झाली होती. 6 रुपये किलोऐवजी 12 रुपये किलोने हे धान्य विकणाऱ्या टोळीला पोलिसांनी अटक केली होती, त्यात वरिष्ठ अधिकारी, वर्ग-1 चे अधिकारी सुध्दा समाविष्ट होते. परंतु या वरिष्ठ अधिकाऱ्यांना शासनाने क्लिन चीट दिली व खास बाब म्हणून सोडून दिले. अशा प्रकारे एका बाजूने भ्रष्टाचार करणाऱ्यांना पोलिसांनी पकडले आणि गुन्हा नोंदविला असताना चार्जशीट दाखल करण्यासाठी शासनाकडे परवानगी मागितली असता तीन वर्षापर्यंत ती परवानगी दिलीच नाही. उलट त्यातून सहीसलामत सोडण्यात आले. सर्वसामान्य व गरिबांसाठी असलेल्या योजनेत भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यांना अशा प्रकारे धडा शिकविण्याऐवजी सोडण्याचा प्रयत्न होत असेल तर ही सार्वजनिक वितरण व्यवस्था चालू शकणार नाही, गरिबांना धान्य सुध्दा वेळेत मिळणार नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर ....

सभापती महोदय, रोजगार हमी योजनेवरील मजुरांना त्यांच्या मजुरीच्या 50 टक्के धान्य व 50 टक्के रोखीने पैसे उपलब्ध करुन दिले जातात. परंतु या मजुरांना ठेकेदार 50 टक्के धान्य न देता 100 टक्के रोखीने पैसे देतात व त्यांच्या नावाने जे काही धान्य असते ते धान्य काळ्या बाजारात नेऊन चढया भावाने विकून भरमसाठ पैसे कमावतात. आज ग्रामीण भागातील जनतेची अशा प्रकारे फसवणूक केली जात आहे. त्यामुळे यासंदर्भात उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र...

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, या ठिकाणी नियम 260 अन्वयेचा अतिशय महत्वाचा प्रस्ताव या ठिकाणी आणला गेला आहे. या महत्वाच्या प्रस्तावावर सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, श्री. दिवाकर रावते,डॉ. वसंत पवार, ॲड. गुरुनाथ कुलकर्णी, श्री. केशवराव मानकर, श्रीमती नीलम गो-हे, श्री. एस.क्यू.जमा, भगवान साळुंखे, डॉ. दीपक सावंत, श्रीमती उषा दराडे, श्री. चंद्रकांत पाटील, श्री. परशुराम उपरकर यांनी विचार मांडलेले आहेत. या प्रस्तावावर विचार मांडतांना अनेक महत्वाच्या सूचना सन्माननीय सदस्यांनी केलेल्या आहेत. महागाईच्या बाबतीत शासनाने कसे धोरण आखावे यासंदर्भात काही सन्माननीय सदस्यांनी अतिशय मौल्यवान सूचना केलेल्या आहेत. परंतु काही सन्माननीय सदस्यांनी हा विषय गांभीर्याचा असतांना सुध्दा त्यावर राजकीय भाष्य केलेले आहे ही दुर्दैवाची गोष्ट आहे. या सभागृतील काही सन्माननीय सदस्यांना शेतीचा अनुभव असल्यामुळे त्यांनी शेतीच्या संदर्भात अतिशय यांगल्या प्रकारे सूचना केलेल्या आहेत परंतु ज्या सदस्यांचा शेतीशी संबंध नाही अशा सन्माननीय सदस्यांनी सुध्दा शेतीवर बोलण्याचा प्रयत्न केलेला आहे. ज्यांना शेतीचा अनुभव नाही त्यांनी या विषयावर बोलण्याचा प्रयत्न केलेला आहे. आमच्या ग्रामीण भागात एक म्हण आहे ती मी आपल्याला सांगतो. "वाफेला आलेले जनावर आणि वापशाला आलेली शेती ज्याला कळते त्यांनीच त्या विषयावर बोलले बरे".

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रीमहोदय असे म्हणाले की, "ज्यांना शेतीचा अनुभव नाही त्यांनी शेतीच्या विषयावर बोलण्याचा प्रयत्न केलेला आहे" माननीय मंत्रीमहोदयांनी असे म्हणणे योग्य नाही.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, मी ग्रामीण भागातील म्हण सांगितलेली आहे. महागाईचा विषय हा फार महत्वाचा विषय आहे. महागाईच्या मुद्याच्या संदर्भात या ठिकाणी ज्या महत्वाच्या सूचना केलेल्या आहेत त्यांचे मी स्वागत करतो. आपल्या महाराष्ट्रात अनियमित पाऊस, अतिवृष्टी, कमी पाऊस यामुळे आपल्या राज्यात दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली होती ही वस्तुस्थिती आहे. यामुळे आपल्या महाराष्ट्रात मोठया प्रमाणात अन्नधान्याच्या उत्पादनात घट झाल्यामुळे महागाईची परिस्थिती निर्माण झाली होती. गहू, तांदूळ, साखरेच्या किमती यामुळे वाढल्या. काही सन्माननीय सदस्यांनी असे विधान केले की, महाराष्ट्रात जेव्हा जेव्हा काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता येते तेव्हा महागाई वाढते. महाराष्ट्रात महागाई आहे हे आम्ही मान्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख ...

करतो परंतु मला सन्माननीय सदस्यांना सांगावयाचे आहे की, महाराष्ट्र सोडून म्हणजे गुजराथ, कर्नाटक, छत्तीसगड, मध्यप्रदेश या ठिकाणी बीजेपीचे सरकार आहे. त्यानी ठिकाणी सुध्दा मोठया प्रमाणात महागाई आहे. (अडथळा) महाराष्ट्रात शिवसेना पक्ष आता चवथ्या स्थानावर गेलेला आहे.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख....

विरोधी पक्षाचे सरकार अनेक राज्यामध्ये आहे. तिथली परिस्थिती बघा. आज कर्नाटकमध्ये गव्हाचे भाव काय आहेत हे आपण बघा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मंत्रिमहोदय येथे सरकार म्हणून उभे आहेत. या राज्यातील जनतेला महागाई वाढत चालली असल्यामुळे दिलासा कसा काय देणार हे सांगितले पाहिजे. इतर राज्यांनी झक मारली म्हणून आम्हाला झक मारायची असे आपल्याला म्हणावयाचे आहे काय ? हा शब्द वापरावा लागत आहे त्यामुळे आपण मला माफ करावे. महागाई वाढल्यामुळे लोकांमध्ये प्रचंड चिड आहे.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी असंसदीय शब्द उच्चारला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हा असंसदीय शब्द नाही. It is bad in taste. तो शब्द मी जाणीवपूर्वक वापरला आहे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, मला संरक्षण द्यावे. कॉंग्रेस-राष्ट्रवादीचे सरकार आहे म्हणून महाराष्ट्रात महागाई आहे असे बोलल्यामुळे मला तसे रेकॉर्डवर आणावे लागले.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या राज्यातील सरकार महागाईला कारणीभूत आहे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, या राज्यातील सरकार महागाईला कशा प्रकारे तोंड देणार आहे, कशा पद्धतीने धोरण आखले आहे यासंबंधातील सविस्तर माहिती मी देणार आहे. विरोधी पक्षातील सदस्य अडीच तास बोलले आहेत. मला अर्धा तास तरी बोलू द्यावे. मी माननीय विरोधी पक्षातील सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण गुजरात, कर्नाटक, छत्तीसगड, मध्यप्रदेश येथे काय परिस्थिती आहे. या राज्यांची महागाईच्याबाबतीत महाराष्ट्राशी तुलना करावी. मग आपल्या लक्षात येईल की, महाराष्ट्रातील परिस्थिती अतिशय चांगली आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांना सांगू इच्छितो की, महागाईचा विषय हा कोणत्याही राज्यापुरता सीमित नाही. हा विषय आता आंतरराष्ट्रीय झालेला आहे. आपण अनेक देशांची उदाहरणे घ्यावित. आज आपण पाहतो की, पंजाब, हरयाणा, उत्तर प्रदेशमधील पश्चिम भाग, बिहार ही राज्ये देशातील हरित क्षेत्र म्हणून ओळखली जातात. येथे मोठ्या प्रमाणावर धान्य उत्पादन होते. पण गेल्या काही वर्षामध्ये तापमानामध्ये वाढ झाल्यामुळे या राज्यातील धान्योत्पादन कमी झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे. ही

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख ...

परिस्थिती भारतामध्ये आहे असे नाही तर आशिया खंडामध्ये देखील आहे. नेपाळ, चीन, पाकिस्तान या देशामध्ये तापमानवाढीमुळे धान्योत्पादन कमी झाल्याचे आढळून येत आहे. त्यामुळे हे देश देखील महागाईला मोठ्या प्रमाणावर तोंड देत आहेत, ही वस्तुस्थिती आहे. रशियामध्ये थंडी पडते. तापमानामुळे तेथे उलटा परिणाम झाला. तेथे तापमान वाढल्यामुळे थंडीचे प्रमाण कमी झाले. पर्यायाने धान्याचे उत्पादन वाढले. असे फार कमी देश आहेत. तथापि, अनेक देशामध्ये धान्योत्पादनात घट मोठ्या प्रमाणात झालेली आहे. त्यामुळे महागाई हा जागतिक प्रश्न झाल्यामुळे आपणा सर्वांना तोंड द्यावे लागत आहे, ही वस्तुस्थिती आहे. राज्याच्या महागाईवर बोलत असताना केंद्र शासनाच्या अनेक गोष्टींचा उल्लेख येथे करण्यात आला. केंद्रामध्ये श्री.मनमोहन सिंग यांचे सरकार आहे. त्यात श्री.शरद पवार हे कृषि मंत्री आहेत. केंद्र शासनाने जे महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत, त्याचा फायदा प्रत्येक राज्याला झालेला आहे. आज शेतकऱ्यांच्या कृषिमालाला देण्यात येणारी आधारभूत किंमत विचारात घ्यावी. 3-4 वर्षापूर्वी कापसाची आधारभूत किंमत प्रतिक्विंटल रूपये 1930 होती. तेव्हा शेतकऱ्यांच्या कापसाला 2100 ते 2300 रूपये भाव मिळत होता. त्यावेळी आमचे अनेक मित्र कापसाला 2700 रूपये भाव मिळाला पाहिजे अशी मागणी करीत होते.

यानंतर श्री.गायकवाड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख ..

त्यावेळी कापसाची आधारभूत किंमत 1930 रुपये होती. केन्द्रीय कृषी मंत्री श्री शरद पवार साहेबांनी कापसाची आधारभूत किंमत 1930 रुपयांवरुन 3000 रुपयापर्यंत वाढवली आहे व 3000 ते 3200 रुपयापर्यंत कापसाचा भाव मिळत आहे. कापसाला जास्त भाव मिळावा म्हणून आपल्याला रेल्वे रोको वा रास्ता रोको आदोलन पूर्वी करावे लागत होते ते आता करावे लागत नाही. आता कापसाला चांगला भाव मिळाला असल्यामुळे त्यांच्या पोटात दुखत आहे.त्यावेळी 2700 रुपये कापसाला भाव द्यावा याकरिता सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी विदर्भात व मराठवाडयात रास्ता रोकोचे आंदोलन केले होते व आज त्यांच्या पोटात दुखत आहेत. केन्द्र सरकारने शेतक-याच्या हितासाठी जे चांगले निर्णय घेतलें आहेत त्याचा फायदा होत असल्याचे दिसत असल्यामुळे आपल्याला आंदोलन करावयास मिळत नाही ही वस्तुस्थिती सन्माननीय सदस्यांनी लक्षात घेतली पाहिजे.

श्री.दिवाकर रावते : (बसून) पुढच्या वर्षी आपण पाहू या.....

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य माझ्या भाषणात अडथळे आणत असल्यामुळे मला आपण संरक्षण द्यावे.

तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे) : सन्माननीय मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, मी या ठिकाणी कापसाच्या आधारभूत किंमतीचे उदाहरण दिले आहे.कापसाला आज 3200 रुपयाचा भाव मिळत आहे....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय मंत्री शासन म्हणून उत्तर देत आहेत. जीवनावश्यक वस्तूंची महागाई असहय झालेली असल्यामुळे सर्वसामान्य जनता त्रस्त झालेली आहे. माननीय मंत्री महोदय कापसासंबंधी उत्तर देत आहेत. शेतक-याच्या कापसाला 3000 रुपये भाव मिळाला आहे परंतु हा भाव का मिळाला आहे हे आपण पुढच्या वर्षी पाहू. तो विषय आता बाजूला ठेवू या. आज जीवनावश्यक वस्तू महाग झालेल्या असल्यामुळे लोक हैराण झालेले आहेत त्यासबंधी मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, त्याही बाबतीत मी बोलणार आहे. कापसाला चांगला भाव मिळाला असल्यामुळे सन्माननीय सदस्यांना कदाचित दु:ख होत असेल. आता मी गव्हाच्या बाबतीत सांगू इच्छितो की..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरनाथ कुलकर्णी :सभापती महोदय, माझा पॉईट ऑफ इनफर्मेशन आहे. नियम 260 अन्वये विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर यांनी महागाईच्या संदर्भात चर्चा उपस्थित केलेली आहे उत्तराचे भाषण आता सुरु असून ते सभागृहात उपस्थित नाहीत तेव्हा सभागृहाच्या आजूबाजूला जर ते असतील तर त्यांना सभागृहात उपस्थित राहण्यास आपण सांगावे .

श्री.दिवाकर रावते (बसून) मी येथे उपस्थित आहे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की गव्हाची आधारभूत किंमत पूर्वी 650 रुपये होती परंतु आता गव्हाची आधारभूत किंमत 1080 रुपये झाली आहे त्यामुळे शेतक-यांना गव्हाचे चांगले भाव मिळत असल्यामुळे शेतकरी खूश आहेत.धानाची आधारभूत किंमत 600 रुपये होती पंरतु आता 980 रुपये अधिक 50 रुपये इतकी आधारभूत किंमत झाली आहे.त्यामुळे धान उत्पादक शेतक-यांना चांगले भाव मिळत आहेत.ज्वारीची आधारभूत किंमत पूर्वी 525 रुपये होती आता ज्वारीची आधारभूत किंमत 840 रुपये झाली आहे. केन्द्र सरकारने आधारभूत किंमती वाढविल्यामुळे शेतक-यांच्या कृषी मालाला चांगले भाव मिळत आहेत त्यामुळे शेतकरी सुखी आहे. केन्द्र सरकारने कृषी मालाच्या किंमती वाढविल्यामुळे त्याचा फायदा शेतक-यांना झाला आहे . त्यामुळे थोडीसा महागाईवर परिणाम झाला असेल. शेतक-याना चांगले भाव मिळत असल्यामुळे आपल्याला दु:ख होत आहे काय ? शेतक-यांच्या कृषी मालाला चांगले भाव मिळत असल्याने त्यांच्या हातात पैसे येत आहेत व त्यामुळे त्यांची परचेसिंग पॉवर देखील वाढलेली आहे ही महत्वाची गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे. भारत स्वातंत्र्य झाल्यापासून शेतक-याच्या दृष्टीने सर्वात महत्वाचा निर्णय केन्द्र सरकारच्या माध्यमातून मध्यंतरी घेण्यात आला होता व 70 ते 72 हजार कोटी रुपयांचे शेतक-यावरील कर्ज माफ करण्यात आले होते.

नंतर श्री.सारफरे s

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. अनिल देशमुख...

आपले सुध्दा केंद्रामध्ये सरकार असतांना आपण एक रुपयांची सुध्दा कर्जमाफी दिली काय? याबाबत विचार करण्याची आवश्यकता आहे...

(अडथळा)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनामधील माननीय सदस्यांनी या सरकारचे कौतुक करीत असतांना 72 हजार कोटींची कर्जमाफी केल्याचे म्हटले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी ते 72 हजार कोटी रुपये कुठे गेले? हे आपण सांगावे. एवढेच मला सभागृहापुढे मांडावयाचे आहे.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, मधल्या काळात माननीय पंतप्रधानांनी माननीय वित्तमंत्री, माननीय कृषी मंत्री यांची दिनांक 6 फेब्रुवारी रोजी दिल्ली येथे एक बैठक बोलाविली होती. त्या बैठकीला देशातील सर्व राज्यांचे माननीय मुख्यमंत्री व माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री उपस्थित होते. ही बैठक सकाळी 10.30 पासून सायंकाळी 5.30 वाजेपर्यंत झाली. त्यामध्ये देशातील महागाईवर चर्चा झाली. त्याबाबत देशातील वाढत्या महागाईबाबत कोणती उपाय योजना केली पाहिजे ? यासंबंधी सविस्तरपणे चर्चा झाली. त्या चर्चेमध्ये गुजरात राज्याचे मुख्यमंत्री माननीय श्री. नरेंद्र मोदी व मध्यप्रदेश राज्याचे मुख्यमंत्री माननीय श्री. शिवराज चौहाण हे दोन्ही भाजपचे मुख्यमंत्री उपस्थित होते. त्यांनी माननीय पंतप्रधानांसमोर जाहीररित्या सांगितले की, महागाई सर्व राज्यामध्ये आहे. याबाबत केंद्रीय कृषी मंत्री माननीय श्री. शरद पवार हे चांगले काम करीत आहेत. त्यामुळे महागाईच्या प्रश्नावर माननीय श्री. शरद पवार साहेबांना जबाबदार कां ठरविता असे माननीय श्री. नरेंद्र मोदी व माननीय श्री. शिवराज चव्हाण हे त्याठिकाणी बोलले याचे मला आश्चर्य वाटले. त्यांचे मिनिट्स माझ्याजवळ आहेत. श्री. नरेंद्र मोदी व श्री. शिवराज चौहान ने कहा कि मंहगाई के बारे में अकेले श्री. शरद पवार को ही क्यों जिम्मेदार ठहराया जाता है ?

माननीय श्री. शिवराज चौहाण हे मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री व भाजपचे नेते आहेत. अशाप्रकारे आपण बाहेर दुटप्पी धोरण ठेवीत आहात. ही गोष्ट सुध्दा आपण लक्षात ठेवली पाहिजे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेची 55 हजार दुकाने आहेत, त्या दुकानांच्या माध्यमातून राज्यातील सर्व लोकांना गहू, तांदूळ, साखर देण्याचे काम केले जाते. हे स्वस्त धान्य दुकानदार काही ठिकाणी प्रामाणिकपणे काम करतात, तर काही ठिकाणी स्वस्त धान्याचा काळाबाजार करतात ही वस्तुस्थिती मी मान्य करतो. यामध्ये गहू, तांदूळ, साखर,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/ SBT/ MMP/

श्री. अनिल देशमुख...

केरोसीनचा काळाबाजार करुन या वस्तू बाहेर विकल्या जातात. अशाप्रकारे मोठया प्रमाणामध्ये हे व्यापारी स्वस्त धान्य दुकानातील वस्तू काळया बाजारामध्ये विकतात. तसेच, या व्यवहारामध्ये अनेक पक्षांचे नेते देखील सामील आहेत. यामध्ये मी केवळ शिवसेना, भाजप या पक्षांचे नाव घेत नाहीतर सर्वच पक्षांच्या नेत्यांचा, कार्यकर्त्यांचा त्यामध्ये सहभाग आहे. त्यामुळे या वितरण व्यवस्थेमध्ये फार मोठया प्रमाणात भ्रष्टाचार सुरु आहे हे मी मान्य करतो. त्यामुळे या सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये संपूर्णत: पारदर्शकता कशी आणता येईल आणि ती अधिक सक्षम कशी करता येईल, त्यामधील असलेले दोष कसे दूर करता येतील हा महत्वाचा प्रश्न आपल्यासमोर आहे. त्यासाठी आपण धोरण तयार केले आहे. इतक्या मोठया प्रमाणावर सुरु असलेली संपूर्ण व्यवस्था मॅन्युअली तपासणे कठीण आहे. म्हणून त्याकरिता संगणकीकरणाच्या माध्यमातून बायो-मॅट्रिक पध्दतीने त्यामध्ये पारदर्शकता आणण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख . . . .

नॅशनल इन्फॉरमेटीक सेंटर म्हणजे एन.आय.सी. ही केंद्र शासनाची संस्था असून आम्ही त्यांची मदत घेत आहोत आणि एक वर्षाच्या आत महाराष्ट्रात बायो मेट्रीक पध्दतीने सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे कॉम्प्युटरायझेशन करण्यात येईल. त्यानंतर भारतातील महाराष्ट्र हे एकमेव राज्य असेल की ज्याठिकाणी सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे कॉम्प्युटरायझेशन करण्यात आलेले आहे. आम्ही केरोसीनचे वाटप टँकरव्दारे करतो, त्या टँकरवर जी.पी.एस.सिस्टीमचा म्हणजे ग्लोबल पोझिशनिंग सिस्टीम इन्स्टॉल करुन त्याचे कशा पध्दतीने ट्रॅपिंग करता येईल यादृष्टीने आम्ही अनेक जिल्ह्यांमध्ये याची सुरुवात केलेली आहे. डेपोमधून टँकर निघाल्यानंतर तो ज्या तालुक्यामध्ये जात असताना सर्वसाधारणपणे त्याला जर तीन तास लागत असतील, परंतु जर त्याला तेथे जाण्यासाठी सहा तास लागले किंवा तो टँकर त्या तालुक्यामध्ये का थांबला ? कुठे थांबला होता? इतका वेळ का लागला ? याचे यानिमित्ताने संपूर्ण ट्रॅपिंग करण्यास आम्ही सुरुवात केलेली आहे. त्याचा सुध्दा अतिशय चांगल्या प्रकारे फायदा होत आहे. तालुक्याच्या गोडाऊनमध्ये गहू, तांदूळ, साखर आल्यानंतर ते जर गावामध्ये पाठवावयाचे असेल तर त्या गावामध्ये एसएमएस व्दारे कळविण्याच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना अतिशय चांगली आहे. आम्ही ती सूचना लागू केली आहे आणि त्याची अगोदरच अंमलबजावणी सुरु केलेली आहे. एकदा आम्ही त्या गावामध्ये धान्य पाठविल्यानंतर लगेच त्या गावातील 25-30 माणसांना त्याबाबत एसएमएस करावयाचा की, तुमच्या गावामध्ये इतका तांदूळ, इतका गहू, इतके तेल, इतकी तूरडाळ पाठविलेली आहे. अशा प्रकारे त्या गावातील 20-25 माणसांना जरी समजले तरी मग सर्व गावातील लोकांना समजते की, आपल्याला गावामध्ये या वस्तू पाठविण्यात आलेल्या आहेत आणि मग त्याचे वितरण व्यवस्थित करता येते. तसेच सन्माननीय सदस्यांनी व्दारपोहोच योजनेच्या बाबतीत सांगितले. आम्ही दोन-तीन गावांमध्ये ही योजना प्रायोगिक तत्वावर चालविली आणि या योजनेच्याबाबतीत सुध्दा आम्ही चांगल्या प्रकारचे रिझल्ट मिळत आहेत.त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये एफ.सी.आय.च्या गोडाऊन पासून डायरेक्ट त्या-त्या गावामध्ये माल पोहोचविण्यासाठी व्दारपोहोच योजना सुध्दा राज्यामध्ये राबविण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत.त्यामुळे संपूर्ण सार्वजनिक वितरण व्यवस्था कशा प्रकारे सक्षम करता येईल, कशा प्रकारे पारदर्शक करता येईल यासाठी कॉम्प्युटरायझेशन,जी.पी.एस.,एसएमएस इ.सर्व गोष्टींचा आम्ही वापर करीत आहोत. कॉम्प्युटरायझेशन सिस्टीम देखील एक वर्षाच्या आत करीत

. . . .3 वाय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख . . . .

आहोत आणि जी.पी.एस. व एस.एम.एस.च्या योजनेस सुरुवात केलेली आहे.त्याचबरोबर जे व्यापारी मोठया प्रमाणात साठेबाजी करतात,त्यांच्यावर सुध्दा कडक कारवाई झाली पाहिजे हे मी पहिल्यांदाच सांगितले आहे.जे व्यापारी त्यांना जी मर्यादा निश्चित करुन दिलेली आहे,त्यापेक्षा गहू, तांदूळ इ.वस्तू साठवून ठेवतात अशा साठेबाजांवर कारवाई करण्याचे काम आम्ही करीत आहोत. मी आपल्याला सांगू इच्छितो की, 2009 मध्ये जवळजवळ 11,144 साठेबाजांवर छापे टाकले आणि त्यामध्ये आम्ही जवळजवळ 299 कोटी रुपयांचा माल जप्त केला.त्यामध्ये 73 व्यापाऱ्यांना अटक केली. 2002 मध्ये म्हणजे जानेवारी पासून ते मार्च-एप्रिल पर्यंत जवळजवळ 2077 ठिकाणी छापे टाकले आणि 78 कोटी रुपयांचा माल जप्त करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून त्याचे वितरण केले. त्यामध्ये 23 व्यापाऱ्यांना अटक केली. साठेबाजांवर महाराष्ट्र शासनाच्या आणि आमच्या खात्याच्या माध्यमातून कडक कारवाई करु.जो कोणी धान्याचा काळाबाजार किंवा साठेबाजी करण्याचा प्रयत्न करील,त्यांच्यावर सुध्दा आम्ही कडक कारवाई करु हे देखील मी प्रामुख्याने सांगू इच्छितो.

सभापती महोदय,साखरेची, अन्नधान्याची, आईल सीडचा स्टॉक करण्याच्या बाबतीत जी मर्यादा आहे,ती सुध्दा कशा पध्दतीने कमी करता येईल याबाबतीत आम्ही केंद्र शासनाला सूचना केली होती.सुरुवातीला एका व्यापाऱ्याकडील स्टॉक लिमिट 5000 क्वि.इतकी होती, ती लिमिट यासाठी कमी केली की तेवढया प्रमाणात माल गोडाऊनमध्ये रहात होता, तो बाजारामध्ये यावा. मग तो गहू असो,तांदूळ असो, तेलबिया असो, साखर या सर्वांची स्टॉक लिमिट कमी करण्याचा निर्णय घेतला. मी आपल्याला सांगू इच्छितो की, महाराष्ट्रामध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून बी.पी.एल.असो, अंत्योदय योजना असो किंवा ए.पी.एल.असो,आपण गेल्या आठ वर्षापासून अंत्योदय योजनेअंतर्गत 2 रु.कि.गहू आणि 3 रुपये कि.तांदूळ देतो.गेल्या आठ वर्षामध्ये त्यामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ केली नाही.बी.पी.एल.मधील जे लाभार्थी आहेत, त्यांना 5 रुपये प्रमाणे गहू आणि 6 रुपये प्रमाणे तांदूळ देतो. त्यामध्ये सुध्दा आठ वर्षामध्ये पाच पैशाची सुध्दा वाढ राज्य शासनाने केलेली नाही.त्याचबरोबर ए.पी.एल. योजनेअंतर्गत गहू, तांदूळाचा पुरवठा होत नव्हता.परंतु जेव्हापासून महागाई वाढलेली आहे, तेव्हापासून म्हणजे गेल्या चार-पाच महिन्यापासून ए.पी.एल.योजनेअंतर्गत सुध्दा कार्डप्रमाणे 15 कि.गहू,तांदूळाचा पुरवठा करीत आहेत.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख .....

जेव्हा पासून आपल्या राज्यामध्ये महागाई वाढली तेव्हा पासून साखर, तेल, तूरडाळ, गहू आणि तांदूळ या पाच वस्तूंच्या दरावर कशा पध्दतीने नियंत्रण आणता येईल आणि महाराष्ट्रामध्ये सवलतीच्या दराने कशा देता येतील यासाठी योजना राबविली. महागाई वाढल्यापासून त्यासाठी दरमहा 120 कोटी रुपये खर्च करतो. साखरेचे दर बाजारामध्ये 35 रुपये किलो असताना आम्ही ती साखर 20 रुपये किलो दराने अत्योदय, बीपीएल तसेच एपीएलच्या लोकांना देतो. तेलाचे दर बाजारामध्ये 40 ते 45 रुपये लीटर आहे. ते तेल आम्ही 30 रुपये दराने सर्व लाभार्थ्यांना देतो. तूरडाळीचे दर मोठ्या प्रमाणात वाढून 70 रुपये, 80 रुपये, 90 रुपये किलो पर्यंत दर गेले होते. ती तूरडाळ आम्ही 55 रुपये दराने देतो. 45 लाख टन तूरडाळीचे वाटप महाराष्ट्रामध्ये केले. त्यासंदर्भात काही प्रमाणात तक्रारी आल्या. एकदोन जिल्ह्यातून माझ्याकडे तक्रारी आल्या होत्या. त्या तक्रारींची दखल घेऊन त्यामध्ये दुरुस्ती केली. परंतु संपूर्ण राज्यामध्ये तूरडाळीचे भाव 90 रुपये, 100 रुपयांवर पोहोचले असताना महाराष्ट्र शासनाने सवलतीच्या 55 रुपये किलो दराने तूरडाळ दिली. आज तूरडाळीचे भाव कमी झाले आहेत. परंतु या पाचही वस्तू पुढील काळामध्ये कशा पुरविता येतील यादृष्टीने आम्ही प्रयत्न करु. आपण गहू, तांदूळ अतिशय सवलतीच्या दराने देतो. गेल्या पाच महिन्यांमध्ये, ऑगस्टपासून मार्चपर्यंत या संपूर्ण पाचही वस्तू सवलतीच्या दराने देण्यासाठी आम्ही 532 कोटी रुपये खर्च केलेले आहेत आणि मार्चपासून परत पुढे सहा महिने मुदतवाढ सुध्दा देण्यात आली आहे. पुढील सहा महिनेपर्यंत या पाचही वस्तू महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून अंत्योदय, बीपीएल तसेच एपीएलच्या लोकांना देण्यात येतील असे मी सांगू इच्छितो.

सभापती महोदय, केंद्र शासनाने प्रत्येक राज्याला सूचना दिलेल्या आहेत. केंद्र शासन मदत करते. महाराष्ट्र राज्याला केंद्र शासनाच्या माध्यमातून जवळजवळ 3 लाख 45 हजार मेट्रिक टन धान्य ज्याची किंमत 650 कोटी रुपये आहे एवढे धान्य दरमहा आपल्याकडे येते. या 3 लाख 45 हजार क्विंटल धान्याचे वितरण संपूर्ण महाराष्ट्रामध्ये करतो. हे करीत असताना केंद्र शासनाने प्रत्येक राज्याला सांगितले आहे की, केंद्र शासन प्रत्येक राज्याला मदत करते परंतु राज्यांनी सुध्दा या महागाईच्या बाबतीत स्वत: पुढाकार घेऊन काही आर्थिक बोजा उचलला पाहिजे. अशा सूचना

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख .....

केंद्र शासनाने प्रत्येक राज्यांना दिलेल्या आहेत. महाराष्ट्रासह चार पाच राज्यांनी यामध्ये पुढाकार घेतलेला आहे. आम्ही सांगितले की, 532 कोटी रुपये आम्ही या चारपाच महिन्यांमध्ये या जीवनावश्यक वस्तू स्वस्त दरात देण्यासाठी खर्च केलेले आहेत आणि पुढील सहा महिने ही योजना राबविणार आहोत. मधल्या काळामध्ये प्रधान सचिव आणि कमिशनर, इन्वेस्टमेंट अँड प्रोटोकॉल, केंद्र शासन, दिल्ली यांच्या माध्यमातून सर्व्हे झाला होता. प्रत्येक राज्यामध्ये 20 कलमी कार्यक्रम कशा पध्दतीने राबविला जातो, त्याचे जे इंडिकेटर्स आहेत ते कशा पध्दतीने राबविले जात आहेत याचा सर्व्हे झाला. त्यांनी महाराष्ट्रामध्ये सर्व्हे केला. बाकी राज्यांमध्येही त्यांनी सर्व्हे केला. त्यांनी सांगितले की, 20 कलमी कार्यक्रमांतर्गत 'Public Distribution System' च्या संदर्भात महाराष्ट्राच्या बाबतीत त्यांनी 'Very Good' असा उल्लेख केलेला आहे. याअंतर्गत त्यांनी अंत्योदय, एपीएल, बीपीएल, ॲफॉरेस्टेशन आणि प्रधानमंत्री ग्राम सडक योजना या पाच योजनांच्या बाबतीत त्यांनी 'Very Good' असा उल्लेख केला आहे. आपण या ज्या पाच वस्तू सवलतीच्या दराने देतो त्याचाही त्यांनी उल्लेख केला आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी साखरेच्या बाबतीत अडचणी सांगितल्या. साखर मिळत नाही असे सांगितले. महाराष्ट्रामध्ये आपण ज्या पध्दतीने साखरेचे वितरण करतो त्यामध्ये बाजारात साखरेचा दर 35 रुपये किलो असताना आपण ती साखर 20 रुपये किलो भावामध्ये देतो.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख....

केंद्रीय ग्राहक व संरक्षण मंत्रालयाचे श्री.एन.सन्याल यांनी राज्य सरकारांना जे पत्र पाठविले आहे त्या पत्रातील एक परिच्छेद मी सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी वाचून दाखवितो. त्या पत्रात असे नमूद केले आहे की,"The Central Government is aware that some State Governments like Maharashtra, Kerala, Tamilnadu, Madhya Pradesh, Andhra Pradesh have undertaken market intervention by way of procuring sugar from sugar mills directly or imports and are releasing the same at subsidized prices to consumers in their respective States. This measure is very commendable.." खास करुन कमांडेबल या शब्दाचा उल्लेख केलेला आहे. त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, "...as such measure only add to the efforts of the state Government to make sugar available to household consumers at affordable rates." सन्माननीय सदस्यांना या पत्राची प्रत देऊ इच्छितो. केंद्र सरकारने या पत्रात प्रामुख्याने 5 राज्यांचा उल्लेख केलेला आहे. त्यामध्ये महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक दाखविला आहे, हे सन्माननीय सदस्यांनी समजून घेतले पाहिजे. (अडथळा) कमांडेबल या शब्दाचा असा अर्थ आहे की, महाराष्ट्र सरकारने पुढाकार घेऊन खुल्या बाजारात साखरेचे दर 35 रुपये, 40 रुपये असताना देखील सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत ती 20 रुपये दराने दिली आहे. त्यामुळे कमांडेबल हा शब्द वापरला आहे. यामध्ये केवळ महाराष्ट्र राज्याचा उल्लेख नाही तर केरळ, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, मध्य प्रदेश या राज्यांचा समावेश आहे. मध्य प्रदेश मध्ये भारतीय जनता पक्षाची राजवट आहे. त्यामुळे त्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे भारतीय जनता पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी अभिनंदन केले पाहिजे. शासनाने 5 जीवनावश्यक वस्तू सवलतीच्या दरामध्ये कशा देता येतील यावर लक्ष केंद्रीत केलेले आहे. सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी असा उल्लेख केला की, या वर्षाच्या अर्थसंकल्पात महागाईला आळा घालण्यासाठी काहीच तरतूद केली नाही. सन्माननीय वित्त मंत्र्यांचे भाषण आपण ऐकले असेल. त्यावेळी 5 जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती स्थिर ठेवण्यासाठी 1550 कोटी रुपयांची तरतूद केली असल्याचे सांगितले आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख....

सभापती महोदय, याठिकाणी बोगस रेशन कार्डांचा विषय उपस्थित केला आहे. बोगस रेशन कार्डे केवळ महाराष्ट्रातच आहेत असे नाही तर देशातील इतर राज्यातही आहेत. बोगस रेशन कार्डांवर नियंत्रण आणण्यासाठी जानेवारी, 2010 मध्ये शासनाने धडक योजना राबविली आहे. ती योजना आता अंतिम टप्प्यात आहे. राज्यामध्ये 20 लाख बोगस रेशन कार्डांचा तपास लागेल असे वाटते. ही सर्व रेशन कार्डे रद्द करण्यात येतील. सभापती महोदय, बीपीएल कार्डासंबंधी सन्माननीय सदस्यांनी विचार मांडले आहेत. बीपीएल कार्डासंबंधी जे बोलले गेले ती वस्तुस्थिती आहे. कारण बीपीएल कार्डासाठी प्रथम 1997 साली सर्व्हे झाला होता. आज 1997 च्या सर्व्हेनुसार लाभार्थ्यांना लाभ मिळत आहे. त्यानंतर 2002 मध्ये सर्व्हे झाला होता. या दोन्ही सर्व्हेबद्दल शंका घेतल्या जात आहेत. त्यामुळे पुन्हा लवकरात लवकर बीपीएलचा सर्व्हे केला जाणार आहे. या बीपीएलच्या यादीमध्ये ज्यांची नावे यावयास पाहिजे होती ती आली नाहीत आणि ज्यांची नावे यादीमध्ये यावयास नको होती त्यांची नावे आली आहेत. म्हणून चुकीच्या सर्वेक्षणानुसार बीपीएलची कार्डे दिली आहेत ती रद्द करण्याची मोहिम राबविली जाईल. राज्यामध्ये परित्यक्ता महिला आहेत, निराधार महिला आहेत त्यांनी बीपीएल कार्डाची मागणी केली आहे. देवदासी महिला आहेत त्यांनी मागणी केली आहे. सरकारकडे बीपीएल कार्डासंबंधी मोठया प्रमाणावर निवेदने येत आहेत. रिक्षावाले, टांगेवाले यांच्याकडून बीपीएल कार्डाची मागणी येत आहे. तृतीयपंथीयांकडून बीपीएल कार्डाची मागणी केली जात आहे.

यानंतर श्री.शिगम.....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अनिल देशमुख...

मतिमंदांना देखील बीपीएल कार्ड देण्याची मागणी केलेली आहे. देवदासी भगिनी देखील बीपीएलचे कार्ड देण्याची मागणी घेऊन आल्या होत्या. राज्यातून बीपीएल कार्डाची मागणी अनेक स्तरातून फार मोठ्या प्रमाणावर होत आहे. या सर्व मागण्या शासनाच्या विचाराधीन आहेत.

सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी वृध्दांचा प्रश्न मांडला. वृध्दांसाठी संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ निराधार योजना या दोन योजनांच्या माध्यमातून प्रतिवर्षी 1 हजार रु. पर्यन्तचा लाभ देण्यात येतो. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी गव्हाच्या संदर्भात रिपोर्ट मागितला. त्या प्रकरणी चौकशी चालू असून या सभागृहासमोर त्यासंबंधीचा अहवाल सादर करण्यात येईल. राज्यात नवीन ग्राहक संरक्षण आयोग केलेला असून तेथे कोणताही अधिकारी नाही असे सांगण्यात आले. त्या आयोगावर श्री. म्हसे नावाचे निवृत्त न्यायाधीश काम करीत आहेत. त्यांच्या अखत्यारित तो आयोग सुरु आहे. याठिकाणी हेल्पलाईनची सूचना करण्यात आली. हेल्प लाईनचा प्रस्ताव केन्द्र शासनाकडे पाठविलेला आहे मुंबईमध्ये तशा प्रकारची हेल्प लाईन चालू करण्यात येत आहे. अधिकची माहिती मिळविण्यासाठी लाभधारकांना या हेल्प लाईनचा फायदा होईल. या महागाईला तोंड देण्यासाठी जे काही करायला पाहिजे ते सर्व चांगल्या पध्दतीने सरकार करीत आहे. त्याचे फायदे देखील दिसत आहेत. 5 जीवनावश्यक वस्तू सवलतीच्या दरात उपलब्ध करुन देत असल्यामुळे अेपीएल, बीपीएल आणि अंत्योदय लाभार्थींना लाभ मिळेल. या महागाईला कसे तोंड देता येईल या दृष्टीने योजना आखून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करीत आहोत. या महागाईच्या प्रश्नावर सरकार जागरुक आहे. या महागाईला सरकार अतिशय चांगल्या पध्दतीने तोंड देत आहे एवढेच या अल्पकालीन चर्चेच्या निमित्ताने मी सांगू इच्छितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी घरी गेल्यानंतर मी सभागृहामध्ये जे जे काही मुद्दे मांडले त्यासंदर्भात काही चिंतन केले तर बरे होईल. माननीय मंत्री महोदयांनी हातात भोपळा दिला असता तरी त्याचा काही तरी उपयोग झाला असता. परंतु तो देखील दिला नाही. सरकार किती कार्यक्षम आहे हे माननीय मंत्री महोदयांनी आपल्या भाषणातून येथे मांडण्याचा प्रयत्न केला. नफेखोरीच्या संदर्भात बोलताना त्यांनी आकडेवारी दिली 2002 पासून 11244 लोकांवर कारवाई करण्याचा प्रयत्न केला. 238 जणांना अटक केली. परंतु गेल्या 8 वर्षात एकालाही शिक्षा झाल्याचा उल्लेख नाही. पंडित नेहरुंनी साठेबाजांना फासावर चढवा असा संदेश दिला होता. गोडाऊन ते बाजार याचा उल्लेख आपण केला मात्र इतर अनेक योजनांचा उल्लेख केला नाही. शेवटी बनावट रेशन कार्डांचा उल्लेख केला. 22 लाखाच्या वर बोगस रेशनिंग कार्डस् देण्यात आली. परंतु ही बोगस रेशनिंग कार्डस् देणा-या अधिका-यांना शोधून काढून त्यांच्यावर कारवाई व्हायला पाहिजे. या ठिकाणी आम्ही सामान्य जनतेच्या व्यथा मांडलेल्या आहेत. माननीय मंत्री महोदयांचा प्रशासनाला धाक आहे, अधिका-यांना धाक आहे असे काही त्यांच्या भाषणातून जाणवले नाही.

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .....

बनावट रेशन कार्ड निर्माण झाली हे सांगत असताना 5-25 अधिकाऱ्यांना सेवेतून काढून टाकले असे सांगितले असते तर धाक निर्माण झाला असता. ते तुम्ही सांगू शकला नाहीत. सर्वसामान्य माणूस महागाईत होरपळतो आहे. ही चर्चा फक्त बीपीएल संदर्भातील नव्हती. सर्वसामान्य माणूस महागाईने होरपळून जात आहे, त्यांच्याबद्दल काहीही न सांगता बीपीएलचे कौतुक केले. त्यांना महागाईच्या काळात स्वस्त दरात धान्य उपलब्ध करुन दिले जाते हे सांगितले. यासाठी 1550 कोटी रुपयांची तरतूद गेल्या वर्षी केली होती. सरकारने यासाठी सबसिडी दिली आहे. लोकांच्या करातून तुम्ही गोळा केलेला पैसा या योजनेसाठी खर्च करीत आहात. त्यांना स्वस्त दरात धान्य मिळत असले तरी सरकार महागाई कमी करीत नाही. कौतुक काय सांगितले? 1997 मध्ये बीपीएलचे सर्वेक्षण झाले. 2002 मध्ये सर्वेक्षण झाले. 2007 मध्ये सर्वेक्षण करणार होतात. बीपीएलची मागणी वाढत आहे. म्हणजे महाराष्ट्रात दारिद्र्याने पिचलेले लोक वाढत आहेत. त्यांच्या स्वस्त दराने धान्य देण्याचा प्रयत्न करीत आहोत हे सांगितले. शेवटी सांगताना चुकीचे बोललात. केंद्रीय मंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी वक्तव्य केले की, तृतीय पंथियांना न्याय मिळवून दिला. तुम्ही सांगितले की, तृतीयपंथी आणि निराधार महिला एकत्रपणे मागणी करतात. आपल्या भाषणातून महाराष्ट्रात संदेश जाईल, महागाई कमी करता येईल यासाठी तुम्ही काय करीत आहात हे सांगितले जाईल अशी अपेक्षा होती. परंतु मंत्रीमहोदय एवढे हुशार आहेत की, ते जगामध्ये पोहोचले. चीनमध्ये काय चालले आहे, अमेरिकेत काय चालले आहे, अमुक काय, तमुक काय हे सांगितले. आमच्या गोरगरीब जनतेला आपल्या भाषणातून काही मिळाले नसले तरी किमान तिरडी तरी स्वस्त करा. ती सुध्दा स्वस्त करु शकला नाहीत. आपल्या भाषणातून काही देऊ शकला नाहीत, काही उत्तर मिळाले नाही हे दुर्दैव आहे. म्हणून अत्यंत नाईलाजाने सरकारच्या या महागाईच्या संदर्भात तीव्र वेदना व्यक्त करुन तुमचा निषेध करुन आम्ही सभात्याग करीत आहोत.

(विरोधी पक्षाच्या सदस्यांनी बहिर्गमन केले)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब यांनी आमचे उत्तर ऐकून सभागृहाबाहेर जावे. माननीय सदस्यांनी जो विषय मांडला त्याबाबत मी मघाशी सांगितले की, जीवनावश्यक वस्तू कायद्यांतर्गत 78 लोकांना अटक केली आहे. अटक केल्यानंतर न्यायालयीन कारवाई न्यायालयात चालू राहते. किती लोकांना अटक केली, किती केसेस दाखल केल्या, किती धाडी टाकल्या याची मी माहिती दिली. जीवनावश्यक वस्तू कायद्याची अंमलबजावणी करीत आहोत. बनावट रेशनकार्डाबाबत मी सांगितले आहे. बनावट रेशनकार्डे म्हणजे बाहेरुन प्रिंट करुन त्यावर नावे घालून वाटप केली जातात. अशाप्रकारची 20 ते 22 लाख रेशनकार्डे सापडली. ती सर्व कार्डे रद्द केली आहेत. त्याचबरोबर निराधार महिला आणि परितक्त्यांना सवलत देतो. निराधार आणि परितक्त्याप्रमाणेच बिडी कामगार, बंद पडलेल्या गिरण्यातील कामगारांना सवलत देतो. इतक्या मोठया प्रमाणात मागणी येत आहे. तृतीयपंथी, देवदासी महिलांकडून मागणी येत आहे. याबाबत केंद्र शासनाच्या नियोजन आयोगाचे आम्हाला टार्गेट दिलेले आहे. त्या टार्गेटच्या वर आम्हाला बीपीएलची यादी नेता येत नाही. महाराष्ट्र हे कल्याणकारी राज्य आहे. बीपीएलची संख्या वाढत नसून ती कमी झालेली आहे. टार्गेटवर आम्हाला जाता येत नाही. आणखी मागणी असली तरी विचाराधीन आहे. त्याचा आम्ही अवश्य विचार करु एवढेच मी याठिकाणी सांगू इच्छितो.

तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे) : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला आहे.

अशुधारित प्रत / शुद्धीपत्र नाही

पृ.शी.: वेतन प्रदान व किमान वेतन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक

मु.शी.: L.C.BILL No. V OF 2010.

(A BILL FURTHER TO AMEND THE PAYMENT OF WAGES ACT, 1936 AND THE MINIMUM WAGES ACT, 1948, IN THEIR APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री.पद्माकर वळवी (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2010 चे वि.प.वि.क्रमांक- 5 वेतन प्रदान अधिनियम, 1936 आणि किमान वेतन अधिनियम, 1948, महाराष्ट्र राज्यात लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

नंतर 4डी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पद्माकर वळवी.....

महोदय, हे विधेयक किमान वेतन प्रदान अधिनियमातील कलम 11 (1) मध्ये जी तरतूद आहे त्यामध्ये कामगारांचे किमान वेतन रोखीने देण्यात येईल अशी तरतूद आहे. त्याचप्रमाणे वेतन प्रदान अधिनियम, 1936, कामगारांना वेतन देण्याची तरतूद आहे त्यातील कलम 6 च्या अंतर्गत अंमलबजावणी होत असताना शासनाच्या यंत्रणेला असे निदर्शनास आले की कामगारांना देय असलेली जी रक्कम आहे, जी नगदी रक्कम आहे ती वेळेवर व योग्य प्रकारे दिली जात नाही तसेच जे वेतन देण्यात येते ते सुध्दा अंशत: देऊन त्यांची पिळवणूक करतात. त्याचबरोबर वैधानिक दायित्व सुध्दा कामगारांना पुरेसे मिळत नसल्यामुळे त्यांना अशा वैधानिक लाभांपासून वंचित ठेवले जाते अशा प्रथा बंद करण्यासाठी शासनाने मंत्रिमंडळात असा निर्णय घेतला आहे की ज्या रकमा कामगारांना द्यावयाच्या असतात त्या रोखीने देण्यापेक्षा बँकेमार्फत देण्याबाबत देण्याबाबत हे विधेयक आणलेले आहे. यामध्ये रोख रक्कम देण्याऐवजी बँकेमार्फत देण्याची तरतूद करण्यात आली आहे. यासंदर्भात मंत्रिमंडळाने निर्णय घेतला असून या कायद्याच्या अमलबजावणीसाठीच हे विधेयक आणलेले आहे. या निर्णयानुसार ज्या कामगारांचे सेवा वेतन प्रदान अधिनियमांतर्गत होत आहे, जे कामगार कायम वेतन अधिनियमाद्वारे नियमित असतील आणि ज्यांचे वेतन दरमहा 3 हजारापेक्षा जास्त असेल अशा सर्व कामगारांना रोखीने वेतन देण्यापेक्षा बँकेमार्फत रक्कम अदा करण्यात येत आहे. यामध्ये कृषी क्षेत्राला वगळण्यात आले असून इतर सर्व क्षेत्रांना हा अधिनियम लागू होणार आहे. राज्यातील ठाणे जिल्ह्यात असा पायलट प्रोजेक्ट शासनाने सुरु केला आहे. ठाणे जिल्ह्यात जे कामगार आहेत त्यांची सेवा नियमित नसेल किंवा ज्यांना 3 हजारपेक्षा जास्त वेतन मिळत नसेल अथवा वेतनाची रक्कम कमी-जास्त असेल अशा सर्व कामगारांना रोखीने वेतन देण्याऐवजी बँकेमार्फत अशी रक्कम देण्यात येणार आहे. त्यानंतर संपूर्ण राज्यात हा निर्णय लागू करण्यात येईल. सर्वसाधारणपणे सलग सेवा आणि 3 हजारपेक्षा जास्त रक्कम अशा दोन्ही गोष्टी यामध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत. हा एक क्रांतिकारी स्वरुपाचा निर्णय असून त्यामुळे कामगार क्षेत्रात महाराष्ट्र राज्य हे देशातील पहिलेच राज्य असेल की ज्या राज्याने कामगारांना वेतन अदा करण्यासंबंधीची योजना लागू केली आहे. यामुळे मालकांकडून कामगारांची जी पिळवणूक होत आहे ती थांबणार आहे. अशा प्रकारे संपूर्ण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पद्माकर वळवी .....

राज्यातील दीड कोटी संघटित व असंघटित कामगारांना या कायद्याचा लाभ मिळणार आहे म्हणून हे अत्यंत महत्वाचे विधेयक असून त्याला सभागृहाने मान्यता द्यावी अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : महोदय, सन 2010 चे विधेयक क्र. 5 च्या संदर्भात माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

वेतन प्रदान अधिनियम, 1936 आणि किमान वेतन अधिनियम, 1948 यामध्ये 3 हजारपेक्षा कमी असलेले वेतन, कदाचित ते कायम असतील अथवा नसतील अशा कामगारांना देण्यापेक्षा बँकेत खाते उघडून त्यांना मासिक वेतन बँकेद्वारे देण्यासंबंधीचे हे विधेयक आहे. किमान वेतन जे 3200 अथवा 3000 असेल तेवढे वेतन बँकेतून कामगार काढू शकतो काय हा सुध्दा संशोधनाचा विषय आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ....

त्या कंपनीला जर रविवारी सुट्टी असेल तर या ठिकाणचा कामगार बँकेत जाणार कधी व बँकेतून पैसे काढणार कधी ? खरे म्हणजे बँकेतून पगार काढावयाचा असेल तर त्याला एक दिवस सुट्टी घेऊनच पैसे काढावे लागणार आहे. विधेयकाच्या उद्देश व कारणामध्ये असे म्हटले आहे की, "अंमलबजावणी यंत्रणेच्या वांरवार असे निदर्शनास आले आहे की, "उक्त अधिनियमांन्वये प्रदान करण्यात येणारी रक्कम काही नियोक्ते देत नाहीत किंवा अंशत: देऊन कामगारांची पळवणूककरतात." या विधेयकामुळे कामगारांना धनादेशाद्वारे पगार मिळणार आहे. या कायद्यामुळे आपण कामगारांची सोय नाही तर कामगारांची उलट पिळवणूकच करणार आहात. तुम्हाला यावर जर कंट्रोल करावयाचे असेल तर मालकांसाठी काही तरी नियम बनवण्याची आवश्यकता आहे. जे मालक कामगारांना अंशत: पगार देऊन कामगारांची पिळवणूक करतात अशा मालकांसाठी नियम बनवण्याची आवश्यकता आहे. खरे म्हणजे मालकांवर कारवाई झाली पाहिजे. या बिलामुळे कामगारांला पगार आणण्यासाठी एक दिवसाची सुट्टी घ्यावी लागेल व त्यामुळे या कामगाराचा एक दिवसाचा पगार बुडणार आहे. काही कंपन्यांमध्ये 50-100 कामगार असतात त्या ठिकाणी कामगाराचे किमान वेतन 3000 हजार रुपये आहे अशा कंपनीतील कामगारांची संख्या विचारात घेण्याची आवश्यकता आहे. ज्या बँकेत कामगाराचे खाते उघडले जाणार आहे ते खाते उघडण्यासाठी पैसे कोण टाकणार आहे ? खाते उघडण्यासाठी मालक पैसे देणार आहे याचा काही सुध्दा उल्लेख विधेयकात नाही. कामगाराचे वेतन 3500 रुपये असेल आणि त्याने खाते उघडल्यानंतर त्याच्या पदरात 3000 रुपये पडतील. मालकाच्या पैशातून कामगाराचे खाते उघडले गेले पाहिजे. आपण वेतन प्रदान अधिनियम, 1936 आणि किमान वेतन अधिनियम, 1948 महाराष्ट्रास लागू असतांना त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता हे विधेयक आणलेले आहे. किमान वेतनावर एखाद्या कामगाराला घेतल्यानंतर त्याला तुम्ही किती वर्षे किमान वेतनावर ठेवणार आहात ? कंपनीत कामगाराला 5-10 वर्षे झाली तरी सुध्दा तो किमान वेतनावरच असतो. महाराष्ट्रातील एमआयडीसी मध्ये काम करणारे जे कामगार आहेत ते वर्षानुवर्षे किमान वेतनावरच काम करीत आहेत. त्यामुळे यासंदर्भात ख-या अर्थाने नियम बनवण्याची आवश्यकता आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ....

कामगारांची पिळवणूक थांबवायची असेल तर त्यासाठी कामगाराच्या सोयीसाठी कायदे बनविण्याची आवश्यकता आहे. एखादी व्यक्ती कामाला लागल्यानंतर पहिल्या सहा महिन्यापर्यंत तो किमान वेतनावर राहिला पाहिजे सहा महिन्यानंतर त्याच्या किमान वेतनात वाढ झाली पाहिजे किंवा तो पर्मनंट होईल. कामगार पर्मनंट झाल्यावर त्याचा पगार वाढतो परंतु याविधेयकात यासंदर्भात काही सुध्दा म्हटलेले नाही. हा कामगार रिटायर्ड होईपर्यंत तो किमान वेतनावरच असतो.

मी युनीयन लिडर म्हणून काम केलेले आहे त्यामुळे अनेक ठिकाणची मॅनेजमेंट छातीठोकपणे सांगते की, माझ्या कंपनीमध्ये मी कायदा सोडून काही सुध्दा करीत नाही. त्यामुळे हे कंपनीवाले कामगारांना किती वर्षापर्यंत किमान वेतन देणार आहेत ? याचा आपण विचार केलेला आहे काय ? कामगाराचे वय 45 वर्षे होत आले तरी तो किमान वेतनावरच राहणार आहे. तो पर्मनंट होणार कधी, त्याला ग्रॅच्यूईटी मिळणार कधी, प्रॉव्हीडंट फंड मिळणार कधी ? यासंदर्भात विधेयकात काहीही माहिती देण्यात आलेली नाही. या विधेयकामुळे कामगाराला फायदा न होता कामगाराची पिळवणूक होणार आहे आणि मालकांना, व्यवस्थापनाला व आस्थापनाला या विधेयकामुळे सूट मिळणार आहे. कामगाराची पिळवणूक थांबविण्यासाठी, कामगाराचे शोषण थांबविण्यासाठी या विधेयकाद्वारे कामगाराचा धनादेश बँकेत टाकला म्हणजे आपण कामगाराला प्रोटेक्ट करतो असा त्याचा अर्थ होत नाही त्यामुळे या विधेयकावर बोलत असतांना कामगाराच्या किमान वेतनात फरक करण्याची गरज आहे. वेतन प्रदान अधिनियमामुळे ज्या आस्थापनामध्ये, ज्या व्यवस्थापनामध्ये 500 पेक्षा किंवा 1000 कामगार ज्या ठिकाणी काम करतात त्या कंपन्यामध्ये पूर्वी 1 तारखेला किंवा 7 तारखेला पगार होत होता व तो पगार होतांना कामगारांना कॅश रुपात मिळत होता. मी आपल्याला उदाहरण देतो की, कोकाकोला कंपनी, पार्ले गोल्ड स्पॉट कंपनीमध्ये पगाराच्या दिवशी जास्त कामगार उपस्थित असल्यामुळे त्यांना सुरक्षा प्रोव्हाईड करुन बँकेतून कॅश आणावी लागत होती. ही कॅश रस्त्यावर लुटली जायची. 2-3 वेळेस पार्ले ग्लुकोज, कोकाकोलाची कॅश लुटण्यात आलेली आहे.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर ....

बँकेमधून कामगारांना पगार मिळणार आहे, यामुळे मॅनेटमेंटचा खर्च कमी होणार आहे. त्यामुळे हे विधेयक कामगारांचे आहे की, मालकांना खूष करण्यासाठी आहे याचा विचार करण्याची गरज आहे. ज्या कंपनीमध्ये 500 ते 1000 कामगार काम करतात त्यांच्या पगारापोटी व्यवस्थापनाला 10 ते 15 कोटी रूपयाची रोख रक्कम आणावी लागते. कामगारांच्या पगाराची तारीख निश्चित केलेली असते. 7 ते 10 तारखेच्या दरम्यान कामगारांचे पगार होतात. ज्या दिवशी पगार असतो त्या दिवशी मॅनेजमेंट लवकर निघू शकत नाही. त्यामुळे या विधेयकाचा फायदा कामगारांना नसून मॅनेजमेंटलाच जास्त होणार आह. कामगारांची पिळवणूक थांबवायची असेल तर कामगारांना पहिल्या वर्षी मिनिमम वेजेस दिले पाहिजे आणि एक वर्ष झाल्यानंतर त्यास नियमित वेतन मिळाले पाहिजे. ज्या कामगारांचे वेतन पाच हजार रूपयापर्यंत आहे, त्यांना धनादेशाद्वारे वेतन न देता रोख स्वरूपात द्यावे अशा प्रकारची मी विनंती करीत आहे. तसेच जे मालक कामचुकारपणा करतील त्यांच्यासाठी कडक नियम शासनाने बनवावेत अशी देखील मी विनंती करीत आहे. या विधेयकातील उद्दिष्ट व कारणे ही परिपूर्ण नाहीत त्यामुळे मी या विधेयकाला विरोध करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

.....

यानंतर श्री.तालेवार....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद ज़मा (विधान सभा सदस्यों द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, विधान परिषद विधेयक क्रमांक 5 - वेतन प्रदान व किमान वेतन विधेयक पर मैं अपने विचार व्यक्त करने के लिए खड़ा हूं. वेतन प्रदान अधिनियम, 1936 के सेक्शन 6 और किमान वेतन अधिनियम, 1948 (1948 का 11) के सेक्शन 11 में संशोधन किया जा रहा है. इस विधेयक के सेक्शन 2 में यह लिखा है कि, "...all wages payable to the employed persons, who are in continuous service as stipulated in section 25B of the Industrial Disputes Act, 1947." यह कांट्राडिक्टरी लगता है. क्योंकि पेमेंट ऑफ वेजेस एक्ट, 1936, मिनिमम वेजेस एक्ट, 1948 और इंडस्ट्रीयल डिस्प्यूट ॲक्ट, 1947 में वर्कर की डेफीनेशन अलग अलग है. वर्कर्स को चेक से पगार देने संबंधी संशोधन करने के बाद अब 3000 या 3000 से ज्यादा वेतन पाने वाले मजदूरों को चेक से वेतन दिया जाएगा. जो परमानंट मजदूर है उनको चेक से वेतन दिया जाएगा. मैं यह जानना चाहता हूं कि क्या असंगठित मजदूरों को इस सुविधा का फायदा मिलेगा ? मैं यह समझना चाहता हूं कि जो असंगठित मजदूर है या जो परमानेंट वर्कर नहीं है, जो अस्थायी मजदूर है, जो ठेकेदारी पर मजदूरी कर रहा है और ऐसे मजदूरों की संख्या बहुत ज्यादा है, इन सब मजदूरों को इस सुविधा का लाभ कैसे मिलेगा ? सम्माननीय सदस्य श्री पावसकर जी ने अभी औद्योगिक विवाद अधिनियम, 1947 के संदर्भ में यहां जो बताया है, उससे मैं सहमत हूं. औद्यागिक विवाद अधिनियम, 1947 मे परमानंट वर्कर की डेफिनिशन यह है कि, "Continuous worker means permanent worker." इसलिए मेरा यह अनुरोध है कि वर्कर की डेफिनेशन के बारे में स्पष्टीकरण होना चाहिए. मेरा यह सुझाव है कि चेक से वेतन देने की सुविधा का लाभ अस्थायी मजदूरों, हाथ ठेला चलाने वाले मजदूरों, दैनिक मजदूरी पर काम करने वाले मजदूरों को भी मिलना चाहिए. दूसरी बात यह है कि कृषि मजदूर तथा शुगरकेन कटिंग के मजदूरों को इस कानून से बाहर रखा गया गया है. इन मजदूरों को मिनिमम वेजेस एक्ट के अन्तर्गत सुविधाएं क्यों नहीं मिलनी चाहिए ? मेरा यह अनुरोध है कि इन मजदूरों को भी संरक्षण देने के बारे में विचार होना चाहिए. क्योंकि इन मजदूरों की संख्या बहुत बड़ी हैं. खेती पर काम करने वाले मजदूर, गन्ना तोड़ने के काम में लगे मजदूर, तेंदू पत्ते के काम में लगे मजदूरों का भी इसमें समावेश होगा या नहीं ? इन दो बातों के बारे में माननीय मंत्री जी जवाब देंगे तो अच्छा होगा. इतना कहकर मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

..... यानंतर श्रीमती दराडे यांचे भाषण

अशोधित प्रत / अशोधित प्रति

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे (विधान सभेने निवडलेल्या) : सभापती महोदय,माननीय कामगार राज्यमंत्र्यांनी जे विधेयक मांडलेले आहे त्याला पाठिंबा देत असतांना या विधेयकाच्या अंतर्गत काही बाबी स्पष्ट होणे आवश्यक असल्यामुळे त्या संदर्भात मी माझे विचार या ठिकाणी माडणार आहे.

सभापती महोदय, कृषी कामगार आणि ऊस तोड कामगार वगळून इतरांसाठी हे विधेयक आणले आहे अशा प्रकारचा उल्लेख माननीय मंत्री महोदयांनी हे विधेयक मांडत असतांना केलेला आहे त्यालाच माझा आक्षेप आहे.कामगार हा कामगारच असतो जो श्रम करतो तो कामगार असतो. जो रोजंदारीवर काम करतो तो कामगार असतो.कामगाराची व्याख्या करीत असताना या दोन्ही कामगारांचा त्यात सामावेश करणे आवश्यक आहे त्यामुळे या संदर्भात सुधारणा आणावी अशी माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे.

सभापती महोदय, किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी करीत असतांना असे दिसून येते की त्या कायद्याची अंमलबजावणी खऱ्या अर्थाने व्यवस्थितपणे होत नाही.कृषी क्षेत्रात कामावर जाणाऱ्या शेंतमजुराची मजुरी जर आपण पाहिली तर असे दिसून येईल की, महिला मजुरांना 50-60 -65 रुपये मजुरी दिली जाते. बीड जिल्हयात कन्स्ट्रक्शनच्या कामावर काम करणा-या महिला मजुरांना 140 रुपये मजुरी दिली जाते. कन्स्ट्रक्शनच्या कामावर सिमेंटची टोपली उचलण्याची ज्या महिलांची तयारी आहे त्यांना 140 रुपये मजुरी मिळू शकते.आणि पुरुषांना 200 रुपये मजुरी मिळू शकते. आपल्याकडे किमान आणि समान वेतन कायदा आहे तरी सुध्दा त्या कायद्याची अंमलबजावणी होत नाही तेव्हा या कायद्याची व्यवस्थित अंमलबजावणी करावी असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदयृ कृषी क्षेत्रात काम करणा-या कामगारांचे मोठया प्रमाणावर शोषण होत असल्यामुळे त्याचा सामावेश या कायद्यात करण्यात येऊन त्यांना संरक्षण द्यावे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मला ऊसतोड कामगारासंबंधी एक बाब निदर्शनास आणून द्यावयाची आहे. संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखान्यांना आणि ऊस उत्पादक शेतक-यांना जगविण्याचे काम ऊस तोड कामगार करीत आहे. बीड जिल्हयातून 4 ते 5 लाख कामगार उस तोड करण्यासाठी दरवर्षी बाहेर जात असतात हे कामगार फक्त पश्चिम महाराष्ट्रातच जातात असे नव्हे तर ते कर्नाटक आणि इतर राज्यातसुध्दा जात असतात. परंतु त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे ....

कामगारांची मोठया प्रमाणावर पिळवणूक होत असते.साखर कारखानदार मुकादमाबरोबर करार करतात आणि मुकादम कोयतेवाले म्हणून गाडीवाल्यांबरोबर करार करतात आणि अशा प्रकारे पती पत्नी दोघे मिळून ऊस तोडण्याचे काम करीत असतात. एका गोष्टीचा मला जरुर उल्लेख करावयाचा आहे की, ऊस तोड कामगार हा एकटा पुरुष म्हणूंन कधीही काम करीत नाही . या देशाच्या विकास प्रक्रियेमध्ये स्त्री आणि पुरुष खांद्याला खांदा लावून काम करतात त्या प्रमाणे श्रम करणारे ऊस तोड कामगार देखील स्त्री आणि पुरुष खांद्याला खादा लावून काम करीत असतात त्याचबरोबर शेंतमजुरांमध्ये स्त्री आणि पुरुष खांद्याला खांदा लावून काम करीत असतात त्यांच्या मजुरीच्या बाबतीत शासन कोणते संरक्षण देणार आहे ? ऊस तोड कामगारांना या कायद्यातून का वगळले गेले आहे.? ऊसाला तीन हजार रुपये भाव देण्यास शासन तयार आहे आणि ऊस तोड कामगारांना मात्र सरक्षण देण्यास शासन तयार नाही हे योग्य नाही. ऊस तोड कामगारांच्या मुलांना निवासी शाळा नाहीत त्यामुळे त्यांची पुढची पिढी बरबाद होईल.ऊस तोड कामगार श्रम करुन दोन वेळा पोटाची खळगी भरण्याचा प्रयत्न करीत आहेत त्यांना देखील कायद्याप्रमाणें संरक्षण का दिले जात नाही त्यांना या कामगारांच्या व्याख्येत त्यांचा समावेश का केला गेला

नाही ? हॉटेल कामगार ,घरेलू कामगार हे असंघटित कामगार आहेत त्यांचा समावेश या विधेयकामध्ये करण्यात यावा त्याचबरोबर ऊस तोड कामगारांवर वारंवार अन्याय केला जातो .तो दूर करण्याच्या दृष्टीने या कायद्याची व्याप्ती वाढवावी अशा प्रकारची भूमिका मांडून या विधेयकाला पाठिंबा देते आणि माझे भाषण संपविते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधान सभेने निवडलेल्या): सभापती महोदय, माननीय कामगार राज्य मंत्र्यांनी मांडलेल्या विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय,.असंघटित कामगाराच्या संदर्भात हे विधेयक मांडण्यात आलेले आहे. गेल्या आठवडयात असंघटित कामगाराच्या संदर्भात शासनाने एक निर्णय घेतला होता त्यावेळी मी प्रश्न उपस्थित केला होता की ज्या ठिकाणी सरकारच एम्प्लॉयर आहे तेव्हा त्या ठिकाणी कशा प्रकारे सरक्षण देण्यात येणार आहे ? यासंबंधी कोणत्याही प्रकाराच्या धोरणाची अंमलबजावणी केली जात नाही तेव्हा त्यासाठी एक कृती रुपरेषा ठरवून दर दोन तीन महिन्यांनी किंवा वर्षभरात अमुक अमुक कायदे बदलून त्याची अंमलबजलावणी कशा प्रकारे करण्यात येणार आहे हे शासनाकडून स्पष्ट केले जात नाही आणि एक एक तुकडा बदलावा त्याप्रमाणे एक एका कायदा बदलण्यात येत आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी जे विधेंयक मांडण्यात आलेले आहे त्याबाबतीत मला असे सांगावयाचे आहे की बॅकेमध्ये पैसे भरण्याची मूळ कल्पना वाईट नाही परंतु ड्रायव्हर्स किंवा मोलकरीण किंवा असंघटित क्षेत्रात काम करणारे वा लहान लहान दुकानात काम करणारे कामगार आहेत त्यांना तुटपूंजा पगार मिळतो. त्यांना तीन हजार रुपये पगार मिळत असेल तर तो शेवटच्या तारखेपर्यत शिल्लक राहत नाही. ब-याच कामगाराची अशी स्थिती असते की त्याचा पगार जर दहा तारखेला होणार असेल तर दहा तारखेपूर्वीच 500 ते 1000 रुपये त्याला घ्यावे लागतात वर्षातून पाच ते सहा वेळा त्याला अगोदरच पगाराचे पैसे घ्यावे लागतात लहान लहान मालक आणि संख्येने कमी असलेल्या कामगाराचा पगार चेकने देण्यासबंधी नियम केला आहे त्यासंबंधी मला असे सांगावयाचे आहे की, एका बाजूला जागृती वाढली आहे परंतु दुस-या बाजूला बॅकेत जाण्या येण्यासाठी 30-40 रुपये खर्च करावे लागतात तसेच वेळ देखील काढावा लागतो सन्माननीय सदस्य श्री किरण पावसकर यांनी सांगितल्याप्रमाणे लहान लहान आस्थापनेच्या जवळ बॅका आहेत काय आणि त्या बॅकेच्या वेळा सोयीच्या आहेत काय याचा विचार करण्याची गरज आहे. आज अनेक जण निरक्षर देखील आहेत.

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीत प्रत / मुद्रणेपूर्वी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

अशावेळी त्यांच्या पासबुकामध्ये एंट्री झाली आहे की नाही? हे पहाणे आणि नंतर पैसे काढणे या मागील हेतू जरी चांगला असला तरी त्यामधून अनेक प्रश्न निर्माण होतील. आज बिल्डींग कंस्ट्रक्शनमध्ये रोजंदारीवर काम करणारे परप्रांतातील मजूर आहेत. त्यांच्यासाठी सुध्दा आपण ही पध्दत लागू करणार काय? याचे कारण या धंद्यामध्ये काम करणारे शेकडो मजूर आहेत. त्या मजुरांच्या नावाने बँकामध्ये खाते काढावे लागेल. विशेषत: दाक्षिणात्य भागातील मजूर असतील, किंवा मराठवाडयाच्या ग्रामीण भागातून आलेले मजूर असतील त्यांचे खाते बँकेमध्ये काढून त्यांना पगार देण्यामध्ये खूप अडचणी येणार आहेत. अशावेळी मजुरांनी मालकाकडून बँकेतील एंट्री तपासून घेऊन पैसे भरले असे म्हणायचे, आणि पैसे काढले असे म्हणायचे. यामधून बँकेची औपचारिकता तयार होणार नाही? याकडे मला लक्ष वेधावेसे वाटते. त्यादृष्टीने हा तकलादू स्वरुपाचा कायदा आहे.

माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी कृषी कामगार, आणि ऊस तोडणी कामगारांना यामधून कां वगळण्यात आले? असा प्रश्न विचारला. त्या बाबत मला असे विचारावयाचे आहे की, रोजगार हमी योजनेच्या कामावर काम करण्या-या मजुरांसाठी आपण काय केले आहे? ते धनादेश स्वीकारण्यासाठी 17 कि.मी. अंतरावर जातील काय? जाणार असतील तरमग त्यांना आज आपण मजुरीचे रोख पैसे कां देतो? सभापती महोदय, मजुरांच्या मजुरीचे धनादेश हे अतिशय थोडया रकमेचे असतात. याबाबतीत मला असे वाटते की, आपण बँकाच्या सोयीसाठी हा निर्णय घेत आहोत की काय? यामधून बँकातील ठेवी वाढतील, बँकांचे टर्न ओव्हर वाढेल. याठिकाणी बँकेपासून या कामगारांना चांगल्या प्रकारची सेवा मिळेल या संदर्भात धोरण ठरविले पाहिजे. कागदोपत्री हा कायदा चांगला दिसत असला तरी त्याच्या अंमलबजावणीबाबत कोणतेही संरक्षण देण्यात आलेले नाही. त्यासाठी आपण धोरण आखणार नाही काय? त्यासाठी कामगार कल्याण निधीचा उपयोग करणार नाही काय? अशापध्दतीचे वेगवेगळे कायदे करीत असतांना माझ्या मनात अशी शंका येते की, ज्या हेतूने अधिकारी वर्ग अशाप्रकारचे कायदे घडवितो. ते घडवीत असतांना त्या बाबत अगोदरचा व नंतरचा संदर्भ पाहून योग्य पध्दतीने कायदा तयार करण्याच्या बाबतीत सातत्य राखले जात नाही. आणि त्यामुळे अशापध्दतीची धेडगुजरी विधेयके या सभागृहामध्ये संमत होतात असे मला याठिकाणी सांगावेसे वाटते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ SBT/

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2010 चें विधान परिषद विधेयक क्रमांक 5 वेतन प्रदान अधिनियम, 1936 आणि किमान वेतन अधिनियम, 1948, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता मांडण्यात आलेल्या विधेयकावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, औद्योगिक विवाद अधिनियम, 1947 याच्या कलम 25 ख मध्ये करारनिविष्ट केल्याप्रमाणे सलग सेवा झालेली असेल आणि ज्यास दरमहा रु.3000 किंवा त्यापेक्षा अधिक वेतन देत असलेल्या कामगारांना किमान वेतन देण्यासंदर्भात हे विधेयक आहे. परंतु याठिकाणी नुकत्याच सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पामध्ये किमान वेतन 100 रुपयांपासून 120 रुपये देण्याचा महाराष्ट्र सरकारने निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व मजुरांना मजूरी मिळणे आवश्यक आहे. कामगार म्हणजे मजूर,आणि मजूर म्हणजे कामगार ही व्याख्या करीत असतांना कृषी कामगार,ऊस तोडणी कामगारांना यामधून वगळण्यात आले आहे. ऊस तोडणीचे काम करणाऱ्यांना कामगारांना कसे वेतन मिळते?. त्यांना वेतन साप्ताहिक मिळते की मासिक मिळते? हा खरा प्रश्न आहे. त्यांना साप्ताहिक वेतन मिळत असेल तर त्यांना बँकेमार्फत पेमेंट करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. परंतु जे रजिस्टर्ड कामगार असतील किंवा एखाद्या मालकाने त्यांना कामावर ठेवले असेल आणि त्यांना 3 हजार रुपये किंवा त्यापेक्षा जास्त वेतन मिळत असेल तर त्यांना धनादेशच्या माध्यमातून वेतन देणे बराबर आहे. यामध्ये बँकेमधून व्यवहार करीत असतांना ज्या समस्या उदभवतात याची सर्वांना माहिती आहे. राज्य सरकारची विधवांकरिता असलेली पेन्शन योजना, किंवा राज्याच्या अन्य योजनांमधून दिले जाणारे धनादेश बँकेमार्फत दिले जातात. त्यावेळी त्यांना अनेक प्रकारचा त्रास सहन करावा लागतो हे त्यांनाच माहीत आहे. 500 रुपयांचा एक धनादेश घेण्यासाठी त्यांना संपूर्ण दिवस खर्च करावा लागतो. ते वेतन घेण्यासाठी हा कामगार दिवसभराचे काम सोडून त्याठिकाणी जाणार आहे काय? हा खरा प्रश्न आहे. म्हणून ही बॅकेची पध्दत चांगली असली तरी त्यामुळे होणारा खर्च आणि होणारे श्रम वाया जाणार आहेत. त्याचप्रमाणे बँकेतून पेमेंट करीत असतांना ज्याप्रमाणे कर्मचा-यांकडून व्यवसाय कर कापून धेतला जातो, त्याप्रमाणे बॅंकेमार्फत व्यवसाय कराची रक्कम कापून घेऊन बाकीचे पैसे त्यांच्या खात्यात जमा होणार आहेत काय? अशाप्रकारचे अनेक प्रश्न यामध्ये आहेत. आणि म्हणून हा कायदा बनवीत असतांना फक्त बँकेचा विचार करण्यात आला आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

पण अन्य कोणत्याही सुविधांच्या बाबतीत विचार करण्यात आलेला नाही. तसेच याबाबतीत कोणत्याही प्रकारचे नियम नाहीत आणि त्यासाठी कोणत्याही प्रकारचे प्राविधान नाही. जेणेकरुन लोकांना समजू शकेल की, असे-असे होऊ शकेल आणि त्यासाठी असा-असा नियम राहील. पण तसे यामध्ये काही नाही. आम्ही असे समजतो किंवा आमची अशी व्याख्या आहे की,कामगार म्हणजे काम करणारा गडी.मग तो शेतामध्ये करणारा असेल किंवा वेअर हाऊसमध्ये काम करणारा असेल किंवा एम.ए.डब्ल्यु.सी.काम करीत असो. याबाबतीत उदाहरण द्यावयाचे तर वर्ध्या येथे रेल्वेच्या माल धक्क्यावर काम करणारे जे हमाल आहेत, त्यांना एका कट्टयाला सहा रुपये मिळतात. येथे जी हमाली मिळते, तशी ती कुठेही मिळत नाही. ते मस्त कारमधून सुटाबूट घालून टाय लावून येतात. त्यांच्या जवळ मोबाईल देखील असतो, अशा कामगारांच्या बाबतीत शासनाने कोणता विचार केलेला आहे हा खरा प्रश्न आहे. कारण सर्व महाराष्ट्रात कामगारांच्या बाबतीत एक पॉलिसी असावयास पाहिजे. सध्या तशी ती असल्याचे दिसून येत नाही. याठिकाणी अशा प्रकारचे विधेयक आणत असताना याबाबतीत देखील विचार करावयास पाहिजे की, रेल्वेच्या मालधक्क्यावर काम करणारा माणूस गावामध्ये सामान्य दुकानांवर काम करणारा कामगार यांच्या संदर्भातील व्याख्या देखील यामध्ये असावयास पाहिजे. जर हे विधेयक फॅक्टरीमध्येच काम करणाऱ्या कामगारांच्या संबंधातील असेल तर आम्ही त्याबद्दल समाधान मानून घेऊ शकतो, पण संपूर्ण महाराष्ट्राचा विचार करावयाचा असेल तर संपूर्ण कामगारांच्या बाबतीत यामध्ये विचार होणे आवश्यक आहे. तशा प्रकारची सुधारणा करण्याची गरज आहे. कामगारांना चेकव्दारे पेमेंट देणे ही चांगली गोष्ट आहे. पण त्यामध्ये देखील भ्रष्टाचार होणार नाही असे नाही. कारण मालकाने कामगाराला चेक दिल्यानंतर, तो बँकेतील खात्यामध्ये जमा केला आणि मालक त्याला सांगितले की, तुझे चेकबुक घेऊन ये. या स्लिपवर सही कर, असे होऊ शकते. डी.एड., बी.एड.च्या शिक्षकांच्या बाबतीत असे प्रकार होत आहेत. भ्रष्टाचार मोठया प्रमाणात होत आहे की, शासनाने कामगारांना जरी वेतनाबाबत चेक दिला तरी हा प्रश्न संपणार नाही. म्हणून याठिकाणी जे विधेयक सादर केलेले आहे, ते व्यर्थ आहे असे मला सांगावयाचे आहे. त्यामुळे मी या विधेयकाला विरोध करीत आहे. धन्यवाद.

. . . .4 आय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, हे विधेयक वाचल्यानंतर असे दिसून आले की, यामध्ये सुधारणेला खूप वाव आहे. मात्र एका गोष्टीचे स्वागत केले पाहिजे की, शासनाने कामगारांना त्यांचे वेतन बँकेमार्फत मिळावे यासाठी एक पाऊल पुढे टाकण्याच्या बाबतीत प्रयत्न केलेला आहे. पण सन्माननीय सदस्या आदरणीय श्रीमती उषाताई दराडे यांनी उल्लेख केला की, यामधून ऊस तोडणी कामगारांना वगळण्यात आलेले आहे आणि एका अर्थाने हा त्याच्यावर केलेला अन्याय आहे. तसेच शेतामध्ये काम करणाऱ्या कामगारांना वगळणे हाही अन्याय आहे. त्याच बरोबर या विधयेकामध्ये कामगारांच्या सगळया संवर्गाचा समावेश असल्याचे दिसत नाही हे देखील मला निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. याबाबतीत उदाहरण द्यावयाचे तर धुणी-भांडी करणारी बाई एखाद्या घरामध्ये दोन तास काम करते आणि तिला पूर्णवेळ कामगार असे म्हटले जात नाही. तिला आपण एका अर्थाने तासिका तत्वावर काम करणारी असे म्हटले तर हरकत नाही. तिला कसा न्याय देता येईल याचा विचार केला पाहिजे. काही ठिकाणी हंगामी म्हणजे महिना-दोन महिन्यासाठी हंगामी कामगार असतात, अर्धवेळ कामगार असतात, त्यांचाही यामध्ये कसा समावेश करता येईल याचा विचार केला पाहिजे. शासनाने या विधेयकामध्ये तीन हजाराची डेड लाईन घातलेली आहे म्हणजे तीन हजार रुपयांपेक्षा जास्त वेतन घेणाऱ्या कामगारांनाच चेक व्दारे पेमेंट देण्यात येणार आहे. पण काही ठिकाणी कामगारांना वर्षानुवर्षे एक हजार, दोन हजार रपयांवर राबवून घेतले जात आहे. त्यांना सुध्दा यामध्ये कसे समाविष्ट करुन घेता येईल यादृष्टीनेही विचार करण्याची आवश्यकता आहे. एकूण जो कोणी श्रमजीवी आहे मग ते बौध्दिक श्रम असतील, शारीरीक श्रम असतील तर अशा वेळी त्या व्यक्तीला त्याच्या कामाचे दाम नेमकेपणाने मिळाले पाहिजे. त्याबाबतीत त्याला हमी प्राप्त झाली पाहिजे अशा प्रकारे सुधारित स्वरुपामध्ये आणि सर्व कामगारांना समाविष्ट करणारे विधेयक दुरुस्ती करुन सदनामध्ये सादर केले तर ते चांगले होईल, ते अधिक स्वागतार्ह असेल. आता आपण एक फसवे समाधान मानुन घेऊ की, आम्ही कामगारांसाठी काही केले. पण प्रत्यक्षात कामगारांना मिळणारा लाभ कमी असेल ही बाब लक्षात आणून देऊ इच्छितो.

सभापती महोदय, दुसऱ्या एका बाबीकडे लक्ष वेधून मी माझे भाषण संपविणार आहे. आपण महाराष्ट्रामध्ये गेल्या दहा वर्षामध्ये कामगारांच्या बाबतीत एक वेगळी प्रणाली प्रस्थापित केलेली आहे. त्याला कॉन्ट्रॅक्ट प्रणाली असा शब्द वापरु या, म्हणजे एखाद्या आस्थापनेमध्ये नव्याने नेमणूक

. . . .4 आय-3

श्री.भगवान साळुंखे . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

न करता तेथील काम कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने केले जाते. या कामाचे टेंडर काढले जाते. कॉन्ट्रॅक्टरला सांगितले जाते की, हे 100 मानवी हातांचे काम आहे आणि ते अमुक इतक्या कालावधीमध्ये पूर्ण करावयाचे आहे. मग दरडोई प्रत्येक दिवसाला 100 रुपये प्रमाणे टेंडर दिले आणि जर 200 लोकांचे काम असेल तर 200x100 एवढा पैसा कॉन्ट्रॅक्टरला द्यावयाचा. परंतु कॉन्ट्रॅक्टर या कामासाठी त्याला पाहिजे त्या लोकांची नेमणूक करतो आणि या कामगारांना तो 100 रुपयाप्रमाणे 50,100 रुपये देतो आणि राहिलेले पैसे कॉन्ट्रॅक्टर घेतो. त्या कॉन्ट्रॅक्टरने केलेल्या श्रमाचा त्याला थोडा जास्त मेहनताना द्यावा हे समजू शकतो. पण कामगाराच्या नावाने जेवढी रक्कम खर्च केली जाते, ती प्रत्यक्षात त्याच्या हातामध्ये दिली जात नाही.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे ....

म्हणजे एका अर्थाने त्यांच्या श्रमाचा गैरवापर करतात. यामध्ये जी यंत्रणा निर्माण केलेली आहे तिला कसे कव्हरेज देता येईल, त्यांचा अंतर्भाव बॅकेमार्फत पगार देण्यामध्ये कसा करता येईल यादृष्टीने सुधारणा करणे आवश्यक आहे. हे सर्व लक्षात घेता जे बिल आपण सादर केलेले आहे त्यामध्ये एक चांगली इच्छाशक्ती आपल्या मनामध्ये निर्माण झालेली आहे. बेटर लेट दॅन नेव्हर याप्रमाणे थोडासा उशीर झाला तरी चालेल पण हे सर्व कव्हरेज देऊन बिल सादर केले गेले तर श्रमजीवी कामगाराला न्याय दिला असे होईल. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पद्माकर वळवी (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, या विधेयकावरील चर्चेत भाग घेताना सन्माननीय सदस्य श्री सय्यद जमा, ॲड. उषाताई दराडे, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री किरण पावसकर, रामनाथ मोते, भगवान साळुंखे तसेच केशवराव मानकर या सर्व सन्माननीय सदस्यांनी काही महत्वाचे मुद्दे उपस्थित केले तसेच काही बाबी निदर्शनास आणल्या. हे बिल आणत असताना जे संघटित क्षेत्रामध्ये काम करणारे कामगार आहेत, जे असंघटित क्षेत्रात काम करणारे कामगार आहेत त्यामध्ये काही कामगारांचा पगार 3 हजार रुपयांपेक्षा कमी आहे अशा कामगारांचे काय करणार असा मुद्दा उपस्थित करण्यात आला. सध्या या विधेयकामध्ये जी दुरुस्ती आणलेली आहे ती संपूर्ण महाराष्ट्राला लागू करीत आहोत. यामध्ये सलग सेवा गृहीत धरलेली आहे. ते परमनंट कामगार असतील असे काही नाही. परंतु जे नियमित कामगार आहेत, वर्षाच्या 365 दिवसांपैकी 240 दिवस जे कामगार काम करतात त्या नियमित कामगारांना हे लागू आहे. यामध्ये जे हंगामी कामगार सहा महिन्यांमध्ये 120 दिवस काम करतात त्यांनाही यामध्ये कव्हर केलेले आहे. ज्यावेळी सलग सेवेचा 3 हजार आणि त्यापेक्षा जास्त पगार असेल त्यांच्यासाठी संपूर्ण महाराष्ट्राकरिता हे लागू केलेले आहे आणि ठाणे जिल्हा प्रायोगिक तत्वावर घेतलेला आहे त्यामध्ये 3 हजार रुपयांपेक्षा कमी पगार असेल आणि सलग सेवा नसली तरी ठाणे जिल्ह्यामध्ये त्यांना हे लागू करीत आहोत. त्यानंतर टप्प्याटप्प्याने अधिसूचित करुन संपूर्ण महाराष्ट्रात लागू करु. हे प्रायोगिक तत्वावर आहे. ही योजना अत्यंत चांगली असून त्याचे आपण स्वागत करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी अशी शंका व्यक्त केली की, जे सामान्य कामगार आहेत त्याला बँकेची सेवा माहीत आहे की नाही ? बँक त्याला सहकार्य करणार की नाही ? यामध्ये तसे होणार नाही. कामगार विभागाने किमान वेतन अधिनियम आणि वेतन प्रदान अधिनियमाच्या अंतर्गत कामगारांचे जे देणे देण्यात येणार आहे त्याच्या संगणकीकरणाची कार्यवाही पूर्ण केलेली आहे. संगणकीकरणासाठी टेंडर सुध्दा काढलेले आहे. ज्या बँका यामध्ये सहभागी होणार आहेत त्यामध्ये असंघटित क्षेत्रासाठी एकच बँक निश्चित करणार आहोत. संघटित क्षेत्रासाठी त्या त्या ठिकाणी कामगार संघटना व्यवस्थापन करतात त्यांना जी बँक सोयीची असेल त्या बँकेत खाते उघडू

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पद्माकर वळवी ....

शकणार आहेत. या संगणकीकरणामध्ये अतिशय पारदर्शकता राहणार आहे. या कामगारांना न्याय मिळावा, ज्यांना आपण कामगार म्हणतो त्यांचे शोषण थांबावे यासाठी हे केलेले आहे. यातून कामगारांचे शोषण थांबणार आहे. खाते उघडण्यासाठी त्या एखाद्या कामगारांची ओळख कोण देईल असा मुद्दा उपस्थित करण्यात आला. पण असे होणार नाही. व्यवस्थापन, कामगार संघटना तसेच मालक संघटनेने याबाबतीत सपोर्ट दिलेला आहे. सर्वांनी त्याचे स्वागत केलेले आहे संघटित क्षेत्रातील अनेक संघटनांनी स्वागत केले आहे. मालक संघटनांनी सुध्दा स्वागत केले आहे. यामध्ये ज्या बँका आम्ही निश्चित करणार आहोत त्यांनी बिझनेस करस्पांडंस नेमण्याचे निश्चित केले आहे. कामगारांचे खाते उघडून देणे, त्यांना देणे दिले जाते की नाही याबाबतीत कामगार विभाग लक्ष देणार आहे. यामध्ये दोन किलोमीटरच्या परिसरात बिझनेस करस्पांडंस राहणार आहे. या अनुषंगाने वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये जे कामगार आहेत त्यांना न्याय कसा देता येईल यादृष्टीने प्रयत्न करणार आहोत.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पद्माकर वळवी.....

यामध्ये बायोमेट्रिक योजना लागू होत आहे. त्यामुळे कोणताही भ्रष्टाचार होणार नाही, भ्रष्टाचार रोखला जावा यासाठी ही सेवा सुरु करीत आहोत.

सभापती महोदय, याठिकाणी शेत मजुरांच्या संदर्भात मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. ऊस तोड मजुरांना यामध्ये का समाविष्ट करण्यात आले नाही, शेत मजुरांना का समाविष्ट करण्यात आले नाही, घरगुती कामगारांना का घेतले गेले नाही असे विचारण्यात आले. परंतु शेत मजूर हंगामामध्ये काम करीत असतात, ऊस तोड कामगार हंगामामध्ये काम करीत असतात, घरगुती कामगारांचे मालक निश्चित नसतात. वैयक्तिक स्वरुपाचे मालक असतात. या कामगारांचे क्षेत्र वेगळे असले तरी भविष्यामध्ये या कामगारांसाठी देखील तरतूद केली जाईल. ही योजना यशस्वी झाल्यानंतर या क्षेत्रातील कामगारांना ही योजना लागू करणार आहे. शेत मजुरांसाठी स्वतंत्र योजना सुरु करण्यासाठी शासन विचार करीत आहे. माथाडी मंडळ, सुरक्षा मंडळ अशी वेगवेगळी मंडळे आहेत त्यांच्यासाठी स्वतंत्र मंडळे तयार करीत आहोत. त्या मंडळांमध्ये मजुरांची नोंदणी होईल, त्या कामगारांना सुध्दा न्याय दिला जाईल. ऊस तोड कामगारांसाठी स्वतंत्र मंडळ तयार केले जाईल. त्यांच्यासाठी स्वतंत्र योजना सुरु करण्याची कार्यवाही सुरु आहे, त्याबाबत प्रस्ताव मागविला आहे. त्यामुळे या कामगारांची नोंदणी होईल आणि त्यांनाही ही बँकिंग सेवा लागू होईल. घरेलु कामगार ॲक्ट तयार केलेला आहे. या कामगारांची या मंडळामध्ये नोंदणी झाल्यानंतर त्यांना ही योजना लागू होईल. या सर्वांना काम देऊ. सभापती महोदय, किमान वेतन अधिसूचनेबाबत किमान वेतन कायदा अंतर्गत ते उद्योग अधिसूचित केलेले आहेत ते निश्चित आहेत. ज्यांना ज्यांना 3 हजार रु. वेतन आहे त्यांना ही योजना लागू केली आहे. ज्यांचे वेतन 3 हजार रुपयांपेक्षा कमी आहे त्यांना पुढील काळामध्ये ही योजना लागू केली जाईल. याबाबत अंतिम निर्णय झाल्यानंतर ते लागू होईल. या विधेयकामध्ये करण्यात आलेली तरतूद म्हणजे एक क्रांतिकारक निर्णय आहे. या तरतुदीचे कामगार संघटनांनी, मालक वर्गांनी, लोकप्रतिनिधींनी, सर्व क्षेत्रातील लोकांनी स्वागत केले आहे. मी सभागृहाला विनंती करतो की, हे विधेयक एकमताने मंजूर करण्यात यावे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3, विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.प.वि.क्रमांक 5 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : सन 2010 चे वि.प.वि.क्रमांक 5 संमत झाले आहे.

3....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

<u>अर्धा- तास चर्चासंबंधी</u>

तालिका सभापती : आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या दोन्ही अर्धा तासाच्या चर्चा पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 13 एप्रिल, 2010 रोजी दुपारी 12 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 7 वाजून 4 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 13 एप्रिल 2010 रोजीच्या दुपारी 12 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही